म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय आ०वा.
दा. क्र. ५८७१८



IRBK-0105715
IRBK-0105715

नाथमाधवकृत

# स्वराज्याचा श्रीगणेशा

संक्षिप्त आवृत्ति

[redacted]
IRBK-0105715
IRBK-0105715

संक्षेपक : ग. वि. अकोलकर

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणें २.

प्रकाशक :
अ. अं. कुलकर्णी
कॉंटिनेंटल प्रकाशन
१९६।१९ सदाशिव, पुणें २.

☆

प्रथमावृत्ति १९५२
पुनर्मुद्रण १९५६
पुनर्मुद्रणाचे सर्व हक्क प्रकाशकाकडे
किंमत दीड रुपया

☆

मुद्रक :
दा. त्र्यं. जोशी,
बी. ए. (टिळक),
चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें २.

## ‘ श्रीगणेशा ’ लिहिण्यापूर्वी—

कुमार-दशा म्हणजे अद्भुत-रम्यतेच्या व साहसाच्या आवडीचा काळ. गुप्त हेर हे कुमारांचे जानी दोस्त. भुयारें, वेषांतरें, चोर-दरवाजे या साऱ्यांचेंच आकर्षण या काळांत असतें. वीरतेचें मानसोपचारें पूजन ह्या वेळीं होत असतें. विभूतिपूजा मूळ धरूं लागते व ध्येयनिष्ठतेचा पायाहि ह्या वयांत घातला जातो. ऐतिहासिक कादंबऱ्यांनीं ही भूक भागेल, इतकेंच नव्हे तर सात्त्विक व नीतिमय विचारांचें त्यांतून पौष्टिक अन्न मिळून मनें सकस व तेजस्वी बनण्यास साहाय्यच होईल !

मराठी राज्याच्या स्थापनेपासून अंतापर्यंतचा साराच कालखंड हा महाराष्ट्रीयांच्या गौरवाचा तसाच अभिमानाचा व प्रेमाचा विषय आहे. आपल्या देशाच्या इतिहासांतील हें पर्व डोळस देशाभिमान वाढविण्यास व आपल्या अपयशांची व उणीवांची जाणीव करून देण्यास नेहमींच उपयोगी पडणारें आहे.

कै. नाथमाधवांनीं या कालखंडावर लिहिलेली त्यांची ‘ स्वराज्या ’-वरील कादंबरी-माला इतिहासाशीं शक्य तितकी इमानदारी राखून गुंफलेली आहे. म्हणून नाथमाधवांच्या, मराठ्यांच्या रोमहर्षच्या इतिहासा-वरील, ‘ स्वराज्या ’च्या या साऱ्या कादंबऱ्या विद्यार्थ्यांच्या जोगत्या करून घेऊन त्या प्रकाशित करण्याचें आम्हीं ठरविलें आहे.

संक्षेप करतांना, हीं संक्षिप्त रूपें मूळाइतकींच चटकदार होतील व त्यांतील ध्येय-प्रवणता व प्रसंग-स्वभाव रेखनांतील भव्योदात्तता कोणत्याहि प्रकारें कमी होणार नाहींत अशी काळजी घेऊन तयार केलीं आहेत.

प्रस्तुत कादंबरीचा काळ १६४६ च्या थोडासा पूर्वींचा आहे. तरुण शिवाजी, अन्यायाविरुद्ध बंड करून उठणाऱ्या आपल्या तरुण सवंगड्यांच्या

साहाय्यानें स्वराज्याचा श्रीगणेशा कसा करतो ह्याचें ओजस्वी व तितकेंच हृदयंगम वर्णन या कादंबरींत आलेलें आहे. शिवाजी व त्याचे सवंगडी, नेताजी, आबाजी यांचीं केव्हां वेषांतरानें तर केव्हां केव्हां उघड स्वरूपांत केलेलीं साहसें तरुण मनाला रोमांचित करतील अशींच आहेत. मातृवत्सल पण धीरगंभीर जिजाई, सालस व प्रेमळ येसूबाई, नवध्येयांनीं आकृष्ट होणाऱ्या व त्यासाठीं धडपडणाऱ्या सुमित्रा व निर्मला या तरुणी—या साऱ्यांचीं चित्रें मोहक आहेत. मुख्यतः शिवाजीच्या मनांतील पारतंत्र्या-विरुद्ध असलेलें वादळ, अन्यायाची चीड, स्वातंत्र्याबद्दलची तळमळ, अखंड उद्योग व त्याचबरोबर त्याच्या ठायीं असलेली परधर्मसहिष्णुता, सदाचरण, दूरदर्शीपणा व स्वतःच्या अनुयायांबद्दल कळकळ आणि प्रेम यांचा उत्कृष्ट संस्कार वाचकांवर सहज व्हावा हें या कादंबरीचें वैशिष्ट्य आहे.

‘स्वराज्या’च्या या संक्षित आवृत्त्यांचा ‘श्रीगणेशा’ श्री. ग. वि. अकोलकर यांनीं केला आहे इतकें सांगितलें म्हणजे त्याचा वळणदारपणा निराळा वर्णन करावयास नको.

—प्रकाशक

अनुक्रमांक ... २०००
दिनांक ... २-४-९८
क्रमांक
नों. दि.

# १. गूढ उकललें !

सायंकाळची ती मनाला आल्हाद देणारी वेळ होती. सूर्य आपला दिनक्रम संपवून विश्रांतिसुखाकरितां अत्यंत त्वरेनें धांवपळ करीत करीत चालला होता. धांवून धांवून दमल्यामुळें त्याची प्रभा मलूल झालेली होती आणि इतका वेळ स्वच्छंदानें चरत असलेलीं जनावरें आपल्या कोंडवाड्यांत जाण्याकरितां धन्याच्या शब्दाची वाट पाहात कान टंवकारून असलेलीं दिसत होतीं. त्या असंख्य जनावरांकडे एकाग्र चित्तानें पाहात असलेला एक तरुण बाजूलाच एका झाडाच्या आड उभा होता. त्या तरुणाच्या अंगावर कोणताहि अलंकार नव्हता, किंवा त्याचा पोषाख वर्णन करण्यासारखा बहुमोलहि नव्हता. नाहीं म्हणायला त्याची शरीरसंपत्ति मात्र वर्णन करण्यासारखी होती खास !

बराच वेळ शेतांतील त्या गाईकडे आणि त्यांच्या सभोंवतालीं घोळका करून असलेल्या वासरांकडे पाहिल्यावर साहजिकच त्या तरुणाच्या डोक्यांत एक विचार आला. सर्व जनावरें इतक्या आतुरतेनें पण प्रसन्न चित्तानें कान टंवकारून कुणाची मार्गप्रतीक्षा करीत आहेत, हें त्याच्या लक्षांत येईना.

थोड्या वेळानें पांव्याचा कर्णमधुर आवाज ऐकूं येऊं लागला. त्याबरोबर क्षणार्धांत त्याला एक अत्यंत हृदयंगम दृश्य दिसलें. अहाहा ! श्रीकृष्णानें आसमंतांतील हजारों गाईवासरांचे प्राण आपल्या मुरलींत कसे एकवटून ठेवले होते, याची साक्ष त्याला त्या पांव्याच्या कर्णमधुर आवाजाबरोबर तीं सर्व उधळलेलीं जनावरें पाहून पटली. हें आल्हाद-जनक दृश्यचित्र पाहून त्याला कल्पनातीत आल्हाद झाला.

पांवा वाजविणारा एक मध्यम वयाचा गुराखी होता. वासरें त्याच्या सभोंवतीं जमतांच त्या गुराख्यानें मोठ्या प्रेमानें कित्येक वासरांच्या

पाठीवरून हात फिरविला, लडिवाळपणानें कित्येक गाईंची पाठ थोपटली आणि कित्येक लहान वासरांचे मटामट मुके घेत त्यानें विचारलें, " प्वाट भरलं का माझ्या वासरांनो ? "

" चला कीं आतां घरला.—रात आहे अंधारी. खाटीक, च्चार आतां हिंडाया पडत्याल कीं बाहेर ! "

" खाटीक-चोरांच्या भीतीनं तूं हीं गाईवासरं आतां कुणीकडे नेऊन ठेवणार ? "

" तूं कोन र इचारनार बाबा ? रातचा काई इचार विचार हाय वाटतं तुझा ? पन संभाल बरं, गोफणधोंड्यांखालीं मरशील हकनाक ! "

" म्हणजे ?—मी कुणी चोर किंवा खाटीक आहें असं तुला दिसतं कीं काय ? "

" दिसाया कशापाई हावं ? दिसतं तसंच त्यें असावं, असं थोडंच हाई ? फल दिसाया चांगलं ग्वाड दिसतं, पन मंदी आंबट निघतं ना ? "

" खरं आहे ! किती लाख रुपयांची गोष्ट बोललास तूं ! " असें म्हणून त्या तरुणानें आपल्याजवळ असलेल्या एका सुंदर ढवळ्या गाईच्या पाठीवरून हात फिरविला. गाईनें मुकाट्यानें त्याला आपल्या पाठीवर हात फिरवूं दिला. गुराख्याचें लक्ष होतें. तो क्षणभरानें म्हणाला, " दादा, मी म्हंगलों म्हनूनश्यान तुला राग तर नाहीं ना आला ? "

" राग ? कशाबद्दल ? आणि तूं मला राग येण्यासारखं काय म्हणालास ? पण मी चोर नाहीं, याबद्दल इतक्यांत तुझी खात्री कशी झाली ? कशावरून मी चोर नाहीं ? "

" तें व्हय ?—" त्याच ढवळ्या गाईच्या पाठीवर थाप मारून हांसत तो गुराखी म्हणाला, " ह्या माझ्या ढवळीनं मला आतां सांगितलं कीं ! "

" ह्या गाईनं ? ह्या गाईनं तुला सांगितलं ? आणि तें केव्हां—आणि तें कसं ? " आश्चर्यानें त्या तरुणानें विचारलें.

" आतां न्हव का त्वां ह्या ढवळीच्या पाठीवरून हात फिरवला ? तवां तिनं आंग थरारलं न्हाई कीं त्वांड बी फिरवलं न्हाई ! च्वाराचा हात जनावरं झट्‌किनी ओळखत्यात. खाटकाला दुरून बघुनश्यान डोळ्यांत पानी आनत्यात, आन् ओरडायाबी लागत्यात. "

" असं काय ? एकंदरीनं मी खाटीक नाहीं किंवा चोरहि नाहीं, ही तरी तुझी खात्री झाली म्हणायची !—काय जनावरांची अक्कल आहे पाहा ! त्या दयाळू परमेश्वरानं इतकी बुद्धि जनावरांतसुद्धां ठेवली आहे ना ? धन्य आहे त्याच्या अजब कर्तृत्वाची ! बरं पण, आतां हीं जनावरं घेऊन तूं जाणार कुठं ? "

" कोंडवाड्यांत. "

" कोंडवाड्यांत ?—काय म्हणतोस ?—कोंडवाड्यांत ? " त्या तरुणाला इतकें आश्चर्य कां वाटलें ?

बोलतां बोलतां तो तरुण एकाएकीं गप्प झाला. त्याच्या डोक्यांत स्वतःबद्दल विचार येतांच तो क्षणार्धांत त्या विचारांत इतका गर्क झाला कीं, पुष्कळ वेळ झाला तरी तो कांहींच बोलत नाहीं असें पाहून गुराखी म्हणाला, " बरं दादा, दीस चालला आतां खालीं; आम्ही जातों आमच्या घरला. " असें म्हणून त्यानें आपल्या गाईंना वळविलें. तो पांवा वाजवीत आपल्या लाडक्या जनावरांबरोबर रमत रमत जाऊं लागला.

आमच्या तरुणाच्या डोक्यांत मात्र विचारांचें भयंकर काहूर माजलें होतें. तें डोक्यांत मावेनासें होऊन आतां त्याच्या नकळत मुखावाटे एक विचार शेवटीं बाहेर येऊं लागला.

' मी कोंडवाड्यांतून सुटावं म्हणून कितीतरी धडपड करीत होतों; अखेर बाबासाहेबांच्या रोषाला आणि मासाहेबांच्या दुःखालाहि कारण झालों ! पण इतकं मीं कां केलं ? बाबासाहेबांनीं मला मुद्दाम आपणाजवळ राहण्याकरितां बोलाविलं होतं ना ? मला तिथं सर्व गोष्टी अनुकूल होत्या. सर्व प्रकारचं सुख मला तिथं मिळत असतां माझ्या मनाची बेचैन स्थिति कां झाली होती ? एखाद्या कोंडवाड्यांत कोंडल्याप्रमाणं मला तिथं कां वाटत होतं ?—छे ती गढी आमची आहे. मुद्दाम बाबा-

साहेबांनीं तो वाडा तयार करून आपल्या सुखसोयींप्रमाणं तें घर बांधलं आहे. तें आमचं घर कोंडवाडा नाहीं—घर आहे. कोंडवाडा नाहीं म्हणावं तर तें घर सोडून निघाल्यावर ही विजापूरची सरहद्द सोडतांच मला आनंद कां झाला ?........

छेः ! नक्कीच—तो कोंडवाडाच होता ! घर नव्हतं. त्या कोंडवाड्यांतून सुटलों म्हणूनच मला हा आनंद झाला !! मग कोंडवाड्यांत जाण्याकरितां तीं वासरं—त्या गाई इतक्या उत्सुक कशा झाल्या ? कोंडवाड्यांत कोंडून घेण्यांत त्यांना सुख कां वाटतं ? तीं जनावरं आहेत, त्यांना कळत नाहीं असं म्हणावं, तर चोराचा हात त्यांना चटकन् कळतो, खाटीक दृष्टीला पडतांच त्यांच्या डोळ्यांत पाणी येतं, श्वापदाचा उग्र वास येऊं लागतांच तीं पळूं लागतात, इतकं त्यांना कळतं. मग हेंच त्यांना कळत नाहीं, असं कसं म्हणावं ? कोंडवाडा आहे हें कळूनहि तीं जनावरं आनंदानं तिथं जातात, यांत कांहीं तरी गूढ असलं पाहिजे........

आतां सुटलं हें कोडं !—असंच असलं पाहिजे खास ! त्या जनावरांना कोंडवाड्यांत ठेवणारा त्यांचा धनी—तो गुराखी—त्या सर्वांचाच पालनकर्ता आहे. चोरांनीं चोरूं नये म्हणून तो त्यांचं रात्रं-दिवस रक्षण करीत असतो. खाटकांच्या हातीं तीं जाऊं नयेत म्हणून तो डोळ्यांत तेल घालून पाळत ठेवतो. तसंच त्यांच्या चाऱ्यापाण्या-करितां तो स्वतःला सर्व दिवसभर उन्हातानांतून सारखं कष्टवितो. तो त्यांच्याच संरक्षणाकरितां मुद्दाम बांधलेला कोंडवाडा खास नव्हे ! मी तरी त्याला कोंडवाडा म्हणणार नाहीं. जनावरांचं आनंदानं, सुखानं आणि निर्भय चित्तानं विश्रांति घेण्याचं तें खरं घर आहे, आणि बाबा-साहेब ज्याला घर, वाडा आणि गढी म्हणतात, तोच खरा कोंडवाडा आहे हेंच खरं ! गुरांचे धनी, पालक—ते गुराखी—त्यांचं रक्षण करणारे खरे धनी आहेत आणि बाबासाहेबांचे धनी, ते विजापूरचे सत्ताधीश बादशहा, बाबासाहेबांचं रक्षण करणारे—त्यांचा प्रतिपाळ करणारे नसून लहर फिरतांच त्यांच्या मानेवर सुरी ठेवणारे—खरेखुरे खाटीकच आहेत होय, असंच—पण बाबासाहेबांना हें कसं बरं कळत नाहीं ? मला

कोडं उलगडून जसा आतां आनंद झाला आहे, तसंच बादशहा हा कोण आहे, हें जर त्यांना कळलं असतं, तर माझ्यासारखे ते विजापुरांत एक क्षणभरहि राहते ना! खरंच, हें कोडं जर मला त्या वेळीं उलगडलं असतं, तर बाबासाहेबांना माझ्या मनाची तळमळ मला कितीतरी स्पष्ट रीतीनं सांगतां आली असती...........

त्या गुराख्यानं—एका गांवढळ माणसानं—आज मला एक गोष्ट शिकविली, इतकंच नाहीं तर त्या मुक्या जनावरांनीं माझ्या मनाची तळमळ शांत केली. गोमाताच ती! मुलाला शिक्षण देणं हा आईचा धर्म आहे. हे गोमाते! तुझ्या संरक्षणाकरितां, तुझ्या चारापाण्याकरितां मी माझ्या देहाची, प्राणाचीहि पर्वा करणार नाहीं, हीच माझी प्रतिज्ञा!"

असें म्हणून गोमातेला नमस्कार करण्याकरितां त्यानें हात जोडले; परंतु त्याच्यापुढें असलेलें तें गाईचें खिल्लार घेऊन तो गुराखी केव्हांच आपल्या कोंडवाड्यांत जाऊन पोंचला होता.

* * *

## २. पिसाळ्या बहिरोबाचें देऊळ

"कोण शिवबा? तूं इतक्या प्रहरीं इथं कुठं?—अरे, बोल. असा खालीं मान घालून काय पाहतोस? सहल करायला आला होतास काय? रस्ता चुकलास ना? अरे वेड्या, आतां काय बरं प्रसंग आला असता पाहा! काय दैवयोग! तुझी माझी भेट तरी झाली! घरीं मासाहेब काळजींत राहतील, बाबासाहेब शोधाशोध करतील."

"बाबासाहेबांना शोधाशोध करण्याची जरुरी नाहीं आणि मासाहेबांनाहि काळजी करण्याचं कारण नाहीं!"

"तूं घरांतून सांगून निघाला आहेस वाटतं?"

"होय, बाबासाहेबांनीं 'जा' म्हटलं आणि मासाहेबांनींहि परवानगी दिली."

"परवानगी दिली ती असं रात्रभर जंगलांत फिरण्याकरितां कीं काय? शिकारीकरितां दिली असेल परवानगी; आणि तूं आज्ञा घेतल्या-

शिवाय असा घरांतून बाहेर पडणार नाहींस हेंहि मला माहीत आहे. बरं तर, चल आतां. पण तुझा घोडा कुठं आहे? पायींच निघाला होतास वाटतं? बरोबर मंडळी कां घेतली नाहींस? वेड्या, असं बाहेर फिरणं कांहीं चांगलं नाहीं. अरे, कोण आहे तो?—गोमा नाईक, तुझं घोडं दे बालराजांना आणि तूं बैस मालगाडींत बरं!"

"थांबा, दादोजी. मला आजपासून तुम्ही 'बालराजे' म्हणून हांक मारीत जाऊं नका. मला तुमचं घोडं नको आणि कांहीं नको. मी हा आतां पुण्याला निघालों आहें."

"शिवबा, याचा अर्थ काय? तूं एकटाच 'पुण्याला निघालों आहें' म्हणतोस याचा अर्थ काय? आणि ही तुझी चर्या अशी कां दिसते उन्हानं करपटलेली? बाबासाहेब कांहीं बोलले कीं काय? दरबारांत कांहीं कमीअधिक प्रकार झाला होय?"

आज ही गुरुशिष्यांची भेट अकल्पित रीतीनें झाली असेंच म्हटलें पाहिजे. शहाजी राजे भोसल्यांना विजापूर सरकारकडून मिळालेल्या जहागिरीची व्यवस्था करण्याचें काम दादोजी कोंडदेवांकडे होतें. जुन्नरची धान्याची वसुली करून त्याची पोंच आपल्या धन्याकडे करण्याकरितां आज ते विजापुरांत येत होते. वर सांगितल्याप्रमाणें वाटेंत शिवाजीची भेट झाली आणि त्यानें घर सोडण्याचीं कारणें सांगितलीं. तीं सर्व शांत चित्तानें ऐकून घेतल्यावर दादोजी म्हणाले, "शिवबा, तूं आतां जें कांहीं करीत आहेस, तें चांगलं आहे किंवा वाईट आहे, हें आतांच मला सांगतां येणार नाहीं. तूं माझ्याबरोबर घरीं चल. मी बाबासाहेबांची योग्य प्रकारें समजूत करतों."

"दादोजी, आतां तें होणं शक्य नाहीं. बाबासाहेबांकडे न जाण्याचा माझा हट्ट नाहीं, पण त्या विजापुरांत—नका, नका, दादोजी, मला तुम्ही आग्रह करूं नका; आपल्या शब्दाचा अपमान करून घेऊं नका. मला पुण्यास जाऊं द्या!"

दादोजीनें क्षणभर शिवाजीच्या तोंडाकडे निरखून पाहिलें आणि बराच विचार केल्यावर दादोजींनीं शिवाजीच्या खांद्यावर हात ठेवून त्याला आपल्या पोटाशीं धरलें आणि त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें,

" शिवबा, तूं वेडा तर नाहींस ? वडील माणसं सांगतात, तें आपल्या बऱ्याकारितां ना ? मग असं कां बरं करतोस ? आपलाच हट्ट धरून वडिलांच्या मर्जीविरुद्ध वागणं चांगलं नाहीं. बाबासाहेबांनीं जितका लौकिक कमाविला आहे, जितकं वजन वाढविलं आहे, त्याहिपेक्षां जास्त 'बापसे बेटा सवाई' होऊन तूं करून दाखवशील, अशी तर माझी खात्री आहे, आणि मासाहेबाहि असंच नेहमीं म्हणतात. आतां बाबासाहेब तुझ्यावर राग करून बोलतात म्हणून त्यांच्यावर रागावण्याचं कारण नाहीं. लहानपणापासून तुझा त्यांना सहवास असता तर तुझ्या स्वभावाची त्यांना ओळख होऊन आमच्याप्रमाणंच त्यांचंहि मत बनलं असतं. बरं मग काय ? येतोस ना माझ्याबरोबर ? तूं तिथं आल्यावर बाबासाहेब तुला एका शब्दानंहि बोलणार नाहींत, याबद्दल मी हमी घेतों. माझ्या शब्दावर तुझा विश्वास आहे ना ? "

" दादोजी, तुमच्या शब्दावर विश्वास नाहीं असं कसं होईल ? तुम्ही तर माझे गुरु आहांत. बाबासाहेब—मासाहेब तर प्रत्यक्ष माझे जन्मदाते आईबाप आहेत. तुम्हां सर्वांवर माझा पूर्ण विश्वास आहे. तुमच्याशिवाय इतर सर्वांवरहि माझा विश्वास आहे. पण तुमचा मात्र माझ्यावर नाहीं खास ! मला तुम्ही परत विजापुरीं येण्यास पुनः पुनः सांगतां, यावरून मीं न येण्याच्या सांगितलेल्या कारणांवर म्हणजे माझ्या बोलण्यावर तुमचा विश्वास नाहीं, हें नाहीं का सिद्ध होत ? दादोजी, नका मला आग्रह करूं ! कोंडवाडाच आहे तो. "

" ठीक आहे. शिवबा, तुझ्या शब्दावर मी विश्वास ठेवतों. मग तर झालं ना ? आतां माझं ऐक. तूं पुण्यास जातों म्हणतोस, तर मी शहरांत जाऊन परत येईपर्यंत थांब. आतां माझ्याबरोबर गोमा आणि सिद्दी जलाल हे दोघेहि आले आहेत, त्यांनाच तुझ्या सोबतीकरितां ठेवतों. मी ह्या वसुलीची पोंच करून शक्य तितकें उद्यांच्या उद्यां परत येतों. मग आपण पुण्यास जाऊं. तेथें गेल्यावर तुझ्या मताप्रमाणं कांहीं तरी एक निश्चित विचार ठरवूं. मग तर झालं ? "

" बरं आहे ! " असें म्हणून शिवाजीनें आपली संमति दिली. दादोजींनाहि तें ऐकून मोठें समाधान झालें. त्यांनीं लगेच सिद्दी जलाल आणि गोमा नाईक यांना जवळ बोलावून जें कांहीं सांगावयाचें तें सांगितलें.

साहेबांनीं तो वाडा तयार करून आपल्या सुखसोयींप्रमाणं तें घर बांधलं आहे. तें आमचं घर कोंडवाडा नाहीं—घर आहे. कोंडवाडा नाहीं म्हणावं तर तें घर सोडून निघाल्यावर ही विजापूरची सरहद्द सोडतांच मला आनंद कां झाला?........

छेः! नक्कीच—तो कोंडवाडाच होता! घर नव्हतं. त्या कोंड-वाड्यांतून सुटलों म्हणूनच मला हा आनंद झाला!! मग कोंडवाड्यांत जाण्याकरितां तीं वासरं—त्या गाई इतक्या उत्सुक कशा झाल्या? कोंडवाड्यांत कोंडून घेण्यांत त्यांना सुख कां वाटतं? तीं जनावरं आहेत, त्यांना कळत नाहीं असं म्हणावं, तर चोराचा हात त्यांना झटकन् कळतो, खाटीक दृष्टीला पडतांच त्यांच्या डोळ्यांत पाणी येतं, श्वापदाचा उग्र वास येऊं लागतांच तीं पळूं लागतात, इतकं त्यांना कळतं. मग हेंच त्यांना कळत नाहीं, असं कसं म्हणावं? कोंडवाडा आहे हें कळूनहि तीं जनावरं आनंदानं तिथं जातात, यांत कांहीं तरी गूढ असलं पाहिजे........

आतां सुटलं हें कोडं!—असंच असलं पाहिजे खास! त्या जनावरांना कोंडवाड्यांत ठेवणारा त्यांचा धनी—तो गुराखी—त्या सर्वांचाच पालनकर्ता आहे. चोरांनीं चोरूं नये म्हणून तो त्यांचं रात्रं-दिवस रक्षण करीत असतो. खाटकांच्या हातीं तीं जाऊं नयेत म्हणून तो डोळ्यांत तेल घालून पाळत ठेवतो. तसंच त्यांच्या चाऱ्यापाण्या-करितां तो स्वतःला सर्व दिवसभर उन्हातानांतून सारखं कष्टवितो. तो त्यांच्याच संरक्षणाकरितां मुद्दाम बांधलेला कोंडवाडा खास नव्हे! मी तरी त्याला कोंडवाडा म्हणणार नाहीं. जनावरांचं आनंदानं, सुखानं आणि निर्भय चित्तानं विश्रांति घेण्याचं तें खरं घर आहे, आणि बाबा-साहेब ज्याला घर, वाडा आणि गादी म्हणतात, तोच खरा कोंडवाडा आहे हेंच खरं! गुरांचे धनी, पालक—ते गुराखी—त्यांचं रक्षण करणारे खरे धनी आहेत आणि बाबासाहेबांचे धनी, ते विजापूरचे सत्ताधीश बादशहा, बाबासाहेबांचं रक्षण करणारे—त्यांचा प्रतिपाळ करणारे नसून लहर फिरतांच त्यांच्या मानेवर सुरी ठेवणारे—खरेखुरे खाटीकच आहेत. होय, असंच—पण बाबासाहेबांना हें कसं बरं कळत नाहीं? मला हें

कोडं उलगडून जसा आतां आनंद झाला आहे, तसंच बादशहा हा कोण आहे, हें जर त्यांना कळलं असतं, तर माझ्यासारखे ते विजापुरांत एक क्षणभरहि राहते ना! खरंच, हें कोडं जर मला त्या वेळीं उलगडलं असतं, तर बाबासाहेबांना माझ्या मनाची तळमळ मला कितीतरी स्पष्ट रीतीनं सांगतां आली असती............

त्या गुराख्यानं—एका गांवढळ माणसानं—आज मला एक गोष्ट शिकविली, इतकंच नाहीं तर त्या मुक्या जनावरांनीं माझ्या मनाची तळमळ शांत केली. गोमाताच ती! मुलाला शिक्षण देणं हा आईचा धर्म आहे. हे गोमाते! तुझ्या संरक्षणाकरितां, तुझ्या चारापाण्याकरितां मी माझ्या देहाची, प्राणाचीहि पर्वा करणार नाहीं, हींच माझी प्रतिज्ञा!"

असें म्हणून गोमातेला नमस्कार करण्याकरितां त्यानें हात जोडले; परंतु त्याच्यापुढें असलेलें तें गाईचें खिल्लार घेऊन तो गुराखी केव्हांच आपल्या कोंडवाड्यांत जाऊन पोंचला होता.

* * *

## २. पिसाळ्या बहिरोबाचें देऊळ

"कोण शिवबा? तूं इतक्या प्रहरीं इथं कुठं?—अरे, बोल. असा खालीं मान घालून काय पाहतोस? सहल करायला आला होतास काय? रस्ता चुकलास ना? अरे वेड्या, आतां काय बरं प्रसंग आला असता पाहा! काय दैवयोग! तुझी माझी भेट तरी झाली! घरीं मासाहेब काळजींत राहतील, बाबासाहेब शोधाशोध करतील."

"बाबासाहेबांना शोधाशोध करण्याची जरुरी नाहीं आणि मासाहेबांनाहि काळजी करण्याचं कारण नाहीं!"

"तूं घरांतून सांगून निघाला आहेस वाटतं?"

"होय, बाबासाहेबांनीं 'जा' म्हटलं आणि मासाहेबांनींहि परवागी दिली."

"परवानगी दिली ती असं रात्रभर जंगलांत फिरण्याकरितां कीं काय? शिकारीकरितां दिली असेल परवानगी; आणि तूं आज्ञा घेतल्या-

शिवाय असा घरांतून बाहेर पडणार नाहींस हेंहि मला माहीत आहे. बरं तर, चल आतां. पण तुझा घोडा कुठं आहे? पायींच निघाला होतास वाटतं? बरोबर मंडळी कां घेतली नाहींस? वेड्या, असं बाहेर फिरणं कांहीं चांगलं नाहीं. अरे, कोण आहे तो?—गोमा नाईक, तुझं घोडं दे बालराजांना आणि तूं बैस मालगाडींत बरं!"

"थांबा, दादोजी. मला आजपासून तुम्ही 'बालराजे' म्हणून हांक मारीत जाऊं नका. मला तुमचं घोडं नको आणि कांहीं नको. मी हा आतां पुण्याला निघालों आहें."

"शिवबा, याचा अर्थ काय? तूं एकटाच 'पुण्याला निघालों आहें' म्हणतोस याचा अर्थ काय? आणि ही तुझी चर्या अशी कां दिसते उन्हानं करपटलेली? बाबासाहेब कांहीं बोलले कीं काय? दरबारांत कांहीं कमीअधिक प्रकार झाला होय?"

आज ही गुरुशिष्यांची भेट अकल्पित रीतीनें झाली असेंच म्हटलें पाहिजे. शहाजी राजे भोसल्यांना विजापूर सरकारकडून मिळालेल्या जहागिरीची व्यवस्था करण्याचें काम दादोजी कोंडदेवांकडे होतें. जुन्नरची धान्याची वसुली करून त्याची पोंच आपल्या धन्याकडे करण्याकरितां आज ते विजापुरांत येत होते. वर सांगितल्याप्रमाणें वाटेंत शिवाजीची भेट झाली आणि त्यानें घर सोडण्याचीं कारणें सांगितलीं. तीं सर्व शांत चित्तानें ऐकून घेतल्यावर दादोजी म्हणाले, "शिवबा, तूं आतां जें कांहीं करीत आहेस, तें चांगलं आहे किंवा वाईट आहे, हें आतांच मला सांगतां येणार नाहीं. तूं माझ्याबरोबर घरीं चल. मी बाबासाहेबांची योग्य प्रकारें समजूत करतों."

"दादोजी, आतां तें होणं शक्य नाहीं. बाबासाहेबांकडे न जाण्याचा माझा हट्ट नाहीं, पण त्या विजापुरांत—नका, नका, दादोजी, मला तुम्ही आग्रह करूं नका; आपल्या शब्दाचा अपमान करून घेऊं नका. मला पुण्यास जाऊं द्या!"

दादोजीनें क्षणभर शिवाजीच्या तोंडाकडे निरखून पाहिलें आणि बराच विचार केल्यावर दादोजींनीं शिवाजीच्या खांद्यावर हात ठेवून त्याला आपल्या पोटाशीं धरलें आणि त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें,

" शिवबा, तूं वेडा तर नाहींस? वडील माणसं सांगतात, तें आपल्या बऱ्याकारितां ना? मग असं कां बरं करतोस? आपलाच हट्ट धरून वडिलांच्या मर्जीविरुद्ध वागणं चांगलं नाहीं. बाबासाहेबांनीं जितका लौकिक कमाविला आहे, जितकं वजन वाढविलं आहे, त्याहिपेक्षां जास्त 'बापसे बेटा सवाई' होऊन तूं करून दाखवशील, अशी तर माझी खात्री आहे, आणि मासाहेबहि असंच नेहमीं म्हणतात. आतां बाबासाहेब तुझ्यावर राग करून बोलतात म्हणून त्यांच्यावर रागावण्याचं कारण नाहीं. लहानपणापासून तुझा त्यांना सहवास असता तर तुझ्या स्वभावाची त्यांना ओळख होऊन आमच्याप्रमाणंच त्यांचंहि मत बनलं असतं. बरं मग काय? येतोस ना माझ्याबरोबर? तूं तिथं आल्यावर बाबासाहेब तुला एका शब्दानंहि बोलणार नाहींत, याबद्दल मी हमी घेतों. माझ्या शब्दावर तुझा विश्वास आहे ना?"

"दादोजी, तुमच्या शब्दावर विश्वास नाहीं असं कसं होईल? तुम्ही तर माझे गुरु आहांत. बाबासाहेब—मासाहेब तर प्रत्यक्ष माझे जन्मदाते आईबाप आहेत. तुम्हां सर्वांवर माझा पूर्ण विश्वास आहे. तुमच्याशिवाय इतर सर्वांवरहि माझा विश्वास आहे. पण तुमचा मात्र माझ्यावर नाहीं खास! मला तुम्ही परत विजापुरीं येण्यास पुनः पुनः सांगतां, यावरून मीं न येण्याच्या सांगितलेल्या कारणांवर म्हणजे माझ्या बोलण्यावर तुमचा विश्वास नाहीं, हें नाहीं का सिद्ध होत? दादोजी, नका मला आग्रह करूं! कोंडवाडाच आहे तो."

"ठीक आहे. शिवबा, तुझ्या शब्दावर मी विश्वास ठेवतों. मग तर झालं ना? आतां माझं ऐक. तूं पुण्यास जातों म्हणतोस, तर मी शहरांत जाऊन परत येईपर्यंत थांब. आतां माझ्याबरोबर गोमा आणि सिद्दी जलाल हे दोघेहि आले आहेत, त्यांनाच तुझ्या सोबतीकरितां ठेवतों. मी ह्या वसुलीची पोंच करून शक्य तितकें उद्यांच्या उद्यां परत येतों. मग आपण पुण्यास जाऊं. तेथें गेल्यावर तुझ्या मताप्रमाणं कांहीं तरी एक निश्चित विचार ठरवूं. मग तर झालं?"

"बरं आहे!" असें म्हणून शिवाजीनें आपली संमति दिली. दादोजींनाहि तें ऐकून मोठें समाधान झालें. त्यांनीं लगेच सिद्दी जलाल आणि गोमा नाईक यांना जवळ बोलावून जें कांहीं सांगावयाचें तें सांगितलें.

गोमा नाईक आणि सिद्दी जलाल यांचे घोडे बरोबरच होते. शिवाय दादोजींनीं शिवाजीकरितां एक उमदा घोडा मागें ठेवला. ह्या घोड्याच्या कापडी जिनाला दोन तलवारी, दोन लांब भाले आणि एक मोठी ढाल इतकीं हत्यारें बांधायलाहि त्यांनीं सांगितलें. त्या दोन नोकरांत एक जातीचा मराठा आणि दुसरा मुसलमान होता. दोन्ही नोकर अस्सल स्वामिभक्त होते. जिजाबाईच्या लग्नांत तिच्या माहेराहून म्हणजे लखोजीराव जाधव यांच्याकडून त्या काळच्या चालीरीतींस अनुसरून इतर अनेक आंदणांबरोबर हुजरे आणि बटकी ह्या नोकरांच्या आंदणांत हे दोघे नोकर शहाजीकडे आले होते. आज इतक्या दिवसांनीं आपला मालक भेटला म्हणून त्या दोघांना कितीतरी आनंद झाला !

" धनीसाहेब, मासाहेबांची तबियत कशी काय आहे ? बाबासाहेबांची तर खुषखबर आहे ना ? " पडक्या देवळाजवळ येतांना वाटेंतच गोमाजीनें विचारलें.

" होय गोमाजी, सर्वांची खुषखबर आहे. तुमची काय खबर आहे ? "

" मालिक की खुषखबर है सो हमारीहि है ! अल्ला आप मालिक-लोगोंकी तन्दुरुस्ती रखे ! " सिद्दी जलाल म्हणाला.

" जलाल, माझी खुषखबर नाहीं. मला विजापुरांत चैन पडलें नाहीं. एखाद्या कोंडवाड्यांत कोंडल्याप्रमाणं मी तिथं गुदमरून गेलों होतों. "

" हां हां, खाविंद, आप कहते हैं सो बिलकूल सच है. ए विजापूर सेहेर बिलकूल सैतानी है. मालिक को रेहेने के लिये, ए सेहेर हरगीज लायक नहीं ! "

हळूहळू ती मंडळी पडक्या देवालयांत आली. देवालयाच्या भिंती काळानें जीर्ण करून टाकल्या होत्या, तरीदेखील प्रवाशांना विश्रांती-करितां त्या अद्यापि आसरा देतच होत्या. आमच्या देवतांत भेदभावाची दृष्टि नसल्यामुळें हिंदु प्रवाशांबरोबर कैक यवन प्रवाशीसुद्धां त्या मोडक्या देवालयांत विश्रांति घेऊन गेले होते. गोमाजीनें टाकून

दिलेल्या गाशावर शिवाजी स्वस्थ विचार करीत पडला होता. बाहेरच्या बाजूला सिद्दी घोड्यांची चाकरी करण्यांत गुंतला होता आणि गोमाजी स्वयंपाकाच्या तयारीला लागला होता. आपला तरुण मालक आतां जेवणार आहे म्हणून तो कांहीं पक्कान्नें करणार होता. इतक्यांत दूर अंतरावर घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकूं येऊं लागले. त्याबरोबर सिद्दी आंत येऊन म्हणाला, "सुनो नाईक, कहीं स्वार दौड के आ रहे हैं। कौन होंगे? जरा हुश्शार रहेना चाहिए!"

सिद्दीचा सवाल ऐकून गोमाजीनेंहि आपले कान टंवकारले. कोणी-तरी स्वार येत आहेत, हें त्याच्या लक्षांत येतांच त्यानें झटकन् चुलीजवळ असलेली मशाल विझाविली आणि दोघेहि दरवाजापाशीं जाऊन सशस्त्र उभे राहिले.

ही बाहेर आलेली मंडळी कोण होती?....

* * *

# ३. आणभाक आणि प्रतिज्ञा

देवळाबाहेर आलेले स्वार बराच वेळ बाहेरच थबकून राहिले.

"देवळांत कोण आहे, बोला." बाहेरच्या एका स्वारानें प्रश्न केला. बराच वेळ झाला. आंतून कोणीहि उत्तर देत नाहीं, असें पाहून बाहे-रच्या मंडळींनीं चकमक झाडून प्रथम चुडी पेटाविल्या. आतां मात्र गोमाजीचा नाइलाज झाला. त्याला पुढें होणें भागच पडलें. तोंच शिवाजीहि आपल्या गाशावरून उठून बाहेर आला.

"आम्हीं इतकं आर्जव करून विचारलं, पण तुम्ही जबाब कां दिला नाहीं? आम्हींदेखील तुमच्यासारखे प्रवासी आहोंत."

"तें खरं; पण काळोखांत तुम्ही प्रवासी आहांत कीं दुसरे कोणी आहांत हें तरी कसं कळावं? आतां उजेड झाला, आतां खात्री झाली! या, आंत या." इतकेंच बोलून शिवाजी आंत गेला आणि पुनः आपल्या गाशावर पडला.

ह्या नवीन आलेल्या प्रवाशांबरोबर आमचा नायक जास्ती कांहीं बोलला नाहीं. त्याला स्वतःचे विचारच पुष्कळ झाले होते.

गोमाजीनें मात्र ही मंडळी कोठून आली आणि जाणार कोठें याबद्दल चौकशी करून खरोखरीच ही मंडळी सज्जन आहेत अशी आपल्या मनाची खात्री करून घेतल्यावर 'आपण कोण' हें त्यांनीं विचारल्यावर सांगितलें. आंत आलेल्या मंडळींचा नायक एका खेड्याचा देशपांडे होता. तो वयानें तेवीस चोवीस वर्षांचा असून काळासांवळाच पण सशक्त बांध्याचा आणि पुऱ्या उंचीचा तरुण होता. कांहीं कामाकरितां आतां तो विजापूरच्या दरबारीं चालला होता. शहाजी राजे भोंसले यांचे चिरंजीव शिवाजी राजे देवळांत आहेत असें कळतांच त्या देशपांड्याला मोठा आनंद झाला. आपलें दरबारांत असलेलें काम शिवाजी राजांच्या मार्फत आपल्या मनासारखें सोळा आणे होईल, असें वाटून तो लगबगीनें आपल्या नोकरांना व्यवस्थेविषयीं जें सांगावयाचें तें सांगत आंत आला. शिवाजी गाशावर स्वस्थ पडला होता. त्याच्याजवळ येतांच त्या देशपांड्यानें अत्यंत लीनतेनें लवून दरबारी पद्धतीचा मुजरा केला. शिवाजीनें त्या मुजऱ्याचा तितकाच आदरभावानें स्वीकार केला. औपचारिक प्रश्नोत्तरें झाल्यावर देशपांडे म्हणाला, "महाराज, योगायोग जुळून येऊन आपलं दर्शन झालं, हें एक मी भाग्य समजतों! मी आतां दरबारीं जात आहें. आपण जर मनावर घ्याल आणि वडिलांना सांगाल तर त्यांच्या मार्फत दरबारांत असलेलं माझं गरिबाचं काम हां हां म्हणतां होईल आणि इतक्या लांब आल्याचं चीज तरी होईल!"

"आपलं काय काम आहे? माझ्या हातून होण्यासारखं असेल तर मला सांगा. वडिलांविषयीं म्हणाल तर मात्र थोडी शंकाच आहे."

"आपण मनावर घेतलं तर होण्यासारखं आहे महाराज! मी रोहिडगडचा देशपांडा आहें. माझं नांव दादजी नरस प्रभु. माझं सरकारी काम सर्व चोख असून हिशोबठिशोब आरशासारखा लख्ख आहे. पण आमच्या सुभ्यानं मला अगदीं सळो कीं पळो करून सोडलं आहे; मीं दरबारांत दाद मागण्याकरितां दोन तीन अर्ज केले; पण उत्तर नाहीं कीं कांहीं नाहीं. त्यांच्याकडून मला खात्रीनं न्याय मिळेल!"

" मिळेलहि कदाचित् !—पण—पण, काय हो दादजी देशपांडे, तुम्ही तुमच्या कामांत चोख आहांत असं असतांहि तुम्हांला त्रास होतो म्हणतां, मग हा ह्या बादशहाकडून अन्याय होतो आहे, असं नाहीं का तुम्हांला वाटत ? "

" महाराज, आपण माझं मन पाहतां काय ? " गोंधळून दादजी म्हणाला. त्याला शिवाजीच्या बोलण्याचा मतलब कळेना. शहाजी राजे बादशहाचे एकनिष्ठ सेवक आणि शिवाजी हा त्यांचा मुलगा; तेव्हां आपलें बादशाहीविरुद्ध मत आहे असें कळतांच आपणावर भलताच प्रसंग यावयाचा, ह्या भीतीनें तो फार जपून बोलूं लागला. तो पुढें म्हणाला, " आम्ही बादशहाचे नोकर; न्याय, अन्याय झाला तरी गप्पच बसलं पाहिजे. आमचा पडला नोकरपेशा ! आणि त्यांत आम्ही गरीब; नाहीं आम्हांला कुणाचा आधार ! आम्हीं जर बादशहाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, तर जवळ आहे नाहीं तें जाऊन चिरडून अखेर व्यर्थ मरून मात्र जाऊं ! "

" आधार मिळाला तर दरबारी बेबंदशाहीचा प्रतिकार करण्याची तुमची तयारी आहे काय ? "

शिवाजीनें इतका स्पष्ट प्रश्न करतांच दादजीहि एकदम म्हणाला, " हो—हो—आहे म्हणजे ? हा सरकारी जुलूम आम्हांला अगदीं असह्य झाला आहे. तुमचे वडील दरबारांत मोठे वजनदार आहेत, तेव्हां बादशाहीविरुद्ध कसं बोलावं म्हणून प्रथम मी थोडा कचरलों; पण तुम्ही होऊन अगदीं उघड्या मनानं मला स्पष्ट विचारतां म्हणून मीहि आतां बोलतोंच ! आम्ही कष्ट करतों, रात्रंदिवस सारखे खपतों आणि हे चोर चैन करतात ! "

" बस्स ! बस्स ! आतां नका मला जास्त सांगूं ! ह्या अन्यायामुळें, ह्या बेबंदशाहीमुळें तुमच्या मनाला माझ्यासारखी आंच लागली आहे खरी ! मग आतां स्पष्ट सांगा, दादजी, आपण कांहीं तरी केलं पाहिजे, असं नाहीं का तुम्हांला वाटत ? "

" महाराज, वाटतं पुष्कळ; पण काय सांगावं ? आम्हीं गरिबांनी कोणत्या जोरावर हालचाल करावी ? "

“खरं आहे. बादशाही शक्ति फार मोठी आहे. तिला टक्कर द्यायला फार मोठं सामर्थ्य एकवटलं पाहिजे. मी आतां विजापूर सोडून निघालों, तो असंच कांहीं तरी करण्याच्या उद्देशानं निघालों.”

“काय, इतका आपला निश्चय झाला आहे? महाराज, धन्य आहांत! आपण धन्य आहांत!” आनंदातिशयानें बेहोष होऊन दादजीनें शिवाजीच्या पायांना जवळजवळ मिठीच मारिली. तो पुढें म्हणाला, “महाराज, आपण संकल्प केला आहे तर आतां खात्रीनं ह्या दुर्दैवी महाराष्ट्राचे दिवस फिरले!”

दादजीला आतां नवीन उत्साह प्राप्त झाला. आपणांला जें पाहिजे होतें तें मिळावें म्हणून आपल्या मनाला जी सारखी रात्रंदिवस तळमळ लागली होती, ती मनाची तळमळ शांत करणारा असा पुढारी आज आपणांस मिळाला म्हणून त्याला अत्यानंद झाला. शिवाजीलाहि तितकाच आनंद झाला. आपल्या मताचा एक मनुष्य आज आपणांस मिळाला, आपली शक्ति वाढली, असें त्यालाहि वाटलें. त्या आनंदाच्या भरांत ते दोघे जेवणाकरितां उठले. हातपाय धुऊन झाल्यावर, ‘तुमचंहि ताट इथंच मागवा; इथंच बसूं आणि बोलूं.’ असें शिवाजीनें सांगतांच दोघांच्याहि नोकरांनीं आपल्या धन्यांचीं ताटें तेथें आणून ठेविलीं.

जेवतां जेवतां शिवाजी म्हणाला, “मग दादजी, सांगा आतां, माझीं मतं तुम्हांला पटतात ना? आपल्या मताची जेवढी मंडळी मिळतील त्यांना आणि इतरांना अनुकूल करून घेऊन मला साह्य द्याल ना?”

“महाराज, आपण आतां अन्नावर बसलों आहोंत आणि तेहि ह्या देवापुढं बसलों आहोंत. तेव्हां मी आतां शपथच घेऊन सांगतों, मी मरेपर्यंत आपणांस साह्य देईन आणि इतरांकडून साह्य देववीन. आज-पासून मीं स्वतःला आपल्या ध्येयाला वाहून घेतलं आहे. म्हणत असाल तर सर्व रोहिडखेडें आतांच्या आतां आपल्या स्वाधीन करतों.”

“नाहीं, दादजी, अशी घाई करूं नका! आज तुमची आमची ह्या देवळांत आणभाक झाली! आतां ह्यापुढं आपल्याला पुष्कळ कार्य करायचं आहे. इमारतीचा पाया शुद्ध आणि मजबूत असल्याशिवाय इमारत टिकत नाहीं, हें विसरूं नका!”

उद्देशानें ते म्हणाले, "हा इथं वृद्ध मनुष्य कोण झोंपला आहे?— जखमा झालेल्या दिसतात. माझ्यामागं कांहीं तरी भानगड केलीस असं दिसतं."

शिवाजीनें थोडक्यांत त्या वृद्ध ब्राह्मणाची हृदयद्रावक हकीकत दादोजींना निवेदन केली आणि दादजी प्रभूची ओळख करून दिली. तेव्हां दादोजी म्हणाले, "चांगलं! आतां तुम्ही बंडाळी करणारसं दिसतं. तुम्ही तरुण मंडळी अशाच हूड रक्ताची राहणार! हा पाहा, आणखी एक तुझ्याकरितां नवीन हूड मीं मुद्दाम बरोबर आणला आहे. चालूं द्या! आम्हां म्हाताऱ्यांचं तुम्ही थोडंच ऐकणार आहांत!"

दादोजीबरोबर आलेल्या त्या तरुणाकडे शिवाजी पाहूं लागतांच स्वाभाविकच त्याची दृष्टि खालीं वळली.

त्याला पाहून शिवाजीच्याहि मनांत एक प्रकारचा स्नेहभाव उत्पन्न झाला. त्यानें विचारलें, "आपण कोण? आपलं नांव काय? आणि कोणत्या उद्देशानें मला भेटण्याकरितां आलां?"

"माझं नांव नेताजी. आटापाल्याची आमच्या वडिलांना जहागीर आहे. त्यावरून आम्हांला पालकर असें म्हणतात. पण आम्ही राहतों चौकला. आतां ह्यापुढं आपणांजवळ राहून कांहींतरी करावं अशा उद्देशानं मी आलों."

"कांहींतरी काय करावं?" मध्येंच दादोजी कोंडदेवांनीं विचारलें, "अरे, आतां तुम्ही करणार तरी काय? हा असा डोकीं फिरलेल्या वेड्यांचा बाजार भरविणार आहांत कीं काय?"

"दादोजी, खरोखर आम्ही आतां वेड्यांचाच बाजार भरविणार आहोंत. माझ्या विचारांबद्दल तुम्ही मला दोष देतां; पण हें पाहा— प्रत्यक्ष तुमच्यापुढं आतां हीं दोन उदाहरणं आहेत. हे दादजी प्रभु आणि हे नेताजीराव! ह्यांचे विचार बनविण्याकरितां मी गेलों नव्हतों; पण परिस्थितीनं त्यांचे विचार बनले आहेत. असे किती तरी नेताजी आणि दादजी मी सभोंवतीं जमवीन. ह्या दोघांच्या विचारावरून तरी देशांत कोणत्या प्रकारची जागृति होऊं पाहात आहे याचा विचार करा."

"मग काय, वेड्यांचा बाजार भरविणारच म्हणतोस?" दादोजी म्हणाले, "बरं तर, आतां निघायचं कीं आजची रात्र मुक्काम करून उद्यां पहाटेस निघायचं?"

"नाहीं—आतां मुक्काम करायचा नाहीं. माझा आतां एक दिवस नव्हे एक रात्र इतकंच नाहीं एक क्षणहि फुकट जातां उपयोगी नाहीं. बरं, नेताजीराव, आम्ही आतां निघालों. तुमचं कसं काय? तुम्ही आतां परत घरीं जाणार काय?"

"ती आतां गोष्टच काढूं नका! जिथं आपले चरण तिथं मी!"

"ठीक आहे; तर आतां मी तुमच्याकडे एक कामगिरी सोंपवितों. ह्या म्हातारेबुवांची सर्व हकीकत तुम्हीं ऐकलीच आहे. तेव्हां ह्यांना नीट सांभाळून त्यांच्या मुलीकडे पोंचते करा आणि तेथून पुण्यास या."

शिवाजीच्या इच्छेप्रमाणें दादोजींनीं लगेच कूच केलें. आतां देवळांत ते दोघे मित्र राहिले बराच वेळ त्यांच्या गोष्टी झाल्या. नवीन विचार आणि नवीन मैत्री, मग गोष्टींना काय तोटा! त्यांची आतां नवीन सृष्टि उत्पन्न झाली होती; आणि त्या नवीन उत्पन्न झालेल्या सृष्टींत 'शिवाजी' हा एकच विषय त्यांच्या गोष्टींचा होता. थोड्या वेळानें दादजीच्या नोकरांनीं निघण्याची तयारी करतांच म्हाताऱ्या ब्राह्मणाला आपण आपल्या घोड्यावर घेऊं असें ठरवून तो त्याला उठविण्याकरितां गेला. परंतु त्या वेळीं म्हातारा शुद्धींत कोठें होता? अंगांत सणसणीत ताप भरल्यामुळें गरीब बिचारा ब्राह्मण बेशुद्ध स्थितींत पडला होता. दादजींच्या एका नोकराला साधारण झाडपाल्यांची माहिती होती. त्यानें आजूबाजूला हिंडून कांहीं झाडपाला गोळा करून आणला; परंतु त्या औषधींचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. संध्याकाळ होतांच म्हाताऱ्याला वात होऊन तो बडबड करूं लागला. रात्र होईपर्यंत त्याचा वात जास्त भडकला. तो वातांत काय बरळत होता त्यापैकीं कांहींच कळत नव्हतें. फक्त 'लक्ष्मी', 'यादव', 'मला वांचवा' असे कांहीं शेलके शब्द स्पष्ट समजत होते इतकेंच! काळोख पडल्यावर बडबड बंद होऊन म्हाताऱ्याला ऊर्ध्व वायु लागला. आतां म्हातारा वांचत नाहीं हें त्यांनीं जाणलें. मध्यरात्र होईपर्यंत त्या वृद्ध ब्राह्मणाचें प्राणोत्क्रमण झालें!!

* * *

# ४. लक्ष्मीचें दिव्य

" आपण कोण ? —जगपाळराव कोण ? —कुणाची आपण चौकशी करीत आहांत ? "

" जगपाळराव विचारे मानकरी यांचीच ही गढी ना ? आमच्या-विषयीं शंका घेण्याचं तुम्हांला कांहीं कारण नाहीं. ह्या आठ-दहा दिवसांत एका ब्राह्मणानं आपली मुलगी आणि मुलगा— " दादजीच्या तोंडचें वाक्य पुरें होतें न होतें तोंच आंतून अकरा-बारा वर्षांचा एक तरतरीत मुलगा धांवत बाहेर आला आणि म्हणाला, " होय, होय— आमचे बाबाच ते ! कुठं आहेत आमचे बाबा ! "

" तुझे—बा—बा—! " इतकें बोलून दादजी थांबला. त्याला एकदम गहिंवर आला. क्षणभरानें जवळ असलेल्या नेताजीकडे वळून तो हळूच म्हणाला, " नेताजी, या मुलाला कसं सांगावं ? पाहा—किती उत्सुकतेनं तो आपल्या वडिलांची चौकशी करीत आहे ! "

" सांगा, आमचे बाबा कुठं आहेत ? "

" मुला, तुझी बहीण कुठं आहे ? "

" ताई का ?—ती काल आपल्या नवऱ्याबरोबर गेली. "

इतका वेळ दादजी चौकशी करीत असतां दरवाज्याच्या आंतून त्याच्याबरोबर बोलत असलेली एक तरुणी बाहेर आली. तिच्यामागें दुसरी तरुणी होती; ती दरवाज्यांतच उभी राहिली. एकामागून दुसरी अशा त्या दोघी नेताजीच्या दृष्टीस पडतांच तो क्षणभर चमकला. आपली कर्मकथा सांगतांना जखमी झालेल्या वृद्ध ब्राह्मणानें जगपाळ-राव विचारे मानकरी यांच्या मुलींचा उल्लेख केला होता, त्याच ह्या मुली होत. मोठ्या मुलीचें नांव सुमित्रा आणि धाकटीचें नांव निर्मला असें होतें. विजापूरच्या दरबारांत शहाजी राजांच्या तोडीचा बाजी घोरपडे नांवाचा एक सरदार होता. जगपाळराव हे ह्याच सरदाराचे आश्रित असून दरबारांतून त्यांना मानकऱ्याची असामी मिळाली होती. पूर्वी ते आपल्या खटल्यासह विजापुरांतच राहात असत; परंतु मुलींची आई निवर्तल्यावर त्यांना शहरांत राहणें धोक्याचें वाटूं लागलें. पत्नीच्या

निधनामुळें मुलींच्या संरक्षणाची घरांतली बाजू लंगडी पडली, असें पाहून जगपाळराव मुलींसह दोन वर्षांपूर्वी शेतावरील आपल्या गढींत येऊन राहिले होते.

त्या दोघी बाहेर येतांच नेताजीच्या विचारांत आणि वृत्तींत खाडकन् क्रान्ति झाली. म्हाताऱ्या ब्राह्मणाच्या मृत्यूमुळें त्याला जें स्मशानवैराग्य प्राप्त झालें होतें तें आतां पार नाहींसें झालें. दादजीबरोबर सुमित्रा बोलत होती आणि हा तिच्या बहिणीचें सौंदर्य आपल्या नेत्रांत सारखें अधाशाप्रमाणें सांठवीत होता.

"तुम्ही त्या म्हाताऱ्या ब्राह्मणाच्या मुलीची कां चौकशी करतां? ती आतां यवनांच्या दृष्टीसहि पडणार नाहीं. एखाद्या यवन सरदाराचे मिंधे होऊन तुम्ही चौकशीकरितां आलां असाल तर तुमचे प्रयत्न फुकट आहेत!" बाहेर येतांच सुमित्रा धिटाईनें म्हणाली.

"आम्ही?—आणि यवनांचे मिंधे!!" खाडकन् दादजीच्या मुखांतून उद्‌गार बाहेर पडले. पण लगेच त्यानें जीभ चावली! "हो—होतों—पण आतां मात्र नाहीं! शिवाजी महाराजांनीं नुकतंच आम्हांला त्या पातकापासून सोडविलं आहे. ह्या मुलाचा बाप—तो वृद्ध ब्राह्मण—यवनांच्या कचाट्यांत सांपडला असतां महाराजांनींच त्याची मुक्तता केली आणि त्यांच्याच सांगण्यावरून आम्ही इकडे आलों आहोंत."

"पण, बाबा तुमच्याबरोबर कां आले नाहींत?" मुलानें मध्येंच प्रश्न केला.

"कां आले नाहींत, तें आतां काय सांगूं?" दीर्घ श्वास सोडून दादजी म्हणाला.

"कां बरं? सांगायला कोणती हरकत आहे? आणि तुम्हीं सांगितल्याशिवाय आमची खात्री तरी कशी पटावी? सध्यांचा काळ कुणावरहि विश्वास ठेवण्याचा नाहीं!"

"खरं आहे." असें म्हणून दादजीनें वृद्ध ब्राह्मणाची साद्यंत हकीकत सांगितली. आपले वडील निवर्तले हें ऐकून तो मुलगा—यादव रडूं लागला. त्या बहिणींनाहि दुःख झालें.

"हे शिवाजी महाराज कोण?" सुमित्रेनें विचारलें, "शहाजी भोसल्यांचा मुलगा शिवाजी तो हाच का?" दादजीनें मान हालवितांच ती पुढें म्हणाली, "पण ह्या शिवाजीविषयीं परवां बाजीसाहेब तर कांहींच्या कांहींच सांगत होते!"

"हे बाजीसाहेब कोण?" दादजीनें प्रश्न केला.

"सरदार बाजीसाहेब घोरपडे हे विजापूरकरांचे सरदार आहेत. आमच्या बाबांची तैनात त्यांच्याकडेच आहे."

"शिवाजी महाराजांविषयीं त्यांचंहि असंच मत आहे का?—पण हा त्यांचा दोष नाहीं. प्रत्यक्ष शहाजी राजांचं मन आपल्या मुलाविषयीं साशंक आहे, तिथं इतरांची काय कथा? पण एकदां महाराजांची आणि बाजीसाहेबांची प्रत्यक्ष गांठ पडली तर त्यांचीं मतं खात्रीनं बदलतील. आमची गोष्टहि तशीच आहे—" असें म्हणून दादजीनें आपला आणि नेताजीचा सर्व वृत्तान्त थोडक्यांत सांगून शिवाजीनें 'गोब्राह्मणप्रतिपालनाच्या' प्रतिज्ञा कशा केल्या, याबद्दल रसभरित वर्णन केलें. तें ऐकून सुमित्रा म्हणाली, "शिवाजीचा स्वभाव इतका का करारी आहे?—मग कांहीं तरी उलटापालट होईल खास! खरंच, कांहीं तरी व्हायला पाहिजे!"

बराच वेळ त्यांच्या शिवाजीविषयक गोष्टी चालल्या होत्या. त्या दोघी बहिणी शिवाजीच्या ध्येयावर बोलतां बोलतां इतक्या रंगल्या कीं, दादजी आणि नेताजी यांच्याबद्दल त्यांना परकेपणा वाटेनासा झाला. "आपले वडील शहरांत गेले आहेत ते परत येतील, तोंपर्यंत आपलें जेवण वगैरे होऊं द्या; मग बाबा आल्यावर यादवाबद्दल काय करावयाचं तें ठरवूं." असें सांगून सुमित्रा नवीन पाहुण्यांकरितां स्वयंपाकाच्या तयारीला गेली.

निर्मलेकडून त्यांना लक्ष्मीची हकीकत समजली. तिच्या नवऱ्याला औरंगाबादेस नोकरी मिळाली होती व कालच तो तिला घेऊन तिकडे गेला होता. त्याला परत जाण्याची फार घाई असल्यामुळें सासऱ्याची वाट पाहात न राहतां दुसऱ्या दिवशीं पहाटेस लक्ष्मीला घेऊन तो निघाला. आपल्या धाकट्या भावालाहि बरोबर न्यावें, अशी तिची फार

इच्छा होती; परंतु 'मी बाबांबरोबर येईन' असें म्हणून यादव मागें राहिला.

जेवणाची तयारी झाल्यावर सुमित्रा पुन्हा बाहेर येऊन दादजीजवळ बसली. इतक्या थोड्या अवधींत त्याचा हा झालेला परिचय पाहून कोणालाहि आश्चर्य वाटलें असतें. दादजी आणि नेताजी यांचा आपल्या घराण्याशीं फार जुना स्नेहसंबंध आहे, असेंच तिला वाटे. परंतु ह्या अल्पावधींत दिसून येणाऱ्या त्यांच्या दृढपरिचयाचें खरें कारण अगदीं निराळेंच होतें. तीहि यवनांचा अतिशय द्वेष करीत असे. आपल्या वडिलांचें दरबारांत वजन असतांहि आपणांस असें रानावनांत येऊन राहावें लागलें, याचें कारण यवनच, हें तिला कळत नव्हतें असें नाहीं; परंतु त्या तडफडण्याचा उपयोग काय ? लक्ष्मी त्यांच्या आश्रयाला आल्यावर तिनें यवनांकडून झालेला आपला छळ सांगितला, त्या वेळीं सुमित्रा फारच संतप्त झाली. 'विषारी सर्पांचीं जशीं आपण डोकीं ठेचतों, तशीं ह्या मेल्या यवनांचीं डोकीं ठेच ठेच ठेचलीं पाहिजेत,' असें ती संतप्त झाल्यावर वरचेवर बोले. 'परंतु ह्या विषारी सर्पांचीं डोकीं ठेचणार कोण ?' हा तिच्या मनांत सतत घोळणारा प्रश्न आज सुटला. शहाजी राजांचा मुलगा—शिवाजी—यवनांचीं डोकीं ठेचण्याकरितां दंड थोपटून उभा राहिला आहे, हें दादजीकडून कळतांच तिला अत्यानंद झाला ! 'जेवण थंड होत चाललें,' म्हणून नोकरानें दोन वेळां येऊन सुमित्रेला सूचना दिली; परंतु वडिलांची शहरांतून परत येण्याची ती वाट पाहात असल्यामुळें पाहुण्यांना 'जेवायला उठा' असें तिला सांगतां येईना. गोष्टी बोलण्यांत आणखी एक प्रहर लोटला, तेव्हां कांहीं स्वार वाड्यांत शिरले. 'आपले बाबा आले' असें त्या दोघींना वाटलें, परंतु स्वारांचा नाईक पुढें होऊन त्यानें सुमित्रेच्या हातांत एक चिट्ठी दिली. त्या चिठींत 'आपण वसुलीकरितां बाजीसाहेबांबरोबर गांवांवर जात आहोंत. दोन दिवस येणं होणार नाहीं; जपून राहा. गढीच्या रक्षणाकरितं दहा स्वार पाठविले आहेत; काळजी करूं नये.' असें जगपाळरावांनीं लिहिलें होतें. सुमित्रेनें चिठी वाचून तींतील मजकूर दादजीला सांगितला आणि त्यांना जेवणाकरितां उठण्यास सांगितलें. जेवण होतांच दादजी आणि नेताजी निघण्याच्या तयारीला लागले.

निघतांना यादवाबद्दल त्यांना एक प्रश्न पडला; परंतु सुमित्रेच्या इच्छे-वरून त्यांनीं यादवाला गढींतच ठेवण्याचें ठरविलें. नोकरांची सर्व तयारी होतांच दादजीनें त्या दोघी बहिणींचा निरोप घेतला. शिवाजीच्या इच्छेप्रमाणें आपण लोकमतजागृतीला सुरुवात करून जगपाळरावां-सारख्या विजापूर दरबारच्या नोकराच्या दोन बाणेदार मुली आपल्या ध्येयाला अनुकूल करून घेतल्या म्हणून त्याला आनंद झाला.

"जगपाळरावांच्या मुलीहि आपल्याच ध्येयाच्या आहेत असं महाराजांना कळल्यावर त्यांना कितीतरी समाधान होईल!" वाटेंत दादजी म्हणाला.

"दादोजींनीं महाराजांना म्हटल्याप्रमाणं आपला हा वेड्यांचा बाजार जमूं लागला म्हणायचा!" नेताजीनें हंसत हंसत उत्तर दिलें.

"नेताजी, आतां ह्यापुढं दोन सडका लागतात. मी ह्या पलीकडच्या सडकेनं मोगलाईतून औरंगाबाद आणि अहमदनगर ह्या बाजूनें मुक्कामावर येतों आणि तुम्ही ह्या दुसऱ्या सडकेनं भीमेच्या कांठावरून पंढरपुरास जा. तिथून पुढं नीरेच्या पाटांवरून थेट सासवड घ्या आणि तेथून पुढं पुणं गांठा. महाराज दादोजीबरोबर मुद्दाम किल्ल्यांची पाहणी करण्याकरितां सह्याद्रीच्या बांधावरून गेले आहेत. ते असे सातारा-वाईवरून महाबळेश्वराचा डोंगर उतरून पुण्यास जातील." असें म्हणून दादजीनें मोठ्या प्रेमानें निरोप घेतला.

नेताजीला भीमा नदीजवळ येईपर्यंत संध्याकाळ झाली; तेव्हां मात्र रात्रीकरितां निवाऱ्याची जागा शोधणें त्यास भाग पडलें. नदीच्या पैलतीराला किर्र झाडी असून बरेंच लांबवर जंगल पसरलें होतें. त्या झाडीच्या पलीकडे जाळ होत असलेला दिसतांच तेथें एखादें खेडें असावें असें वाटून त्यानें पलीकडे जाण्याकरितां घोडा नदींत घातला.

कदाचित् वणवा लागून हीं झाडें पेटलीं असावींत, अशी नेताजीनें तीरावर पाय ठेवतांना मनाची समजूत केली. तोंच त्याला स्त्रीचें विव्हळणं आणि इतर ओरड ऐकूं आली. तत्काळ त्यानें घोड्याच्या पाठीवर उडी टाकली. आतां नदीच्या कांठचीं मोठमोठीं झाडें पेटूं लागलीं होतीं. त्या उजेडांत तो कसा तरी ठेचाळत त्या किर्र झाडींतून बाहेर पडला. तेथें

जवळच एका मोठ्या वृक्षाखालीं चार यवन त्याच्या दृष्टीस पडले. स्त्रीच्या विव्हळण्यावरून ती हिंदु आहे, असें लक्षांत येतांच नेताजीच्या म्यानांतून झर्कन् तरवार बाहेर आली. त्यानें घोड्याला टांच मारून पहिल्या धडाडीला आपलें जनावर त्या यवनांच्या अंगावर घातलें. क्षणार्धांत तेथें दंगल उडाली. पहिल्या फटक्यालाच त्यानें एका यवनाला जमिनीवर लोळविलें. बाकीचे तिघे त्याच्या अंगावर धांवून आले; परंतु नेताजीच्या त्या तरवारीच्या विलक्षण फेंकी त्यांना सहन होईनात! थोड्या जखमा होतांच त्यांनीं मागच्या मागें पाय काढला आणि आपापल्या घोड्यावर उड्या टाकून जीव घेऊन ते पळत सुटले.

"मला मरूं द्या! मी तुमच्या पायां पडतें!—माझी विटंबना करूं नका!" विव्हळत पण अगदीं आर्त स्वरांत त्या स्त्रीनें उच्चारलेले शब्द ऐकून नेताजीच्या हृदयाला पीळ पडला. तो खालीं वांकला आणि धीर देत म्हणाला, "बाई, भिऊं नका. तुमची विटंबना आतां कुणी करणार नाहीं. माझ्या तरवारीनें त्या दुष्टांचा चांगलाच समाचार घेतला आहे."

"आतां मी धीर तरी कुणाकरितां धरूं?—नका, नका महाराज, मला आतां मरूंच द्या! पेटवा हो पेटवा, माझं एवढं लुगडं तरी पेटवा, नाहीं तर मला त्या आगींत तरी नेऊन टाका!"

बाजूला उजेड पडला असल्यामुळें त्या स्त्रीचें पोळलेलें तोंड स्पष्ट दिसत होतें. प्रत्येक शब्द उच्चारतांना तिला किती मर्मांतिक वेदना होत होत्या, हें नेताजीच्या लक्षांत आलें. त्यानें वांकून विचारिलें, "बाई, तुम्ही ह्या चांडाळांच्या हातीं कशा सांपडलां? तुम्ही कुठं जात होतां?"

"औरंगाबादेस."

त्या स्त्रीच्या मुखांतून औरंगाबाद हा शब्द निघतांच नेताजी एकदम चमकला! निर्मलेनें सांगितलेली सर्व हकीकत त्याच्या पूर्ण लक्षांत होती. त्यानें चटकन् विचारलें, "तूं लक्ष्मी काय?"

ती लक्ष्मीच होती. यवनांनीं केलेल्या हालअपेष्टांना बळी पडलेल्या त्या वृद्ध ब्राह्मणाची मुलगी ती लक्ष्मी होती. प्रवासांत त्यांच्यावर यवनांचा हल्ला झाला. त्या झटापटींत त्यांनीं तिच्या नवऱ्याला जखमी

करून बरोबरच्या दोन स्वारांना ठार मारलें आणि ते लक्ष्मीला घेऊन निघाले. बिचारी पोर भयभीत होऊन बेशुद्ध झाली. ते यवन स्वार सरकारी अंमलदारच होते. मंगळवेढ्यावरून येत असतां त्यांना वाटेंत ही शिकार सांपडली. थोड्या वेळानें ती शुद्धीवर आली त्या वेळीं संध्याकाळ होत आली होती. भीमा नदीच्या तीरावर एखाद्या झाडाखालीं रात्र काढावी अशा उद्देशानें त्या यवनांनीं तेथें तळ दिला. लक्ष्मी सारखी रडतच होती. आपण कोणत्या संकटांत आहोंत, हें तिला पूर्णपणें कळून चुकलें होतें. नदींत जाऊन उडी घ्यावी, असा विचार तिच्या डोक्यांत आला; परंतु नदी गांठण्याकरितां त्या दुष्टांना चुकवून झाडी ओलांडून जाणें तिला शक्य दिसेना. इतक्यांत एका स्वारानें हुक्का ओढण्याकरितां चकमक झाडून कापूस पेटविला. हुक्का पेटतांच त्यानें तो जळका कापूस बाजूला फेकला. दुसऱ्या स्वारानें त्या जळक्या कापसावर आजूबाजूचीं वाळलेलीं पानें आणि काटक्या टाकल्या. थोड्या वेळानें तें पेटूं लागलें तेव्हां तो एक खेळ झाला असें समजून तिसऱ्यानेंहि त्याचें अनुकरण केलें. थोड्या वेळांत तीं वाळलेलीं पानें आणि काटक्या जळूं लागून त्यांचा जाळ झाला.

त्या आगीचा भडका पसरलेला पाहून ती झटकन् उठली आणि या आगीकडे धांवत जाऊं लागली. इतक्यांत एका यवनाचें लक्ष तिच्याकडे गेलें. तोहि तिच्या मागून धांवूं लागला. हा प्रकार पाहून बाकीच्या यवनांनीं एकच ओरड केली. लक्ष्मीनें मोठ्या शिकस्तीनें आगींत उडी टाकली. तोंच मागून येणाऱ्या यवनानें तिला मागें ओढलें. परंतु त्या गडबडींत तिचा पदर पेटला आणि तिचें सर्व तोंड होरपळून निघालें.

ज्या सौंदर्यानें तिला इतक्या भयंकर संकटांत टाकलें आणि पुढेंहि तिच्यावर अनेक प्रकारचे प्रसंग आणण्यास कारण झालें असतें, तें सौंदर्य आज तिनें अग्निनारायणाला बळी दिलें!—लक्ष्मीचें लावण्यसंपन्न मुख आतां विद्रूप दिसूं लागलें.

* * *

# ५. व्यक्तींची उत्सुकता

नेताजीच्या सर्वांगाचा भडका उडाला ! आपण केलेल्या दिव्याची हकीकत लक्ष्मी कण्हत कण्हत सांगत असतां रागाचा पारा सारखा चढत चालला. अत्यंत अमानुष रीतीनें यवनांनीं रंगविलेलें त्या वृद्ध ब्राह्मणाच्या हृदयविदारक स्थितीचें चित्र त्याच्या डोळ्यांपुढें अगदीं ताजें होतें; तोंच त्याच्या मुलीचें हें हृदयभेदक चित्र त्याच्यापुढें येऊन आतां उभें राहतांच, त्याचा कोप प्रज्वलित कां होऊं नये ?

" नेताजीराव, मला इथंच पडूं द्या ! मला मरूं द्या ! मी आतां मेलें काय अन् जगलें काय सारखंच आहे ! पण तुम्ही इतकं चुडेदान मला द्या— तिकडचा शोध करा; इथं जवळच कुठं तरी त्यांचा शोध लागेल. "

" लक्ष्मी, काळोख तर केव्हांच पडला ! तुला दिसतो हा उजेड तूं केलेल्या दिव्याचा आहे. पाहा—हें जंगल कसं पेटत आहे. माझंहि अंतःकरण अगदीं तस्सं पेटत आहे. लक्ष्मी, तुझ्याबद्दल मीच त्या चांडाळांचा सूड घेईन. तूं काळजी करूं नको. "

इतकें बोलून मरून पडलेल्या यवनाचा घोडा लक्ष्मीला बसण्याकरितां देऊन नेताजी तेथून निघाला. आगीनें होरपळल्याच्या वेदना लक्ष्मी कशी सहन करीत होती हें तिचें तिलाच ठाऊक ! त्या काळोख्या रात्रीं अपरिचित रस्त्यावरून ती आपला घोडा इतक्या वेगानें दामटवीत आहे, हें पाहून नेताजीला आश्चर्य वाटलें ! कारण त्या काळोखांत तशीच भीषणता होती. जगूं काय लक्ष्मीच्या अंगावरचें वस्त्र जाळल्यामुळें तिची अब्रू रक्षण करण्याकरितांच रात्रीं तसा घनदाट काळोख पसरला होता. क्वचित् ठिकाणीं ठोकरा खात त्यांचे घोडे मंगळवेढ्याजवळ आले. अशा अपरात्रीं कोणाला उठवावें आणि कोणाजवळ आश्रय मागावा, ह्या विवंचनेंत असतां वेशीजवळच एका बैराग्याचा मठ आहे, याची नेताजीला एकदम आठवण झाली. त्या शतकाच्या प्रारंभाला महालिंगदास नांवाचा खानदेशांत एक तेजस्वी साधु होऊन गेला. तो प्रतिवर्षीं कांहीं निवडक यात्रा करीत असे. आणि त्या करतांना

जागोजाग निवडक ठिकाणीं उतरत असे. मंगळवेढ्याच्या वेशीवरील हा मठ त्या साधूच्या निवडक ठिकाणांपैकींच एक होता. नेताजी त्या मठाजवळ आला आणि आतां तो तेथील बुवाला हांक मारणार, तोंच त्या मठांतून तळमळण्याचा आवाज त्याला ऐकूं आला. इतक्यांत, 'तिकडचा—तिकडचाच हो हा शब्द!' असें म्हणून नेताजीच्या मागें घोड्यावर असलेल्या लक्ष्मीनें ताडकन् खालीं उडी टाकिली आणि ती धांवत आंत गेली.

लक्ष्मीचा नवरा नारायण तेथें जमिनीवर विव्हळत तळमळत पडला होता. जवळचा लांब दाढीचा बुवा त्याच्या जखमा बांधीत होता, आणि दुसऱ्या दोघांनीं त्याला धरलें होतें. यवनांनीं त्याच्यावर हल्ला केला, त्या वेळीं त्याच्या चार नोकरांपैकीं दोन मरून पडले, आणि तो स्वतः भयंकर जखमी होऊन पडला. त्याचा उजवा पाय जन्माचा अधू होऊन उजवा हात जन्माचा लुळा झाला होता. पुढें त्या दोन नोकरांनीं त्याला उचलून थोड्या वेळापूर्वीं त्या बुवाच्या मठांत आणलें होतें. आमची मंडळी आली, त्यापूर्वींच थोडा वेळ हा प्रकार घडला होता. लक्ष्मी आंत येतांच नारायणानें जवळजवळ किंकाळीच फोडली. एकाएकीं अशा अपरात्रीं आपल्या बायकोच्या स्वरूपांत हें तिचें पिशाच्च आलें कीं काय असा त्याला प्रथम भास झाला. आगीनें होरपळल्यामुळें तिचें स्वरूप इतकें विद्रूप झालें होतें. क्षणभरानें परस्परांनीं एकमेकांस ओळखतांच उभयतांनीं अश्रु गाळले. बुवा शक्य तितकें करून त्यांचें सांत्वन करूं लागला. परंतु केवळ शब्दानें त्यांच्या वेदनांचें सांत्वन थोडेंच होणार होतें? लक्ष्मी लगेच आपलें दुःख विसरून बुवाबरोबर पतीच्या शुश्रूषेला लागली. तें पाहून बुवा म्हणाला, "मुली, तूं स्वस्थ राहा! तुझा सतीधर्म आहे हें मी जाणतों; पण स्वतःच असल्या वेदनांनीं तूं पीडित आहेस. थांब—मी तुझ्याकरितां आतां औषधी घेऊन येतों. घटकेंत तुला आराम होईल."

नेताजीला घेऊन तो वृद्ध बुवा काळोखांत बाहेर पडला. तेव्हां नेताजीनें लक्ष्मीविषयीं थोडक्यांत बुवाला सर्व कांहीं सांगितलें. तेव्हां बुवा म्हणाला, "तुम्ही इतक्यांत त्यांना वृद्ध ब्राह्मणाच्या निधनाची

# ५. व्यक्तींची उत्सुकता

नेताजीच्या सर्वांगाचा भडका उडाला ! आपण केलेल्या दिव्याची हकीकत लक्ष्मी कण्हत कण्हत सांगत असतां रागाचा पारा सारखा चढत चालला. अत्यंत अमानुष रीतीनें यवनांनीं रंगविलेलें त्या वृद्ध ब्राह्मणाच्या हृदयविदारक स्थितीचें चित्र त्याच्या डोळ्यांपुढें अगदीं ताजें होतें; तोंच त्याच्या मुलीचें हें हृदयभेदक चित्र त्याच्यापुढें येऊन आतां उभें राहतांच, त्याचा कोप प्रज्वलित कां होऊं नये ?

" नेताजीराव, मला इथंच पडूं द्या ! मला मरूं द्या ! मी आतां मेलें काय अन् जगलें काय सारखंच आहे ! पण तुम्ही इतकं चुडेदान मला द्या— तिकडच्या शोध करा; इथं जवळच कुठं तरी त्यांचा शोध लागेल. "

" लक्ष्मी, काळोख तर केव्हांच पडला ! तुला दिसतो हा उजेड तूं केलेल्या दिव्याचा आहे. पाहा—हें जंगल कसं पेटत आहे. माझंहि अंतःकरण अगदीं तस्सं पेटत आहे. लक्ष्मी, तुझ्याबद्दल मीच त्या चांडाळांचा सूड घेईन. तूं काळजी करूं नको. "

इतकें बोलून मरून पडलेल्या यवनाचा घोडा लक्ष्मीला बसण्याकरितां देऊन नेताजी तेथून निघाला. आगीनें होरपळल्याच्या वेदना लक्ष्मी कशी सहन करीत होती हें तिचें तिलाच ठाऊक ! त्या काळोख्या रात्रीं अपरिचित रस्त्यावरून ती आपला घोडा इतक्या वेगानें दामटवीत आहे, हें पाहून नेताजीला आश्चर्य वाटलें ! कारण त्या काळोखांत तशीच भीषणता होती. जणूं काय लक्ष्मीच्या अंगावरचें वस्त्र जाळल्यामुळें तिची अब्रू रक्षण करण्याकरितांच रात्रीं तसा घनदाट काळोख पसरला होता. क्वचित् ठिकाणीं ठोकरा खात त्यांचे घोडे मंगळवेढ्याजवळ आले. अशा अपरात्रीं कोणाला उठवावें आणि कोणाजवळ आश्रय मागावा, ह्या विवंचनेंत असतां वेशीजवळच एका बैराग्याचा मठ आहे, याची नेताजीला एकदम आठवण झाली. त्या शतकाच्या प्रारंभाला महालिंगदास नांवाचा खानदेशांत एक तेजस्वी साधु होऊन गेला. तो प्रतिवर्षीं कांहीं निवडक यात्रा करीत असे. आणि त्या करतांना

जागोजाग निवडक ठिकाणीं उतरत असे. मंगळवेढ्याच्या वेशीवरील हा मठ त्या साधूच्या निवडक ठिकाणांपैकींच एक होता. नेताजी त्या मठाजवळ आला आणि आतां तो तेथील बुवाला हांक मारणार, तोंच त्या मठांतून तळमळण्याचा आवाज त्याला ऐकूं आला. इतक्यांत, 'तिकडचा—तिकडचाच हो हा शब्द !' असें म्हणून नेताजीच्या मागें घोड्यावर असलेल्या लक्ष्मीनें ताडकन् खालीं उडी टाकिली आणि ती धांवत आंत गेली.

लक्ष्मीचा नवरा नारायण तेथें जमिनीवर विव्हळत तळमळत पडला होता. जवळचा लांब दाढीचा बुवा त्याच्या जखमा बांधीत होता, आणि दुसऱ्या दोघांनीं त्याला धरलें होतें. यवनांनीं त्याच्यावर हल्ला केला, त्या वेळीं त्याच्या चार नोकरांपैकीं दोन मरून पडले, आणि तो स्वतः भयंकर जखमी होऊन पडला. त्याचा उजवा पाय जन्माचा अधू होऊन उजवा हात जन्माचा लुळा झाला होता. पुढें त्या दोन नोकरांनीं त्याला उचलून थोड्या वेळापूर्वीं त्या बुवाच्या मठांत आणलें होतें. आमची मंडळी आली, त्यापूर्वींच थोडा वेळ हा प्रकार घडला होता. लक्ष्मी आंत येतांच नारायणानें जवळजवळ किंकाळीच फोडली. एकाएकीं अशा अपरात्रीं आपल्या बायकोच्या स्वरूपांत हें तिचें पिशाच्च आलें कीं काय असा त्याला प्रथम भास झाला. आगीनें होरपळल्यामुळें तिचें स्वरूप इतकें विद्रूप झालें होतें. क्षणभरानें परस्परांनीं एकमेकांस ओळखतांच उभयतांनीं अश्रु गाळले. बुवा शक्य तितकें करून त्यांचें सांत्वन करूं लागला. परंतु केवळ शब्दानें त्यांच्या वेदनांचें सांत्वन थोडेंच होणार होतें? लक्ष्मी लगेच आपलें दुःख विसरून बुवाबरोबर पतीच्या शुश्रूषेला लागली. तें पाहून बुवा म्हणाला, "मुली, तूं स्वस्थ राहा ! तुझा सतीधर्म आहे हें मी जाणतों; पण स्वतःच असल्या वेदनांनीं तूं पीडित आहेस. थांब—मी तुझ्याकरितां आतां औषधी घेऊन येतों. घटकेंत तुला आराम होईल."

नेताजीला घेऊन तो वृद्ध बुवा काळोखांत बाहेर पडला. तेव्हां नेताजीनें लक्ष्मीविषयीं थोडक्यांत बुवाला सर्व कांहीं सांगितलें. तेव्हां बुवा म्हणाला, "तुम्ही इतक्यांत त्यांना वृद्ध ब्राह्मणाच्या निधनाची

बातमी सांगूं नका. स्वतःच्या दुःखानं तीं दोघं होरपळलीं आहेत. माझ्या औषधानं त्यांना जादूसारखा गुण येईल. त्यांचं चित्त थोडं स्वस्थ झाल्यावर मग तुम्ही सर्व बातमी सांगा."

ती रात्र तशीच दोघांच्या औषधोपचारांत गेली. परंतु दोघांनाहि दुसऱ्या दिवशीं पुष्कळ आराम वाटूं लागला. तें पाहून लक्ष्मी आणि नारायण यांना बुवाच्या मठींतच ठेवून आपण पुढें जावें, असा नेताजी विचार करूं लागला. परंतु त्या दोघांनीं लगेच डोळ्यांत पाणी आणलें. नारायण म्हणाला, "नेताजीराव, तुम्ही आम्हांला सोडून जाणार काय? मीं आतां हा असा कुचकामाचा मनुष्य बनलों. कुणाची नोकरी करतां येणं मला शक्य तरी आहे काय? आम्हांला शिवाजी महाराजांकडे घेऊन चलाल तर तो थोर पुरुष खात्रीनं आम्हां दुर्दैवी जोडप्याची कांहीं सोय लावील."

"महाराजांना तुमच्यासारखींच तावून सुलाखून निघालेलीं माणसें पाहिजेत. मी तुम्हांला आनंदानं पुण्याला घेऊन जाईन." असें आश्वासन देऊन नेताजी क्षणभरानें पुढें म्हणाला, "लक्ष्मी, तुला कल्पना होणार नाहीं इतका भयंकर दुःखाचा डोंगर तुझ्यावर कोसळला आहे. त्या दुष्ट यवनांनीं तुझ्या वृद्ध पित्याला—"

"काय? माझे बाबा? त्यांचं काय झालं?—बोला, लवकर बोला—" लक्ष्मीनें भयभीत होऊन विचारलें.

हळूहळू नेताजीनें वृद्ध ब्राह्मणाच्या मृत्यूची सर्व हकीकत सांगितली. आपल्या पित्याच्या मृत्यूचा तो हृदयद्रावक वृत्तान्त ऐकून लक्ष्मीनें अनावर शोक केला. बुवानें तिचें सांत्वन करण्याची शिकस्त केली.

शेवटीं नेताजी तिला धीर देत देत म्हणाला, "लक्ष्मी, हताश होऊं नकोस! तुझ्यासारख्या दुःखी जीवांचा प्रतिपाळ करण्याची महाराजांनीं प्रतिज्ञा केली आहे! मी आतां परत जगपाळरावांच्या गढींत जाऊन यादवाला घेऊन येतों; मग आपण सर्वजण पुण्यास जाऊं."

यादवाला आणण्याच्या निमित्तानें कां होईना, इतक्या लवकर जगपाळरावांच्या गढींत परत जावयाचें आहे, ह्या विचारानें नेताजीला

आनंद झाला. गढींत गेल्यावर निर्मला आपणांस दिसणार, आपण तिच्याबरोबर बोलणार, ह्या विचारानेंच त्याला आनंद झाला होता. त्यानें न्याहारीसुद्धां केली नाहीं.

दोन प्रहर होईपर्यंत नेताजी गढीजवळ आला. जशी जशी गढी जवळ येऊं लागली, तसतसा त्याचा उत्साह आणि आनंद वाढूं लागला. वाडयांतून आंत येतांना त्याच्या घोडयाच्या टापा ऐकून प्रथम घरांतून बाहेर आली ती निर्मलाच! एकाएकीं नेताजीला पाहून ती दचकून जागच्या जागींच उभी राहिली. तिच्या चर्येवर आनंद, आश्चर्य आणि भीति ह्या तीन विकारांचें संमिश्रण झालेलें स्पष्ट दिसत होतें. एकच क्षण तीं दोघें परस्परांकडे एकाग्र दृष्टीनें पाहात होतीं. लगेच दुसऱ्या क्षणाला आपल्या डोक्यावरील पदर सांवरून निर्मलेनें आपली दृष्टि खालीं वळविली. इतक्यांत आंतून यादव बाहेर आला. त्याच्यामागें सुमित्राहि येत होती.

"कोण? नेताजीराव, तुम्ही परत आलांत? कां बरं?—कांहीं विशेष आहे कीं काय?" सुमित्रेनें विचारलें.

"मी तुमच्याबरोबर आतां पुण्यास येतों." यादव पुढें येऊन म्हणाला.

"तुला नेण्याकरितांच मी आलों आहें. तुला, तुझ्या वहिणीला, तुझ्या मेहुण्याला—सर्वांनाच मी आतां पुण्यास महाराजांजवळ नेणार."

"पण लक्ष्मी आपल्या नवऱ्याबरोबर औरंगाबादेस गेली आहे ना?"

"कुठलं औरंगाबाद आणि कुठलं काय?—वाटेंतच त्यांच्यावर यवनांचा हल्ला झाला."

"म्हणजे? असं झालं तरी काय?"

नेताजीनें ती अंगावर शहारे आणणारी हकीकत सांगितली. आपल्या मैत्रिणीचा तो हृदयद्रावक वृत्तान्त ऐकून त्या दोघी बहिणी फार हळहळल्या. परंतु आतां होऊन गेलेल्या गोष्टीला काय इलाज होता? अद्यापि त्यांचे वडील परत आले नव्हते. तेव्हां कोणाचीहि वाट पाहण्याची जरुरी नसल्यामुळें नेताजीनें आपलें स्नान वगैरे

आटोपून जेवणहि उरकून घेतलें. जेवतांना सुमित्रा त्याच्याबरोबर बोलत होती. तिच्या बोलण्याचा विषय 'शिवाजी' हाच होता.

"आतां ह्यापुढं विजापूरच्या बाजूला येण्याचा प्रसंग आला, तर आमच्या गढीला विसरूं नका!" सुमित्रा म्हणाली, "त्यांना एकदां पाहावं अशी माझी फार इच्छा आहे!"

"मग महाराजांना मी अवश्य घेऊन येईन. सुमित्राअक्का, शिवाजी महाराज किती साधे आहेत म्हणून सांगूं? इथं आल्यावर तुम्हीहि आपल्याच ध्येयाच्या आहांत असं कळल्यावर त्यांना किती तरी आनंद होईल."

"मग खरोखरीच त्यांना एकदां इथं घेऊन याच!"

दिवस किंचित् खालीं जातांच यादवाला बरोबर घेऊन नेताजी निघाला. काळोख पडण्याच्या सुमाराला तो मंगळवेढ्यास बुवाच्या मठीजवळ आला. पाठीशीं बसविलेल्या यादवाला त्यानें प्रथम खालीं उतरविलें. बहीणभावंडांची गांठ पडतांच आपल्या पित्याच्या निधनाबद्दल लक्ष्मी पुनः शोक करूं लागली.

नारायणाला थोडें उठतां फिरतां येऊं लागतांच दहाव्या दिवशीं बुवाचा निरोप घेऊन ती मंडळी प्रवासाला निघण्याच्या तयारीला लागली. बुवानें त्यांना प्रवासांत लागणारें कांहीं साहित्य बरोबर दिलें. अशा रीतीनें ह्या मंडळीचा प्रवास सुरू झाला. वाटेंत त्यांनीं पंढरपुरास मुक्काम केला. भीमेचें स्नान करून लक्ष्मी विठोबापुढें जाऊन बसली. तिनें आपल्या प्राप्त स्थितीबद्दल हृदयाला पाझर फोडणारें शब्दचित्र देवाला दाखविलें.

त्यांचा पुढला मुक्काम दहिगांवांत झाला. आणखी एकदोन मुक्कामांत पुणें येणार म्हणून नेताजीला आनंद झाला. यादव तर सारखा उड्या मारीत होता. शिवाजी महाराजांना आपण केव्हां पाहूं असें त्याला झालें होतें. संध्याकाळच्या सुमारास पांचपन्नास मावळे स्वार गांवांत शिरले. ही नवीन मंडळी कोण आली आहे, हें पाहण्याकरितां नेताजी धर्मशाळेंतून बाहेर आला. त्या स्वारांच्या पुढें असलेला ऐटबाज सरदार पाहून त्याच्याशीं बोलण्याची नेताजीला स्वाभाविकच इच्छा झाली.

नेताजीनें पुढें होऊन त्या स्वाराला मुजरा केला. त्यानेंहि हसत त्या मुजऱ्याचा स्वीकार केला. आतां ते एकमेकांबरोबर बोलणार, इतक्यांत यादव धांवत आला आणि त्या सरदाराकडे पाहात नेताजीला म्हणाला, "नेताजीदादा, हेच का हो ते शिवाजी महाराज?"

* * *

# ६. अपशकुन

"नाहीं बरं बाळ, मी शिवाजी महाराज नाहीं!" नेताजी 'नाहीं' म्हणून म्हणणार तोंच तो स्वार म्हणाला, "मी त्याचा मेहुणा आहें. तुम्ही त्यांनाच भेटण्याकारितां निघालं आहांत वाटतं?—होय, दिसतंच तें! तुमचं नांव नेताजीराव नाहीं का? काल शिवाजी तुमच्याविषयीं सांगत होता. आमची कालच यवतेश्वराच्या डोंगरावर भेट झाली. तुम्हीं आणाभाका घेतल्या, तशी मींहि काल यवतेश्वराच्या देवळांत शिवाजी-जवळ शपथ घेतली. तो म्हातारा दादोजी तर मला वेडा म्हणूं लागला. पण आतां कांहीं तरी केलं पाहिजे खास!—खरं ना, नेताजीराव? हें पाहा, नेताजीराव, मला बुवा फार बोलायला लागतं. माझं नांव बजाजी. आम्ही फलटणचे निंबाळकर. माझी धाकटी बहीण सई ही दिली आहे शिवाजीला. फार डोक्याचा आहे बुवा तो"—अशा रीतीनें नेताजीला बोलण्याची सवड न देतां बजाजीच्या तोंडाचें यंत्र सुरू झालें.

"—बरं, पण तुमच्याबरोबर ही दुसरी मंडळी कोण आहे? दादजी प्रभु शिवाजीनं सांगितल्याप्रमाणं मुद्दाम मोगलाईतून गेले ना?—हा मुलगा मोठा तेजदार दिसतो. कुणाचा हा? नेताजीराव, चला आतां. इथं धर्मशाळेंत आलां आहांत, तर आतां आमच्या घरीं चला. आमचा थोडासा पाहुणचार घ्या, मग आपण सर्वजण संगतीनंच पुण्याला जाऊं!"

"नका—बजाजीराव, नका आतां आग्रह करूं! मजबरोबर अस-लेली मंडळी अस्वस्थ मनाची आहेत; त्यांतून पुण्याला जाण्याची मला दांडगी ओढ लागली आहे."

"अशी ओढ प्रत्येकाला लागली पाहिजे." असें म्हणून बजाजी आपल्या घोड्यावर स्वार झाला आणि म्हणाला, "बरं तर, तुमची इच्छा!"

त्यांनीं एकमेकांचा निरोप घेऊन परस्परांना मुजरे केले. बजाजीनें घोडा वळवून त्याला टांच मारली. त्या वेळीं काय झालें असेल तें असो! एकाएकीं घोड्यानें ठोकर खाल्ली. तो घोड्यावरून खालीं कोसळला. नेताजी झटकन् पुढें झाला आणि त्यानें त्या भिमथडी जनावराला धरून बजाजीला वर उठविलें.

"लागलं का कांहीं?" नेताजीनें विचारिलें.

"छे! पण हा असा अपशकुन कां व्हावा बरं? नेताजीराव, हा अपशकुन आहे असं नाहीं का तुम्हांला वाटत?"

"भलतंच! अहो, जनावर आहे, लागतेच आहे ठोकर!" असें म्हणून नेताजीनें त्याची शंका उडवून टाकण्याचा प्रयत्न केला; परंतु बजाजीच्या मनाला रुखरुख लागलीच!

दुसऱ्या दिवशीं पहाटेस नेताजीनें आपला प्रवास पुढें चालविला. वाटेंत त्यांना मल्हारी मार्तंड ऊर्फ खंडोबाची जेजुरी लागली. तेथें त्यांनीं सकाळची न्याहारी आटोपली. देवालय टेकडीच्या माथ्यावर असल्यामुळें नारायणाशिवाय सर्वांनीं देवदर्शन केलें. तेथील देखावा पाहून नेताजीचें चित्त प्रसन्न झालें. आपण गेल्यावर तेथें आपणांस कोणी यात्रेकरू मंडळी भेटतील असें नेताजीला वाटलें नव्हतें. परंतु गिरिशिखर गांठतांच तेथें झाडांच्या सावलींत बरेच घोडे बांधलेले त्याच्या दृष्टीस पडले. ठिकठिकाणीं चुली मांडून मंडळी जेवण करीत होती. देवालयाच्या पुढें कांहीं राहुट्या ताणलेल्या होत्या आणि जवळच दोन मोठे मेणे ठेवलेले होते. ते पाहून कोणीतरी श्रीमंत घरंदाज मराठमोळ्याची मंडळी दर्शनाकरितां आली असावी असें त्यानें ताडलें. झाडाखालीं जेवण करीत असलेल्या मंडळींजवळ प्रथम शोध करावा आणि मग दर्शनाकरितां देवळांत जावें, असा विचार करून नेताजीनें आपला घोडा एका झाडाला बांधला. इतक्यांत त्या स्वारांपैकीं एक स्वार त्याच्याजवळ येऊन मुजरा करीत म्हणाला, "काय हो, तुमची आणि आबासाहेबांची झाली का भेट?"

" आबासाहेब कोण ? " किंचित् गोंधळून नेताजीनें उलट विचारलें.

" आबासाहेब कोण हें तुम्हांला नाहीं माहीत ? "

" तुम्ही राजेसाहेबांच्या वाड्यांत दोन दिवस आबासाहेबांची चौकशी नव्हतां का करीत ? वा ! विसरलां वाटतं ? "

" पण हे आबासाहेब कोण ? माझ्या अद्यापि लक्षांत येत नाहीं ! मी चौकशी करीत होतों म्हणतां ? "

" आबासाहेब कोण, म्हणजे आमचे छोटे राजेसाहेब ! "

छोटे राजेसाहेब हें नांव कानीं पडतांच नेताजीच्या डोक्यांत एकदम लख्ख उजेड पडला. तो चट्कन् म्हणाला, " शिवाजी महाराज का ? "

" हो हो ! तेच आमचे छोटे राजेसाहेब ! तुम्ही चौकशी करीत होतां त्याच दिवशीं ते महाराजांवर रागावून निघाले होते. आतां मासाहेबहि त्यांच्या भेटीकरितां निघाल्या आहेत. वहिनीसाहेबहि आहेत बरोबर ! आज हें देवदर्शन आटोपून पुण्यास जाणार. "

नेताजीला सर्व गोष्टींचा उलगडा झाला. त्यानें त्या स्वाराला सर्व हकीकत विचारली. शिवाजीनें विजापूर सोडल्यावर आठ दिवसांनीं शहाजी राजांनीं पांचपन्नास स्वार, सोनोपंत डबीर आणि राघव बल्लाळ चिटणीस हीं आपल्या विश्वासाचीं माणसें बरोबर देऊन आपल्या इतमामाप्रमाणें जिजाबाई आणि सईबाई ह्या सासूसुनेला पुण्यास रवाना केलें. त्यांचा हा वाटेंतला शेवटचा मुक्काम जेजुरीला पडला होता. अशा अकल्पित रीतीनें शिवाजीच्या मातोश्रींची भेट होत आहे, हें पाहून नेताजीला फार आनंद झाला. त्यानें त्या स्वाराला सर्व हकीकत विचारून घेतल्यावर ' मासाहेबांना मुजरा करण्याचा आपणांस योग यावा ' अशी इच्छा दर्शविली. तो स्वारहि ' चला ' म्हणून मोठ्या आनंदानें पुढें झाला.

थोड्याच वेळांत पुण्याच्या खालच्या बारामावळांतील [illegible] मंडळी तेथें जमली. प्रत्येक तरुण घरंदाज, इभ्रतदार आणि वतनदार घराण्यांतला होता. ती मंडळी वर आलेली पाहतांच देवळांतून दोन तरुण बाहेर आले आणि मोठ्यानें म्हणाले, " आपली सर्व मंडळी आली. चला या, आणि प्रथम मासाहेबांना मुजरा करा.



3237

नेताजी त्यांच्याकडे पाहात राहिलेला पाहून तो स्वार हळूच म्हणाला, "ही जोडी आणि आपले आबासाहेब अगदीं बालमित्र! आज वर्ष झालं, आबासाहेब विजापुरांत होते; पण ह्या दोघांना कांहीं चैन पडलं नाहीं. मासाहेबांचाहि ह्या दोघांवर फार जीव आहे. तिसरा एक आबासाहेबांचा लंगोटीमित्र पुण्यास आहे. त्याचं नांव येसाजी. आतां आपण गेल्यावर त्याची भेट होईल."

थोड्या वेळानें ती सर्व मंडळी देवळांत आली. त्या लहानशा सभामंडपांत मंडळींची अतिशय गर्दी झालेली दिसत होती. एका बाजूला जाजम पसरलें असून किनखापानें मढविलेल्या लोडाजवळ जिजाबाई बसली होती. तिच्यापासून बऱ्याच अंतरावर डबीर आणि चिटणीस बसले होते. त्यांच्याजवळ एक वृद्ध जोडपें बसलें असून इतर पुष्कळ मंडळी अदबीनें बसलेली होती. एका कोपऱ्याला पडदा लावून आडोशाची जागा केलेली होती. तेथें सईबाई आणि त्यांच्या बटकी स्वयंपाक करण्याच्या उद्योगांत होत्या. आंत येतांच यादव सर्वांच्या पुढें होऊन जिजाबाईच्या पुढें गेला आणि धिटाईनें मुजरा करून उभा राहिला. सर्वांना त्या मुलाचें कौतुक वाटलें. "कोण रे तूं?—मुला, तुझं नांव काय?" असें जिजाबाईनें विचारतांच यादवानें झटकन् आपलें नांव सांगितलें; परंतु पुढें त्याला कांहीं सांगतां येईना. तेव्हां नेताजी पुढें झाला. त्यानें अत्यंत पूज्य भावनेनें जिजाबाईला मुजरा केला. तिनें क्षणभर त्याच्याकडे पाहिलें. त्याच्या पोषाखावरून तो सरदार किंवा एखाद्या जहागीरदार घराण्यांतील असावा, अशी तिनें झटकन् कल्पना केली.

"आबासाहेबांच्या नवीन मित्रमंडळींपैकीं दिसतात." नेताजीकडे पाहात सोनोपंतानें जिजाबाईला म्हटलें, "आणि हा मुलगा दिसतो ब्राह्मणाचा!"

"होय. आपण तर्क केला तो खरा आहे." नेताजीनें उत्तर दिलें, "ह्या मुलाची हकीकत अंगावर शहारे आणणारी आहे." असें म्हणून त्यानें थोडक्यांत लक्ष्मीची आणि तिच्या नवऱ्याची यवनांनीं काय स्थिति केली, इत्यादि सर्व हकीकत त्यानें सांगितली. आजूबाजूला

बसलेली मंडळी नेताजी सांगत असलेला हृदयद्रावक वृत्तांत चित्त देऊन ऐकत होती. क्षणभरानें जिजाबाई त्याच्याकडे पाहात म्हणाली, "या यादवाची ती दुर्दैवी वहीण आणि तिचा हतभागी नवरा खालच्या देवळांत आहेत काय? अरेरे! काय ह्या मेल्या यवनांनीं उच्छाद मांडला आहे! नेताजी, तूं मोठं काम केलंस! मी तुला शाबासकी देतेंच; पण माझा शिवबाहि तुझी पाठ थोपटील.—बरं, पण आतां ही नवीन कामगिरी कोण घेतो मनावर? म्हाताऱ्यांनीं तर देवाच्या द्वारीं धरणं धरलं आहे आणि मीहि त्यांना आश्वासन देऊन चुकलें आहें."

"मासाहेब, आतां तुमच्याशिवाय आम्हांला दुसऱ्या कुणाचा आधार आहे?" जिजाबाईच्याजवळ बसलेला म्हातारा बोलूं लागला, "अंगांत जोर होता—हाडांत कस होता, तोंपर्यंत हीं खोरीं सांभाळून होतों; पण आतां काय? हे आतां आलेले नेताजीराव जी हकीकत सांगतात, तसाच प्रकार बघा माझ्या मुलीच्या बाबतींत झाला. आमचे जांवईबुवा तर वेडेपिसे होऊन गेलेआहेत. मुलगा कसा शहाणा, चतुर आणि हुशार आहे; पण करतो काय?"

"आहे कुठं तो?" जिजाबाईनें विचारलें, "त्याला बोलावण्याकरितां मंडळी गेली आहेत ना?"

"आज चार दिवस झाले, दऱ्याखोऱ्यांत भटकतो आहे! व्याही तर आमच्या नांवानं सारखीं बोटं मोडताहेत! पोरीच्या पायगुणानंच हा प्रसंग ओढवला असं ते म्हणतात."

"तुमच्या व्याह्यांचं नांव काय?"

"बहीरखेड्याचे ते तुळाजी नाईक. आमच्या जांवयाचं नांव बहिर्जी नाईक."

"वरं आहे, म्हातारेबुवा, मी करतें कांहीं तरी व्यवस्था! तुम्ही अगदीं काळजी करूं नका. माझ्या शिवबाचे हे इतके सवंगडी इथं आहेत. आपल्या बहिणीला सोडवून आणण्याकरितां इथला वाटेल तो भाऊ जाईल; तुम्ही कां काळजी करतां?"

"मासाहेबांनीं आज्ञा करावी, मी जातों." नेताजी एकदम म्हणाला.

जिजाबाईनें क्षणभर त्याच्याकडे कौतुकानें पाहिलें. नेताजीच्या बाजूला बसलेले तानाजी आणि फासलकर बाजीहि चळवळ करूं लागले. आपणांसाहि मासाहेबांनीं आज्ञा करावी आणि आपणाहि ह्या कामगिरीवर जावें, असें त्या दोघांना वाटूं लागलें. त्यांच्या मनांत कोणते विचार घोळत आहेत, हें चाणाक्ष जिजावाईनें तेव्हांच ओळखलें. ती म्हणाली, "तानाजी, तूं आणि बाजींनीं अद्यापि विजापूर पाहिलेलं नाहीं; तेव्हां मला वाटतं नेताजी जर गेला, तर त्यानं विजापूर पाहिलेलं आहे, तेव्हां तोच लवकर शोध लावील."

"जशी मासाहेबांची आज्ञा! सांगत असाल तर आम्हीहि नेताजी-रावांबरोबर जातों."

"जा म्हणून सांगितल्यावर दोघेच काय पण सर्वजण जाल, ही माझी खात्री आहे; पण शिवबाला भेटण्याची तुम्हांला उत्कंठा लागली आहे ना?"

* * *

## ७. पुन्हा विजापूर

पुनः पहिल्या दमांतच परत जाण्याकरितां नेताजी तयार झाला. जातांना खालच्या देवालयांत येऊन लक्ष्मीला भेटला. तो परत विजापुरास जात आहे, म्हणून तिला प्रथम वाईट वाटलें; परंतु आपणां-सारख्याच संकटांत सांपडलेल्या स्त्रीला सोडवून आणण्याकरितां तो जात आहे, असें ऐकून ती मनापासून म्हणाली, "नेताजीराव, आमचं आतां कांहींहि होवो; आम्ही आतां आपल्या मंडळींत येऊन पडलों आहोंत. कसं तरी पुणं गांठूं. पण तुम्ही जा. बिचारीवर त्या मेल्या यवनांनीं कोणता प्रसंग आणला असेल, हरि जाणे! तुम्ही जाल, तर तिची सुटका कराल अशी माझी पूर्ण खात्री आहे. जा—"

त्या दुर्दैवी कुटुंबाचा निरोप घेऊन नेताजी आपल्याबरोबर दिलेल्या स्वारांसह निघाला. संध्याकाळपर्यंत तो दहिखेड्यावरून नीरा नदीच्या पाटाला लागला. आतां ते सडे आणि सशस्त्र असल्यामुळें मुक्कामाची

त्यांना फिकीर वाटत नव्हती. मोठ्या आनंदानें गोष्टी बोलत त्यांचा प्रवास चालला होता. हळूहळू ते पाटाच्या वळणाला लागले. तेथें एका मोठ्या झाडाखालीं एका दगडावर एक मनुष्य बसलेला त्यांच्या दृष्टीस पडला. तो कोणीतरी धनगर किंवा गुराखी असावा, अशी त्यांना शंका आली; परंतु आजूबाजूला पाहतांच गुरांचा कांहीं ठावठिकाणा दिसेना. अर्थात् तो गुराखी नाहीं अशी नेताजीची खात्री झाली. काळोख पडत चाललेला आणि अशा वेळीं गांवापासून इतक्या लांब अशा स्थलीं हा मनुष्य असा सचिंत कां बसला असावा, हें जाणण्याची त्याला जिज्ञासा उत्पन्न झाली. जवळ जातांच चटकन् एक विचार त्याच्या मनांत आला. जिच्या शोधाकरितां आपण जात आहों, आणि जिच्यामुळें भ्रमिष्ट होऊन भटकत आहे, तो हा बहिर्जी नाईकच असावा, असें त्याला वाटलें. तो झटकन् आपला घोडा वळवून त्याच्याजवळ गेला आणि विचारूं लागला, "काय हो! विजापूरला जायला अगदीं जवळचा मार्ग कोणता?"

"तुमच्या घरांत बायकामुली फार आहेत वाटतं?" त्या मनुष्यानें उलट प्रश्न केला. हा असा सडेतोड प्रश्न ऐकून नेताजीला चमत्कारिक वाटलें. आपण काय विचारतों आणि हा मनुष्य चीड येण्यासारखा उलट प्रश्न काय विचारतो हेंच त्याच्या लक्षांत येईना.

"मी तुम्हांला सरळ विचारतों आणि तुम्ही असा तिरसट माणसा-सारखा उलट प्रश्न विचारतां, हें मोठं आश्चर्य आहे!"

"आश्चर्य वाटतं तर आपल्या बायकामुलींना घेऊन जा विजापुरांत! विचारतां कशाला?"

"मी सरळ विचारतों; पण तुम्ही—"

"सरळच उत्तर देतों. जातां कशाला विजापुरांत? बायकामुलींची लाज गमवायला? मग आपल्या हातांनीं कां नाहीं त्यांच्या माना कापीत?"

"तुम्ही असं चमत्कारिक काय बोलतां?"

"चमत्कारिक! अहो—हें मस्तक पेटलं आहे, भडकलं आहे! तुम्ही विचारतां काय? तुम्हांला विजापुरांत जायचं आहे ना?—जा, विजापुरांत नाहींतर मसणपुरांत जा—"

"तुम्ही असं वेड्यासारखं काय बोलतां?"

"तुमची बायको पळवून नेली असती, म्हणजे कळलं असतं!"

"अस्सं अस्सं! तुमची बायको पळवून नेली आहे काय?—मग तुम्ही बहिर्जी नाईक कीं काय?"

"आँ!—तुम्ही कोण?—छे! तुम्हांला मीं कधीं पाहिलं नाहीं. तुम्ही कोण?—"

"मी कोणी कां असेना; पण राव, बायको पळवून नेली म्हणून डोक्यांत अशी राख घालून काय बसलां आहांत? चला—आमच्या-बरोबर चला. आम्हीं दीपाबाईला सोडवून आणण्याकरितांच निघालों आहोंत. उठा—तुमचं सर्वस्व नेलं तेव्हां नाहीं तुमचं डोकं फिरलं; पण आतां बायको नेतांच असे भ्रमिष्ट झालांत! काय म्हणावं तुम्हांला!"

"पण तुम्ही कोण?—माझं नांव, माझ्या बायकोचं नांव तुम्हांला कसं कळलं?"

"कसं कळलं तें तुम्हांला ऐकायचं आहे का? मग उठा, चला, आमच्याबरोबर चला, म्हणजे सर्व कांहीं सांगतों."

बायकोमुळें भ्रमिष्ट बनलेला तो बहिर्जीच होता. तो जसा प्रथम नेताजीला हिणवून बोलला, तसाच आतां नेताजी त्याला हिणवूं लागला. पण त्या हिणवण्यांत बहिर्जीच्या अंगांत नवीन जीवन उत्पन्न करण्याचें सामर्थ्य होतें. कारण थोड्याच वेळांत बहिर्जी चांगला शुद्धीवर आला. आपण बायकोकरितां मुळूमुळू रडत बसलों होतों, याची आतां त्याला लाज वाटूं लागली. नेताजीनें त्याला खंडोबाच्या देवळांतील हकीकत सांगून आपणास मासाहेबांनीं आज्ञा केली आहे, असें सांगतांच, 'ह्या मासाहेब कोण? आणि अनोळखी स्त्रीनें आपल्या बायकोला शोधून आणण्यासाठीं नेताजीसारख्या परक्या मनुष्याला आज्ञा करण्याचें कारण काय?' असे एकामागून एक प्रश्न बहिर्जीच्या मनांत उद्भवले.

"चला, बहिर्जी, आतां एखादं घोडं पाहा आणि चला आमच्याबरोबर!"

"आतां रात्र होईल. आतां ह्या दहिखेड्यांत रात्र काढूं आणि सकाळी ताज्या दमांत इथून निघूं. पण ह्या मासाहेब कोण आहेत?"

मासाहेब कोण, हें सांगण्याकरितां नेताजीला पुष्कळ गोष्टी सांगणें भाग पडलें. दहिखेड्यांत एका ठिकाणीं बहिर्जीची ओळख होती, तेथेंच ती सर्व मंडळी गेली. त्यांचें जेवण वगैरे तेथेंच झालें. बरीच रात्र होईपर्यंत त्यांच्या गोष्टी चालल्या होत्या. बहिर्जीबरोबर त्या खेड्यांतील आणखी चार सहा जण नेताजीच्या गोष्टी ऐकत बसले होते आणि तोहि मोठ्या उत्साहानें शिवाजीविषयीं गोष्टी सांगत होता. आपण शिवाजीजवळ कशी शपथ घेतली, याविषयीं तो सांगूं लागतांच बहिर्जी आणि इतर श्रोते यांच्या मनांतहि तशीच शपथ आपणाहि घ्यावी, असा विचार येऊं लागला. शेवटीं बहिर्जीला रहावेना. तो म्हणाला, "नेताजीराव, तुम्हीं घेतली तशी शपथ आम्ही कां घेऊं नये?"

"मीदेखील तुम्हांला हेंच विचारतों. तुम्हीच काय, पण हिंदु म्हणविणाऱ्या प्रत्येक मनुष्यानं तशी शपथ कां घेऊं नये?"

"खरंच! प्रत्येकानं तशी शपथ घेतलीच पाहिजे."

त्या मध्यरात्रीं निशादेवीच्या पुढें बहिर्जीबरोबर गोष्टी ऐकत बसलेल्या सर्वांनीं धडाधड शपथा घेतल्या! लगेच प्रत्येकाच्या मनांत शिवाजीला पाहण्याची उत्सुकता उत्पन्न झाली. इतकेंच काय, पण प्रत्येकाला आपणांत कांहीं तरी क्रांति झाली असेंहि वाटूं लागलें. खऱ्या कळकळीचे, अस्सल जातिवंत असे बहिर्जीसुद्धां सात अनुयायी शिवाजीच्या ध्येयाला येऊन मिळाले.

त्यांचा उत्साह दिखाऊ नव्हता; खऱ्या कळकळीचा तो उत्साह होता; तो आजन्म टिकाऊ होता; आणि याचें कारण खऱ्या कळकळीनें देशकार्याला लागलेला त्यांचा पुढारी अस्सल जातिवंत होता!

* * *

# ८. उपोद्‌घात

" बाबा, तुम्ही गेल्यावर आपल्या गढींत कोण कोण मंडळी आली असली पाहिजेत अशी तुमची कल्पना आहे ?—सांगा पाहूं ? " लडिवाळपणानें निर्मलेनें विचारलें.

" हा वेडे ! हें मला कसं सांगतां येईल ? माझ्यामागं कोण कोण मंडळी आली होती, हें पाहण्याकरितां मी इथं डोळे ठेवून का गेलों होतों ?—कोण आली होती मंडळी ?—आणि त्या म्हाताऱ्याचा मुलगा तो यादव कुठं दिसला नाहीं तो ? मोठा गडबड्या आहे तो पोर ! "

" तो पुण्याला गेला. पण बाबा, लक्ष्मीची हकीकत तुम्हांला कळली का ? बिचारीचे अगदीं हालहाल कीं हो झाले आहेत ! बिचारा तो गरीब म्हातारा यवनांच्या हालांनीं मेला. लक्ष्मीचा नवरा जखमा लागून लंगडा झाला आणि ती आगींत होरपळली ! "

" पण हें इतकं झालं कसं ?—बाजीसाहेब, ऐकलंत ? ह्या सरदार लोकांची ही एवढी गोष्ट मला पसंत नाहीं. फार अत्याचार करतात बुवा ! "

" जगपाळराव, तुम्हांला पसंत असो अगर नसो; ते आज सत्ताधीश आहेत, करतील ती पूर्व दिशा आहे ! "

" तें खरं; पण बाजीसाहेब, तुमच्यासारख्या बड्या वजनदार सरदारांनीं आतां दरबारांतून ह्या गोष्टीला आळा घातलाच पाहिजे. ह्या अधिकाऱ्यांच्या अत्याचाराला भिऊन आम्हीं असे रानावनांत किती हाल काढावयाचे ? कांहीं तरी इलाज कराच ! "

" मी सांगतों ना जगपाळराव, ह्याला कांहींच इलाज चालणार नाहीं ! आपण आपलं आहे तें सांवरून नीट जपून राहावं, हाच त्याला इलाज ! "

जगपाळराव नुकतेच घरीं परत आले होते. त्यांच्यावरोबर दरबारांत जाण्याकरितां बाजी घोरपडेहि आला होता. ते येतांच निर्मलेनें

त्यांच्यामागें काय काय गोष्टी झाल्या, कोण कोण मंडळी आली होती, वगैरे सर्व हकीकत इत्थंभूत सांगितली. आपण घरीं नसतांना आपल्यामागें दादजी देशपांडे आणि नेताजी पालकर हीं नवीनच अनोळखी माणसें येऊन गेलीं, ही गोष्ट जगपाळरावांना बिलकूल पसंत पडली नाहीं. त्यांनीं निर्मलेला त्या मंडळीविषयीं खोदखोदून प्रश्न विचारले. बाजी घोरपडे जवळच असल्यामुळें या गोष्टी कान टंवकारून ऐकत होता. निर्मलेनें सर्व हकीकत सांगितल्यावर बाजीसाहेब म्हणाला, " जगपाळराव, तुमच्यामागं ही अशी उडाणटप्पू मंडळी तुमच्या घरीं यावी आणि त्यांनीं ह्या पोरींच्याजवळ असा हैदोस घालावा, ही गोष्ट मला बिलकूल पसंत नाहीं. बाकी तुमचं काय मत असेल तें असो ! "

" छेः छेः ! मला ही गोष्ट बिलकूल मान्य नाहीं. त्या शिवाजीनं आतां विजापुरांत थोडी का धामधूम माजविली होती ? पण शहाजी भोसल्याकडे पाहून बादशहाला मूग गिळावे लागले ! पण अशी अरेरावी किती दिवस चालणार ? एकदां का बादशहानं डोळे वटारले कीं खाईल थप्पड आणि बसेल गप्प !—निर्मले, हें पहा, आतां तुम्हांला सांगून ठेवतों—पुनः पुनः बजावून ठेवतों, ह्यापुढं ह्या असल्या उपटसुंभ माणसांना आपल्या वाड्यांत थारासुद्धां मिळतां उपयोगी नाहीं. तो शिवाजी अलीकडे फार चेकाळला आहे. त्याचा कोणीहि मनुष्य, त्याचा थोडासा संबंध असलेला असा कोणताहि मनुष्य ह्यापुढं आपल्या वाड्यांत येतां उपयोगी नाहीं. उद्यां दरबारांत जर कांहीं कमीअधिक झालं आणि त्या शिवाजीवर जर एखादं किटाळ आलं, तर आपल्या वाड्यांत याची मंडळी येतात जातात, ह्या गोष्टीवरूनसुद्धां हकनाक भलताच प्रसंग आपणांवर यायचा ! म्हणून म्हणतों, तुम्ही अशा मंडळींच्या थाऱ्यालसुद्धां उभ्या राहूं नका. खरं कीं नाहीं, बाजीसाहेब ?"

" खरं म्हणून काय विचारतां ? अहो, ह्या शिवाजीकडून होणार आहे काय ? कालचं पोर तें ! बापाचं दरबारांत वजन आहे, घालतोय हुतुतू आणि मारतोय माकडासारख्या उड्या ! "

" मग बाजीसाहेब, कुणाकडून होणार आहे ? " आंतून धिटाईनें

बाहेर येऊन सुमित्रेनें विचारलें. इतका वेळ ती दरवाजाच्या आड उभी होती. बाजी घोरपडे आले म्हणजे ती सहसा पुढें येत नसे; परंतु आज तिनें आपला नियम मोडला. जगपाळराव आणि बाजीसाहेब आले, आणि त्यांच्याबरोबर निर्मला बोलत होती, तेव्हां ती आंतून सर्व गोष्टी ऐकत होती. वडिलांबरोबर बाजीसाहेबांनींहि शिवाजीविषयीं इतकी तुच्छता दाखविलेली तिला खपली नाहीं. इतका वेळ ती गप्प होती; परंतु शेवटीं तिला राहवेना. तेव्हां ती आपल्या गोषाचा विनय बाजूला सारून पुढें सरसावली. "तुम्ही असे जाणते शूर असून आणि दरबारांत तुमचं इतकं दांडगं वजन असून तुम्ही ह्या यवनांच्या अत्याचाराला आळा घालीत नाहीं. उलट त्यांचे गोडवे गातां आणि आळा घालण्या-कारितां पुढं सरसावलेल्या शिवाजीला 'पोर' म्हणून त्याची हेटाळणी करतां, तेव्हां तुम्हांला काय म्हणावं ?"

"जगपाळराव, ही तुमची मुलगी सुमित्राच बोलते काय ?" मुद्दाम तिला लाजविण्याच्या उद्देशानें बाजीसाहेबांनीं विचारलें. बाकी तिची ही तडफ पाहून तो आणि जगपाळरावहि गार झाले !

"होय—ही सुमित्राच बोलते ! बाजीसाहेब, मी बोलतें तें उगाच नाहीं. ह्या अंतःकरणाला आंच लागली म्हणून बोलतें; आमच्या मैत्रिणीची—त्या गरीब लक्ष्मीची—तिच्या बापाची आणि तिच्या नवऱ्याची ह्या मेल्या यवनांनीं काय भयंकर विटंबना केली ती तुम्हांला पाहवते ना ?"

"पण त्याला इलाज काय ? ते सत्ताधीश आहेत ना ?"

"मग उद्यां तुमच्या प्रत्यक्ष बायकामुलींवर असे अत्याचार झाले तरी तुम्ही बादशहाचे गोडवेच गात राहाल ना ?–" हा तिचा प्रश्न ऐकून कोणाहि अस्सल मराठ्यानें त्वेषानें थैमान घातलें असतें, असा तो अंतःकरण पेटवून खरेंखुरें चैतन्य उत्पन्न करणारा प्रश्न होता. बाजीसाहेब स्तंभित होऊन गप्पच राहिला. ती पुढें म्हणाली, "तुम्ही म्हणतां शिवाजीच्या हातून होणार आहे काय ?—आतां मीच विचारतें कीं, तुमच्या हातून होणार आहे काय ?—हे असेच बादशहाचे गोडवे गाण्यापलीकडे तुमच्या हातून कांहींसुद्धां होणार नाहीं ! आणि

कांहीं होणार असेल, तर तें शिवाजीच्याच हातून होईल. करून दाखवील तर तोच कांहीं करून दाखवील, हें पक्कें लक्षांत ठेवा, बाजीसाहेब ! "

" सुमित्रेचें हें आवेशयुक्त पण निश्चयी भाषण ऐकून बाजीसाहेब आणि तिचे वडील आश्चर्यानें पूर्ण स्तंभित होऊन तिच्या मुखाकडे 'आ' पसरून पाहातच राहिले. जणूं काय प्रत्यक्ष राष्ट्रदेवताच आपणांपुढें उभी राहून भविष्य कथन करीत आहे, असा त्या दोघांना त्या वेळीं भास झाला !

हा भास होता कीं हें खरें भविष्यकथन होतें ?....

* * *

# ९. हें कोणतें राजकारण ?....

" हुजूर ! असं करणं थोडं धोक्याचं होईल. "

" कुछ फिकिर नहीं. इस बदमाश की कत्तल कर डालो ! "

" खाविंद, आपल्या हुकुमाप्रमाणं सर्व कांहीं करतों; पण ह्या क्षुद्र सेवकाची एक नम्र विनंती ऐकून घ्यावी. मालिक, हा बजाजी निंबाळकर आणि आपले राजे शहाजी भोसले हे अगदीं जवळचे नातेवाईक आहेत. शहाजी राजांचा मुलगा शिवाजी—"

" ए सैतान ?—" जणूं काय भावनेप्रमाणें शिवाजीचें नांव ऐकतांच तो प्रथम डोळ्यांपुढें येऊन बादशहा भयभीत होऊन एकदम म्हणाला.

" त्या शिवाजीला ह्या बजाजीची बहीण दिली आहे. इतकं जवळचं नातं असल्यामुळं आपण जर त्याची कत्तल केली, तर शहाजी राजांना मोठा राग येईल. तसंच आपल्या दरबारांत माने, मोहिते, घोरपडे असे मोठमोठे मराठी सरदार आहेत, त्यांनाहि हें कृत्य पसंत पडणार नाहीं. म्हणून म्हणतों, हुजुरांनीं बजाजीची सरसहा कत्तल करण्याचा दिलेला हुकूम फिरवावा. सध्यांचा वेळ मोठा कठीण आहे. दरबारच्या मराठे

सरदारांना दुखविण्याची ही वेळ नाहीं. नाहींतर भलताच प्रसंग येईल ! दिवसेंदिवस मोगलांची सत्ता वाढत चालली आहे. अशा वेळीं आपल्या दरबारचे सरदार जर तिकडे जाऊन मिळाले तर प्रसंग मोठा कठीण येईल."

"मग वजीर, तुमची काय सल्ला आहे ?" वजिराचा युक्तिवाद बादशहाला पटला; कारण या वेळीं दिल्लीच्या मोगल बादशहानें दक्षिणेंत मुद्दाम खानदौरान नांवाचा अत्यंत जुलमी पण धोरणी सुभेदार पाठविला होता. बादशहाला जी काय सल्ला द्यावयाची ती वजिरानें दिली. बराच वेळ बादशहा आणि वजीर ह्या दोघांचें गुप्त खलबत चाललें होतें.

शिवाजीचा मेहुणा शिवाजीजवळ शपथ घेऊन घरांतली भाऊबंदकी मोडण्याकरितां दहिगांवला आला होता. बजाजी निंबाळकर गांवांत शिरतांना त्याच्या घोड्यानें ठोकर खाऊन झालेल्या अपशकुनाची त्याच्या मनाला एकसारखी रुखरुख लागून राहिली. आलेलें दुश्चिन्ह आपणांवर येणाऱ्या प्रसंगाचें सूचक आहे, असेंच त्याला वाटूं लागलें. आणि शेवटीं त्याचप्रमाणें झालें. तो आपल्या सावत्र भावांना हरप्रयत्नानें प्रत्येक बाबतींत पड घेऊन सांगत होता; परंतु त्याची कोणतीच गोष्ट त्यांनीं मनावर घेतली नाहीं. 'तुला जें कांहीं आम्हांला बोलायचें आहे, तें विजापूरच्या बादशहासमक्ष बोल,' असें म्हणून त्यांनीं बजाजीला विजापुरास नेण्याचा घाट घातला.

परंतु 'बादशहानें दिलेल्या जहागिरीची मला जरुरीच नाहीं; मग मी बादशहाकडे तरी कशाला येऊं ? तुम्हांला वाटेल तर तुम्ही जहागीर ठेवा, नाहीं तर सोडून द्या—' असें निर्वाणीचें उत्तर देऊन बजाजीनें पुण्यास जाण्याची तयारी केली. तो आतां आपलें ऐकत नाहीं, तेव्हां आतां पुढें काय करावें, याविषयीं त्यांना विचार पडला. शेवटीं त्या दोघांनीं एक शक्कल काढिली. बजाजी हा बादशहाच्या विरुद्ध उठला आहे, असा राजद्रोहाचा त्याच्यावर आरोप ठेवून त्याला कैद करण्याचा त्यांनीं निश्चय केला, आणि सैन्यासह ते त्याच्यामागें निघाले. बजाजी निघाला तो थेट पुनः फलटणास आपल्या वडिलांकडे—मुधोजीरावांकडे आला, आणि त्यांना त्यानें सर्व हकीकत सांगितली.

मुधोजीरावांनींहि मुलाची समजूत करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु कोणती गोष्ट करण्याकरितां आपण आलों आहोंत, हें पूर्वींच त्यांनीं ठरविलें असल्यामुळें बोलाचालीवरून शब्दाला शब्द वाढत गेला आणि बापलेक हातघाईवर आले. शेवटीं तें प्रकरण वाढतां वाढतां त्याला लढाईचें स्वरूप येऊन मुधोजीराव आपल्या वडील मुलाच्या हातून मारले गेले. नंतर बजाजीला कैद करून ते दोघे सावत्र भाऊ विजापुरास आले. बजाजीच्या सावत्र भावांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून बादशहा त्याचा वध करण्यास तयार झाला.

बराच वेळ बादशहा आणि वजीर यांचें खलबत चाललें होतें. शेवटीं वजिरानें आपल्या सर्व गोष्टी बादशहाला पूर्णपणें पटविल्या, तेव्हां त्यांच्याच तंत्रानें वागण्याचें ठरवून बादशहा म्हणाला, " ठीक आहे. वजीर, तुमच्या मताप्रमाणं होऊं द्या. तुम्ही म्हणतां तसं झालं तरी कांहीं हरकत नाहीं; पण ह्या गोष्टीला शहाजादी कबूल होईल किंवा नाहीं याची शंका आहे. "

" हुजूर, आपली परवानगी असल्यावर त्या सर्व गोष्टी मी जुळवून आणतों. "

" माझी परवानगी आहे. मग काय बजाजींचा न्यायनिवाडा उघड झाला पाहिजे ?—बरं तर, ह्या अदालत महालांतच दरबार बोलविण्याची व्यवस्था करा. जा– "

पडत्या फळाची आज्ञा घेऊन वजीर कुर्निसात करून तेथून निघाला आणि शहाजादीच्या महालांत शिरला.

वजिरानें पुढें होऊन राजकन्येला लवून कुर्निसात केल्यावर प्रथम त्यांचीं ख्यालीखुशालीचीं प्रश्नोत्तरें झालीं. थोड्या वेळानें 'आपणांस कांहीं खासगी बोलावयाचें आहे' असें त्यानें सुचवितांच रोशनबिबीनें आपल्या मैत्रिणींना दूर जाण्यास सांगितलें. नंतर बराच वेळ वजीर तिच्याबरोबर हलक्या हलक्या स्वरांत बोलत होता; परंतु राजकन्येला त्याचें सर्वच बोलणें रुचलें असें तिच्या चर्येवरून दिसेना. शेवटीं तो म्हणाला, " रोषन, राजकारणांतील हे डावपेंच तुला समजणार नाहींत, ही गोष्ट मीहि कबूल करतों; पण मी सांगतों असंच आतां तुला वागलं पाहिजे. "

" वजीरसाहेब, तुम्ही सांगतां हें मला कसंसंच वाटतं ! मला हें कसं साधेल ? परक्या माणसाबरोबर बोलतांना माझी जीभ— "

" कांहीं अडखळत नाहीं ! अंगावर आलं कीं शिंग पुढं होतंच ! तूं एवढी धीट, हुशार आणि अशी हातपाय गाळूं लागलीस ? "

" बरं तर, केवळ बावांच्याकरितां मी ह्या तुमच्या राजकारणांत पडतें. पण मला तुम्ही साहाय्य कराल ना ? "

" मी तर एका पायावर तयार आहें. हें सर्व राजकारण जर मींच जुळवून आणलं आहे, तर मग मी तुला मदत करणार नाहीं असं कसं होईल ? बादशहानं तर त्याची कत्तल करण्याचा प्रथम हुकूम फर्मावला होता. त्याची आज कत्तल केली आणि उद्यां जर शहाजीसारखे उलटले, तर हां हां म्हणतां ते बादशाहीच्या ठिकऱ्या उडवतील ! "

" इतका का तो बडा सरदार आहे ? "

" स्वतः पाहा म्हणजे समजेल. शिवाय रोषन, तुला खरं सांगायचं म्हणजे आपल्या सर्व दरबारांत त्याच्याइतका देखणा पुरुष नाहीं. स्वभावानंहि तो फार उमदा मनुष्य आहे. बोलणं किती मिठास आहे म्हणून सांगूं ! " वजिरानें बराच वेळ ऐसपैस वर्णन केल्यावर रोषनबिबीचें मन वळलें. नंतर तिला पुढचा कार्यक्रम सांगून वजीर तिची रजा घेऊन बाहेर पडला.

वाटेंत त्याची व बाजी घोरपड्याची गांठ पडली; पण त्यानें बाजीला आपल्या कारस्थानाचा थांगपत्ता लागूं दिला नाहीं. बाजी बहुधा आपल्या जहागिरींच्याच गांवीं कर्नाटकांत राहात असे. विजापूरच्या सरदारांत जरी त्याचें प्रामुख्यानें नांव होतें, तरी शहाजी राजापुढें तो फिका होता. महिन्या दोन महिन्यांनीं किंवा मध्यंतरीं दरबारचें बोलावणें आलें, तर तो मुजरा देण्याकरितां विजापुरांत येत असे आणि त्या प्रत्येक वेळीं जगपाळरावांच्या वाड्यांत उतरत असे. आज तो दरबारांत आला होता, तो जगपाळरावांच्या गढींतूनच आला होता.

वजीर घाईघाईनें गेल्यानंतर क्षणभर विचार केल्यावर बाजी चिनी महालांतून बाहेर पडला व बादशहाला मुजरा करण्याकरितां आनंद महालांत आला. बादशहानें त्याला पाहतांच त्याच्या मुजऱ्याचा स्वीकार

करून त्याला आपल्याजवळ बसविलें. नंतर ख्यालीखुशाली विचारून 'दोन दिवस महालांत रहा आणि दरबारचा पाहुणचार घ्या' असाहि त्यानें बाजीला आग्रह केला. अशा रीतीनें त्यांच्या गोष्टी चालल्या असतां अदालत महालांत दरबार भरल्याची वर्दी देण्याकरितां एक गुलाम तेथें आला. तेव्हां उठतां उठतां बजाजीबद्दल बादशहानें कोणतें राजकारण योजिलें आहे तें कळावें, ह्या उद्देशानें त्यानें विचारलें, "खाविंद, आतां बजाजीकरितां हा दरबार भरला आहे ना ? त्याच्या गुन्ह्याकडे पहातां त्याची कत्तल करणें, हाच जरी न्यायानें त्याचा इन्साफ होत असला, तरी काळवेळ पाहून त्याच्यावर मेहेरनजर केली पाहिजे, असं मला वाटतं !"

"बाजीसाहेब, तुमचं म्हणणं बरोबर आहे. तुमचीं मनं दुखवणार नाहींत असाच मी आतां इन्साफ देणार आहें." असें म्हणून बादशहा उठला. बाजीचा हिरमोड झाला.

बादशहाकरितां सुंदर कारागिरीचें मयूरसिंहासन मांडलें होतें. त्याच्यामागेंच आंतल्या दालनांत जाण्याचा कमानदार दरवाजा होता. त्या दरवाजाला त्या वेळीं चिकाचा पडदा लावलेला होता. वजिराच्या सांगण्याप्रमाणें रोषनबिबी त्या पडद्याच्या मागें गोषांत बसली होती. बादशहा तेथें येतांच सर्वांनीं उठून खडी ताजीम दिली. थोड्या वेळानें बजाजी निंबाळकराला चार सशस्त्र शिपायांच्या पहाऱ्यांत तेथें आणलें. त्याचे सावत्रबंधु सावाजी आणि जगदेव पूर्वींच आले होते. बादशहानें वजिराकडे वळून गुन्हा काय आहे असें विचारतांच, 'बजाजीवर राजद्रोह आणि पितृवध असे दोन गुन्हे शाबीत होतात,' असें त्यानें सांगितलें. प्रत्यक्ष त्याचे भाऊ त्याच्यावर हे आरोप ठेवतात, तेव्हां शंका घेण्याचें कारण नसून आरोपीजवळ स्वतःबद्दल साक्षीपुरावा नसल्यामुळें बादशहानें त्याला पूर्ण दोषीच ठरविलें.

"आमच्या बादशाहीविरुद्ध उठणाऱ्या ह्या पितृघातकी बजाजीला आमच्या खास आरा किल्ल्याच्या तळघरांत कोंडून ठेवा आणि उद्यां सूर्योदयाबरोबर दक्षिणेच्या ब्राह्मणी बुरुजावर त्याची कत्तल करा !" रागाचा पूर्ण आविर्भाव आणून बादशहा म्हणाला.

"बादशहा, मी सर्वसाक्षी परमेश्वराला स्मरून सांगतों कीं, मी पूर्ण निर्दोषी आहें. वडील बंधूंनीं माझ्यावर हे घाणेरडे आरोप ठेवले आहेत; त्यांत त्यांचा काय उद्देश असेल तो त्यांनाच ठाऊक! माझ्या मृत्यूमुळें बादशहा, तूं स्वतःला कोणत्या संकटांत घालीत आहेस, याची तुला कल्पना नाहीं. अद्याप विचार कर. तुझ्या बादशाहीचे दिवस फिरले आहेत. बादशाहीवरील भावी संकट टाळण्याकरितां ह्या गोष्टीचा पुनः एकवार विचार कर. मी ईश्वराला स्मरून सांगतों कीं, मी पूर्ण निर्दोषी आहें!"

"बस्स! ही बकबक बंद कर. वजीर, ह्या बंडखोराला घेऊन जा आणि माझ्या हुकुमाप्रमाणें करा. जा—"

* * *

## १०. प्रेमयाचना आणि वचनबद्धता

मध्यरात्रीचा अंमल सुरू झाला होता. जिकडे तिकडे अगदीं शांतता झालेली दिसत होती. निद्रादेवीनें आपला अंमल सर्वत्र पसरविला होता. फक्त राजवाड्यावर पहारा करीत असलेले सशस्त्र शिपाई मधून मधून 'हुश्शार!' असें ओरडून त्या शांततेचा भंग करीत होते. अशा वेळीं खुद्द राजवाड्यांतील एक दोन महालांत निद्रादेवीचा प्रवेश झालेला दिसत नव्हता. किल्ल्यांतील तळघराच्या अंधारकोठडींत विशेष बंदोबस्तानें कडीकुलुपें लावलीं असल्यामुळें निद्रादेवीनें प्रवेश केला नाहीं, हें लिहिणें नकोच. त्या अंधारकोठडींत आपल्या आयुष्याचीं घटकापळें मोजीत असलेला एक दुर्दैवी कैदी—बजाजी निंबाळकर—शांत चित्तानें एका शिलातलावर बसला होता. उद्यां अरुणोदय होतांच आपला देहान्त होणार आहे, म्हणून त्याच्या मनाला किंचित्‌हि अस्वस्थता वाटत नव्हती. मृत्यूची भीति त्याच्या मनाला शिवली नाहीं; मात्र एका गोष्टीची त्याच्या मनाला तळमळ लागली होती आणि ती गोष्ट म्हणजे त्यानें शिवाजीजवळ घेतलेली शपथ! आपण कोण-कोणत्या गोष्टी करण्याचें ठरविलें होतें, काय काय करणार होतों,

इत्यादि विचार मनांत येऊन सर्वच गोष्टींची उलटापालट झाल्यामुळें त्याचें मन तळमळत होतें.

त्याच वेळीं राजमहालांत बादशहानें खास आग्रहानें ठेवून घेतलेला पाहुणा बाजी घोरपडे आपल्या सुखशय्येवर तळमळत पडला होता. त्याला झोंप बिलकूल येईना. तें वजिराचें राजकारण साधण्यापूर्वींच आपण प्रयत्न करून हा बजाजीचा कांटा दूर केला, म्हणजे आपला एक प्रतिस्पर्धी कमी होईल असा आपल्या महत्त्वाकांक्षेला अनुसरून नीच विचार त्यानें ठरविला. तो आपल्या शय्येवरून उठला, त्यानें आपलीं शस्त्रें हातीं घेतलीं, लगेच अत्यंत सावधपणानें आपल्या महालाचा दरवाजा उघडून तो बाहेर पडला. त्याला किल्ल्याच्या तळघरांत असलेली अंधारकोठडी कोठें आहे, हें चांगलें माहीत होतें. कारण आरा किल्ल्याचा पूर्वींचा मातीचा असलेला तट पाडून तो भक्कम दगडांनीं बांधून घेण्याचें बहुतेक सर्व काम त्याच्याच देखरेखीखालीं झालें होतें. ज्या तळघरांत बजाजीला कैद करून ठेवलें होतें, ती अंधारकोठडी कडीकुलुपें लावून पक्क्या बंदोबस्तानें बंद केली होती, तरी आपण चोरवाटेनें सहज आंत प्रवेश करूं अशी त्याला खात्री होती. अशा रीतीनें तो अत्यंत सावधपणानें आणि हुशारीनें निघाला असतां आपल्यामागें कोणी येत असेल, अगर आपल्या कृत्यावर कोणाची पाळत असेल, अशी शंका घेण्याचेंहि त्याला कारण नव्हतें. थोड्या वेळानें तो चोरवाटेनें अगदीं अंधारकोठडीजवळ आला. अंधारकोठडींत बजाजी जरी निःशस्त्र होता, तरी तो निधड्या छातीचा वीर आहे आणि वेळप्रसंग पडला तर आपलें शस्त्र आपल्या हातांतून हिसकावून घेऊन तें तो आपल्या मानेवरच ठेवील, अशी त्याला भीति होती. शिवाय प्राणसंकटीं कोणीहि दुबळा मनुष्य हातपाय झाडतोच! हा सर्वसाधारण सिद्धान्त आठवून त्यानें आपल्या दोन्ही हातांतील शस्त्रें नीट खंबीर धरून पायानें कळ दाबिली. त्याबरोबर गुप्त दरवाजा खाड्दिशीं उघडला. त्या आवाजाबरोबर ‘ कोण आहे ? ’ असा आंतून ध्वनि आला.

“ तुझा काळ ! ”

“ माझा काळ ?—आणि तो इतक्या लवकर कसा आला ? ”

“ मरायला तयार हो ! ”

“ मी मरायला तयारच आहें; परंतु माझ्या मृत्यूची सूर्योदयापर्यंत मुदत आहे. ”

“ ही वटवट बंद कर !–मरणाला सिद्ध हो ! ”

“ मी मरणाला केव्हांहि तयारच आहें; पण माझा काळ असा लपत छपत काळोखांत कां आला ? सूर्योदय होईपर्यंत माझ्या मरणाला थांबलं पाहिजे. बादशहानं–”

“ बादशहा गेला * * * * ! चल, आटप–” असें म्हणून बाजीनें आपली तरवार उगारली. तो बजाजीवर अत्यंत जोरानें तरवारीचा वार करणार, इतक्यांत खाड्दिशीं दरवाजा उघडून आंत लख्ख प्रकाश पडला, आणि त्याबरोबरच “ खबरदार ! ” असा ध्वनि आंत आला. बाजी घोरपड्याची छाती धडाडली ! त्याचा तरवारीचा वर केलेला अवसानाचा हात गळून खालीं आला ! त्यानें भीत भीत मागें वळून पाहिलें, तों दरवाजांत सर्वांग पांढऱ्या बुरख्यानें झांकून घेतलेली एक व्यक्ति हातांत दिवा घेऊन उभी असलेली त्याच्या दृष्टीस पडली !

“ बाजीसाहेब, असलं नामर्दपणाचं काम करतांना तुम्हांला शरम वाटायला पाहिजे होती. अशा काळोखांत लपत छपत येऊन बिकट परिस्थितींत असलेल्या एका असाहाय्य माणसावर तुम्ही शस्त्र उगारतां ? धिक्कार असो तुमच्या शूरपणाला ! जा, तुमच्यासारख्या नीच माणसा-बरोबर बोलण्याचीहि माझी इच्छा नाहीं. जा—ह्या गोष्टीचा स्फोट होऊं नये अशी जर तुमची इच्छा असेल, तर मुकाट्यानं इथून चालते व्हा. जा—” असें हुकुमी आवाजांत सांगून त्या व्यक्तीनें दरवाज्याकडे बोट दाखविलें. बाजीसाहेबाला वर तोंड करण्याचेंहि धैर्य झालें नाहीं. मुकाट्यानें खालीं मान घालून तो आल्या वाटेनें चालता झाला. तो निघून गेल्यावर त्याच्यासमोर उभ्या असलेल्या त्या शुभ्र वस्त्र परिधान केलेल्या व्यक्तीकडे बजाजीचें लक्ष वेधलें. ही व्यक्ति कोण असावी, असा तो विचार करूं लागला, तोंच ती व्यक्ति बोलूं लागली,

“ सरदारसाहेब, क्षणापूर्वीं बाजी घोरपडे तुम्हांला मारण्याकरितां आला होता; परंतु मी तुम्हांला वांचविण्याकरितां आलें आहें. ”

त्या व्यक्तीचा आवाज ऐकून बजाजी आश्चर्यचकित झाला; कारण त्या आवाजांत मनाला थक्क करून सोडणारा फरक झाला होता. बाजी घोरपड्याबरोबर बोलतांना त्या आवाजांत भयंकर कठोरता असून प्रत्येक शब्द हुकुमी होता; परंतु आतां तोच आवाज अत्यंत मृदु आणि आर्जवी झाला ! ती व्यक्ति पुढें म्हणाली,

"चला, उठा. आपणाकरितां बाहेर सर्व तयारी जय्यत करून ठेविली आहे. आतां एक क्षणहि व्यर्थ दवडूं नका. किल्ल्याच्या बाहेर गुप्त दरवाजाच्या तोंडाशीं एक घोडा सज्ज करून ठेवला आहे, त्याच्यावर स्वार व्हा, आणि वेशीच्या ब्राह्मणी दरवाजानं बाहेर पडा. आपणांस कोणीहि अटकाव करणार नाहीं."

"तूं कोण आहेस ?"

"महाराज, मी कोणी कां असेना !"

"आवाजावरून तूं स्त्री आहेस हें सिद्धच होतं—"

"आपल्या पायाची मी एक शुद्ध बटीक आहें !"

"पण माझ्याकरितां ही भलतीच उठाठेव आणि धाडस करण्याचं तुला काय कारण ? तूं कुणाच्या सांगण्यावरून हें करीत आहेस ? तुझं नांव काय ?"

"महाराज, माझं नांव कांहीं का असेना ! तें कळून न कळून सारखंच आहे. मी कुणाच्या सांगण्यावरून हें केलं नाहीं. फक्त आपले बहुमोल प्राण वांचावे म्हणून मींच होऊन हें धाडस केलं आहे."

"वेडी आहेस !— मरणाला भिऊन मी असा भागूबाईसारखा केव्हांहि पळून जाणार नाहीं. मला माझा जीवच वांचवायचा असता, तर मघां माझा काळ म्हणून आलेल्या बाजी घोरपड्याला एका क्षणांत लोळवून मी इथून बाहेर पडलों असतों; पण 'बजाजी निंबाळकर मरणाला भिऊन पळून गेला' असा नामर्दपणाचा दोष मला नको आहे ! जा—जा."

"महाराज, आपण जर इथून जाणार नाहीं—आपण जर आपले प्राण वांचविणार नाहीं—तर मी आपल्या पायांजवळ प्राण देईन !"

"तुला मीं कधीं पाहिलंहि नाहीं. आवाजावरून तूं हिंदु नाहींस हें

स्पष्ट होत आहे. असं असून माझे प्राण वांचविण्याकरितां तूं हा धाडसाचा इतका अट्टाहास कां करावास?"

"केवळ प्रेमाकरितां!"

"किती अविचारी आहेस तूं! मी तुझ्या जातीचा नाहीं, गोताचा नाहीं किंवा धर्माचा नाहीं! कदाचित् इथून गेल्यावर मी तुझ्या कधीं दृष्टीसहि पडणार नाहीं. अशी वस्तुस्थिति असतां तूं प्रेमाच्या कोणत्या उद्देशानं हें धाडस करीत आहेस? तुझ्या प्रेमाला मजकडून कोणता मोबदला मिळणार?"

"मोबदल्याची मला इच्छाच नाहीं! मोबदल्याची आशा करून माझ्या शुद्ध प्रेमाला 'स्वार्थाचा' मी केव्हांहि बट्टा लावणार नाहीं! मग काय, महाराज, आतां निघायचं ना! आपण बोलण्यांत किती तरी वेळ गमाविला आहे. आपण इथून लवकर चला—अरुणोदयाला आतां थोडा अवधि राहिलेला दिसतो. चला—आटपा—"

"हे पवित्र स्त्रिये—" क्षणभर विचार करीत करीत गंभीर स्वरांत बजाजी म्हणाला, "तूं कोण आहेस, हें मला कळूं देत नाहींस आणि माझ्याकडून कोणत्याहि गोष्टीची अपेक्षाहि करीत नाहींस, यावरून तुझ्या पवित्र प्रेमाच्या शुद्ध हेतूची मला पूर्ण कल्पना होते. केवळ तुझ्या सात्त्विक प्रेमाला मान देण्याकरितांच मी इथून जातों; पण तुझ्या उपकाराची मला कोणत्याहि रीतीनें फेड करतां येत नाहीं म्हणून वाईट वाटतं!"

"एकूण माझ्या प्रेमाचा मोबदला देण्याची आपली इच्छा आहे तर!"

"हे निःस्वार्थी शुद्ध मनाच्या देवते! तुला अशी शंका कां यावी? हा बजाजीचा शब्द आहे—हा मराठ्याचा शब्द आहे. तुझ्या ह्या पवित्र प्रेमाचा प्रेमानंच मोबदला देण्याचा जर दिवस उगवला, तर तो मी माझ्या आयुष्यांतील खरोखरीच एक भाग्याचा दिवस समजेन!"

"अगदीं खरं ना हें, महाराज?"

"खरं म्हणून शंका?—हें घे वचन."

* * *

प्र. क्र. ५७१८ नों. दि

## ११. स्त्रीचातुर्य कीं वचनपूर्तता

त्या शुभ्र वस्त्र परिधान केलेल्या स्त्रीचा मोठ्या आदरानें आणि पूज्य बुद्धीनें बजाजीनें निरोप घेतला. आपण अंधारकोठडी सोडून जात आहोंत, भ्याडपणानें किंवा मरणाच्या भीतीनें जात नसून केवळ सात्त्विक आणि शुद्ध प्रेमाचा केवळ बहुमान करण्याकरितां, आणि असें प्रेम ज्या स्त्रीच्या अंतःकरणांत वसत आहे, त्या स्त्रीचाहि गौरव करण्याकरितां जात आहोंत, असें त्याला वाटलें. अंधारकोठडींतून बाहेर पडल्यावर त्या स्त्रीनें दाखविलेल्या गुप्त मार्गानें सर्व पहारे चुकवून तो किल्ल्याच्या बाहेर पडला. तेथें एका विस्तीर्ण वडाच्या झाडाखालीं एक उमदा घोडा सज्ज करून एक मनुष्य उभा होता. बजाजी तेथें येतांच त्या स्त्रीच्या सांगण्याप्रमाणें तो किंचित् 'हं-हं' असा हंकरला. 'कौन है?' असा त्या मनुष्यानें प्रश्न करतांच 'बजाजी' असें बजाजीनें उत्तर दिलें. तेव्हां त्या मनुष्यानें लगाम त्याच्या हातांत दिली आणि 'इस रस्ते से सीधे चले', असें म्हणून त्यानें दक्षिण वेशीच्या दरवाजाकडे बोट दाखविलें. बजाजीनें घोड्याच्या पाठीवर उडी टाकली, आणि त्या मनुष्यानें दाखविलेल्या दिशेकडे घोडा फेकला. दक्षिण दरवाजांतून बाहेर पडून तो मार्गाला लागला आणि जवळजवळ एक मैल गेला असेल नसेल, तोंच त्याच्यामागून घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं येऊं लागला. रात्र काळोखी असल्यामुळें आपल्यामागून येणारे स्वार कोण आहेत, हें कळावयाला मार्ग नव्हता. मागच्या घोड्यांच्या टापांचा आवाज त्याला अधिकाधिक स्पष्ट ऐकूं येऊं लागला. तीन चार मैल पुढें जातांच समोरूनहि त्याला टापांचा आवाज ऐकूं येऊं लागला. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे बजाजी कैचींत सांपडला. कारण दोन्ही बाजूंना किर्र झाडी असल्याकारणानें त्या स्वारांना चकवितांहि येणें शक्य नव्हतें. थोड्या वेळानें ते मागचे आणि पुढचे स्वार त्याच्या अगदीं जवळ येऊन ठेपले. बजाजीनें 'कौन है?' असा दोन्ही बाजूंच्या स्वारांना मोठ्यानें प्रश्न केला. परंतु त्याच्या प्रश्नाला उत्तर मिळण्याऐवजीं मागच्या स्वारांनीं झटपट चकमकी झाडून दोन चार मशाली पेटविल्या. त्या उजेडांत मागच्या स्वारांपैकीं एक स्वार त्वेषानें

आपला घोडा बजाजीच्या अंगावर घालून म्हणाला, " बदमाष, काफर, रंडी की अवलाद ! किल्लेमें से भाग जाता था क्या ? "

बजाजी पुनः कैद झाला !

सकाळींच अदालत महालांत पुनः दरबार भरला. आदल्या दिवशीं दुपारीं जी मंडळी दरबाराला आली होती, तीच मंडळी आतांहि हजर होती. शिवाय बाहेरच्या सज्ज्यांत शहरवासी जनांची अतिशय गर्दी झालेली होती. बाजी घोरपडेहि दरबारांत आला होता; परंतु त्याची चर्या काळवंडलेली दिसत होती. बादशहा येतांच थोड्या वेळानें शिपायांच्या सशस्त्र पहाऱ्यांत बजाजीला दरबारांत आणलें. त्याला पाहून ' बदमाष, कैदमें से भाग जाता था क्या ?— काफर ! ' असें दांत-ओठ खात प्रत्येकजण म्हणाला. दरबारांतहि चळवळ झाली. क्षणभरानें बादशहा दरडावून मोठ्या रागानें म्हणाला, " बेहराम ! काल माझ्यापुढं ह्याच दरबारांत मोठं तोंड करून बोलणारा तूंच काफर ना ? मरणाला भीत नाहीं म्हणून प्रौढी गाइलीस; मग भागूबाईप्रमाणं अंधारकोठडींतून पळून कां गेलास ?—माझा हुकूम तूं मोडलास, प्रत्यक्ष माझा अपमान केलास आणि काल भरसभेंत मला दुरुत्तरं केलींस. बोल—आपल्या बापाला ठार मारलंस कीं नाहीं ? कबूल कर. "

बजाजीला आतां तोंड उघडण्याची सोयच नव्हती. आपण अंधार-कोठडींतून पळालों, हा न्यायाच्या दृष्टीनें खरोखरीच अपराध आहे, ही गोष्ट त्यालाहि कबूल होती. परंतु रात्रीं कोणता प्रकार घडला म्हणून आपण अंधारकोठडी सोडली हें त्याला सांगतां येईना. कारण एका पवित्र स्त्रीनें प्रेमाच्या उद्देशानें आपली सुटका केली असें दरबारांत सांगून तिची विटंबना करणें, हा क्षुद्र विचार त्याच्या मनांत येईना.

" इस बेइमान सैतान की जल्द कत्तल कर डालो. "

बादशहाचा हुकूम झाला. मारेकऱ्यानें आपली तरवार वर उचलली. बजाजी अगदीं शांत आणि निश्चल उभा होता. आतां एक हृदयद्रावक देखावा भर दरबारांत आपल्या दृष्टीस पडणार म्हणून सभाजनांपैकीं कित्येकांना वाईट वाटून त्यांनीं आपल्या डोळ्यांवर हात ठेवले. कित्येकांना आनंद झाला. इतक्यांत बाजूचा चिकाचा पडदा दूर

सारून अत्यंत बहुमोल वस्त्र आणि अलंकार परिधान केलेली परंतु तोंडावरून बुरखा घेऊन तोंड झाकलेली तरुणी धांवत बाहेर आली आणि बादशहाच्या पायांवर पडली ! तें पाहून अत्यंत आश्चर्यचकित स्वरानें बादशहा म्हणाला, " या अल्ला !—यह क्या ? शहाजादी यहां क्यौं आयी ?—अफसोस ! मेरे प्यारे लडकी— "

सर्व सभाजन विस्मयानें थक्क होऊन बादशहाच्या पायांजवळ अस्ताव्यस्त पडलेल्या शहाजादीकडे पाहूं लागले. खुद्द बादशहा खालीं उतरून तिला उठवूं लागला; परंतु शहाजादी न उठतां म्हणाली, " बाबा, ह्या तरुणाला अभयवचन मिळाल्याशिवाय मी आपल्या चरणांवरून उठणार नाहीं ! "

तो आवाज कानीं पडतांच बाजी घोरपडे काळा ठिक्कर पडला ! त्यानें रात्रीचा आवाज ओळखला ! बजाजीहि आश्चर्यातिरेकानें तिच्याकडे पाहूं लागला. रात्रीं आपणांला जिनें सोडविलें ती दुसरी तिसरी कोणी नसून शहाजादीच आहे, आणि आपण तिच्या प्रेमाचें स्थान आहोंत हें पाहून क्षणभर त्याला अभिमान आणि कौतुक वाटलें. क्षणभरानें बादशहा म्हणाला, " रोषन, माझ्या प्यारे मुली ! हा काय वेडेपणा आहे ? ऊठ—ह्या हरामजाद्या मनुष्याला फर्मोविलेली शिक्षा मला केव्हांहि रद्द करतां येणार नाहीं ! ह्या हरामखोर माणसाची कत्तल ही झालीच पाहिजे ! "

" ठीक आहे. बाबा, ह्या तरुणाची कत्तल करण्याचा जर आपला इतका निश्चयच आहे, तर ह्याच दरबारांत मीहि प्राणत्याग करीन ! "

" या अल्ला परवरदिगार !—ह्या पोरीला सैतान लागलं कीं काय ?—रोषन, माझ्या लाडक्या रोषन, माझ्या प्यारे रोषन, हें तूं काय बोलतेस ? ह्या सैतानाबरोबर तूंहि प्राणत्याग करणार म्हणतेस ह्याचा अर्थ काय ? "

" बाबा, ह्याचा अर्थ—प्रेम ! "

" तोबा ! तोबा !— " असें म्हणून बादशहानें विस्मयानें दोन्ही हातांनीं आपल्या तोंडांत मारून घेतल्या आणि हातवारे करीत तो पुढें म्हणाला, " प्रेम ?—ह्या सैतानावर तुझें प्रेम ? रोषन, हें तूं काय बोलतेस ?— "

बराच वेळ विचार करीत बादशहा तिच्याकडे पाहात राहिला. आतां पुढें बादशहा काय करतो, हें पाहण्याकरितां सर्वांचें चित्त अधीर झालें ! खरोखरीच बादशहाला मोठा पेंच पडल्यासारखा दिसत होता. क्षणभरानें त्यानें आपली दृष्टि बजाजीकडे वळविली. त्या दृष्टींत राग आणि तिरस्कार स्पष्ट व्यक्त होत होता. बजाजी मात्र अगदीं शांत चित्तानें उभा होता.

"ठीक आहे. रोषन, तुझ्याकरितां--केवळ तुझ्या प्रेमाकरितां मी ह्या तरुणाला माफी करतों; पण एक अट आहे. ती अट जर हा तरुण मान्य करील, तरच मी दिलेली शिक्षा रद्द करीन. बोल !"

"बोला, बाबा, आपली कोणती अट आहे ? बोला, प्रेमाकरितां आपली वाटेल ती अट मान्य करायला ते केव्हांहि माघार घ्यायचे नाहींत, अशी माझी पक्की खात्री आहे. बोला, आपली अट कोणती ?"

"ह्या तरुणानं मुसलमान होऊन शादी केली पाहिजे."

"केव्हांहि नाहीं !" एकदम गर्जना करून बजाजी म्हणाला, "बेहेत्तर आहे एकदां सोडून सात वेळ कत्तल झाली तरी; परंतु प्राण गेला तरी मी धर्मांतर करणार नाहीं !"

"ऐक—रोषन !" बादशहा रागानें म्हणाला, "ह्या तरुणाचं भाषण ऐक ! तूं ह्या तरुणाकरितां प्राण द्यायला तयार झाली आहेस ना ? पाहा, यानं तुझ्या प्रेमाची कशी किंमत केली ती पाहा ! आणि आतां शहाणी हो ! फीर मागं !"

परंतु झटकन् आपल्या बापाच्या हातांतील हात सोडवून ती पुढें झाली आणि बजाजीच्या समोर, त्याच्या अगदीं जवळ जाऊन उभी राहिली. क्षणभर तिनें आपल्या बुरख्यांतूनच बजाजीकडे पाहिलें. नंतर ती म्हणाली, 'महाराज, आपण दिलेलं वचन इतक्या लवकर विसरलांत काय ?—आपल्या शब्दाकरितां, आपल्या वचनाकरितां बाबांची अट मान्य करणार नाहीं का ? महाराज, ह्या चरणांवर वाहिलेल्या ह्या प्राणाचे धिंडवडे करणार काय ?" असें म्हणून रोषनबिबी खालीं वांकली आणि तिनें बजाजीचे पाय धरले. तिचा हस्तस्पर्श होतांच बजाजीला एक

अननुभूत भावना झाली. त्याच्या सर्वांगावर पुनः रोमांच उभे राहिले. तो किंचित् वांकून तिच्याकडे पाहूं लागला. त्याच संधीला रोषनबिबीच्या तोंडावरील ओढणीचा पदर खालीं पडला. रोषनबिबीचें मुखकमल दृष्टीस पडतांच बजाजीच काय, परंतु सभागृहांतले सर्वजण आश्चर्य-स्तंभित झाले! इतका वेळ तिच्या शब्दांनीं जें कार्य केलें नाहीं, तें आतां तिच्या सौंदर्यदर्शनानें केलें!

"रोषन, ऊठ! हा बजाजी तुझा बंदा गुलाम आहे. तुझ्या प्राप्तीकरितां तुझ्या पित्याची एकच काय, पण हजारों अटी मान्य करील!—ऊठ." बजाजी तिला एकदम उठवीत म्हणाला.

क्षणार्धांत सर्व देखावा बदलला! मनु पालटला!! वजिराचें राजकारण यशस्वी झालें!!!

त्याच दिवशीं धर्मांतराचा विधि होऊन शहाजादीबरोबर बजाजीची 'शादी' झाली! आतां बजाजीचा 'बजाखां' झाला!

* * *

# १२. अकल्पित योगायोग

सायंकाळची वेळ होत आली होती. मागें वर्णन केल्याप्रमाणें जिजाबाईच्या आज्ञेप्रमाणें दीपाबाईचा शोध करण्याकरितां नेताजी निघाला. त्याला वाटेंत बहिर्जी भेटला. तेथें रात्रीच्या वस्तीकरितां एका खेड्यांत उतरून त्यानें बरेच अनुयायी मिळविले आणि प्रत्येकाकडून शपथ घेवविली. तेथून दुसऱ्या दिवशी सकाळीं ती सर्व मंडळी विजापुरांत येण्याकरितां निघाली. बजाजी निंबाळकराची हकीकत काय आहे, त्याची चौकशी करण्याचें काम जिजाबाईनें त्याच्याकडे सोंपविलें होतें, त्याप्रमाणें चौकशी करून त्या 'भावांभावांत तंटा झाला व मुधोजीरावांचा खून होऊन बजाजीला कैद करून विजापुरांत नेलें,' अशा सविस्तर हकीकतीचें पत्र देऊन त्यानें एक स्वार मासाहेबांकडे पाठविला. नंतर ती सर्व मंडळी विजापुरांत येऊन दाखल झाली. तेथें एका मुशाफरखान्यांत तळ देऊन आतां पुढें काय करावयाचें, त्याबद्दल त्यांनीं खल केला.

शहरांत टेहळणी करीत करीत त्या दोघांनीं बरेच वाडे पाहिले. प्रत्येक वाड्याच्या देवडीवर मुसलमान पहारेकरी त्यांच्या दृष्टीस पडत. एक दोन ठिकाणीं त्यांनीं चौकशी केली; परंतु कोणीहि त्यांच्या प्रश्नाला सरळ उत्तर दिलें नाहीं; उलट मानखंडना मात्र झाली ! अशी वर वर चौकशी करून पळवून नेलेल्या मुलीचा शोध लागावा कसा ? शेवटीं एका वाड्यांत नोकरचाकरांची बरीच धांदल चाललेली त्यांच्या दृष्टीस पडली; परंतु ते सर्व नोकर सिद्दी, खोजे आणि मुसलमान होते. थोड्या वेळानें, एक मुसलनान पोर फळफळावळ आणि फुलें यांनीं भरलेली टोपली घेऊन वाड्यांत जात होता, त्याच्याजवळ नेताजीनें चौकशी केली. तेव्हां रात्रीं त्या वाड्यांत मजलस आहे, इतकें त्याला कळलें. थोड्या वेळानें एक स्त्री वाड्यांतून बाहेर पडली. नेताजी आणि बहिर्जी कोपऱ्याजवळ रस्त्यावर उभे होते. ती स्त्री त्यांच्या बाजूनें झपाट्यानें जात होती. साधारण काळोख असल्यामुळें आणि त्यांतून तिनें डोक्यावरून ओढणीचा पदर घेतलेला असल्यामुळें तिचा चेहरा त्यांच्या दृष्टीस पडला नाहीं. ती वाड्यांतील बटीक असावी असा त्यांचा समज झाला, आणि त्यांनीं तिच्याकडे दुर्लक्ष केलें. परंतु ती जवळ येतांच "माझ्यामागून या" असें हळूच म्हणून पुढें गेली. आवाजावरून ती हिंदु आहे, इतकें त्यांनीं जाणलें. तिच्यामागून जावें किंवा न जावें असा विचार बहिर्जीच्या मनांत आला. नेताजी मात्र कोणताहि विचार न करतां तडक चालूं लागला. अर्थात् बहिर्जीलाहि त्याच्यामागें जाणें भाग पडलें. रस्त्याच्या अगदीं टोंकाला गेल्यावर ती स्त्री थांबली. वाटेंत एकदोनदां तिनें मागें वळून पाहिलें. नेताजी आणि बहिर्जी जवळ येतांच ती स्त्री हळूच म्हणाली,

"पायां पडतें, जरा थांबा ! माझी एक गोष्ट ऐका. रात्रीं वाड्याच्या मागल्या पागेच्या दरवाजाजवळ या. मी दरवाजा उघडून ठेवीन. तिथं गवतावर एक स्त्री निजलेली तुम्हांला दिसेल, तिला घेऊन जा. तिच्या अब्रूचं रक्षण केल्याचं तुम्हांला पुण्य लागेल. जा—आतां जास्त वेळ थांबायला मला वेळ नाहीं. ती स्त्री मेल्यासारखी दिसेल; पण भिऊं नका. सूर्योदयाला ती शुद्धीवर येईल. जा—विसरूं नका ! तें पाहा कोणी

येत आहे. जा—लवकर जा—" असें म्हणून ती स्त्री झटकन् वळली आणि झपाट्यानें बाजूच्या बोळांत शिरली.

बरेच तर्कवितर्क मनांत येऊन त्या दोघांचीं मनें अगदीं गोंधळून गेलीं. म्हातारीच्या सांगण्यावर विश्वास ठेवावा का? म्हणून नेताजीनें बहिर्जीला आणि बहिर्जीनें नेताजीला प्रश्न करावा; परंतु कोणाकडूनहि निश्चयात्मक उत्तर मिळेना. इतक्यांत नेताजीच्या डोक्यांत एक कल्पना आली आणि तो म्हणाला, "बहिर्जी, त्या म्हातारीनं सांगितलं आहे, त्याप्रमाणं आपण तिथं गेल्यावर ज्या स्त्रीची आपण सुटका करणार, ती स्त्री दुसरी तिसरी कोणी नसून तुझी दीपाबाई नसेल कशावरून? काय सांगावं?—योगायोग कसे जुळून येतील तें कांहीं सांगवत नाहीं! मला वाटतं, जावंच!—पण बरोबर आपल्या मंडळींपैकीं चार दोन माणसं असलेलीं बरीं! तूं जा आणि त्यांना घेऊन ये. मी त्या स्त्रीनं सांगितल्याप्रमाणं पागेच्या दाराजवळ तुझी वाट पाहात उभा आहें. जा—"

बहिर्जी मुकाट्यानें निघून गेला आणि नेताजी हळूहळू पागेच्या दरवाजाजवळ येऊन उभा राहिला. वाड्यांत सर्वत्र धामधूम चालली होती. जिकडे तिकडे रोषनाई केलेली असल्यामुळें तो एक दीपोत्सवच आहे कीं काय असें वाटत होतें. वाड्याच्या आंतबाहेर केलेला शृंगार पाहून सहज नंदनवनाची कल्पना होत होती. तें ऐश्वर्य डोळ्यांना दिपविणारें होतें, यांत शंकाच नव्हती.

सर्वत्र ऐषआरामाच्या वस्तु आणि खाद्यपेयांच्या जिनसांची रेलचेल दिसत होती. शहरांतील मोठमोठे शेट-सावकार, सरदार आणि अमीर-उमराव आपल्या इच्छेप्रमाणें तेथील वस्तूंचा मनमुराद उपभोग घेत होते. त्या मंडळींत बाजी घोरपडे आणि वजीरसाहेब आपल्या मनाची करमणूक करून घेत असलेले दिसत होते. वजीरसाहेबांची मर्जी सांभाळण्याकरितां त्या वाड्याचा मालक अदबीनें हात जोडून जवळच बसलेला होता. आतांपर्यंत केलेल्या वर्णनावरून तो वाडा कोणाचा होता, हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. वाड्याच्या मालकाचें नांव अमीर मोअझील असें होतें. हे अमीरसाहेब विजापुरांत येऊन नुकतेंच एक वर्ष झालें होतें. आपण काबूलच्या राजघराण्यांतील आहोंत असें सर्वत्र

प्रसिद्ध करून त्यानें सर्व शहरांत स्वतःच्या नांवाचा बोलबाला केला होता. शिवाय त्याची राहणीहि अत्यंत श्रीमंतीची असल्यामुळें कोणालाहि शंका घेण्याचें कारणच नव्हतें. त्यांतून मजलशीचे प्रसंग करून शहरांतील मोठमोठ्या मंडळींना तो आपल्या वाड्यांत आणी; परंतु वस्तुस्थिति अगदीं निराळीच होती. तो एक गुलामांचा व्यापारी होता. उत्तर हिंदुस्थानांतून फिरत फिरत विजापुरीं आल्यावर त्या शहराची रचना आणि तेथील धनसंपन्न व चैनी लोक पाहून मोठ्या चातुर्यानें लोकांवर छाप बसवून त्यानें आपली वस्ती वर वर्णन केलेल्या वाड्यांत केली होती.

इतक्यांत एक सिद्दी नोकर घाबऱ्या घाबऱ्या आंत आला आणि अमिराच्या कानांत कांहीं सांगून त्याला आंत घेऊन जाऊं लागला. तेव्हां दिवाणखान्यांत बसलेल्या कांहीं मंडळींनीं काय गडबड आहे म्हणून चौकशी केली. कित्येकांनीं अमिराला अडविलें; कित्येकांनीं तर उतावीळपणानें, “अमीरसाहेब, आतां कां बुवा वेळ करतां ? दाखवा एकदां तुमच्या शिलकेंतल्या अस्मानच्या पऱ्या ! आज आम्ही तुमच्याजवळची एक तरी परी घेणार ! तुम्ही सांगाल ती किंमत !” असेंहि म्हटलें, तर कित्येक त्यांच्याबरोबर आंत जाऊं लागले. परंतु त्या सर्वांना थांबवून अमीरसाहेब हंसत हंसत म्हणाले, “थांबा, अशी घाई करूं नका. आज तुम्हांला अशी एक बिजली परी दाखवितों कीं यंव ! तिच्या पायांवर मोहरांचा पाऊसच पडला पाहिजे.” इतकें बोलून अमीरसाहेब आंत गेला. तो बोलतांना हंसत होता, तथापि सिद्दी नोकरानें सांगितलेल्या बातमीनें त्याचें काळीज करपून निघालें होतें. एकामागून एक अशीं चार दालनें ओलांडून गेल्यावर तो जनानखान्याच्या दरवाजाजवळ आला. तेथें वाड्यांतील इतर दासदासी घोळका करून कुजबुजत असलेल्या त्याच्या दृष्टीस पडल्या. आपल्या मालकाला येतांना पाहून सर्व नोकरांची झटकन् पांगापांग झाली. क्षणभरानें आंतून एक वृद्ध स्त्री बाहेर आली. मालकाला पाहतांच ती स्त्री स्वतःच्या थोबाडींत पटापट मारीत रडक्या स्वरांत हुंदके देत देत म्हणाली, “दयावंत मालीकसाहेब, घात झाला हो घात झाला ! ती पोर कांहीं केल्या कबूल होईना म्हणून तिला खालच्या तळघरांत कोंडून ठेवलं होतं ! तिथं तिला जहरी साप

चावला ! सर्व घात झाला ! खाविंदांनीं मोठ्या श्रमानं मिळविलेलं बुलबुल हातांतून उडून गेलं हो ! "

" पण ती मेली काय ? तिला औषधोपचार कां केला नाहीं ? तुम्हीं काय हा गोंधळ केला ?—कुठं आहे ती ?—मला दाखीव—मला पाहूं दे ! "

" तिला इतकं विष चढलं आहे कीं, ती नखशिखान्त काळी ठिक्कर पडली आहे. आतां तिच्या शरीराला कोणी स्पर्श करील त्यालाहि विष चढेल, इतकं त्या काळसर्पाचं विष जालीम आहे. ती पाहा— " असें म्हणून त्या स्त्रीनें दरवाजा उघडून आंत बोट दाखविलें. तेथें एका कोचावर एक स्त्री अस्ताव्यस्त पडली होती. तिच्या शरीराचा दृष्टीस पडणारा भाग—तोंड, हात आणि पाय—अगदीं काळे झालेले दिसत होते. अमीरसाहेब आंत येऊन क्षणभर त्या स्त्रीकडे पाहात राहिला. त्या वेळीं त्याच्या डोक्यांत कोणते विचार चालू होते तें कळणें कठीण होतें.

अमीरसाहेबानें एक दीर्घ श्वास सोडला. आज त्याच्या मनोराज्याचे डोलारे ढांसळून जमीनदोस्त झाले ! आणि सर्व आशा जळून खाक झाल्या ! क्षणभरानें तो म्हणाला, " आतां ह्या प्रेताची काय व्यवस्था करायची ? ह्या विषाला कोण हात लावील ? आणि हें सर्व बिनबोभाट कसं पार पडेल ? "

" मीहि मघांपासून त्याच फिकिरींत आहें. आपल्या नोकरांपैकीं कोणीहि तिला हात लावणार नाहीं. आतां हें सर्व मलाच केलं पाहिजे. "

" कर—कांहीं कर; पण हें घरांतलं विष बाहेर काढ ! माझं डोकं फिरूं लागलं आहे— "

" मग खाविंद, तुम्ही खोलीच्या बाहेर व्हा. ह्या जालीम विषानं ह्या खोलींतील हवाहि बिघडली असेल—तुम्ही बाहेर जा. "

बाहेर जात जात अमीरसाहेब म्हणाला, " पण आतां तूं काय करणार ? "

" मी आतां रस्त्यावरून दोन अनोळखी माणसं धरून आणतें. "

" पण ते हिला नेतील काय ? बाहेर बभ्रा तर होणार नाहीं ना ? "

"त्याची नको काळजी ! पैसा काय करणार नाहीं ?"

"घे, हे घे ! पण बिनबोभाट काम कर !" असें म्हणून अमीरसाहेबानें तिच्या हातांत पैशाची थैली दिली. ती थैली घेतांना त्या वृद्ध स्त्रीच्या मुखावर किंचित् हास्य चमकलें ! अमीरसाहेब निघून गेल्यावर तिनें खोलीचा दरवाजा बंद करून घेतला आणि मालक आला म्हणून बाजूच्या भिंतीआड लपलेल्या एका नोकराला हांक मारून ती म्हणाली, "आतां इथं कुणीहि येऊं नका. मी बाहेरचीं दोन माणसं पकडून आणतें आणि त्यांच्याकडून हें विष घराबाहेर नेतें. कोणाच्याहि अंगावर ह्या प्रेताची सांवली पडली, तरी त्याला विष बाधेल. हुशार राहा. जा—" अशा रीतीनें सर्वांना दहशत घालून ती मागच्या जिन्यानें खालीं उतरली. पागेंत आल्यावर तिनें एकदां सर्वत्र न्याहाळून पाहिलें. जवळपास कोणी नाहीं असें पाहून तिनें हळूच पागेचा दरवाजा उघडला. नेताजी आणि बहिर्जी आपल्या इतर चार मंडळींसह बाहेर उभे होते. पागेचा दरवाजा वाजतांच नेताजी पुढें झाला. तेव्हां ती स्त्री पुढें होऊन हळूच म्हणाली, "मीं योजलेली शक्कल अगदीं बरोबर उतरली ! ती स्त्री वरच आहे. तिला बेशुद्ध होण्याचं औषध दिलं आहे, ती बरोबर सूर्योदयाला शुद्धीवर येईल; मग हा पाला पाण्यांत घालून त्या पाण्यानं तिचे हात, पाय, तोंड साफ धुऊन काढा. म्हणजे तिला लावलेली वनस्पति निघून जाईल." असें म्हणून तिनें पाला बांधलेलें गांठोडें पुढें केलें. "चला, तुम्ही दोघे माझ्याबरोबर वर चला आणि तिला उचलून घेऊन या. होतां होईल तों तिला आतांच शहराबाहेर घेऊन जा. हा वेशीबाहेर जाण्याचा परवाना आहे. तुम्हांला कुणी अडविणार नाहीं आणि अडविलंच तर ही मोअझीम अमीरसाहेबांची बटीक सर्पदंश होऊन मेली, तिला नदीवर नेत आहोंत असं सांगा. चला—"

त्या स्त्रीबरोबर वाड्यांत जावें किंवा नाहीं अशी शंकाहि मनांत न आणतां नेताजी पुढें झाला. बहिर्जी त्याच्यामागून होताच. नेताजीनें आपली तरवार म्यानांतून काढून हातांत घेतली होती. वर जातांना त्यांना कोणीहि भेटलें नाहीं. म्हातारीनें दरवाजा उघडून त्यांना आंत नेलें आणि तोंडानें कांहीं एक न बोलतां हाताच्या खुणांनीं कोचावर

पडलेल्या स्त्रीला उचलून पुनः त्या वृद्ध स्त्रीनें कांहीं बोलूं नका अशा अर्थाची खूण करून मुकाट्यानें जाण्यास सांगितलें. आपल्या नाजुक ओझ्यासह ते दोघे बाहेर आले, त्या वेळीं वाड्यांत पुढल्या बैठकीच्या महालांत चाललेला हंशा आणि आरडाओरड त्यांना ऐकूं आली; परंतु तिकडे त्यांना लक्ष देण्याचें कारण नव्हतें. खालीं उतरून आल्यावर ते सरळ आपल्या रस्त्याला लागले. दरवाजांतून बाहेर पडल्यावर कांहीं एक न बोलतां म्हातारीनें पुनः दरवाजा बंद करून घेतला आणि आमची मंडळी आपल्या मार्गाला लागली. एखाद्या प्रेताला घेऊन जावें त्याप्रमाणें ती सर्व मंडळी अगदीं मुकाट्यानें चालली होती. त्या वेळीं मध्यरात्रीचा सुमार झाला होता. वेशीजवळ येतांच तेथील पहारेकऱ्यांनीं त्यांना रोखलें; परंतु परवाना दाखवून म्हातारीनें सांगितल्याप्रमाणें सांगतांच पहारेकऱ्यांनीं दोन शिव्या हांसडून त्यांना वेशीबाहेर जाऊं दिलें. कांहीं अंतरावर गेल्यानंतर नेताजी म्हणाला,

"बहिर्जी, तुझे जर हात दुखत असतील, तर तिला मी घेतों."

"कांहीं नको! पण आतां जायचं कुठं?" बहिर्जीनें विचारलें.

"इथं नदीकांठावर एक बहिरोबाचं पडकं देऊळ आहे. महाराजांची आणि माझी पहिली भेट त्याच देवळांत झाली. तिथं आपण जाऊं. मग सकाळीं पुढचा विचार ठरवूं."

"नेताजी, तुझी आणि महाराजांची जशी भेट झाली, तशी माझीहि होईल काय?" मोठ्या उत्सुकतेनें बहिर्जीनें विचारलें.

"काय सांगावं?—तुझी खरी कळकळीची इच्छा असेल, तर होईलहि भेट! पण महाराज इथं कुठून येणार? आतां ते पुण्यास असतील."

"पण नेताजी, तुला खरंच सांगूं का?— ह्या स्त्रीचा स्पर्श झाल्यापासून कांहीं चमत्कारिक आशाजनक भावना माझ्या मनांत उद्भवूं लागल्या आहेत. ही कुणीतरी आपलीच आहे, असंच माझ्या मनाला वाटतं. मघां मीं हिचा चेहरा नीट न्याहाळून पाहिला; पण मला ओळख पटली नाहीं. तथापि, माझं मन कांहीं निराळंच सांगतं. तसंच महाराज भेटतील का? असा माझ्या मनांत प्रश्न यायला आणि 'होय,

आतां भेटतील' असं माझ्या मनाकडून उत्तर मिळायला एकच गांठ पडली!"

"तुझी मनोदेवता जर इतक्या स्पष्ट रीतीनं तुझ्याबरोबर बोलत असेल तर काय सांगावं? योगायोग कसे आणि केव्हां अकल्पित रीतीनं जुळून येतील तें कांहीं सांगतां येणार आहे काय?—"

बोलत बोलत मंडळी पिसाळ्या बहिरोबाच्या देवळाजवळ आली. ते कृष्णपक्षाचे दिवस होते, तरी आकाशांत उगवलेल्या तारकांमुळें पडलेल्या उजेडांत त्यांना रस्ता स्पष्ट दिसत होता. ह्याच रस्त्यानें नेताजी पूर्वीं दादोजीबरोबर देवळांत आला होता.

लांबून बहिरोबाच्या देवळांत उजेड दिसत होता. कोणी तरी मुशाफर त्या देवळांत उतरले असतील अशी नेताजीनें कल्पना केली. मुकाट्यानें पायीं चालत असल्यामुळें देवळाच्या दरवाजाजवळ येईपर्यंत आंत असलेल्या लोकांना त्याची चाहूल ऐकूं आली नाहीं. नेताजीनें पुढें होऊन 'आंत कोण आहे?' असा प्रश्न करतांच झटकन् चार पांच सशस्त्र शिपाई आंतून बाहेर आले. त्यांच्यापैकीं म्होरक्याला पाहतांच नेताजी आश्चर्यानें एकदम म्हणाला, "कोण?—गोमाजी नाईक, तुम्ही इकडे कसे? महाराजांची काय खबर आहे?"

"नेताजी आला वाटतं?" आंतल्या गाशावर पडलेला तरुण गंभीर स्वरांत म्हणाला.

"महाराज, आपणहि इकडेच!" असें म्हणून नेताजी तीरासारखा पुढें झाला आणि शिवाजींच्या चरणावर वंदन करीत म्हणाला, "हे मी आणखी कांहीं वेडे पीर बरोबर आणले आहेत. आपला वेड्यांचा बाजार वाढत चालला, महाराज! वहिर्जी, ये पुढं. हे पाहा आपले शिवाजी महाराज! तुझ्या मनोदेवतेनं तुला जें सांगितलं तें अखेर खरं ठरलं! आहे खरा योगायोग!"

"अरे, असे योगायोग किती तरी घडून येणार आहेत. आई भवानीवर पूर्ण निष्ठा आणि चिकाटीचा प्रयत्न असल्यावर योगायोग जुळून यायचेच. पण ही स्त्री कोण?"

सर्वांनीं महाराजांना मुजरे केल्यावर नेताजीनें थोडक्यांत सर्व गोष्टी

सांगितल्या. शिवाजी म्हणाला, "ही स्त्री कोण आहे, हें तुम्हांला माहीत नाहीं तर! असो—कुणीहि असो. गोमाजी, पाहा बरं तुझ्या औषधानं ही शुद्धीवर येते का? ती सावध होऊन वृत्तान्त सांगेपर्यंत मला चैन पडणार नाहीं. तिला अशी आंतल्या बाजूला निजवा." असें म्हणून शिवाजीनें आपला स्वतःचा गाशा पुढें केला. गोमाजी नाइकानें आपल्याजवळच्या बटव्यांतून कांहीं औषधी काढून तिच्या नाकाजवळ धरली. थोड्या वेळानें तिची हालचाल सुरू होऊन ती शुद्धीवर येऊं लागली. नेताजीनें आपल्याजवळच्या पाल्याचें पाणी तयार करून तें तिच्या तोंडाला लावलें. त्याबरोबर तिनें झटकन् डोळे उघडले आणि आजूबाजूला भयभीत दृष्टीनें पाहात उठून बसली. तेव्हां नेताजी म्हणाला, "भिऊं नका! तुम्ही आतां त्या दुष्ट अमिराच्या वाड्यांत नाहीं. ही सर्व आपली मंडळी आहे. तुम्हांला आमच्याकडून किंचित्हि त्रास होणार नाहीं. पण तुम्ही कोण? तुमचं नांव काय? तुम्ही कोणत्या गांवच्या? तें सर्व सांगा, म्हणजे तुम्हांला तुनच्या घरीं पोंचविण्याची आम्ही व्यवस्था करूं."

"नेताजी, ती स्त्री शुद्धीवर आली काय?" शिवाजीनें विचारलें, "ती कोणत्या गांवची तें विचार म्हणजे आपण पुढली व्यवस्था करूं."

"मी बहिरखेडची! माझं सासर तिथं आहे—"

"मग तुमचं नांव दीपाबाई का?"

"हो."

"खरं कीं काय?—बहिर्जी, तूं हिला अद्यापि कसं ओळखलं नव्हतंस? बायकोसाठीं वेडा तर झाला होतास आणि ओळख तर विसरलास!"

क्षणभर बहिर्जी आणि दीपाबाई परस्परांकडे पाहात होती. त्याच्या म्हणण्याप्रमाणें आज जुळून आलेले योगायोग विलक्षण होते, यांत शंकाच नाहीं! परस्परांची आतां पूर्ण ओळख पटली. दीपाबाईच्या तोंडाला औषधी लावलेली असल्यामुळें तिचा वर्ण काळा झाला होता आणि त्यामुळेंच बहिर्जीनें तिला ओळखलें नव्हतें. तो आपल्या

पत्नीच्या मुखाकडे पाहात म्हणाला, " ओळखलं नाहीं खरं; पण त्याला कारण आहे; तिचं तोंड काळं झालं आहे ! "

" तोंड काळं होण्याची वेळ आली असती तर हें तोंड जगांतून काळं केलं असतं ! हा तोंडाला लावलेला रंग आहे बरं ! " पदरानें तोंड पुशीत पुशीत किंचित् झटक्यानेंच दीपाबाईनें उत्तर दिलें. इतक्यांत शिवाजी पुढें आला. त्याच्या चेहऱ्याकडे दृष्टि जातांच त्याची गंभीर पण भव्य मूर्ति पाहून दीपाबाईनें झटकन् उठून तोंडावरून पदर ओढला. तेव्हां शिवाजी म्हणाला, " नको, अशी लाजूं नकोस ! आम्ही सर्व जण तुझे भाऊ आहोंत ! "

" नाहीं, महाराज, हा बहिर्जी मात्र त्या नात्यांत नाहीं ! " नेताजी हंसत हंसत म्हणाला, " त्याचं नातं निराळं आहे. जेजुरीच्या मल्हारीकडे आहेर यात्रेला गेले असतां— "

" असं काय ? मग मासाहेबांनीं मला ती हकीकत सांगितली आहे. बरं झालं ! आज जुळून आले खरे योगायोग ! "

* * *

## १३. पुनः शपथा आणि प्रतिज्ञा

" पण ती खुबसुरत आहे काय ? तूं तिला नजरेनं पाहिलं आहेस काय ? उमर किती आहे म्हणालीस ?— "

" तें आपण पाहूं ! पण अमीरसाहेब, तुम्ही स्वतः एकदां नजरेनं पाहा आणि मला बक्षीस काय देणार तें बोला ! काल केलेली मजलस फुकट गेली; पण आतां या पोरीवरून शंभर नाहीं, तर दहा हजार मोहरासुद्धां कुणीहि गुलहौशी सरदार ओंवाळून टाकील. "

" अस्सं ! मग मेणा बरोबर घेतला पाहिजे. "

" ती सर्व व्यवस्था मी करीन. तुम्ही प्रथम हा सौदा पटवा. "

" पण आपण जाण्यापूर्वीं दुसराच कोणी अल्लाचा पीर तेथें जाऊन हा सौदा पटविणार नाहींना ? "

"म्हणून म्हणतें, अमीरसाहेब, तुम्ही रक्कम घेऊन लवकर चला. थोडी जास्त रक्कम जवळ असूं द्या."

"ती नको काळजी! हजार मोहोरा घेतों. मग तर झालं?"

बरोबर एक नोकर, अमीरसाहेब आणि ती म्हातारी सौदा पटाविण्याकरितां निघालीं. शिवाजीनें योजल्याप्रमाणेंच हा सर्व प्रकार होत होता. अमीरसाहेब तर मोठ्या खुषींत होते. म्हातारी म्हणते त्याप्रमाणें ती पोर सुंदर आणि तरुण असेल तर आपण तिच्या सौंदर्यावर खात्रीनें आपणांस आजपर्यंत मिळाला नाहीं इतका पैसा मिळवूं; इतकेंच नाहीं, तर कालच्या मजलशींत बड्या बड्या लोकांची निराशा होऊन ते दुःखी होऊन परत गेले, त्या सर्वांना परत बोलावून आपण खूषच खूष करूं, अशा प्रकारच्या विचारांचे डोलारे उठवीत अमीरसाहेबांची स्वारी रस्त्यानें चालली होती. बहिरोबाच्या देवळांत त्या वेळीं अगदीं सामसूम दिसत होतें. फक्त पुढल्या पडक्या दालनांत दीपाबाई आणि तिच्या बाजूला शिवाजी, नेताजी आणि बहिर्जी असे तिघेजण मुकाट्यानें बसले होते. म्हातारीनें अमीरसाहेबांस आंत आणलें, आणि फक्त समोर बसलेल्या दीपाबाईकडे बोट दाखविलें. तिला पाहतांच अमीरसाहेब एखाद्या दगडी पुतळ्याप्रमाणें जागच्या जागींच थबकले. आठ दिवस ती त्याच्या वाड्यांत होती; परंतु तितक्या अवधींत एकदोनदांच ती त्याच्या दृष्टीस पडली असल्यामुळें तिला त्यानें ओळखली नाहीं. वास्तविक त्यानें दीपाबाईला ओळखावें, अशीच शिवाजीची इच्छा होती. शिवाजीला ओळखणें तर शक्यच नव्हतें; कारण त्यानें शिवाजीला केव्हांहि पाहिलें नव्हतें. क्षणभरानें अमीर म्हणाला, "अहाहा! क्या नूर है! क्या बेगुमान खुबसुरती है! या अल्लाह परवरदिगार! यह तेरी करामत देखकर दिवाना बना हूं!" हातवारे करीत आणि आपल्या सर्वांगाला लवचिक वेलीप्रमाणें वळवीत मोठ्या खुषींत येऊन तो बोलत होता. त्याचा पहिला आनंदातिशयाचा वेग संपतो न संपतो, तोंच त्याच्या पाठीवर "फडाड" असा आसुडाचा फटका ऐकूं आला. त्याबरोबर 'ओय्! ओय्! या अल्लाह!' असा शंखध्वनि करीत अमीरसाहेब जमिनीवर कोसळला! लगेच एकामागून एक असे सारेख फाड् फाड् आवाज त्याच्या पाठीवर होऊं लागले.

दहा पंधरा फटक्यांतच त्याच्या पाठीची चामडी लोळूं लागली. तेव्हां शिवाजीनें 'थांब!' अशी खूण केली. नंतर कांहीं एक न बोलतां शिवाजी उठला आणि म्हातारीला म्हणाला, "म्हातारे, ह्या चांडाळानं हा नीच धंदा करून आजपर्यंत किती द्रव्य संपादन केलं असेल?"

"वीस पंचवीस हजार मोहोरा! शिवाय वाडा, सामानसुमान—"

"ऊठ—ए पाजी मनुष्या, ऊठ! सूर्यास्तापूर्वीं पंचवीस हजार मोहोरा तुझ्याकडून पोंचल्या तरच तुला इथून सोडूं, नाहीं तर सूर्यास्ता-बरोबर तुझ्या प्राणाचा अस्त होईल!"

"ओय्—ओय्! या अल्लाह! मुझे बचाओ!—मी गरीब, मी पंचवीस हजार मोहोरा कुठून देऊं? मी शरण आहें. मला सोडा—"

"नेताजी, उडव कोरडा!"

फाड्! फाड्!! फाड्!!! उडविलेल्या कोरड्यांचा आवाज झाला.

"ओय्! ओय्! मर गया!"

जवळजवळ आसुडाचे पन्नास फटके खाईपर्यंत अमीरसाहेबांचा मोहोरांवरचा लोभ सुटला नाहीं; परंतु शेवटीं तो अगदीं असह्यच झाला, तेव्हां त्यानें मोहोरा देण्याचें कबूल केलें. शिवाजीनें त्याच्याकडून त्याच्या माणसांना एक पत्र लिहून घेतलें. नेताजीबरोबर त्या म्हातारीला त्याच्या वाड्यांत परत पाठविलें. नंतर शिवाजी त्या अमिराला म्हणाला, "आजपर्यंत अशा अनाथ स्त्रिया तूं ह्या शहारांत कोणत्या नीच माणसांना विकल्यास त्याची यादी दे. हं—चल, आटप!"

माराच्या भीतीनें त्यानें पटापट नांवें सांगितलीं. त्यांपैकीं पांच सहा उमराव व सरदार त्या वेळीं शहरांत राहात होते; बाकीचे आपापल्या जहागिरिवर ऐषआराम भोगीत होते. त्या शहारांत राहणाऱ्या उमराव-सरदारांच्या नांवें शिवाजीनें एक पत्र अमिराकडून लिहून घेतलें, आणि त्या पत्रांत 'एक लावण्यवती स्त्री खुदाच्या मेहेरनजरेनें माझ्या हातीं आली आहे. ती आपल्या जनानखान्यांत ठेवण्यास सर्वतोपरी लायक आहे—आपल्या जनानखान्याला एक भूषण आहे. तर एक हजार मोहोरा घेऊन येऊन हा सौदा पटवावा. येतांना एकटेंच यावें; बरोबर कुणालाहि आणूं नये, नाहीं तर सौदा फुकट जाईल', अशा अर्थाचा मजकूर

लिहिला होता. शिवाजीनें आपल्या माणसांकडून तीं पत्रें पाठविलीं. सायंकाळ होईपर्यंत नेताजी त्या अमिराच्या घरून ठरलेली रक्कम घेऊन आला. घोड्याच्या पाठीवर थैल्या लादलेल्या पाहून अमीरसाहेब ऊर बडवींत म्हणाले, "या अल्लाह ! मैं कैसा एही आफत में आ के फँस गया ? तोबा ! तोबा ! !"

थोड्या वेळानें पाठविलेल्या पत्राबरहुकूम एक एक पात्र रंगभूमीवर येऊं लागलें. तेथें पुढें काय काय प्रकार झाले असतील, ती हकीकत पुनः पुनः वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं. पहिल्या प्रथम आसुडाचा फडफडाट, नंतर रडण्याओरडण्याचा आर्त स्वर आणि शेवटीं मोहोरांचा खणखणाट त्या पिसाळ्या बहिरोबाच्या देवालयांत दुमदुमूं लागला. सूर्यास्तापर्यंत देवळाच्या आंतल्या पटांगणांत तीस हजार मोहोरांचा ढीग पडला. ह्याशिवाय शिवाजीनें त्या नीच सरदारांकडून आपल्या सुटकेकरितां शहरांत त्यांच्यासारख्याच त्यांच्या नीच मित्रांना पंधरा वीस हजार मोहोरांच्या हुंड्या सूर्योदयाच्या आंत पटविण्याकरितां पाठविल्या होत्या त्या निराळ्याच ! आपण पाठविलेल्या हुंड्या बिनतक्रार पटल्या, असें पाहून शिवाजीनें कैद करून ठेवलेल्या त्या अमीर, उमराव आणि सरदार मंडळींना जबर दहशत घालून सोडून दिलें.

"डबीर, तुम्ही आणि चिटणीस हें सर्व द्रव्य घेऊन ह्या मंडळी-बरोबर नीट बंदोबस्तानं जा. बायकांना—ह्या म्हातारीला नाहीं म्हणा कुणी लुटून नेणार; पण आमच्या दीपाबाईला नीट सांभाळून न्या."

"आपण काळजी करूं नये; पण महाराज, आपण एकटेच मागं राहतां हें आमच्या मनाला चमत्कारिक दिसतं." सोनोपंत म्हणाले.

"माझ्याबरोबर हा नेताजी राहतोच आहे. शिवाय बहिर्जी आणि गोमाजी नाईकहि आहेत." शिवाजी म्हणाला, "तुम्ही मजविषयीं काळजीच करूं नका. मी शहरांत फिरणार तो स्वतंत्र वेष बदलून फिरणार. पण एकदां निंबाळकरांची हजिरी घेणार !"

परंतु बाजूला उभा असलेल्या नेताजीच्या मनांत निराळाच विचार घोळत होता. आपण परत येत असतांना वाटेंत जगपाळराव विचारे मानकरी यांच्या गढींत जाऊन निर्मलेला भेटावें अशी त्याची इच्छा

होती; परंतु तसें करणें त्याला साधलें नाहीं. शिवाय ‘ शिवाजी महाराज जर कधीं विजापुरांत आले, तर त्यांना आमच्या गढींत अवश्य घेऊन या, ’ असें सुमित्रेनें मोठ्या आग्रहानें सांगितलेलें त्याच्या लक्षांत होतें. त्याप्रमाणें आतां महाराजांना विनंती करून त्यांना एकदां गढींत न्यावें, हा विचार त्याच्या मनांत घोळत होता. त्या दोघी बहिणींचे स्वाभिमानी विचार आणि त्यांचें शीलवंत आचरण पाहून महाराजांना अत्यानंद होईल अशी त्याची खात्री होती. बोलतां बोलतां गढींत जाण्याविषयीं त्यानें हळूच शिवाजीजवळ गोष्ट काढली. तेव्हां त्या दोघी बहिणींविषयीं खोदखोदून माहिती विचारून घेतल्यावर शिवाजी म्हणाला, “ तुझी इच्छा आहे, तर मी त्या गढींत येईन; परंतु ‘शिवाजी’ म्हणून मात्र येणार नाहीं. तूं म्हणतोस त्याप्रमाणं त्या दोघींचं माझ्याविषयीं फार चांगलं मत असेल, मी नाहीं म्हणत नाहीं; पण स्वत:विषयीं खरं जनमत अजमावयाचं असेल, तर छद्मवेषच उपयोगी पडतो. तेव्हां अनायासं मला वेषांत बदल करायचा आहे; तर त्या बदललेल्या फकिराच्या किंवा बैराग्याच्या वेषांत मी तुझ्याबरोबर त्या गढींत येईन. ” असें म्हणून शिवाजी देवळाबाहेर पडला. सर्वजण नदीवर आले. घडलेल्या प्रसंगाचा शिवाजीनें त्या वेळीं चुकूनहि उल्लेख केला नाहीं.

शुचिर्भूत होऊन सर्वजण देवळांत येतांच शिवाजी देवापुढें उभा राहिला आणि म्हणाला, “ नेताजी, गेल्या खेपेला ह्याच पवित्र स्थळीं मीं दोन प्रतिज्ञा केल्या. आजदेखील मी ह्याच पवित्र स्थळीं आणखी दोन प्रतिज्ञा करणार आहें. मी घर सोडून शत्रूची सरहद्द ओलांडल्यावर ह्या देवालयाच्या आसमंतांतील स्वतंत्र वातावरणांत मला कर्तव्याची प्रथमच जाणीव झाली आणि त्या जाणिवेनं गो आणि ब्राह्मण यांच्या प्रतिपालनाच्या मीं दोन प्रतिज्ञा केल्या. आज मला ह्याच स्थळीं पुन: आल्यावर आणखी दोन कर्तव्यांची जाणीव झाली. ह्या कर्तव्यांची जाणीव मला ज्या गोष्टींपासून झाली. त्या गोष्टी म्हणजे एक, निंबाळकरांचं धर्मांतर आणि दुसरी, आपल्या दीपाबाईवर आलेला प्रसंग ! म्हणून मी आतां ह्या मध्यान्हीला देवापुढं अशी प्रतिज्ञा करतों कीं, हा शिवाजी ह्यापुढं गोब्राह्मणांचा प्रतिपाळ करीलच; पण त्याबरोबर स्वधर्माचं रक्षण

करून स्त्रियांच्या पातिव्रत्याचेंहि पालन करील." असें म्हणून शिवाजीनें बहिरोबापुढें आपली नग्न तरवार आडवी धरून अत्यंत मनोभावानें वंदन केलें.

"मीहि महाराजांच्या प्रत्येक कार्यांत त्यांना ह्या देहांत प्राण असेपर्यंत साह्य करीन, हीच ह्या चरणांवर माझी शपथ!" नेताजीनें लगेच शिवाजीच्या पायांवर हात ठेवून आणभाक वाहिली! त्याच्या-मागून बहिर्जी, नंतर डबीर, चिटणीस असा एक एक जण पुढें होऊन शपथा वाहूं लागला! खरोखरीच तो प्रसंग मोठा गंभीर होता, यांत शंकाच नाहीं!

अशा अचाट प्रतिज्ञा करून आमच्या कथानायकानें स्वतःवर किती कल्पनातीत जबाबदारी ओढवून घेतली होती, याची आजच्या काळांत नुसती कल्पना करणेंहि अशक्य झालें आहे! जवळजवळ, फाटलेल्या आकाशाला ठिगळें लावण्याचा तो अशक्य प्रयत्न असतां त्या वज्रनिश्चयी वीराला तें काम क्षुल्लक वाटावें, यावरून त्या नरकेसरीला आम्ही अवतारी पुरुष म्हणून त्याचे देव्हारे माजवूं नयेत तर काय करावें?....

× × × × ×

दोन प्रहरीं जेवण वगैरे आटोपतांच शिवाजीच्या आज्ञेप्रमाणें सोनोपंतांनीं मंडळीसह निघण्याची आपली तयारी केली. अमीर-साहेबांच्या वाड्यांत असलेली म्हातारीहि आतां दीपाबाईबरोबर जाण्यास तयार झाली. आपल्या पातिव्रत्यरक्षणांत तिनें केलेल्या अमूल्य मदती-बद्दल दीपाबाई तिची अत्यंत ऋणी होती. ह्या आठ दिवसांच्या सहवासांत दीपाबाई तिला पोटच्या मुलीसारखी वाटूं लागली. आपण आतां चांगल्या माणसांच्या हातांत पडलों; आतां आपले शेवटचे दिवस मोठ्या सुखांत आणि चुकूनमाकून आपल्या हातून घडलेल्या पापाच्या क्षालनार्थ ईशचिंतनांत जातील म्हणून म्हातारीला नवजीवन आलें होतें. इकडे शिवाजीहि आपल्या पुढल्या कार्याकरितां वेषांतर करून तयार झाला. अंगांत भगवी कफनी घालतांच आमच्या कथानायकाच्या भव्य मूर्तींत विलक्षण फरक दिसूं लागला! त्या वेषांत त्याचें मुळांतलें

दिव्य तेज द्विगुणित होऊन भूमातेच्या उद्धाराकरितां, तपेंच्या तपें गिरिकंदरांत तपश्चर्या करीत असलेली दिव्य विभूति तेथें जणूं काय अवतीर्ण झाली आहे, असाच सर्वांना भास झाला. बहिर्जीनेंहि आपल्या वेषांत आमच्या कथानायकाचेंच अनुकरण केलें. तें पाहून नेताजीहि वेषांतर करूं लागला; परंतु शिवाजीनें त्याला तसें करूं दिलें नाहीं. हळूहळू सर्व मंडळी देवळाच्या बाहेर पडली. डबीर आपल्या मंडळीसह शिवाजीचा निरोप घेऊन मोठ्या बंदोबस्तानें पुण्याच्या मार्गाला लागले. शिवाजी, बहिर्जी आणि नेताजी गोमा नाइकाला बरोबर घेऊन जगपाळरावांच्या गढीकडे जाण्याकरितां निघाले.

संध्याकाळच्या सुमारास ती मंडळी गढीजवळ आली. वाड्यांत शिरतांच त्या दोघी बहिणी पहिल्या दालनांतच प्रपंचकृत्य करीत बसलेल्या त्यांच्या दृष्टीस पडल्या. त्या वेळीं जगपाळराव वाड्यांत नव्हते. अलीकडे बाजी घोरपडे शहरांत राहात असल्यामुळें जगपाळ-रावांचेंहि राहणें शहरांत होत असे. नेताजीला आंत येतांना पाहून त्या दोघी बहिणी झटकन् उठून उभ्या राहिल्या. दोघींच्याहि चर्येवर आनंदाची छटा दिसली; परंतु ती फार वेळ टिकली नाहीं. 'शिवाजी-बरोबर किंचित्‌हि संबंध असलेल्या एखाद्या मनुष्याला वाड्यांत येऊं देऊं नका, किंवा तुम्ही त्याच्या वाऱ्यालाहि उभ्या राहूं नका', अशी जगपाळरावांनीं आपल्या मुलींना सक्त ताकीद दिली होती. एकीकडे ही पित्याची आज्ञा, वाड्यांत आलेल्या नेताजीचें स्वागत करूं नको, असें त्या पितृभक्त मुलींना सांगत होती आणि दुसरीकडे त्यांचें स्वाभिमानी पण उदार मन वाड्यांत आपण होऊन आलेल्या त्या पाहुण्यांचें आदरातिथ्य करण्यास उत्सुकतेनें सांगत होतें. अशा या परस्परविरोधात्मक मनाच्या भावनेंत त्या दोघी बहिणी गोंधळून जाऊन त्या किंकर्तव्यमूढ स्थितींत जागच्या जागीं उभ्या राहिल्या. मागल्या खेपेस आपण गढींत आलों असतां आपलें जितक्या प्रेमानें आणि आस्थेनें स्वागत झालें, त्याहिपेक्षां विशेष प्रकारानें ह्या खेपेस आपलें स्वागत होईल, अशी नेताजीला गढींत येतांना पूर्ण खात्री होती आणि त्या प्रेममय स्वागताकरितां त्याचें मन आनंदानें उत्सुकहि झालें होतें! परंतु आतां त्या दोघींची ती मूकवृत्ति पाहून तो अगदीं गोंधळून गेला.

आपण महाराजांजवळ ज्या दोघींचा जो एवढा गौरव केला होता, ज्यांच्या भेटीकरितां आपण मुद्दाम महाराजांना आणलें, त्यांचें हें प्रथमदर्शनींच असें वर्तन पाहून महाराजांच्या मनाला काय वाटलें असेल, याची त्याला कल्पनाहि करतां येईना ! किंवा मागें असलेल्या महाराजांकडेहि पाहण्याचें आतां त्याला धैर्य होईना. बराच वेळ तो त्या गोंधळलेल्या स्थितींत दरवाजाजवळ उभा होता. शेवटीं त्याच्यानें राहावेना. तो झटकन् घोड्यावरून उतरून पुढें झाला आणि म्हणाला, "सुमित्राबाई, तुम्ही आज अशा मुग्ध कां ? कांहीं विशेष प्रकार आहे कीं काय ? गढींतील सर्व मंडळी ठीक आहेत ना ? तुमचे वडील कुठं आहेत ?—सर्वांचं क्षेम आहे ना ?"

"हो !" एवढा एकच शब्द बोलून सुमित्रा पुन्हा स्तब्ध झाली.

"सुमित्राबाई, आमच्या येण्यानें आज तुम्हांला त्रास झालेला दिसतो. खरोखरीच तसा कांहीं प्रकार असल्यास सांगा, म्हणजे आम्ही आलों तसेंच परत जाऊं."

"तसं कांहीं नाहीं !—प—ण—"

"पण आणि परंतु असं संशयात्मक कां बोलतां ? स्पष्ट सांगा. मला त्यांत राग नाहीं. मानापमानाचं गाठोडं बांधूनच मी शिवाजी महाराजांचा अनुयायी बनलों आहें. आम्हीं स्वीकारलेल्या व्रताच्या पूर्ततेकरितां आम्हांला मानापमानाचा विधिनिषेध मानायचा नाहीं ! कारण महाराजांची शिकवणच आम्हांला तशी आहे."

"कसली आहे तुम्हांला शिकवण ? तुम्हांला मिळालेली शिकवण तर जगाला निराळीच दिसते." सुमित्रा म्हणाली, "चोऱ्यामाऱ्या करण्याची आणि बादशाही मुलुखांत दंगाधोपा आणि बंडाळी करण्याची तुम्हांला शिकवण मिळाली आहे !"

म्हणजे ?—सुमित्राबाई, तुम्ही काय बोलतां हें मला समजलं नाहीं ! परवां मी दोनदां गढींत आलों असतां तुम्ही शिवाजी महाराजांविषयीं किती तरी आदर व्यक्त केला होता. त्यांना इथं एकदां घेऊन या म्हणून मला तुम्हीं आग्रह केला होता. आणि खरोखरच जर मीं आज

महाराजांना इथं आणलं असतं, तर तुमचं वर्तन आणि हें भाषण ऐकून त्यांना काय वाटलं असतं ?"

"खरं जनमत अजमाविण्याकरितां मनुष्यानं कसं वागलं पाहिजे, हें माझं सांगणं आतां तरी तुला पटलं ना नेताजी ?" शिवाजी त्याच्याजवळ येऊन म्हणाला.

नेताजीहि क्षणभर गप्प झाला. शिवाजीचें म्हणणें त्याला पटलें. तो पुनः सुमित्रेकडे वळून म्हणाला, "सुमित्राबाई, इतक्या थोड्या अवधींत तुमचा ग्रह कसा बदलला ? अशीं कोणतीं कृत्यें तुमच्या दृष्टोत्पत्तीस आलीं म्हणून तुम्ही शिवाजी महाराजांना बंडखोर आणि दरोडेखोर म्हणूं लागला ?"

"नेताजीराव, तुमच्या शिवाजीबद्दल माझा पूर्वीं जो ग्रह होता, तो अद्यापिहि तसाच कायम आहे, परंतु बाजीसाहेब तसं म्हणतात. शहाजी राजांची आंतून फूस असून त्या जोरावर तो अलीकडे दरोडेखोरी करतो, असं ते परवां सांगत होते."

"अस्सं अस्सं !" शिवाजी पुढें होऊन म्हणाला, "पण तुम्हांला असं सांगणारे हे बाजीराव कोण ?"

"ते शहाच्या दरबारचे मोठे सरदार आहेत. माने, मोहिते, मोरे यांच्यापेक्षां ह्या बाजीसाहेब घोरपड्यांचा मान दरबारांत थोर आहे. आमचे बाबा त्यांच्याच पदरीं मानकरी आहेत. त्यांच्याच सांगण्यावरून आमच्या बाबांनीं 'शिवाजीच्या कोणत्याहि मनुष्याला आपल्या वाड्यांत येऊं देऊं नका' अशी आम्हांला सक्त ताकीद दिली !"

बाजी घोरपड्याचें नांव ऐकतांच नेताजीनें कपाळाला आंठ्या घातल्या. हे मोठ्या मानाचे सरदार कोणत्या दर्जाचे आहेत, याचा प्रत्यक्ष अनुभव नेताजीला आला होता आणि ती सर्व हकीकत त्यानें शिवाजीला सांगितली होती. क्षणभरानें तो म्हणाला, "अरे अरे ! आमच्या शिवाजी महाराजांच्या उदात्त ध्येयाविषयीं आपल्याच मंडळींनीं हा किती तरी विपरीत समज करून घेतला आहे !"

"मग तुमच्या शिवाजीचं ध्येय तरी काय आहे ?" सुमित्रेनें विचारलें.

"शिवाजीचं ध्येय?" शिवाजी म्हणाला, "यवनांची हांजी हांजी करून, एखाद्या लाळ घोटणाऱ्या कुत्र्यापुढं टाकलेल्या भाकरीच्या तुकड्यावर खूष होणाऱ्यांना शिवाजीच्या ध्येयाची काय किंमत वाटणार? ते त्याला बंडखोर आणि दरोडेखोरच म्हणणार! हा दोष त्यांचा नाहीं, तर ते चघळीत असलेल्या गुलामगिरीच्या भाकरीचा हा दोष आहे!"

"असेलहि कदाचित्! पण 'शिवाजीचं ध्येय, शिवाजीचं ध्येय' म्हणून तुम्ही म्हणतां तें असं त्याचं ध्येय तरी ऐकूं द्या."

"आमच्या महाराजांचं ध्येय फार पवित्र आहे!" नेताजी म्हणाला, "दुर्बलांना आणि अनाथांना साह्य करून त्यांना समर्थ करणं आणि गोब्राह्मणांचा प्रतिपाळ करणं!"

"इतक्या गोष्टी शिवाजीकडून होतील काय?"

"होय, इतक्या गोष्टी करण्याबद्दल त्यांनीं प्रतिज्ञा केल्या आहेत!"

"शिवाजीनं अशा मोठमोठ्या प्रतिज्ञा केल्या आहेत; त्यांत हिंदुधर्माचं रक्षण करण्याचीहि प्रतिज्ञा केली आहे; मग त्याचाच मेहुणा तो बजाजी निंबाळकर मुसलमान कसा झाला?" सुमित्रेनें विचारलें.

"हा पाहा वीर—केवळ धर्मरक्षणाकरितां बैरागी बनलेला हा वीर पाहा!" बाजूला उभा असलेल्या शिवाजीकडे बोट दाखवून मोठ्या अभिमानानें नेताजी म्हणाला, 'सुमित्राबाई, आणखी थोडे दिवस थांबा आणि मग बोला. हा फाटका दिसणारा बैरागी निंबाळकरांच्या बाबतींत काय कामगिरी करतो ती पाहा आणि मग शंका-कुशंका घ्या! प्रभु रामचंद्र एकवचनी आणि एकपत्नी आहेत, याचा अनुभव घेण्याकरितां जगाला त्यांच्या चरित्राचं अखेरपर्यंत अवलोकन करावं लागलं, हें तुम्ही विसरतां काय?"

नेताजीनें दिलेला दृष्टान्त ऐकून सुमित्रा अगदीं गप्प झाली! तिला तो दृष्टान्त पटला. आपण भलतीच शंका काढल्याबद्दल ती शरमून गेली; पण लगेच विषय बदलण्याच्या उद्देशानें 'स्त्रियांच्या पातिव्रत्यरक्षणाकरितां शिवाजीनं विजापूर कसं हालवून सोडलं?' असा प्रश्न केला, तेव्हां नेताजीनें अगदीं मुळापासून ती हकीकत सांगण्यास

सुरुवात केली. मल्हारी मार्तंडाच्या देवळांतून यात्रेला गेलेल्या दीपाबाईला पळवून नेण्यापासून तों तिची सुटका होईपर्यंत सर्व गोष्टी त्यानें सांगितल्या. त्या गोष्टी सांगतांना, सुमित्रेनें मोठ्या आदरानें बादशहाचे वडे मानाचे सरदार जे बाजीसाहेब घोरपडे, यांचा दोन चारदां नामनिर्देश केला होता. त्या हिंदु-मराठा म्हणविणाऱ्या बड्या सरदाराची गांठ पडली असतां त्यांच्या मुखांतून हिंदु स्त्रियांच्या अब्रूबद्दल कोणतीं मुक्ताफळें निघालीं, तीं सर्व जशींच्या तशींच त्यानें वर्णन करून सांगितलीं. ती हकीकत ऐकत असतां सुमित्रेच्या भुंवया क्रोधानें वर चढल्या.

"काय ?—आम्हां स्त्रियांवद्दल वाजीसाहेबांचे विचार इतके क्षुद्र आहेत काय ?"

"आमच्या सांगण्यावर तुमचा विश्वास बसत नसेल, तर सुमित्राबाई, तुम्ही स्वतःच्या स्थितीवरूनच विचार करा. तुमचे बाजीसाहेब बडे असतील; तुम्ही सांगतां त्याप्रमाणं त्यांचा मान मोहिते, मेरे, माने ह्यांच्यापेक्षांहि कदाचित् जास्तहि असेल; पण गरीव स्त्रियांच्या अब्रूचं रक्षण करण्याची ताकद त्यांच्या अंगांत नाहीं. ती ताकद त्यांच्या अंगांत असती, तर तुम्ही त्यांचे आश्रित, मग तुम्हांला असं शहराच्या बाहेर रानावनांत येऊन कां राहावं लागलं असतं ?"

इतक्यांत वाड्याबाहेर घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं येऊं लागला. ही कोण मंडळी येत आहेत, हें त्या दोघी बहिणींनीं चटकन् ओळखलें. "बाबा आले !" असा स्वाभाविक उद्‌गार निर्मलेच्या मुखांतून बाहेर पडला. आपल्या वाड्यांत शिवाजीच्या ह्या मंडळींना पाहून बाबा काय म्हणतील म्हणून निर्मला भ्यालेली दिसूं लागली. इतका वेळ ती आपल्या आक्काजवळ दरवाजांत उभी राहून नेताजी सांगत असलेल्या गोष्टी चित्त देऊन ऐकत होती; परंतु आतां बाहेर घोड्यांच्या टापा ऐकून ती आपल्या अक्काच्या पाठीशीं लपली ! सुमित्रा मात्र निश्चल उभी होती. बाबा आले म्हणून तिला भीति तर वाटली नाहींच; उलट नेताजीच्या आणि बैराग्याच्या वेषांत असलेल्या शिवाजीच्या त्या चैतन्य देणाऱ्या गोष्टी ऐकून त्याचें इतका वेळ आपण आदरातिथ्य केलें नाहीं म्हणून तिला

आतां वाईट वाटूं लागलें. शिवाजीनें एक वेळ त्या दोघी बहिणींकडे पाहिलें. त्या दोघींच्या चर्येवर दिसणारे विकार पाहून तो म्हणाला, “ आम्ही आतां जातों. आम्हांला वाड्यांत येऊं देऊं नका, असं तुमच्या वडिलांनीं सांगितलं आहे. तेव्हां इथं राहण्यानं तुम्हांला त्रास होईल म्हणून आम्ही इथून आतां जावं हेंच चांगलं ! ”

“ थांबा—जाऊं नका. ” सुमित्रा एकदम म्हणाली, “ आम्हांला कांहींएक त्रास होणार नाहीं. आतां आमचे बाबा येतील. तुमच्या शिवाजीविषयीं त्यांचा भलताच ग्रह झाला आहे हें माझ्या लक्षांत आलं ! त्यांचा असा ग्रह कायम राहणं चांगलं नाहीं. त्यांनीं ह्यापुढं बाजी-साहेबांची नोकरी करूं नये असंच मला आतां वाटूं लागलं आहे; कारण बाजी त्या दुष्टांची ताबेदारी करतात ! ”

सुमित्रेची ती तडफ पाहून शिवाजीला तिच्याविषयीं कौतुक वाटलें. तो क्षणभर तिच्या मुखाकडे पाहतच राहिला. तिच्या नेत्रांत चमकणारें स्वाभिमानाचें दिव्य तेज त्याला स्पष्ट दिसलें. परस्परांच्या दृष्टीला दृष्टि भिडतांच किंचित् काल तीं एकमेकांकडे पहातच राहिलीं. परस्परांनीं एकमेकांच्या शुद्ध अंतःकरणाचें संशोधन करण्याकरितां कीं काय, दृष्टीचें तें मीलन केलें आहे असें नेताजीला वाटलें. क्षणभरानें तें संशोधन पूर्ण झालें. परस्परांना परस्परांच्या अंतःकरणाची जाणीव झाली, ओळख पटली आणि दोघांनींहि आपली दृष्टि दुसरीकडे वळविली.

जगपाळरावांचा घोडा वाड्यांत शिरला. त्यांच्यामागें पांच सहा नोकर स्वार होते. वाड्यांत येतांच त्यांनीं एकदां सभोंवर दृष्टि फेकली आणि ते एकदम ओरडून म्हणाले, “ कोण आहे रे देवडीवर ? हरामखोरांनो, ह्या भिकारड्या गोसावड्यांना अशा तीनसांजच्या वेळीं वाड्यांत कां येऊं दिलं ?— आणि सुमित्रे, तूं—पण हा कोण ? ” नेताजी-कडे पाहून ते पुढें म्हणाले, “ निर्मले, तुला मी काय ताकीद देऊन गेलों होतों ?—ह्या मंडळींना तूं पुनः वाड्यांत येऊं दिलंस याचा अर्थ काय ? थांबा, आतां तुम्हांला चावडीवरच नेऊन गुजरतों !—पकडा रे ह्या चांडाळांना ! ”

"बाबा, हें काय ?" सुमित्रा पुढें होऊन म्हणाली, "हें करणं न्यायाचं होईल काय ?"

"कसला न्याय घेऊन बसली आहेस पोरी ! अरे, ह्यांना पकडा म्हणून सांगतों ना ! बघतां काय असे माझ्या तोंडाकडे ?—पकडा त्या हरामखोरांना !"

चारहि बाजूंनीं नोकर धांवून आले. आमचा कथानायक आणि त्याची मंडळी अगदीं शांत होती. नोकर अंगावर येतांच नेताजीचा हात तरवारीच्या म्यानापर्यंत गेला होता; परंतु शिवाजीला शांत उभा पाहून तोहि शांत झाला. इतक्यांत सुमित्रा मध्यें झाली. ती मोठ्यानें म्हणाली, "बाबा, खरोखरीच हा अन्याय होत आहे ! ह्या मंडळींनीं असा कोणता अपराध केला आहे, म्हणून ह्यांना तुम्ही पकडतां ? अन्यायाचा प्रतिकार करणारीच ही मंडळी आहे !"

"बस् बस् ! तुला काय कळतोय् न्याय नी अन्याय ?"

"आतांपर्यंत कळत नव्हता; पण आतां कळला आणि ह्या अन्यायी राज्याचा तिटकाराहि आला !"

"कुणीं शिकवलं तुला हें पांडित्य ? ह्या अन्यायाच्या गोष्टी तुला सांगितल्या कुणीं ? ह्या बैराग्याचं हें काम असलं पाहिजे."

"होय बाबा, त्यांनींच शिकवलं ! न्यायाची प्राणप्रतिष्ठा करण्याची ज्यानं प्रतिज्ञा केली आहे, त्याचेच हे अनुयायी आहेत आणि त्यांनींच शिकवलं !"

"तूं हीं कुणाची स्तुतिस्तोत्रं गात आहेस ?—सुमित्रा, तुझी जीभ फार बहकूं लागली; पण लक्षांत ठेव !"

"बाबा, धर्मानं, न्यायानं आणि नीतीनं ज्यानं आपल्या गरीब देशबांधवांना सुखी करण्याची प्रतिज्ञा केली आहे, त्या शिवाजीचीं स्तुतिस्तोत्रं गाइलीं तर तें कांहीं पाप होत नाहीं !"

"कोण शिवाजी ? तो शिव्या ! चोर, हरामखोर !—" क्रोधातिशयानें जगपाळराव म्हणाले," ह्या गोसावड्यांनींच हे तुमचे कान भरले आहेत. थांबा—हरामखोरांनो ! तुमचा आतां चांगलाच बंदोबस्त करतों."

असें म्हणून जगपाळराव घोड्यावरून खालीं उतरले आणि धरण्यासाठीं शिवाजीजवळ रागारागानें आले. इतका वेळ तो अगदीं शांत चित्तानें बापलेकीचें भाषण ऐकत होता. सुमित्रेच्या स्वाभिमानयुक्त भाषणानें त्यालाहि स्फुरण आलें होतें. तो शांतपणानेंच म्हणाला, " कां — तुम्ही शिवाजीला शिव्या कां देतां ? त्यानं तुमचं असं काय घोडं मारलं आहे ? "

" काय घोडं मारलं आहे ? " ह्या बंडखोर शिवाजीनं ही सर्वत्र बंडाळी माजवून आम्हां मराठ्यांच्या नांवाला काळोखी आणली आहे."

" त्यानं काळोखी आणली नाहीं; उलट तुमच्या तोंडाला लागलेली काळोखी दूर करण्याचे त्याचे प्रयत्न चालले आहेत ! "

" त्या पोराकडून होणार आहे काय ? त्या आडमुठ्या मावळ्यांना हाताशीं धरून त्यानं दरोडेखोरीच करावी ! त्या पोराची महती मजजवळ गाऊं नकोस; समजलास ? जा — "

" समजलों, पुष्कळ समजलों !— पण काय समजलों ? लोकांना एकदां गुलामगिरीची संवय जडली म्हणजे ती करण्यांतच त्यांना भूषण वाटणार, हें समजलों ! अशा ह्या गुलामांना त्यांच्या गुलामगिरींतून सोडविण्याचा कुणी प्रयत्न करूं लागला म्हणजे तो त्यांना दुष्मनासारखाच वाटणार ! "

" अरे गोसावड्या ! कां उगाच त्या शिवाजीची बडेजावी गातोस ? दर्यामें खसखस ! त्या पोराकडून होणार आहे काय ? त्यानं गिरिकंदरांत लपून छपून दिवस काढावे. त्याच्या अंगांत हिम्मत असती तर अवाढव्य पसरलेल्या बादशाही सत्तेला विरोध करण्याकरितां हातांत समशेर घेऊन तो केंव्हांच पुढं झाला असता. अशी लपून छपून त्यानं भामटेगिरी केली नसती बरं ! "

" हातांत नागवी समशेर घेऊन पुढं येण्यास शिवाजी कचरतो, किंवा त्याला यवनांची भीति वाटते, असा आपला समज आहे काय ? शत्रूपुढं दंड ठोकून स्वबांधवांच्या स्वातंत्र्याकरितां लढाईचं तोंड रणांगणावर उघडं करण्यास शिवाजी केंव्हांहि मागं घ्यायचा नाहीं ! पण मी सांगतों त्यावर विश्वास ठेवा. शिवाजीला रात्रंदिवस हीच

तळमळ लागली आहे. खरोखरीच स्वदेशाभिमान हाच शिवाजीचा धर्म आहे! स्वदेशसेवा हेंच शिवाजीचं व्रत आहे आणि स्वदेशहितचिंतन हाच शिवाजीचा व्यवसाय आहे. देशकार्याच्या यज्ञांत स्वार्थाची आहुति देऊन आपलं चित्त, वित्त आणि देह देशार्पण करणं हीच त्याची प्रतिज्ञा आहे!"

"बस्स बाबा, पुष्कळ झालं हें तुझं शिवाजीचं पुराण!" असें म्हणून त्यांनीं निर्मलेला पुढें म्हटलें, "निर्मले, जा, ह्या गोसावड्यांच्या झोळींत भिक्षेचं थोडं धान्य टाक आणि जाऊं दे एकदांची कटकट! मघांपासून व्यां व्यां करून माझं डोकं मात्र उठविलं!" असें म्हणून जगपाळराव घरांत शिरले. इतका वेळ घसाफोड करून आमच्या कथानायकानें सांगितलेल्या, समजाविलेल्या आणि पटविलेल्या गोष्टींचा किंचिताहि परिणाम त्यांच्या मनावर झालेला दिसला नाहीं, तें पाहून शिवाजीच्या तोंडून अत्यंत उद्वेगाचा उद्‌गार बाहेर पडला—"अरेरे! किती स्वाभिमानशून्य मराठा हा!"

* * *

## १४. प्रयत्नवादीच

"बा महाराष्ट्रा! माझ्या दुर्दैवी देशा! तुझ्या या स्वाभिमानशून्य पुत्रांना तुझ्या पारतंत्र्याबद्दल कांहींच दुःख वाटूं नये काय? तुझ्या नशिबांतल्या हालअपेष्टा जर चुकत नाहींत, तर त्या दाढीवाल्यांकडून झाल्या काय, आणि शेंडीवाल्यांकडून झाल्या काय, सारख्याच आहेत. एकटा शिवाजी काय करणार?" आमच्या कथानायकाच्या अंतःकरणाला पीळ पडून बाहेर पडलेले हे उद्‌गार बाजूला दरवाजांत उभ्या असलेल्या सुमित्रेच्या हृदयाला घरें पाडीत गेले. ती पुढें होऊन म्हणाली, "आपण शिवाजीचे अनुयायी म्हणवितां ना?—मग असे निरुत्साही कां होतां?" शिवाजीनें फक्त तिच्याकडे पाहिलें आणि एक दीर्घ श्वास मात्र सोडला. तेव्हां ती पुढें म्हणाली, "बैरागीमहाराज, आपले शिवाजी दैववादी आहेत कीं प्रयत्नवादी आहेत?"

" शिवाजी प्रयत्नवादी आहे ! " अत्यंत गंभीरपणानें पण निश्चयी स्वरांत शिवाजीनें उत्तर दिलें. त्याबरोबर सुमित्रा मोठ्या तडफेनें म्हणाली, " मग निराश कां होतां ? चिकाटीनं अव्याहत प्रयत्न चालू ठेवा. आज जें असाध्य दिसत आहे, तेंच अखेर साध्य होणार आहे ! आपलं सर्व भाषण मीं ऐकलं. शिवाजीच्या ध्येयाविषयीं माझी तर खात्री झाली. आपला देश आणि देशबांधव यांवांचून ज्याला अन्य पाश नाहीं, धर्म, न्याय आणि नीतिकार्य यांवांचून ज्याला अन्य उद्योग नाहीं, त्या अव्याहत चिकाटीच्या प्रयत्नवाद्याला निरुत्साही करण्याचं सामर्थ्य या जगांत कोणाच्याहि अंगांत नाहीं ! आपल्या शिवाजीनं आरंभलेलं कार्य सत्कार्य आहे; ह्या सत्कार्यार्थ प्रयत्न करून शेवटीं परमेश्वरानं शिवाजीला जय दिला नाहीं, तर ही सुमित्रा ईश्वराचं अस्तित्वच कबूल करणार नाहीं ! आमचे बाबा झाले काय, घोरपडे झाले काय, किंवा मोरे-माने झाले काय, हे सर्व मराठे स्वतः बादशहाचे बडे सरदार म्हणवून घेणारे, मोठेपणालाच हपापलेले आणि ऐषआरामामुळं ऐदी बनलेले आहेत. यांच्यापासून शिवाजीला काडीचीहि मदत होणार नाहीं. यांच्या मदतीची अपेक्षा करण्यापेक्षां जंगलांत, पहाडांत, दऱ्याखोऱ्यांत राहणारे, उन्हातानांतून फिरणारे ह्या भूमातेचे खरे सत्पुत्र ते मावळे, हेटकरी आणि शेतकरीच तुमच्या शिवाजीला त्याच्या मनाप्रमाणं जिवापाड मदत करतील, असं आतां मला वाटूं लागलं आहे ! "

" सुमित्रे, तुझा प्रत्येक शब्द अगदीं खरा आहे ! शिवाजी ह्या ऐदी बनलेल्या मराठ्यांवर विसंबून नाहीं. आपल्या देशाला जर कांहीं चांगले दिवस यायचे असतील, तर ते ह्या अडाणी आणि जंगली म्हणून, ह्या ऐदी सरदारांनीं तुच्छतेनें झिडकारलेल्या मावळे, हेटकरी आणि शेतकरी वर्गाकडूनच येतील ! हे मावळे, हेटकरी व शेतकरी लोक ' जंगली, अडाणी ' म्हणून शिवाजी त्यांचा कधींहि उपहास करणार नाहीं. अत्यंत गलिच्छ मानलेल्या खतांतच सुगंधी फुलं आणि रुचकर फळं निर्माण होतात, हें निसर्गतत्त्व शिवाजीच्या हृत्पटलावर खोदलेलं आहे ! " शिवाजीनें दिलेला दृष्टान्त सुमित्रा अत्यंत आतुरतेनें ऐकत होती. आपल्या भाषणाचा यथायोग्य परिणाम तिच्या मनावर झाला आहे, हें

शिवाजीच्या केव्हांच लक्षांत आलें. आपण तिच्या वडिलांजवळ इतकी घसेफोड केली याबद्दल प्रथम त्याला अत्यंत वाईट वाटलें होतें; परंतु तो हेकेखोर मनुष्य वळला नाहीं, त्याविषयीं झालेलें दुःख सुमित्रेनें भरून काढलेलें पाहून शिवाजी तितक्याच उत्साहानें तिच्याबरोबर बोलूं लागला. ती क्षणभरानें दुःखित स्वरांत म्हणाली, बैरागीमहाराज, तुम्ही इतका वेळ आमच्या बाबांना कळकळीचा उपदेश केला; पण उपड्या घड्यावर पाणी, असाच अखेर तुम्हांला अनुभव आला आणि त्यामुळं तुम्हांला दुःख होऊन आमच्या कुटुंबाविषयीं तुमचा अगदीं वाईट ग्रह झाला असेल. पण—"

"असं कसं म्हणतेस, सुमित्रे? आतां तूंच विचार कर कीं, ज्या ह्या नभोमंडळांत दररोज आपल्या उज्ज्वल प्रकाशकिरणांनीं सर्व सृष्टीला प्रफुल्लित करून सोडणारे चंद्र आणि सूर्य यांच्यासारखे महातेजोराशी आहेत, त्याच ह्या नभोमंडळांत त्या महातेजोराशींना क्षणिक कालपर्यंत तरी ग्रासणारे राहू-केतू सारखे नीच पापग्रहहि आहेत! ह्या एकदोन पापग्रहांमुळं सर्व नभोमंडळ पापी आहे, असं कुणी तरी म्हणेल काय? तूंच सांग."

"अहाहा! बैरागीमहाराज, किती गंभीर कल्पना ही तुमची!! मग तुमच्या शिवाजीच्या कल्पना किती तरी उदात्त असणार! खरो-खरच मला आतां असं वाटूं लागलं आहे कीं, माझ्यासारख्या अबलेकडून शिवाजीला मदत होणं जरी शक्य नसलं, तरी ह्या आपल्या मायभूमी-करितां आपला हा देह झिजवावा."

"शाबास! सुमित्रे! शाबास! तुझ्यासारख्या ज्या सत्यनिष्ठ स्वदेशा-भिमानी कुमारिका आज आपल्या देशांत असतील, त्या पुढं मातृपदाला पोंचल्यावर त्यांच्या पोटीं जन्म घेणारा प्रत्येक बाळ देशोद्धारकच निपजेल!"

इतक्यांत वडिलांच्या सांगण्याप्रमाणें मुठींत भिक्षा घेऊन निर्मला बाहेर आली; परंतु ती भिक्षा आमच्या कथानायकानें घेतली काय? त्यानें अंगांत घातलेली भगवी कफनी आणि काखेंत लटकविलेली झोळी कशाकरितां होती? वाचक हो! तो नरकेसरी त्या वेळीं महाराष्ट्राजवळ कोणती भिक्षा मागत होता?

* * *

# १५. निर्मलेकरितां मागण्या

" माझ्या स्वतःसंबंधीं मीं तुम्हांला कांहीं विशेष सांगायला पाहिजे असं नाहीं. माझे पुढले सर्व बेत तुम्हांला माहीत आहेतच ! तेव्हां माझ्या म्हणण्याला होकार द्यायला काय हरकत आहे ? "

" बाजीसाहेब, तुम्हीं माझ्या निर्मलेची मागणी करावी, हें मी तिचं मोठं भाग्य समजतों ! वास्तविक पाहिलं तर तुमची योग्यता कुठं आणि माझी कुठं ! "

" जगपाळराव, तुमच्या मुलीची योग्यता काय आहे, हें मी जाणून आहें. पण जगपाळराव, मीं सांगितलेल्या गोष्टींबद्दल तुम्हीं कांहीं मनावर घेतलेलं दिसत नाहीं. त्या भोसल्याच्या पोराची ती टारगट मंडळी अलीकडे तुमच्या गढींत वरचेवर येतात; पण तें कांहीं चांगलं नाहीं. "

" आपण त्याची बिलकूल काळजी करूं नका ! मी आतां त्याबद्दल अगदीं पक्का बंदोबस्त केला आहे. माझ्या मुली कांहीं वेड्या नाहींत. बाजीसाहेब, मघां वजीर तुम्हांला सांगत होता, ती काय गडबड आहे ?"

" गडबड कसली ? शहाजीच्या त्या हरामखोर पोराची ती बंडाळी ! आज दरबारांत अशी खबर आली आहे कीं, शिवाजीच्या साथीदारांनीं कल्याणचा सर्व सुभा लुटला, बादशाही खजिन्यावर हल्ला करून सर्व खजिना पळवून नेला, आणि त्याबरोबरच सुभ्याच्या बायका-मुलांनाहि कैद केलं ! शिवाय अशीहि दुसरी बातमी आली आहे कीं, घाटाखालचीं बारा मावळं शिवाजीनं हस्तगत करून घेतलीं आहेत ! "

" आणि त्या दिवशीं आपल्या अमीरसाहेबाचा वाडा जाळला. शिवाय त्याला आणि इतर सरदारांना चोप दिला, त्यांत देखील शिवाजीचं अंग आहे असं म्हणतात, तें खरं का ? "

" असेलहि कदाचित् ! पण म्हणावं, आतां थोडे दिवस राहिले आहेत. बादशहाकडून एकदां मला हुकूम मिळूं द्या, कीं ह्या शहाजीची आणि त्या उनाड पोराची चांगलीच उडवितों !—बरं पण जगपाळराव, मी उद्यां आपल्या गढींत येणार आहें. कशाकरितां येणार तें आलंच असेल तुमच्या लक्षांत ? " हंसत हंसत बाजीनें म्हटलें.

" हो, हो ! या, अवश्य या ! घर आपलंच आहे. मी सुमित्रेला सांगून ठेवतों. "

" छे छे ! तसं कांहीं करूं नका. मला आगंतुकीनंच येऊं द्या आणि असा आलों म्हणजेच खरी मजा येणार आहे ! "

" बरं, जशी आपली मर्जी ! "

जगपाळराव उठणार, इतक्यांत एक सेवक आंत येऊन वजीर-साहेबांची स्वारी येत आहे, अशी वर्दी देऊन गेला. तेव्हां बाजी म्हणाला, " थांबा, जगपाळराव, हे वजीरसाहेब पुनः कां आले आहेत तें ऐकून जा. आतां तुमच्यापासून मला कोणतंच राजकारण लपविणं नाहीं; कारण तुम्हीं आम्ही आतां एकच आहोंत ! "

" बाजीसाहेब, इतकं तुम्हीं समजून म्हटल्यावर मग काय ? पण ही वजीरसाहेबांची इतकी तारांबळ कां उडाली आहे ? "

" ही तारांबळ त्या शिवाजीच्या बंडाळीमुळंच असेल ; दुसरं काय ? "

बाजी म्हणाला तेंच खरें होतें. कल्याणचा सुभा लुटल्याबद्दलची खबर दरबारांत येतांच बादशहा अतिशय संतप्त झाला. त्यानें वजिराला बोलावून शिवाजीच्या बंदोबस्ताकरितां फौज पाठविण्यास सांगितलें आणि आठ दिवसांच्या आंत शिवाजीचा बंदोबस्त झालाच पाहिजे असा कडक हुकूम दिला. त्याप्रमाणें पुढली व्यवस्था काय करावी, हें विचारण्याकरितां वजीर मुद्दाम बाजीकडे आतां आला. परस्परांचे सलाम वगैरे झाल्यावर वजीर म्हणाला, " बाजीसाहेब, चला, आतां बांधा कंबर ! बादशहानं स्वतः होऊन आतां हुकूम दिला आहे. तुम्हांला वाटेल तितकी फौज बरोबर घ्या आणि तुमचं मन चाहील तसा ह्या शिवाजीचा तुम्ही बंदोबस्त करा ! "

" बादशहानं हुकूम दिला म्हणतां ?—ठीक आहे ! मी करतों त्याचा विचार ! शहाजी भोसल्याच्या बंदोबस्ताला मी लागतों आणि आमचे हे जगपाळराव त्या पोराच्या मुसक्या बांधून त्याला घेऊन येतील. काय जगपाळराव, घेतां ना एवढी गोष्ट मनावर ? "

" हो, हो ! त्यांत काय आहे विशेष ? पण आपलं उद्यांचं ठरलं आहे त्याचं कसं काय ? तुम्ही गढींत येणार आहांत ना ? "

"हा काय आणखी बेत रचला आहे तुम्हीं, बाजीसाहेब?" वजिरानें मध्येंच विचारलें.

"आमची मुलगी!" जगपाळराव म्हणाले, "बाजीसाहेब तिला पदरांत घेताहेत!"

"असं काय?—आनंद आहे."

पुढें कांहीं वेळ त्यांच्या गोष्टी होऊन जगपाळराव आपल्या नवीन कामगिरीवर जाण्याकरितां निघाले. आजच्याइतका आनंद आणि उत्साह त्यांना बऱ्याच वर्षांत झाला नव्हता. आपण इतके दिवस जी गोष्ट व्हावी म्हणून इच्छा करीत होतों, ती आज झाली. आपल्या एका मुलीला बाजी घोरपड्यासारख्या बड्या सरदारानें मागणी घातली, याबद्दल त्यांना कल्पनातीत आनंद झाला आणि त्या आनंदाच्या भरांत त्यांनीं शिवाजीवर फौज घेऊन जाण्याची नवीन कामगिरी पत्करली. पण त्यांना ज्या गोष्टींत आनंद झाला, त्या गोष्टींत निर्मलेला आनंद होता काय?

आम्ही आतां उल्लेख करीत आहोंत तो दुसरा दिवस होता. जगपाळराव आपल्या नवीन कामगिरीवर गेले होते; परंतु योगायोग असा कांहीं विलक्षण रीतीनें जुळून आला कीं, ज्या गोष्टीच्या बंदोबस्ताकरितां जगपाळराव गेले, त्या गोष्टीचें मूळ त्यांच्या गढींतच होतें. कल्याणचा लुटलेला खजिना आणि सुभ्याच्या घरांतील कैद केलेली मंडळी त्या वेळीं जगपाळरावांच्या गढींत होती. पण हा योगायोग कसा जुळून आला?—शिवाजीला साहाय्य करण्याची शपथ घेतलेले जे त्याचे अनेक अनुयायी झाले होते, त्यांपैकींच आबाजी सोनदेव नांवाचा धाडसी पुरुष होता, दादजी देशपांड्याजवळ त्यानें शपथ घेतली होती. शिवाजीमहाराजांना कोणत्या गोष्टींत कसें साह्य करावयाचें हें समजतांच तो धाडसी पण उच्छृंखल वृत्तीचा तरुण लगेच उद्योगाला लागला.

आपणांबरोबर पन्नास-साठ तरुण घेऊन आबाजी सोनदेव शिवाजीला येऊन मिळण्याकरितां निघाला. त्या वेळींच कल्याणचा सुभा मोठा खजिना घेऊन विजापुरीं जात आहे, असें त्याला कळलें. लगेच त्या

धाडसी तरुणाच्या मनांत निरनिराळे विचार येऊं लागले. तो खजिना लुटण्याचा विचार इतर प्रसंगीं त्याच्या मनांतहि आला नसता आणि धाडसहि झालें नसतें; परंतु आतां त्या शपथेनें त्याच्या अंगांत एक प्रकारचें चैतन्य उत्पन्न केलें होतें! आपण शपथ घेतली आहे, आणि आम्ही आपले अनुयायी आहोंत, असें सांगण्याकरितांच शिवाजीजवळ जाण्यापेक्षां शपथेप्रमाणें कांहींतरी कामगिरी करून दाखवावी आणि मग महाराजांच्या दर्शनाला जावें, असें निश्चयानें ठरवून त्यानें कल्याणचा सुभा विजापुरीं नेत असलेल्या खजिन्यावर पाळत ठेवली. इतक्यांत विजापूरच्या हद्दींत नेताजी त्यांना भेटला. त्याचें धाडस कांहीं विलक्षणच होतें. त्यांतून नुकत्याच त्यानें प्रत्यक्ष शिवाजीच्या धाडसाच्या कांहीं गोष्टी पाहिल्या होत्या. त्याला अनुसरून त्याच्या पाठबळावर सर्व मंडळींनीं त्या खजिन्यावर धाड घातली आणि तो लुटला. त्याच लुटींत सुभ्याची सूनहि त्यांच्या हातीं लागली. तिला सोडून देण्याबद्दल नेताजीनें आबाजीला पुष्कळ सांगून पाहिलें; परंतु 'आपल्या बायका हातीं लागल्या म्हणजे ते जसे त्यांना पळवून नेतात, तसें त्यांच्या बायका हातीं लागल्या म्हणजे आपणासहि नेण्याचा अधिकार आहे' असा त्यानें युक्तिवाद काढला. अर्थात् नेताजीला कांहीं बोलतां येईना.

आपण शिवाजीमहाराजांकरितां काय करतों, हें दाखविण्याकरितां म्हणा किंवा गढींतील मंडळीपुढें आपली शेखी मिरविण्याकरितां म्हणून म्हणा, आबाजी सोनदेवाला घेऊन नेताजी त्या लुटीसह गढींत आला; परंतु सुमित्रेनें त्यांना फार वेळ राहूं दिलें नाहीं. 'आपण शिवाजी-महाराजांकरितां जें कांहीं करीत आहांत तें मला मान्य असलें, तरी आमच्या वडिलांना तें पसंत नाहीं आणि वडीलहि घरीं नाहींत; तेव्हां त्यांच्यामागं तुम्हांला घरांत ठेवून घेणं चांगलं नाहीं', असें सुमित्रेनें सांगतांच रात्रभर मुक्काम करून नेताजीनें ती सर्व लूट तोरणा गडावर सोनोपंतांकडे पाठविली.

लुटीसह त्यानें आबाजीला वाटेला लावलें आणि तो स्वतः पुनः मागेंच राहिला. एकदां आपल्या दैवाचा सोक्षमोक्ष करावा असें ठरवून तो पुन्हां गढींत जाण्याकरितां निघाला. तेथें जवळच एक लहानसा

तलाव होता. तेथें कोणीतरी बसलें आहे, असें पाहून नेताजी तिकडे निघाला. सुमित्रा नेहमीं त्या तलावावर जात असे. त्या दोघी बहिणींचें तें एक उठण्याबसण्याचें आणि सहल करण्याचें स्थान होतें. त्या वेळीं सुमित्रा एकटीच त्या तलावाच्या कांठीं एका मोठ्या शिळेवर बसली होती. आज सकाळपासून तिचें मन अस्वस्थ झालें होतें. रात्रीं आबाजी सोनदेवानें त्यांच्या गढींत आणलेल्या मुलाण्याच्या सुनेला पाहून तिच्या मनांत निरनिराळ्या भावना प्रगट होऊं लागल्या. तिला गढींत चैन पडेना म्हणून ती तलावावर आली. तेथें विचार करीत बसली असतां नेताजी तिच्याजवळ गेला. त्याला पाहतांच ती उठून उभी राहिली आणि म्हणाली, " नेताजीराव, तुम्ही नाहीं का गेलां अजून ?—पण काय हो नेताजीराव, आतां ते आबाजी त्या मुलाण्याच्या सुनेला शिवाजी-जवळ नेऊन काय करणार ? तुमचे शिवाजीमहाराज तिला जवळ करतील का ? ह्यापूर्वीं असं कधीं झालं होतं का ? "

" तें मी कसं सांगूं ? सुंदर वस्तूचा कोणाला मोह पडणार नाहीं ? " असें म्हणून नेताजी पुनः थोडा वेळ थांबला. आतां अनायासें गोष्ट निघाली आहे, तेव्हां आपल्या मनांतील गोष्ट सुमित्रेला सांगावी आणि तिची संमति मिळवावी असा विचार करून नेताजी हळूच म्हणाला, " सुमित्राबाई, मी तुम्हांला विचारूं का ? मी पुण्यास न जातां असा मागं कां राहिलों म्हणून तुम्हीं मघां विचारलं, त्याचं खरं कारण मला तुमच्या निर्मलेजवळ एक गोष्ट काढायची आहे; पण तुम्ही मला संमति देतां का ? "

" काय म्हणतां तुम्ही ? " आपल्या विचारांतून भानावर येऊन सुमित्रा म्हणाली. नेताजी काय म्हणतो याकडे तिचें लक्ष नव्हतें.

" मी निर्मलेला विचारूं का ? "

" विचारा. "

* * *

# १६. प्रेमस्थानांचा शोध

'आज सकाळपासून मला हें असं काय होऊं लागलं? घटके-घटकेला माझ्या मनांत असे निरनिराळे विचार कां येतात?' विचारांचा अतिरेक झाल्यावर सुमित्रा स्वतःशींच बोलूं लागली. नेताजीनें तिला काय विचारलें, हेंदेखील तिला कळलें नाहीं. त्यानें विचारलें एक आणि ही भलतेंच समजून त्याच्या प्रश्नाला तिनें उत्तर दिलें निराळेंच! सकाळपासून ती विचारांतच होती. मुलाण्याच्या सुनेला पाहूनच तिच्या डोक्यांत विचार येऊं लागले; परंतु आतां नेताजीच्या सांगण्या-वरून त्या सुंदर स्त्रीचा शिवाजीमहाराज स्वीकार करतील, असें तिला कळतांच तिची चित्तवृत्ति एकदम अस्थिर झाली. नेताजी तिच्याजवळून केव्हां गेला हेंहि तिला कळलें नाहीं, इतकी ती विचारमग्न स्थितींत होती. आतां हळूहळू ते विचार तिच्या मुखावाटे बाहेर पडूं लागले.

'सकाळपासून माझ्या मनांत किती तरी विचार आले, पण आतां इतक्यांत नेताजीरावांनीं त्या स्त्रीबद्दलच सांगतांच माझ्या अंतःकरणांत अशा विलक्षण भावना कां प्रकट होऊं लागल्या? इतके दिवस माझी वृत्ति शांत होती, पण आतांच माझ्या वृत्तींत फरक कां पडला? मी इतक्यांतच अशी तामसी वृत्तीची कां बनलें? शिवाजीमहाराज त्या अप्रतिम लावण्यवती स्त्रीचा स्वीकार करतील असें नेताजीरावानं सांगतांच कोणती विलक्षण भावना माझ्या मनांत जागृत झाली? मुलाण्याच्या सुनेबद्दल माझ्या मनांत मत्सराचं बीजारोपण झालं काय?—हो, मत्सराचंच हें बीजारोपण! मला त्या स्त्रीचा मत्सर वाटूं लागला काय? पण मीं तिचा मत्सर तरी कां करावा? ती माझी कोण?—ती माझी कुणी नाहीं आणि मीहि तिची कुणी नाहीं; पण शिवाजीमहाराज!—पण मी त्यांच्या भजनीं लागलें, यांत मी चुकलें काय?—कां वरं?—शिवाजी! शि—वा—जी! अहाहा! ह्या नांवांत अशी कोणती जादू आहे? ही जादू नव्हे! हें नांवच पवित्र आहे! शिव म्हणजे पवित्र! ब्रह्मदेवानं त्यांना पवित्र बनविलं आहे, आणि म्हणूनच माझं मन त्यांच्या-वर भक्ति करूं लागलं—प्रेम करूं लागलं! पवित्र वस्तूची आवड असणं हा

अपराध होईल का ? वसंतामध्यें विहार करणाऱ्या—विहंगकुलास भूषण असलेल्या कोकिळेचा कर्णमधुर आवाज ऐकून कोण बरं मुग्ध होणार नाहीं ? तसंच शिवाजीमहाराजांच्या मंगल कीर्तीचा चोहोंकडून ऐकूं येणारा आलाप ऐकून माझं मन मुग्ध झालं, यांत पाप कसलं आणि हा अपराध तरी कसला ? शिवराया, तुम्हींच स्वतःच्या कृतीनं मला ह्यापुढं कर्तव्याच्या मार्गावर पाऊल टाकण्यास शिकविलं ! तुमचं देश-सेवाव्रत, तुमची गोब्राह्मणप्रतिपालनाची प्रतिज्ञा आणि तुमचं निःस्वार्थ आचरण माझ्या प्रेमाला कारण झालं. मीं तुम्हांला देव कां मानूं नये ?—देवा, शिवराया, हे निर्मल पवित्र देवा शिवराया ! ही सुमित्रा हें हृदयकमळ निर्हेतुक बुद्धीनं तुझ्या चरणीं अर्पण करतें.' असें म्हणून सुमित्रेनें मोठ्या भक्तिभावानें डोळे मिटून नमस्कार केला; इतक्यांत निर्मला तेथें आली. आपल्या बहिणीला नमस्कार करतांना पाहून तिला आश्चर्य वाटलें.

"अक्का ! तूं कुणाला ग आतां नमस्कार केलास ?"

"मीं माझ्या देवाला नमस्कार केला !"

"तुझ्या देवाला ? म्हणजे ? तुझा आणि माझा असे देव निरनिराळे आहेत काय ?"

"होय, प्रत्येकीचे देव निराळेच आहेत !"

"ते कसे ? देव निरनिराळे कसे असतील, अक्का ?"

"निर्मले, तुझ्या हें कसं ग लक्षांत येत नाहीं ? ज्या ठिकाणीं आपलं शुद्ध आणि सात्त्विक प्रेम जडलं आहे, तोच आपला देव बरं !"

"अक्का, कोणता ग तुझा देव ? सांग."

"माझा देव ?—निर्मले, माझा देव शिवाजीमहाराज !"

"काय म्हणतेस हें अक्का ?—शिवाजीमहाराज ! त्यांना तूं अद्यापि पाहिलं नाहींस, आणि त्यांच्यावर तुझं प्रेम कसं जडलं ? काय ग बाई हें जगावेगळं प्रेम ?"

"निर्मले, जगावेगळं प्रेम नाहीं ! माझं प्रेम शुद्ध, निर्मल आणि सात्त्विक आहे. मीं शिवाजीमहाराजांना पाहिलं नाहीं, असं तूं म्हणतेस,

पण त्यांना रोज पाहतें. आतां ह्या वेळीं—ह्या ठिकाणींसुद्धां ते आहेत आणि मला ते दिसतात !"

"दिसतात !–कुठं दिसतात ?–आज इथं आले आहेत शिवाजी-महाराज ? खरंच अक्का, मला किनई शिवाजीमहाराजांना पाहायचं आहे !"

"पाहा, म्हणजे दिसतील !"

"कुठं आहेत ?" निर्मला आश्चर्यचकित मुद्रेनें इकडे तिकडे पाहूं लागली. तें पाहून सुमित्रा हंसत हंसत गंभीर स्वरांत म्हणाली, "निर्मले, तुला ते कसे दिसतील ? मनाची समाधि लागल्याशिवाय तुला ते कसे दिसतील ?"

"आणि तुला दिसतात का ग अक्का ?"

"हो–दिसतात ! आणि कां दिसूं नयेत ? मीं माझ्या मनाच्या समाधींत माझ्या देवाला ह्या ठिकाणीं ह्या वेळीं पाहिलं यांत तुला इतकं नवल तें काय वाटलं ?"

"मग अक्का, शिवाजीमहाराज कसे आहेत ? ते कसे दिसतात ? त्यांचं रूप कसं आहे ? त्यांचा बांधा कसा आहे ? सांग तरी, सांग !"

"तुला सांगूं ? निर्मले, माझ्या मनश्चक्षूंनीं मला दिसत असलेलं हें ह्या जगतीतलावर अवतरलेल्या नूतन प्रकाशराजाचं वर्णन करून तुला सांगूं ?–" असें म्हणून ती गंभीर स्वरांत म्हणाली,

"अहाहा ! निर्मले, पाहा–पाहा–ते शिवाजीमहाराज पाहा ! कपाळ किती भव्य आहे; त्या डोळ्यांत विलसत असलेलं दिव्य तेज मला सहनदेखील होत नाहीं; कांति तरी किती दैदीप्यमान आहे पाहा–" असें बोलत ती हळूहळू चालूं लागली. जणूं काय ब्रह्मानंदीं टाळी लागून स्वतःला विसरलेली ती एक चालती पुतळीच आहे, असें दिसलें. निर्मलेनें तिला अडविलें नाहीं किंवा तिच्या समाधीचा भंग केला नाहीं. फक्त ती मोठ्या आदरभावानें तिच्याकडे पाहात होती. जातां जातां सुमित्रा गढीच्या बाजूला असलेल्या गर्द लतांच्या झाडींत शिरली. तिच्याकडे पाहात पाहात निर्मला त्या मोठ्या शिळेवर बसली.

थोड्या वेळापूर्वीं ह्याच शिळेवर बसून सुमित्रा स्वगत विचार बोलत होती. आतां निर्मलाहि स्वतःचे विचार बोलूं लागली.

“अक्काला आपलं प्रेमस्थान कसं बरं ओळखतां आलं? आणि मलाच तें कां ओळखतां येऊं नये? माझं प्रेमस्थान कोणतं? ज्या दिव्य प्रेमानं हृदयवीण्याच्या तारा एकाकार होऊन माझी अक्का जशी आपल्या प्रेमस्थानाशीं तन्मय होते, अशा स्वर्गीय प्रेमाची माझ्या हृदयाला अद्यापि जाणीवच झालेली नाहीं; नाहींतर अक्काप्रमाणं तें माझं प्रेमस्थान माझ्या डोळ्यांपुढं उभं राहतं. मी कुणावर प्रेम करतें काय? बाजीवर माझं प्रेम असेल काय?—आणि नेताजीरावांवर?—छे! मी हा प्रेमाचा विचार करूं लागलें म्हणजे अशी गोंधळूनच जातें! स्वरूपावरून प्रेम करायचं कीं गुणावरून प्रेम करायचं? शौर्यावर भाळून प्रेम करायचं कीं संपत्तीला मोहून प्रेम करायचं?—छे! अक्कालाच विचारलं पाहिजे; पण तिला तिचं प्रेमस्थान कसं बरं सांपडलं असेल? अक्काला तिचा देव सांपडला. ती मला माझा देव सांगेल काय?” असें म्हणून निर्मला उठली आणि [illegible] गेली त्या मार्गानें जाऊं लागली; तोंच समोरून [illegible] तिच्या दृष्टीस पडला.

“निर्मले, [illegible]पुढं हात जोडायचे [illegible] आलों आहें.” जवळ येतांच नेताजी म्हणाला, “[illegible] दिवस ती गोष्ट माझ्या मनांत घोळत आहे. तुला सांगण्याचा मीं कितीदां तरी प्रयत्न केला; परंतु तसा प्रसंगच मिळाला नाहीं!”

“नेताजीराव, तुम्ही कोणती गोष्ट मला सांगणार आहांत?” निर्मलेनें त्याच्याकडे रोखून पाहात विचारलें, “सांगा—काय सांगायचं असेल तें सांगा.”

“तुला राग तर नाहीं ना येणार?”

“राग येण्यासारखी गोष्ट असेल तर राग येईल आणि राग येण्यासारखी नसेल तर नाहीं येणार! सांगा.”

“मी तुझ्याजवळ एक याचना करणार आहें. करूं का?”

“कसली?”

पण त्यांना रोज पाहतें. आतां ह्या वेळीं—ह्या ठिकाणींसुद्धां ते आहेत आणि मला ते दिसतात ! ”

“ दिसतात !—कुठं दिसतात ?—आंज इथं आले आहेत शिवाजीमहाराज ? खरंच अक्का, मला किनई शिवाजीमहाराजांना पाहायचं आहे ! ”

“ पाहा, म्हणजे दिसतील ! ”

“ कुठं आहेत ? ” निर्मला आश्चर्यचकित मुद्रेनें इकडे तिकडे पाहूं लागली. तें पाहून सुमित्रा हंसत हंसत गंभीर स्वरांत म्हणाली, “ निर्मले, तुला ते कसे दिसतील ? मनाची समाधि लागल्याशिवाय तुला ते कसे दिसतील ? ”

“ आणि तुला दिसतात का ग अक्का ? ”

“ हो—दिसतात ! आणि कां दिसूं नयेत ? मीं माझ्या मनाच्या समाधींत माझ्या देवाला ह्या ठिकाणीं ह्या वेळीं पाहिलं यांत तुला इतकं नवल तें काय वाटलं ? ”

“ मग अक्का, शिवाजीमहाराज कसे आहेत ? ते कसे दिसतात ? त्यांचं रूप कसं आहे ? त्यांचा बांधा कसा आहे ? सांग तरी, सांग ! ”

“ तुला सांगूं ? निर्मले, माझ्या मनश्चक्षूंनीं मला दिसत असलेलं हें ह्या जगतीतलावर अवतरलेल्या नूतन प्रकाशराजाचं वर्णन करून तुला सांगूं ?—” असें म्हणून ती गंभीर स्वरांत म्हणाली,

“ अहाहा ! निर्मले, पाहा—पाहा—ते शिवाजीमहाराज पाहा ! कपाळ किती भव्य आहे; त्या डोळयांत विलसत असलेलं दिव्य तेज मला सहनदेखील होत नाहीं; कांति तरीं किती दैदीप्यमान आहे पाहा—” असें बोलत ती हळूहळू चालूं लागली. जणूं काय ब्रह्मानंदीं टाळी लागून स्वतःला विसरलेली ती एक चालती पुतळीच आहे, असें दिसलें. निर्मलेनें तिला अडविलें नाहीं किंवा तिच्या समाधीचा भंग केला नाहीं. फक्त ती मोठ्या आदरभावानें तिच्याकडे पाहात होती. जातां जातां सुमित्रा गढीच्या बाजूला असलेल्या गर्द लतांच्या झाडींत शिरली. तिच्याकडे पाहात पाहात निर्मला त्या मोठ्या शिळेवर बसली.

थोड्या वेळापूर्वीं ह्याच शिळेवर बसून सुमित्रा स्वगत विचार बोलत होती. आतां निर्मलाहि स्वतःचे विचार बोलूं लागली.

“ अक्काला आपलं प्रेमस्थान कसं बरं ओळखतां आलं? आणि मलाच तें कां ओळखतां येऊं नये? माझं प्रेमस्थान कोणतं? ज्या दिव्य प्रेमानं हृदयवीण्याच्या तारा एकाकार होऊन माझी अक्का जशी आपल्या प्रेमस्थानाशीं तन्मय होते, अशा स्वर्गीय प्रेमाची माझ्या हृदयाला अद्यापि जाणीवच झालेली नाहीं; नाहींतर अक्काप्रमाणं तें माझं प्रेमस्थान माझ्या डोळ्यांपुढं उभं राहतं. मी कुणावर प्रेम करतें काय? बाजीवर माझं प्रेम असेल काय?—आणि नेताजीरावांवर?—छे! मी हा प्रेमाचा विचार करूं लागलें म्हणजे अशी गोंधळूनच जातें! स्वरूपावरून प्रेम करायचं कीं गुणावरून प्रेम करायचं? शौर्यावर भाळून प्रेम करायचं कीं संपत्तीला मोहून प्रेम करायचं?—छे! अक्कालाच विचारलं पाहिजे; पण तिला तिचं प्रेमस्थान कसं बरं सांपडलं असेल? अक्काला तिचा देव सांपडला. ती मला माझा देव सांगेल काय?” असें म्हणून निर्मला उठली आणि सुमित्रा गेली त्या मार्गानें जाऊं लागली; तोंच समोरून नेताजी येतांना तिच्या दृष्टीस पडला.

“ निर्मल[illegible] मी तुला एक गोष्ट सांगण्याकरितां आलों आहें.” जवळ येतांच नेताजी[illegible] “[illegible] बरेच दिवस ती गोष्ट माझ्या मनांत घोळत आहे. तुला सांगण्याचा मीं कितीदां तरी प्रयत्न केला; परंतु तसा प्रसंगच मिळाला नाहीं!”

“ नेताजीराव, तुम्ही कोणती गोष्ट मला सांगणार आहांत?” निर्मलेनें त्याच्याकडे रोखून पाहात विचारलें, “ सांगा—काय सांगायचं असेल तें सांगा.”

“ तुला राग तर नाहीं ना येणार?”

“ राग येण्यासारखी गोष्ट असेल तर राग येईल आणि राग येण्यासारखी नसेल तर नाहीं येणार! सांगा.”

“ मी तुझ्याजवळ एक याचना करणार आहें. करूं का?”

“ कसली?”

पण त्यांना रोज पाहतें. आतां ह्या वेळीं—ह्या ठिकाणींसुद्धां ते आहेत आणि मला ते दिसतात !"

"दिसतात!—कुठं दिसतात?—आज इथं आले आहेत शिवाजी-महाराज? खरंच अक्का, मला किनई शिवाजीमहाराजांना पाहायचं आहे !"

"पाहा, म्हणजे दिसतील !"

"कुठं आहेत?" निर्मला आश्चर्यचकित मुद्रेनें इकडे तिकडे पाहूं लागली. तें पाहून सुमित्रा हंसत हंसत गंभीर स्वरांत म्हणाली, "निर्मले, तुला ते कसे दिसतील? मनाची समाधि लागल्याशिवाय तुला ते कसे दिसतील?"

"आणि तुला दिसतात का ग अक्का?"

"हो—दिसतात! आणि कां दिसूं नयेत? मीं माझ्या मनाच्या समाधींत माझ्या देवाला ह्या ठिकाणीं ह्या वेळीं पाहिलं यांत तुला इतकं नवल तें काय वाटलं?"

"मग अक्का, शिवाजीमहाराज कसे आहेत? ते कसे दिसतात? त्यांचं रूप कसं आहे? त्यांचा बांधा कसा आहे? सांग तरी, सांग !"

"तुला सांगूं? निर्मले, माझ्या मनश्चक्षूंनीं मला दिसत असलेलं हें ह्या जगतीतलावर अवतरलेल्या नूतन प्रकाशराजाचं वर्णन करून तुला सांगूं?—" असें म्हणून ती गंभीर स्वरांत म्हणाली,

"अहाहा! निर्मले, पाहा—पाहा—ते शिवाजीमहाराज पाहा! कपाळ किती भव्य आहे; त्या डोळ्यांत विलसत असलेलं दिव्य तेज मला सहनदेखील होत नाहीं; कांति तरीं किती दैदीप्यमान आहे पाहा—" असें बोलत ती हळूहळू चालूं लागली. जणूं काय ब्रह्मानंदीं टाळी लागून स्वतःला विसरलेली ती एक चालती पुतळीच आहे, असें दिसलें. निर्मलेनें तिला अडविलें नाहीं किंवा तिच्या समाधीचा भंग केला नाहीं. फक्त ती मोठ्या आदरभावानें तिच्याकडे पाहात होती. जातां जातां सुमित्रा गढीच्या बाजूला असलेल्या गर्द लतांच्या झाडींत शिरली. तिच्याकडे पाहात पाहात निर्मला त्या मोठ्या शिळेवर बसली.

थोड्या वेळापूर्वी ह्याच शिलेवर बसून सुमित्रा स्वगत विचार बोलत होती. आतां निर्मलाहि स्वतःचे विचार बोलूं लागली.

"अक्काला आपलं प्रेमस्थान कसं बरं ओळखतां आलं? आणि मलाच तें कां ओळखतां येऊं नये? माझं प्रेमस्थान कोणतं? ज्या दिव्य प्रेमानं हृदयवीण्याच्या तारा एकाकार होऊन माझी अक्का जशी आपल्या प्रेमस्थानाशीं तन्मय होते, अशा स्वर्गीय प्रेमाची माझ्या हृदयाला अद्यापि जाणीवच झालेली नाहीं; नाहींतर अक्काप्रमाणं तें माझं प्रेमस्थान माझ्या डोळ्यांपुढं उभं राहतं. मी कुणावर प्रेम करतें काय? बाजीवर माझं प्रेम असेल काय?—आणि नेताजीरावांवर?—छे! मी हा प्रेमाचा विचार करूं लागलें म्हणजे अशी गोंधळूनच जातें! स्वरूपावरून प्रेम करायचं कीं गुणावरून प्रेम करायचं? शौर्यावर भाळून प्रेम करायचं कीं संपत्तीला मोहून प्रेम करायचं?—छे! अक्कालाच विचारलं पाहिजे; पण तिला तिचं प्रेमस्थान कसं बरं सांपडलं असेल? अक्काला तिचा देव सांपडला. ती मला माझा देव सांगेल काय?" असें म्हणून निर्मला उठली आणि सुमित्रा गेली त्या मार्गानें जाऊं लागली; तोंच समोरून नेताजी येतांना तिच्या दृष्टीस पडला.

"निर्मला, मी तुला एक गोष्ट सांगण्याकरितां आलों आहें." जवळ येतांच नेताजी म्हणाला, "आज बरेच दिवस ती गोष्ट माझ्या मनांत घोळत आहे. तुला सांगण्याचा मीं कितीदां तरी प्रयत्न केला; परंतु तसा प्रसंगच मिळाला नाहीं!"

"नेताजीराव, तुम्ही कोणती गोष्ट मला सांगणार आहांत?" निर्मलेनें त्याच्याकडे रोखून पाहात विचारलें, "सांगा—काय सांगायचं असेल तें सांगा."

"तुला राग तर नाहीं ना येणार?"

"राग येण्यासारखी गोष्ट असेल तर राग येईल आणि राग येण्यासारखी नसेल तर नाहीं येणार! सांगा."

"मी तुझ्याजवळ एक याचना करणार आहें. करूं का?"

"कसली?"

"प्रेमाची !"

"प्रेमाची याचना !" विचार करीत करीत निर्मला म्हणाली.

"नेताजीराव, तुम्हांला वाईट वाटेल; तुमची निराशा होईल; तुम्हांला कदाचित् रागहि येईल; पण त्या गोष्टीला माझा नाइलाज आहे !"

"नको ! निर्मले, माझी अशी निराशा करूं नकोस. तुझ्या नाकारण्यानं ह्या नेताजीची काय अवस्था होईल, याचा प्रथम विचार कर आणि मग उत्तर दे !—पण थांब ! निर्मले, विचारच करूं नकोस. तुला विचार करायला लावणं म्हणजे तुझ्याजवळ सक्तीनंच प्रेमयाचना करणं होय ! मी अशी याचना करूं इच्छित नाहीं. सक्तीची याचना करून मी तुझ्यावरील माझ्या निर्मल प्रेमाला कलंक लावणार नाहीं. तूं आतां 'माझं तुमच्यावर प्रेम नाहीं' असंच सांगणार ना ?—ठीक आहे ! माझं प्राक्तन मला कळलं ! मी तुला दोष देत नाहीं. निर्मले, तुझ्या ह्या नाकारण्यानं जरी माझं मन हळहळत राहिलं, तरी ह्या अंतःकरणांत तुझ्याविषयीं वसत असलेलं प्रेम किंचिताहि कमी होणार नाहीं ! निर्मले, आतां मी जातों. तुझ्याजवळ एक प्रेमवेडा प्रेमाची याचना करण्याकरितां आला होता, ही गोष्ट साफ विसरून जा आणि ज्या कोणा महाभागावर तूं प्रेम करीत असशील, त्याच्याच प्रेमानं सुखी राहा. जातों मी—" असें म्हणून नेताजी चटकन् वळला आणि तडक चालूं लागला. त्यानें एकदांसुद्धां मागें वळून पाहिलें नाहीं. तो दृष्टिआड होईपर्यंत निर्मला त्याच्याकडे पाहात होती. पुनः ती त्या शिळेवर बसतांच तिच्या मनांतून एक विचार बाहेर येऊं लागला ! "मघा अक्कानं वर्णन केलं तें खरं प्रेम मला आतां पाहायला मिळालं ! खरंच, प्रेम हा किती नाजुक मनोविकार आहे ! माझ्या ठिकाणीं नेताजीरावांचं खरं खरं प्रेम जडलं आहे यांत शंका नाहीं. त्यांनीं किती सरळ व शुद्ध रीतीनं आपलं प्रेम माझ्यापुढं उघड केलं !"

निर्मला एकदम दचकली ! परंतु क्षणभरानें तिच्या चर्येवर हास्य दिसूं लागलें ! नेताजीच्या प्रेमयाचनेमुळें तिला जें आतांपर्यंत कळलें नव्हतें तें आतां कळलें. तिच्या अंतःकरणाला जी जाणीव झाली नव्हती, ती आतां झाली ! तिला पडलें होतें तें गूढ आतां सुटलें

आणि तिला तिच्या प्रेमस्थानाची ओळख पटली! मुलाण्याची सून दृष्टीपुढें आली म्हणूनच सुमित्रेला आपल्या प्रेमस्थानाची ओळख पटली; त्याचप्रमाणें आतां नेताजी प्रेमयाचना करण्याकरितां आला म्हणूनच निर्मलेला आपल्या प्रेमस्थानाची ओळख पटली! आणि ती ओळख पटतांच ती किंचित् दचकली, पण लगेच तिची कळी खुलली! ती म्हणाली, "मी बाजीसाहेबांवरच प्रेम करतें! माझं प्रेम बाजीसाहेबांवरच आहे! अक्का म्हणते तें माझं प्रेमस्थान मला मिळालं! माझा देव मला सांपडला!" इतकें बोलून ती झटकन् उठली; आपला देव कोण हें अक्काला सांगण्याकरितां ती उत्कंठित झाली. ती झपाट्यानें तेथून गढींत जाण्याकरितां निघाली, तोंच समोरून बाजी घोरपडे येतांना तिच्या एकदम दृष्टीस पडला. त्याबरोबर ती जागच्याजागींच थबकली! तिनें गडबडीनें आपला डोक्यावरील पदर सांवरला आणि किंचित् लाजून ती तेथेंच उभी राहिली.

तिनें क्षणभरानें मान किंचित् वर करून तिरक्या दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें. त्यानें हात जोडलेले पाहातांच ती एकदम म्हणाली, "इश्श! हें काय? माझ्यापुढं का आपण हात जोडायचे?"

"आराध्यदेवतेपुढं हात जोडायचे नाहींत मग कुणापुढं हात जोडायचे? निर्मले, मीं हे हात कशाकरितां जोडले आहेत, हें तुझ्या लक्षांत आलं ना?" तो आर्जवी स्वरानें तिला जवळ बसण्यास सांगूं लागला. निर्मला अगदीं स्तब्ध उभी होती. पण तिचें मन मात्र स्तब्ध नव्हतें. नुकतेंच नेताजीच्या वाणींत, दृष्टींत आणि कृतींत तिनें अनुभविलेलें प्रेम ती आतां बाजीच्या वाणींत, दृष्टींत आणि कृतींत दिसतें कीं काय, हें पाहूं लागली. बाजी मोठ्या लहरींत येऊन बोलत होता; परंतु त्याच्या बोलण्याकडे तिचें लक्ष नव्हतें. तिचें सर्व लक्ष त्याच्या निरीक्षणांत गुंतलें होतें. पुष्कळ वेळ तिनें बाजीचें—आपल्या प्रेमस्थानाचें निरीक्षण आणि परीक्षण केलें; परंतु नेताजीनें प्रथम याचना करण्यांत जें पवित्र प्रेम दाखविलें, त्याच्या बोलण्यांत तिला जें शुद्ध प्रेम दिसून आलें, तो पाहात असतां त्याच्या नेत्रांत तिनें जें निर्मल प्रेम पाहिलें आणि परत जातांना त्याच्या कृतींत जें गंभीर प्रेम तिनें

अनुभवलें, त्यांपैकीं कोणतेंच प्रेम तिला बाजीच्या परीक्षणांत दिसून आलें नाहीं.

" निर्मले, तूं बोलत कां नाहींस ? अशी कोणत्या विचारांत तूं मग्न झाली आहेस ? बादशहाच्या सांगण्यावरून मी काल शिवाजीच्या बंदोबस्ताकरितां जाणार होतों; परंतु तुझ्या वडिलांनीं तें काम शिरावर घेतलं आणि मी माझ्या ह्या आराध्यदेवतेकडे आलों. "

" कां ? " फक्त एकच प्रश्न विचारून निर्मलेनें बोलण्यास सुरुवात केली.

" कां ? " माझी ही निर्मला ' राणी ' व्हावी म्हणून ! भोसल्याला कैद करतांच त्याचा ' राजा ' हा किताब मला मिळेल ! दरबारांत माझा हुद्दा वाढेल आणि मी बादशहाचा एक बडा भारी सरदार होऊन राहीन—"

" नाहीं ! तुमची राणी होण्याची माझी इच्छा नाहीं ! " बाजी जसजसा आर्जवयुक्त भाषण करूं लागला, तसतसा तो निर्मलेच्या मनांतून उतरूं लागला !

" तुला शंका आली काय ? "

" शंका नाहीं, पण मला खरं वाटतं तेंच मी सांगतें. आमच्या बाबांना शिवाजीचा बंदोबस्त करण्याकरितां तुम्हीं कां पाठविलं ? किती वाईट गोष्ट केलीत ही तुम्हीं ! "

" वाईट गोष्ट केली ?—वाः ! उलट आपल्या भावी सुखांतले हे कांटे काढतों असं म्हण ! भोसल्याला कैद केल्याशिवाय मी राजा कसा होणार आणि तूं तरी राणी कशी होणार ? तुझ्या सुखाकरितांच तर हा माझा सर्व खटाटोप ! "

" केव्हांहि मी आपली राणी होणार नाहीं. "

" म्हणजे ? "

" माझं आपणांवर प्रेम आहे तरी मी आपणाशीं ह्या परिस्थितींत विवाह मात्र करणार नाहीं. मी अशी राहीन ! "

" कारण ? "

"कारण?" भेदक दृष्टीनें बाजकिडे पाहात निर्मला म्हणाली, "कारण सांगूं का? तुम्ही स्वजातीय आणि देशबंधु यांना सोडून वागतां, यवनांची गुलामगिरी करतां, हें याचं कारण! आपणांसारख्या क्षत्रियपद धारण करणारास हें शोभतं का? या वेळीं देशांत काय चाललं आहे हें तुम्हांला दिसूं नये काय?" निर्मलेला एकाएकीं स्फुरण आलें. ती खणखणीत स्वरांत पुढें म्हणाली, "या वेळीं स्वातंत्र्यासाठीं सर्व क्षात्रवर्गीनीं आपल्या तरवारी सज्ज कराव्या, आणि तुम्हीं शूर सरदार असूनहि अशी यवनांची गुलामगिरी करावी, हें तुम्हांला शोभतं का?"

"निर्मले, हे कोणंते राजद्रोही वेडे विचार तूं मनांत आणतेस?"

"माझे विचार वेडे असोत कीं कसेहि असोत! मला ते पूर्णपणें पटले आहेत."

"पण माझ्यावर प्रेम आहे म्हणतेस ना?"

"प्रेम असलं तरी तुमची अर्धांगी होऊन तुमची अर्धी गुलामगिरी स्वीकारण्यास मी केव्हांहि तयार होणार नाहीं."

"तुझ्या वडिलांनीं मला संमति दिली आहे. आतां मला तुझ्या स्वतंत्र बाण्याची मुळींच पर्वा नाहीं. मी तुझ्याशीं विवाह करणारच!"

"तें केव्हांहि शक्य नाहीं!"

"शक्य नाहीं?—ह्या बाजीला शक्य नाहीं असं काय आहे? मी तुला अस्सं भाग—"

"हं—बाजी! मागं सरा! मी तुम्हांला माझ्या अंगाला स्पर्श करूं देणार नाहीं!"

"अस्सं काय? मग मीच पाहतों!"

"बाजी!" मोठ्यानें ओरडून निर्मला मागें सरली. बाजी तिच्याशीं लगट करण्याकरितां पुढें सरसावला, तोंच बाजूच्या झाडींतून हुकमी शब्द ऐकूं आला—

"खबरदार!"

* * *

## १७. असहाय्य अबलांची हांक

तो सुमित्रेचा शब्द होता ! तिनें इतका वेळ झाडींतून सर्व प्रकार अवलोकन केला होता. ती गढींत जाण्याकरितां तलावावरून निघाली, त्याच वेळीं बाजूच्या झाडींतून नेताजी येत असलेला तिला दिसला. तो आपणांला कांहींतरी विचारीत होता; परंतु आपण अस्वस्थ चित्तामुळें त्याच्याकडे लक्ष दिलें नाहीं, इतकें तिला स्मरण होतें. तो पुढें काय करतो, कुठें जातो, हें पाहण्याकरितां ती तशीच त्या झाडींत दृष्टीस न पडतां एका शिलेवर उभी राहिली. निर्मला शिलेवर बसली होती; तिच्याजवळ नेताजी जाऊं लागतांच सुमित्रेला थोडें चमत्कारिक वाटलें. ती एकटी आहे, तेव्हां आपण पुढें व्हावें, असें प्रथम तिला वाटूं लागलें; परंतु तिच्या मनानेंच तिला थांबविलें. ती उभी राहिली होती, तेथून तिला त्या दोघांचा संवाद चांगला ऐकूं आला. नेताजीचें शुद्ध पवित्र प्रेम पाहून तिचें अंतःकरण उचंबळून आलें. शेवटीं निराशा झाली असतांहि जातांना " तूं ज्या महाभागावर प्रेम करीत आहेस त्याच्या प्रेमांतच सुखी राहा, " असें म्हणून तो निघून गेला. त्या वेळीं मात्र तिला अगदीं गहिंवरून आलें ! अशा दिव्य प्रेमाचा अव्हेर केल्याबद्दल तिनें निर्मलेला किती तरी दोष दिला; तिला तिचा रागहि आला. ती पुढें होऊन बोलणार, इतक्यांत बाजी घोरपडे समोरून येत असलेला तिच्या दृष्टीस पडला ! बाजीचा तो अतिप्रसंग पाहून तिच्या सर्वांगाचा भडका झाला ! चवताळलेल्या नागिणीप्रमाणें ती झाडींतून बाहेर पडली आणि म्हणाली, " खबरदार ! बाजी, तुम्ही इतके नामर्द असाल अशी माझी कल्पनाहि नव्हती ! एका कुमारिकेच्या अंगाला स्पर्श करायला तुम्हांला कांहींच शरम वाटूं नये काय ? बाजी, जा—इथून मुकाट्यानं जा ! " अधिकारयुक्त स्वरांत सुमित्रा म्हणाली, " आतां जास्त शोभा करून घेऊं नका ! तुमचा स्पर्श होण्यापेक्षां चितेचाच स्पर्श माझ्या निर्मलेला अधिक सुखावह होईल, हें लक्षांत असूं द्या ! जा ! "

" बरं बरं, पाहून घेईन ! तुझा दिमाख मीच उतरीन हें तुझ्या लक्षांत असूं दे ! "

सुमित्रेनें उत्तर दिलें नाहीं; फक्त तिरस्कारानें त्याच्याकडे पाहिलें. बाजी मुकाट्यानें परत फिरला. आतां आपण जास्त बोललों तर सुमित्रेनें म्हटल्याप्रमाणें ती आपलीच शोभा करील, हें तो जाणून होता. मागें वळून न पाहतां तो तसाच हातपाय आपटीत निघाला. तलावाच्या पलीकडच्या बाजूला त्यानें आपला घोडा बांधलेला होता. तो दृष्टिआड झाला असें पाहून सुमित्रा बाजूला वळली. निर्मलेच्या मुखाकडे तिची दृष्टि जातांच ती आश्चर्यानें म्हणाली, "हें ग काय?—निर्मले, अग, वेडी का तूं? अशी रडूं कां लागलीस?" तिच्या खांद्यावर हात ठेवून आपल्या पदरानें तिचे डोळे पुशीत ती पुढें म्हणाली, "तुला रडायला झालं तरी काय?"

"अक्का, मला आतां भीति वाटूं लागली!" जास्त जास्त हुंदके देत निर्मला म्हणाली, "बाजींची मला आतां भीति वाटूं लागली!"

"आतां कसली भीति?—बाजीची भीति वाटण्याचा जो प्रसंग होता, तो तूं मोठ्या धैर्यानें पार पाडलास आणि आतां त्याला भिऊं लागलीस?"

"अक्का, त्या वेळीं मला इतकं कोठून अवसान आलं? मी बाजींना किती कठोर शब्दांत बोललें! आतां मला वाईट वाटतं!"

"कांहीं मनाला वाईट वाटून घेऊं नकोस. त्या वेळीं त्या प्रसंगानं आणलेलं तुझ्या अंगांतील अवसान तो प्रसंग दूर होतांच गलित झालं आणि म्हणूनच तुझ्या डोळ्यांत पाणी आलं! आतां भीति बाळगण्याचं कांहींच कारण नाहीं. पण निर्मले, पाहिलंस ना, बाजी आणि नेताजी यांच्यांत किती जमीन-अस्मानाचं अंतर आहे तें! दोघेहि वीर आहेत. बाजीबद्दल पुष्कळ गोष्टी आपणांस बाबांनीं सांगितल्या आहेत. नेताजीनं केलेल्या बऱ्याच शौर्याच्या गोष्टी आपण स्वतः पाहिल्या आहेत. तेव्हां हे दोघेहि वीर कदाचित् शौर्यानं सारखेच असतील; पण नेताजी हा शिवाजीचा कट्टा अनुयायी आहे. शिवाजीजवळ त्यानं शपथ घेतली आहे. त्याच्या हातून होणारीं कार्यें धाडसाचीं तर असतीलच; पण तीं सर्व धाडसाचीं कार्यें सत्कार्येंच असतील. बाजी कितीहि शौर्यवान् असला तरी त्याच्या शौर्याला किंमत नाहीं! ज्याच्या शौर्याचा उपयोग

स्वतःच्या देशाकरितां होतो, तोच वीर; आणि त्याच्याच शौर्याला किंमत! बाजी किंवा आपले बाबा यवनांची तावेदारी करून त्यांना आपलं शौर्य विकीत आहेत. अशा शौर्याची किंमत कवडीमोल आहे; पण शिवाजी आणि त्याची शपथ घेतलेला त्याचा प्रत्येक अनुयायी आपल्या दीनदुबळ्या बांधवांकरितां जें कार्य करीत आहे, त्याचीच किंमत सर्वांत अधिक श्रेष्ठ ठरेल, असं नाहीं का तुला वाटत, निर्मले?"

"खरंच अक्का! ज्याला धर्म-न्याय-नीतीची भीति असून स्वदेशाभिमान आहे, त्याच्याच शौर्याची किंमत अधिक श्रेष्ठ होय! पण अक्का, मला आतां ह्या गढींत भीति वाटूं लागणार. बाजी इथून चिडून गेले आहेत. बाबा घरांत नाहींत, तेव्हां आपलं इथं कसं होईल? पण ते कोण? ते स्वार इकडे कुणीकडे येताहेत?—बाबा आले वाटतं! पण नाहीं; यवन स्वार दिसतात. चल, अक्का, गढींत चल—"

"किती भित्री आहेस तूं निर्मले!—थांब, येऊं दे त्यांना! ते काय आपणांला खाणार आहेत कीं गिळणार आहेत?"

ते यवन स्वारच होते. गढीच्या मागें तलावाच्या बाजूनें ते स्वार तडक आंत घुसले. त्यांनीं दिलेल्या घोड्यांच्या गतीकडे पाहून सुमित्रा मनांत दचकली! थोड्या वेळापूर्वीं बोलतांना स्वतःचें रक्षण कसें करावें म्हणून तिनें निर्मलेजवळ मोठ्या गर्वोक्तीनें उद्‌गार काढले व स्वरक्षणाविषयीं आपण किती बेफिकीर आहोंत हें सांगितलें. त्या गोष्टी संभाषणांत ठीक होत्या; पण आतां त्या तडफेनें आलेल्या यवन स्वारांना पाहतांच तिच्या काळजांत धस्स झालें. निर्मला तर कावरीबावरी होऊन पाहूं लागली; तथापि सुमित्रेचें प्रसंगावधान मोठें वाखाणण्यासारखें होतें यांत शंका नाहीं. क्षणभरानें त्या चार यवन स्वारांपैकीं तीन स्वार थोडे मागें राहिले आणि एक त्या दोघी बहिणींच्या जवळ येऊन उभा राहिला. निर्मला अगदीं आपल्या वहिणीला चिकटून उभी होती. स्वार जवळ येतांच त्यानें त्या दोघींच्या चेहेऱ्याकडे क्षणभर निरखून पाहिलें. जवळपास कोणी नाहीं, अशी मनाची खात्री करून घेऊन तो सरळ पण आर्जवी शब्दांत म्हणाला, "ही जगपाळराव विचारे यांचीच गढी ना?"

सुमित्रेनें फक्त होकारार्थी मान हालविली, तेव्हां तो पुढें म्हणाला, " मानकरीसाहेब मला आतां भेटतील काय ? ते गढींत आहेत काय ? मी त्यांना मुद्दाम फार महत्त्वाच्या कामाकरितां भेटण्यासाठीं आलों आहें."

" आमचे बाबा घरीं नाहींत आणि ते केव्हां येतील हेंहि माहीत नाहीं. "

त्याचबरोबर आनंदानें " अल्लाची पूर्ण मेहरबानी आहे ! शकुन तर चांगला झाला ! " असें म्हणून तो स्वार मागें वळून आपल्या साथी-दारांना खुणावीत म्हणाला, " या कादर,—गफूर या—"

धन्याच्या शब्दांची वाट पाहात मागें तिष्ठत असलेले स्वार आपापल्या घोड्यांना टांचा मारून पुढें सरसावले आणि त्या दोघी बहिणींना त्यांनीं गराडा दिला. पहिल्या स्वारानें झटकन् घोड्यावरून अर्धी कमान टाकून सुमित्रेच्या कंबरेभोंवतीं विळखा घातला आणि एखाद्या लहान मुलाच्या खेळण्याप्रमाणें तिला सहज उचलून आपल्या घोड्यावर घेतलें. त्याचेंच अनुकरण दुसऱ्या स्वारानें करून निर्मलेलाहि उचलून घेतलें. डोळ्याचें पातें लवतें न लवतें, इतक्या अल्पावधींत हा प्रकार झाला. दोघींनीं एकच किंकाळी फोडिली. ती किंकाळी त्या तलावाच्या आसमंतांतील प्रदेश दणाणून ध्वनिप्रतिध्वनि करीत आकाशपटल फोडून बाहेर गेली !

पण ती किंकाळी फुकट गेली काय ? शिवाजीच्या अभेद्य प्रतिज्ञेवर विश्वासून त्याला साह्यार्थ बोलाविण्याकरितां दूतिरूपानें फोडलेली ती किंकाळी शून्य आकाशांत शून्याकारच झाली काय ?...पण थांबा, असा गैरसमज करून घेऊं नका ! ऐका— असे भयभीत होऊं नका. तो पाहा, एकाएकीं सिंहनाद झाला ! पृथ्वी फोडून स्फोटतुल्य शब्द बाहेर आला ! दशदिशा भेदरून टाकणारा ध्वनि झाला ! पापी अंतःकरणाच्या चिंधड्या उडविणारा तो शब्द होता—

" काफर !—सैतान ! "

असा हुकमी स्पष्ट शब्द उत्पन्न झाला आणि त्या भयानक ध्वनीला भेदरून स्वारांचे चारी घोडे मंत्रप्रयोग केल्याप्रमाणें जागच्या जागींच एकदम उभे राहिले. आपल्या जनावरांतील चैतन्य हिरावून घेणारा

आवाज कोणत्या दिशेनें आला तें पाहण्याकरितां पुढला स्वार भयभीत दृष्टीनें पाहूं लागला, तोंच बाजूच्या झाडींतून लांब, पल्लेदार, नग्न, तळपणारी तरवार हातांत धरून एक भव्य फकीर बाहेर पडतांना त्यांच्या दृष्टीस पडला. त्याच्यामागें दुसरा फकीर आणि त्याच्याहीमागें ओळीनें दहावीस फकिरांची सशस्त्र रांग आपल्या म्होरक्याच्या शब्दाप्रमाणें वागण्यास उत्सुक असलेली त्यानें पाहिली.

"सैतान! अशा अनाथ अबलांवर बळजबरी करणारांचा एका ठोकरीनें प्राण घेण्याचा मला अल्लाचा फरमान आहे!" तो फकीर त्वेषानें कर्कश स्वरांत म्हणाला.

चटकन् सुमित्रेनें डोळे उघडले. त्या फकिरानें 'सैतान' म्हणून ओरडतांच त्या कर्णकठोर ध्वनींत ओळखीचा आवाज तिच्या कानीं पडला. डोळे उघडून त्या फकिराकडे दृष्टि जातांच तो नेताजीबरोबर आपल्या गढींत एकदां आलेला बैरागी असें तिनें तत्काळ ओळखलें. आपल्या हांकेला शिवाजीचा अनुयायी धावून आलेला पाहून तिला धीर आला. तिनें झटकन् स्वाराच्या बाहूंतून स्वतःला सोडवून खालीं उडी टाकली. लगेच निर्मलाहि तिच्याजवळ येऊन उभी राहिली. त्यांच्याकडे एकवेळ पूर्ण दृष्टीनें पाहून तो फकीर पुढें झाला. तोंच त्या पहिल्या स्वाराचा स्पष्ट चेहरा त्याच्या दृष्टीस पडला. त्याबरोबर आश्चर्यानें तो म्हणाला, "कोण, वजीर? वाहवा! नीचा—" त्वेषाच्या भरांत फकिरानें त्याच्या छातीवर आपली तरवार सहज रोखली. त्या तीक्ष्ण शस्त्राचा नुसता स्पर्श होतांच भीतीनें भेदरून गेलेले वजीरसाहेब घोड्यावरून कालीं कोसळले! आतां आपण मरणार हें भविष्य त्याला समजून चुकलें!

"वजीरसाहेब, बादशहानं प्रजेच्या संरक्षणाची काळजी तुमच्यावर सोंपविली आहे ना? वाः! फार चांगली काळजी घेतां! ह्या तुम्हांला आतां मुली शोभतील! बादशहा बिचारा देवमाणूस! पण तुम्ही राज्यशकट चालविणारे, स्वतःला मुत्सद्दी म्हणवून घेणारे नीच अधिकारी, हा स्वतःच्या प्रजेवर असा अत्याचार करतां? तुमच्यासारख्या नीचांना कोणतीहि शिक्षा केली तरी ती अपुरीच आहे! आज तूं ह्या दोघींचा

अपराध केला आहेस. ह्या करतील ती शिक्षा तुला भोगिली पाहिजे. बोला—सुमित्रा, निर्मला, तुम्हांला चाहेल ती शिक्षा ह्याला फर्मावा, मी तात्काळ ती अमलांत आणतों."

"ह्या मेल्या चांडाळाची दाढी कापा आणि थुंका मेल्याच्या तोंडावर !" त्वेषानें सुमित्रा म्हणाली.

"ठीक आहे. सुमित्रे, तुम्ही आतां आंत जा. तूं दिलेली शिक्षा मी अमलांत आणतों. अद्यापि मला ह्या हरामखोराची बरीच झडती घ्यावयाची आहे, ती घेऊन मग तुम्हांला भेटून आम्ही आमच्या उद्योगाला जाऊं."

"आमच्यासमक्ष मेल्याला होऊं द्या शिक्षा ! डोळे भरून एकदां पाहूं द्या, मग आम्ही आंत जातों—" सुमित्रेच्या तोंडून शब्द बाहेर पडतात न पडतात तोंच फकिराच्या बाहींत लपलेला तीक्ष्ण धारेचा जंबिया बाहेर पडला आणि त्यानें एका झटक्यांत वजिराच्या दाढीला फारकत दिली !

म. ग्रं. सं. ठाणे,
क्र. ५८०७५
दि. ... ०१-९८

## १८. शीलपरीक्षा !

"बोल—शिवाजीविरुद्ध बादशहाचे कान भरवून तूं काय काय कारस्थानं रचलीं आहेस तीं सर्व कबूल कर !—माझ्याकडे पाहून तुला माझी काय ओळख पटणार आहे ? मी फकीर नाहीं, तसाच बैरागी नाहीं. तुमच्या नीच कारस्थानांतून आणि जुलमांतून ह्या अशा असाहाय्य स्त्रियांना आणि दीन-दुबळ्यांना सोडविण्याची शपथ घेतलेला शिवाजीचा एक अनुयायी आहें, समजलास ?— बोल, खरं सांग, तरच जिवानिशीं सुटशील !"

"मी आतां प्रसंगांत सांपडलों आहें, म्हणून तुम्ही वाटेल तो दोष मला द्या; पण मी खरं सांगतों, शिवाजीनं बादशाही मुलखांत फार बंडाळी चालविली आहे. बादशहानं शहाजीराजांना दिलेल्या जहागिरी-लगतचे किल्ले यानं स्वाधीन करून घेतले. घाटावरचे मावळे

आपणांकडे घेऊन बादशाही वसूलहि बंद पाडला. ह्या सर्व गोष्टी शिवाजी, शहाजीराजांच्या संमतीनंच करतो. "

" वजीर, हें तूं कशावरून म्हणतोस ? शिवाजी ज्या गोष्टी करतो त्यांस राजांची संमति नाहीं. ह्या सर्व गोष्टींना शिवाजीच एकटा जबाबदार आहे, हें तूं लक्षांत ठेव. राजांना तुम्ही धाकदपटशा दाखवितां, पण लक्षांत ठेवा, त्यांच्या वाटेला जाल तर तें तुम्हांला जड जाईल. अगोदर सावध करून ठेवतों. बरं, आणखी शिवाजीविरुद्ध तुमच्या काय काय तक्रारी आहेत ? "

" परवां त्यानं कल्याणचा सुभा लुटला—"

" काय ? कल्याणचा सुभा लुटला ? " फकिरानें आश्चर्यचकित होऊन विचारलें.

" गोष्ट खरी आहे महाराज. " मध्येंच सुमित्रा म्हणाली.

" गोष्ट खरी आहे ?—पण थांब, प्रथम ह्याला विचारूं दे. सांग वजीर, पुढं शिवाजीनं काय काय केलं ? "

" त्यानं पुष्कळच केलं आहे; पण त्याचा बंदोबस्त करण्याकरितां जगपाळरावांना काल पाठविलं आहे. शिवाय बादशहाच्या हुकमावरून शहाजीराजांकडे बाजी घोरपडे गेले आहेत. "

" अस्सं काय ? हे आमचे जातभाई दरबारचे कुत्ते !—सुमित्रे, मी तुझ्या वडिलांबद्दल असं बोलतों त्याचा तुला राग येईल, पण काय करूं ? हे आमचे लोक आमच्या गळ्याला कसा फांस लावतात पाहा ! याचं कारण निव्वळ गुलामगिरी ! जा—शिवाजीचा बंदोबस्त करण्याची ताकद तुमच्या अंगांत नाहीं. जा, मुकाट्यानं अल्लाला स्मरून प्रजेच्या हिताचं आणि सुखाचं काम करा, जा—"

मुकाट्यानें घोड्यावर बसून वजीर चालता झाला. एकदां त्यानें आपल्या दाढीवरून नेहमींच्या संवयीप्रमाणें हात फिरविला. अरेरे ! हें काय झालें ? वजीरसाहेबांचें भूषण आज नष्ट झालें ! इतके दिवस त्या लांब दाढीच्या आंत लपलेलें कुटिल अंतःकरण आज उघडें पडलें !

नंतर तो फकीर सुमित्रेला म्हणाला, " कल्याणचा सुभा शिवाजीनं लुटला हें तुला कसं कळलं ? "

"काल रात्रीं ती सर्व मंडळी आमच्या गडींत आली होती; पण बाबांच्या मागं—पण—" सुमित्रा बोलतां बोलतां अडखळली. हें पाहून फकीर म्हणाला, "सुमित्रे, मी आतां ह्यापुढं तुमच्या वडिलांबद्दल कांहीं बोलणार नाहीं. मला त्यांचा राग नाहीं. तुला जितके ते पूज्य आहेत, तितकेच तुझे वडील म्हणून मलाहि पूज्य आहेत; पण मला जो त्यांच्याबद्दल बोलण्याचा प्रसंग येतो, तो त्यांच्या गुलामगिरीबद्दलच! शिवाजीच्या मंडळींना गडींत येऊं देऊं नको, असं त्यांनीं सांगितलं आहे, म्हणून तूं आमच्या लोकांना गडींत थारा दिला नाहींस, असंच ना?"

"त्या मंडळींत नेताजीरावहि होते."

"काय, नेताजी होता? मग त्यानंच तो सुभा लुटला काय?"

"नाहीं; आबाजी सोनदेवानं लुटला."

"हा आबाजी सोनदेव कोण?" फकीर विचार करीत करीत म्हणाला.

"तुमच्या शिवाजीच्या मंडळींपैकींच आहे. ते आज सकाळींच इथून पुण्यास सोनोपंतांकडे गेले. त्यांनीं आपणाबरोबर कल्याणच्या सुभ्याची सूनहि घेतली आहे."

"सून घेतली आहे? ती कां?"

"शिवाजीमहाराजांना देण्याकरितां."

"म्हणजे?—ती गुलाम आहे कीं काय?"

"ती कैद केलेली आहे. स्वरूपानं अत्यंत सुंदर आहे, म्हणून शिवाजीमहाराजांना ती नजर करायची, असा आबाजीचा बेत आहे."

"किती वेडा मनुष्य आहे हा! शिवाजीला अशी वस्तु नजर करण्याचा विचार तरी कसा त्याच्या मनांत आला? आश्चर्य आहे!"

"कां बरं? ती सुंदर आहे ना? पण महाराज, शिवाजीमहाराज तिचा स्वीकार करतील का हो?" तिच्या विचारण्यांतील खोंच आणि तिची उत्सुकता पाहून ती कोणत्या अर्थानें प्रश्न विचारीत आहे, हा तिच्या मनांतील भाव फकिरानें तत्काळ ओळखला. तो फकीर कोण होता हें वाचकांनीं जाणलेंच असेल! तो आमचा कथानायकच

होता. सुमित्रेचा प्रश्न ऐकून शिवाजी म्हणाला, "काय सांगावं !—पण तुला कसं वाटतं ?"

"मी तरी काय सांगूं !—सुंदर वस्तूचा कुणाला मोह पडणार नाहीं ?"

"एकूण शिवाजी त्या स्त्रीचा स्वीकार करील असंच तुला वाटतं ना ?"

"मला काय वाटतं तें काय सांगूं ! पण महाराज, ती परस्त्री ना ? आतांपर्यंत तुम्ही, नेताजीरावांनीं, तसंच प्रथम इथं आले होते, त्या दादजी प्रभूंनीं शिवाजीमहाराजांचं जें गुणवर्णन केलं, त्यावरून माझ्या मनांत त्या थोर पुरुषाविषयीं जी कल्पना दृढ झाली आहे, तें माझं मन मला सांगतं कीं, शिवाजीमहाराज शीलवंत आहेत, ते कधींहि त्या स्त्रीचा स्वीकार करणार नाहींत !"

"अशीच खात्री ठेव. शिवाजी आपलं शील कधींहि भ्रष्ट होऊं देणार नाहीं, हें मी प्रतिज्ञेवर सांगतों. आपल्या देशाचा इतिहास सच्छीलतेवर उभारला आहे, म्हणूनच त्याचा एवढा गौरव होतो, हें शिवाजीला माहीत आहे. आपल्या देशांतील सर्व इतिहासप्रसिद्ध व्यक्ति सच्छील म्हणून जगाला आदर्शभूत झाल्या आहेत ना ? शीलावांचून जीविताला किंमत नाहीं, असा भारतीय इतिहासाचा सिद्धान्त आहे हें खरं ना ? पांडवांनीं शीलाच्या जोरावर विपत्तींतून पुनः पूर्ववैभव प्राप्त करून घेतलं आणि शीलाच्या अभावीं कौरवांचा सत्यानाश झाला. त्याचप्रमाणं शीलवत्ता खंबीर म्हणूनच प्रभु रामचंद्रानं रावणासारखं प्रचंड पण शीलभ्रष्ट धूड धुळीस मिळविलं. एकूण काय, शील प्रधान आहे, परस्त्रीचा अभिलाष ही अधोगति आहे." बोलण्याच्या आवेशांत शिवाजीचें लक्ष सुमित्रेच्या मुखाकडे होतें. त्याचें भाषण ऐकतां ऐकतां ती प्रसन्नचित्त होऊन तिला सहज समाधि लागली. शिवाजी तिच्याकडे पाहातच राहिला. त्याला सुमित्रेचें मोठें कौतुक वाटलें. थोड्या वेळानें शिवाजी म्हणाला, "सुमित्रे, आतां आम्ही जातों. तुझे वडील केव्हां येतील हें निश्चित नाहीं; करितां माझ्यावरोबर असलेल्या लोकांपैकीं कांहींजण मी इथं ठेवून जातों; कारण तुमच्या सुरक्षितपणाविषयीं मला आतां भीति वाटूं लागली आहे."

"पण महाराज, तुम्ही बजाजी निंबाळकराकरितां मुद्दाम शहरांत गेलां होतां ना ?"

"होय, मी तेथूनच आलों. काल रात्रींच त्याची भेट झाली. त्याच्या शीलाची परीक्षा करण्याकरितां मीं त्यांच्या अंतःकरणाला टोंचलं आहे. शील थोर असेल तर होईल जागृति !"

* * *

## १९. दरोडा कीं हल्ला ?

ती वेळ भर दोन प्रहरची होती. ऊन अगदीं रखरखीत पडलें होतें. डोण नदीच्या तीरावर एका झाडाच्या सावलींत नेताजी स्वस्थिती-विषयीं विचार करीत बसला होता. इतक्यांत दोन यवन स्वार जनावरांना पाणी पाजण्याकरितां नदीतीरावर आले. त्या दोघांत कांहीं बोलाचाली सुरू होती; कारण ते दोघेहि एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत होते. भांडणाचा रंग जवळ जवळ येत चालला होता. नेताजीच्या डोक्यांत त्या वेळीं जर इतर विचार भ्रमण करीत नसते तर त्यानें आपल्या नेहमींच्या द्वड स्वभावाला अनुसरून त्या यवन स्वारांची कांहीं तरी खोडच काढली असती; पण मनाची स्थिति तशी नव्हती. हळूहळू त्या यवन स्वारांचें भांडण वाढत चाललें. तेव्हां त्यांची मौज पाहण्याकरितां नेताजी उठून त्यांच्याजवळ गेला. दोघांच्या भांडणांत कोणी तिसरा मनुष्य गेला म्हणजे स्वाभाविकच तो न्यायाधीश बनतो. भांडखोर त्याला आपापल्या कागाळ्या सांगूं लागतात तसाच प्रकार आतांहि झाला. त्या स्वारांपैकीं एक यवन म्हणाला, "भाई, देखो, आम्ही दोघेहि एकाच मालिककडे नोकर असून एका घरांत राहून ह्यानं माझ्या बिबीला फसवून पळविलं, हें ह्याला लाजीम आहे काय ? मी ह्याला सरळ विचारतों आणि हा मला तेढीं उत्तरं देतों."

"रहिमान्या, तुला काय सरळ उत्तरं द्यायचीं ?" दुसरा स्वार खेंकसून म्हणाला, "एक बायको सांभाळतां आली नाहीं आणि मला विचारतोस !"

" अबदुल्लया, तोंड सांभाळून बोल ! "

दोघांचें भाषण पेटलें. शिवीगाळ करतां करतां परस्पर त्वेषाला चढून दोघेहि हातघाईवर आले. दोघांनींहि तरवारी उपसल्या. नेताजी बाजूला उभा राहून त्यांची मौज पाहात होता. आपण ह्या भांडणांत पडायचें नाहीं, असा त्यानें विचार केला होता आणि त्याचप्रमाणें तो स्वस्थ उभा होता. ते यवन स्वार एकमेकांना वर्मी मारण्याकरितां एकमेकांवर तुटूं लागले. दोघांनाहि कमी अधिक जखमा होऊन रक्ताच्या चिळकांड्या उडूं लागल्या. शेवटीं अबदुल्ला म्हणून संबोधिलेला तो दुसरा स्वार गतप्राण होऊन पडला. पहिल्या यवनाचीहि जवळजवळ मरणोन्मुखच स्थिति झाली. रहिमान कण्हत पडलेला पाहून नेताजीला त्याची दया आली. तो आतां पुढें झाला. एका घोड्यावरील गाशा काढून त्यानें त्या घायाळ झालेल्या यवनाला त्या गाशावर नीट बसविलें. नंतर नदीचें पाणी आणून त्याच्या जखमा नीट धुऊन बांधल्या. थोडें पाणी त्याच्या तोंडांत घातलें. थोड्याच वेळानें तो स्वार थोडा हुशार झाल्यावर म्हणाला, " भाई, तुम्ही हिंदु लोकं हाडाचे फार गरीव आणि दयाळू ! अल्लानं पाहा माझे जातभाई कसे वदमाष उत्पन्न केले आहेत ते ! ह्याला दफन करायला खड्डा खणण्याइतकी आतां माझ्या अंगांत ताकद नाहीं. मला जर तूं मदत करशील तर अल्ला तुझं भलं करील ! "

" पण तूं आतां जाणार कुठं ? " पुनः नेताजीनें पहिला प्रश्न केला. " तुम्ही दोघेहि एकाच कामावर निघालां होतां काय ? "

" होय. सरदार बाजीसाहेब घोरपडे यांचे जगपाळराव म्हणून मानकरी आहेत. ते हल्लीं मोहिमेवर आहेत. त्यांना सरदारसाहेबांनीं एक लखोटा दिला होता. त्याचं त्यांनीं उत्तर लिहून दिलं आहे, तें घेऊन आम्ही त्यांच्या गढींत जात होतों; पण आतां इतक्या लांब मला जावेल असें नाहीं वाटत ! "

' गढी ! ' त्या एका शब्दाबरोबर मागच्या सर्व गोष्टी नेताजीच्या डोळ्यांपुढें एकदम आरशासारख्या येऊन उभ्या राहिल्या ! त्याच्या हृदयसागरावर अपूर्व लहरी उसळूं लागल्या. आपण पुनः एकदां गढींत

जावें, आणि दुरूनच निर्मलेला एकदां पाहावें, असें त्याला वाटूं लागलें; पण इतःपर आपण तुझ्या दृष्टीस पडणार नाहीं,असें तो निर्मलेजवळ म्हणाला होता. होय, मुद्दाम जावयाचें नाहीं; पण कारणपरत्वें जाण्यास काय हरकत आहे ? थोडक्यांत सांगायचें म्हणजे गढींत जाण्यास त्याचें मन उत्सुक झालें म्हणून तो तेथें जाण्याबद्दल कारणें शोधूं लागला. तो म्हणाला, " रहिमानभाई, तुझ्या जखमा तुला इतक्या लांबचा प्रवास करूं देणार नाहींत, हें खरं आहे. तुझं कांहीं काम माझ्या हातून होण्यासारखं असलं तर मला सांग. मी मोठ्या आनंदानं करीन. जगपाळरावांची गढी मला माहीत आहे; आणि त्यांच्या दोन्ही मुलींचा मला चांगलाच परिचय आहे ! "

" काय ? तूं त्यांना ओळखतोस ?—या शुक्र अल्लाह ! मग भाई, माझं एवढं काम कर; हा एवढा लखोटा मानकऱ्यांच्या थोरल्या मुलीस दे. तूं तिला ओळखतोस ना ? नाहींतर चुकून धाकट्या मुलीच्या हातांत देशील. " कंबरपट्ट्यांतून लखोटा काढून तो नेताजीच्या हातांत देत देत रहिमान म्हणाला.

" पण हा लखोटा दिला कुणीं ? भलत्या कुणाकडून जर हा लखोटा आला असेल किंवा यांत कांहीं पापमूलक मजकूर असेल, अगर हें कांहीं कारस्थान असेल तर मात्र मी हा लखोटा साफ नेणार नाहीं. "

" तुम्ही हिंदु लोक ह्या अशा क्षुल्लक गोष्टींतहि नेकी-बदनेकीचा विचार करतां, शाब्बास आहे तुमची ! पण यांत भिण्यासारखं कांहीं नाहीं. हा लखोटा खुद्द मानकऱ्यांनीं लिहिला आहे; बापानं मुलीला लिहिलेला हा लखोटा आहे. हा लखोटा फक्त सुमित्रेच्या हातांत पडला पाहिजे, असं मानकऱ्यांनीं मला बजावून बजावून सांगितलं आहे. निर्मलेला ह्या लखोट्यांतील कांहीं कळूं देऊं नकोस म्हणजे झालं ! "

वास्तविक पाहतां हें एक अत्यंत हलकें काम त्याच्याकडे आलें. एका यवन जासुदाकडे सोंपवलेलें काम, त्या जासुदानें नेताजीकडे दिलें; पण त्या कामांतच त्याला उत्साह वाटला. शिवाजीनें त्याच्याकडे सोंपवलेली कामगिरी कितीतरी विश्वासाची आणि महत्त्वाची होती; पण ती कामगिरी तो साफ विसरला ! त्या कामापेक्षां हें लखोटा पोंचता

करण्याचें काम त्याला महत्त्वाचें वाटून तो उठला. अबदुल्लाचें प्रेत पुरण्याकरितां त्यानें त्याच्याच भाल्याच्या साह्यानें नदीतीरावर खड्डा खणला. नंतर त्याचें प्रेत उचलून तें आंत ढकललें. रहिमानहि कण्हत कण्हत उठला आणि त्यानेंहि त्या प्रेतावर शेवटची माती घालून क्षणभर प्रार्थना केली. त्याचा तो दुष्मन् होता तरी, "अल्लाह ! त्याच्या आत्म्याला शांति दे !" म्हणून त्यानें अल्लाची करुणा भाकली. इतका प्रकार झाल्यावर नेताजींनें आपले सर्व कपडे धुतले; स्वतः निर्मळ स्नान केलें. आतां त्याला अबदुल्लाचा घोडा मिळाला होता. जनावर चांगलेंच होतें. मांडीखालीं घोडा मिळतांच त्याचा सर्व साज जमला. अबदुल्लाचीं हत्यारेंहि त्याच्याजवळ होतीं. त्याचा रुबाब आतां पूर्वी-सारखाच दिसूं लागला. कपडे वगैरे धुतलेले असल्यामुळें दुपारीं नदी-तीरावर बसलेला तो हाच असें कोणींहि त्याला ओळखलें नसतें. आपण गढींत काळोख होण्याच्या आंत जाऊन पोहोंचूं अशी त्याला खात्री होती, आणि त्या हिशेबावर त्यानें घोड्याला गति दिली होती. आतां आपणांस पुनः निर्मला भेटणार हा एकच प्रधान आनंद त्याला झाला होता.

× × ×

पण त्या वेळीं गढींत काय प्रकार होता ? वजिराचा अत्याचार झाल्या दिवसापासून त्या दोघी वहिणी अगदीं अस्वस्थ होत्या. जगपाळरावहि नसल्यामुळें नोकरचाकरांवर भिस्त ठेवून त्यांना फार सावधगिरीनें राहावें लागत होतें. गढींत सहा नोकर होते; शिवाय शिवाजीनें जातांना मुद्दाम तीन माणसें तेथें ठेविलीं होतीं. मानकरी घरीं येईपर्यंत राहा आणि ते आल्यावर आपलें नांव न सांगतां वजिरानें केलेला नीचपणा सांगून 'शिवाजीच्या एका अनुयायानें मुलींची सुटका केली आणि गढीच्या रक्षणार्थ आम्हांला ठेवलें' असें त्यानें जगपाळरावांस सांगण्यास सांगितलें होतें. आज आपणांवर कांहीं प्रसंग येणार अगर कांहींतरी अनिष्ट खबर कानीं पडणार किंवा एखादा वाईट प्रकार अनुभवावा लागणार, असेच विचार सुमित्रेच्या मनांत सकाळ-पासून घोळूं लागले. तिनें कितीदां तरी आपल्या देवाचें चिंतन करून मनाला धीर दिला.

बरीच रात्र झाली ! शिवाजीनें ठेवलेलीं तीन माणसें दोघींना धीर देत होतीं; परंतु सुमित्रेच्या मनाची हुरहूर कांहीं कमी होईना. त्या दोघींनीं कसेंबसें आपलें जेवण उरकलें. नोकर जेवायला बसले. थोडा वेळ झाला तोंच गढीच्यासभोंवतीं एकदम गलका झाला. क्षणार्धांत पांचपन्नास मशाली पेटून सर्वत्र उजेड झाला. गढींतील नोकर जेवण टाकून आपापलीं शस्त्रें घेण्यास धावले, परंतु तोंडावर बुरखा घेऊन गढींत शिरलेल्या त्या लोकांनीं त्यांस कैद केलें. पन्नास लोकांपुढें ते चौघेजण काय करणार....?

" शिवाजीनं कल्याणचा लुटलेला खजिना इकडे आणून ठेवलेला आहे तो मुकाट्यानं दाखवा—" त्या बुरखेवाल्यांपैकीं एकजण पुढें होऊन म्हणाला. परंतु त्याला उत्तर कोण देणार ? त्यांनीं सर्व वाडा शोधण्यास सुरुवात केली. सुमित्रा आणि निर्मला खोलींत होत्या. दरवाजा आंतून बंद करून हातांत शस्त्र घेऊन सुमित्रा दरवाजाजवळ उभी होती. निर्मला तिच्यामागेंच होती. दोघींहि भ्यालेल्याच होत्या; पण आतां शेवटपर्यंत माघार घ्यावयाची नाहीं, असा निश्चय करूनच त्या आलेल्या संकटाला तोंड देण्यास सज्ज झाल्या होत्या. गढीवर हल्ला करणाऱ्या मंडळींनीं बुरख्यानें तोंडें लपविलेलीं पाहून ती दरोडेखोर मंडळी आहेत असें सुमित्रेनें ओळखलें. आणि ते दरोडेखोरच होते. त्यांना खजिन्याची बातमी लागली होती, आणि तो खजिना लुटण्याकरितांच ते आतां आले होते. सकाळपासून त्यांनीं चौकशी करून गढींतील सर्व भेद काढला होता. सुमित्रेनें पाठविलेलीं माणसें त्यांनीं तिकडेच कैद करून ठेविलीं होतीं. सर्व वाड्यांत त्यांनीं नासधूस चालविली. मौल्यवान् आणि उपयोगी वस्तूंचा त्यांनीं एकत्र ढीग केला. शोधतां शोधतां ते त्या दोघी बहिणी असलेल्या त्या खोलीकडे आले. दरवाजा बंद आहे, असें पाहून पांचपंचवीस जणांनीं तो एका धक्क्याबरोबर उखळून टाकला.

" थांबा— त्या दोघींना कोणीहि हात लावूं नका ! " दरोडेखोरांचा मुख्य म्हणाला, " या— अशा पुढं या, आणि खजिना कुठं आहे तो सांगा. आम्हीं हेरून ठेवलेली ती लूट आमच्यापूर्वीं त्या भोसल्याच्या

पोरानं लुटली. तिच्यावर आमचा हक्क आहे. दाखवा—कुठं लपवून ठेवला आहे तो खजिना?"

त्या दोघींनीं तोंडांतून एक अक्षरहि काढलें नाहीं. क्षणभरानें तो दरोडेखोर पुढें म्हणाला, "तुम्हीं सांगितलं नाहीं, तरी खजिना आम्ही शोधून काढणार! चला रे, लागा उद्योगाला! ह्या दोघींना कैद करा. हीं आपलीच लूट आहे. खणा, सर्व वाडा खणून काढा. भिंती पाडा, तळघर शोधा, चला, आटपा लवकर!"

नायकाच्या हुकुमाप्रमाणें दुसरे दरोडेखोर कामाला लागणार, तोंच दूर अंतरावर घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं येऊं लागला. त्याबरोबर त्यांनीं पटापट मशाली विझवून टाकल्या आणि हें नवीन संकट काय आलें आहे, तें पाहण्याकरितां सर्वजण सावध झाले.

नवीन आलेल्या स्वारांनीं आपल्या मशाली पेटविल्या. त्या उजेडांत कांहीं स्वार गतप्राण झालेले व कांहीं जखमी होऊन कण्हत-कुंथत असलेले त्यांच्या दृष्टीस पडले. एका बाजूला निर्मला भयभीत झालेली उभी होती. त्या आलेल्या स्वारांपैकीं कांहींजणांना तिनें ओळखलें आणि विचारलें,

"तुम्ही कसे आलां? बाजीसाहेब कुठं आहेत?"

ते स्वार बाजी घोरपड्याचे होते. त्यानें विशिष्ट हेतूनेंच इतके स्वार पाठविले होते. त्या दोघी बहिणी सामोपचारानें आल्या तर ठीकच आहे; नाहींतर त्यांना कैद करून घेऊन या, असा त्या स्वारांना हुकूम मिळाला होता. गढींत जगपाळरावांचे नोकर आहेत. ते कदाचित् आडवे येतील म्हणून बाजीनें स्वारांची संख्या जास्त पाठविली होती. गढीच्या दरवाजांतच त्यांच्यावर हल्ला होतांच गढींत कांहीं तरी गडबड आहे, असें त्यांच्या लक्षांत आलें. त्यांपैकीं एकजण म्हणाला, "हे इथं पडलेले लोक पोषाखावरून दरोडेखोर दिसतात. गढीवर दरोडा पडला काय?"

"होय हो! पण बाजीसाहेब नाहीं का आले?" उत्सुकतेनें निर्मलेनें विचारलें.

"नाहीं. तुम्हांला नेण्याकरितां आम्ही आलों आहोंत."

"पण माझी अक्का कुठं आहे!—अक्का,—अक्का!" निर्मला भीतीनें गांगरून जाऊन धांवाधांव करूं लागली. "अरे, कुणीतरी शोधा! माझी अक्का, ए अक्का! छे, ती इथं नाहीं. जा रे जा—त्या मेल्या चांडाळांनीं माझ्या अक्काला नेलं वाटतं! जा धांवा—धांवा—"

स्वारांनीं पुष्कळ शोध केला, परंतु सुमित्रेचा शोध लागला नाहीं. तेव्हां बाजीकडून आलेल्या स्वारांचा नाईक म्हणाला, "निर्मलाबाई, चला तुम्ही, अर्धे स्वार तुमच्या सुमित्राअक्कांचा शोध करायला पाठवितों; पण तुम्ही आतां इकडे राहूं नका! हे दरोडेखोर थोडा वेळ राहून पुन्हांहि येण्याचा संभव आहे; चला—"

निर्मलेला हा युक्तिवाद पटला आणि ती दुःखित मनानें त्यांच्या-बरोबर जाण्याकरितां निघाली.

मध्यरात्र उलटून गेल्यावर एक स्वार गढीच्या दरवाजाजवळ आला. त्यानें गढीचा दरवाजा अशा मध्यरात्रीं सताड उघडा पाहतांच त्याच्या छातींत धस्स झालें! त्याचा घोडा सारखा दौड करीत आलेला असल्या-मुळें फुर्रफुर्र करीत होता. त्या आवाजांत गढीच्या आंत जखमी होऊन पडलेल्या माणसांचें कण्हणें त्याला ऐकूं आलें नाहीं. त्यानें 'सुमित्रा-अक्का' म्हणून मोठमोठ्यानें हांका मारल्या, परंतु कोणींहि जबाब दिला नाहीं. तेव्हां घोड्यावरून उडी टाकून तो एकदम आंत घुसला; परंतु दरवाजांतच पडलेल्या एका प्रेताला ठेंचाळून तो दुसऱ्या एका प्रेतावर पडला. काळोख असल्यामुळें आंत काय गडबड झालेली आहे, हें दिसायला मार्ग नव्हता. पण आतां त्याला बाजूला कण्हण्याचा आवाज ऐकूं आला. त्यानें घाईघाईनें विचारलें, "कोण विव्हळत आहे?"

"तुम्ही कोण आहांत?" विव्हळण्याच्या स्वरांत उलट प्रश्न झाला.

"मी नेताजी! पण तूं कोण? ही काय गडबड आहे?"

"नेताजीराव! अरेरे! तुम्ही थोडे उशिरां आलांत. येथें दरोडा पडला—"

"पण सुमित्रा, निर्मला सुरक्षित आहेत ना? कुठं आहेत त्या!"

"त्यांना नेलं! अरे देवा!—नेताजीराव, मला थोडं पाणी—"

* * *

# २०. बाजारच्या दिवसाच्या मौजा

तो बाजारचा दिवस ! असा टोलेजंग बाजार त्या खेडयांत ह्यापूर्वीं कधीं भरलेला कोणाच्याच स्मरणांत नाहीं. सर्वत्र धामधूम आणि गडबड सुरू होती. असा हा चैतन्यदायक बाजार भरण्याचें कारण त्या खेडयांत आज शिवाजी होता. आज प्रत्येकजण अगदीं बेफिकीर होता. वास्तविक पाहिलें तर आज सर्व खेडें मोठ्या फिकिरींत असायचें ! कारण दोन दिवसांपूर्वीं त्या खेडयांतून व जवळपासच्या भागांतून खाटकांनीं कांहीं गाई नेल्या होत्या. ' त्या गाई एका बैराग्यानें सोडविल्या आणि खाटकांना मारलें ! ' असें इतर खाटकांना कळतांच ते चिडून गेले होते; आणि त्यांनीं जुटीनें बाजाराला येऊन खेडयांतील सर्व गाई नेण्याचा निश्चय केला आहे, अशी बातमी सकाळींच खेडयांत पसरली होती; परंतु आज खेडयांत शिवाजीराजे आहेत म्हणून कोणालाच त्या येणाऱ्या खाटकांचें भय वाटलें नाहीं. उलट आपण सर्व खाटकांचा खरपूस समाचार घेऊं आणि मागला सूडहि पुरा उगवूं म्हणून उमेदच वाटत होती. दिवस थोडा वर येतो तोंच पन्नासपाऊणशें स्वार खेडयांत आले. त्यांच्याबरोबर माल लादलेले आणखी पंधरावीस घोडे होते: माल लादलेल्या घोडयांच्या मध्यभागीं एक मेणा होता. बाजाराकरितां ही कोण मंडळी आली आहेत, हें पाहण्याकरितां खेडयांतील लोक जमले, आणि चौकशी करूं लागले. तेव्हां त्यापैकीं एक स्वार म्हणाला, " आम्ही शिवाजीमहाराजांची मंडळी आहोंत. महाराज खेडयांत आहेत ना ? "

आपणाकडे मंडळी आली आहे, ही बातमी शिवाजीला बसल्या-जागींच कळली. आलेल्या स्वारांच्याबरोबर मालाचे घोडे आणि एक मेणा आहे, असें कळतांच आमच्या कथानायकानें धोरणानें चटकन् सर्व गोष्टी जाणल्या आणि ती मंडळी आपल्यासमोर येण्याची तो वाट पाहात बसला. थोडया वेळानें दोन स्वार शिवाजीजवळ आले. त्यांचे घोडे धरण्याकरितां पुष्कळजण तेथें होते. दोघांनाहि मंडळीनें आंत आणलें. शिवाजी आंत बसलेला होता. दोघांनींहि लवून अत्यंत नम्रभावानें मुजरे केले. तेव्हां शिवाजी म्हणाला, " या—आबाजी

सोनदेव, आलांत? ठीक झालं! असें आश्चर्यचकित होऊं नका. तुमचं नांव मला कळलं आणि तुम्ही माझे झालां आहांत म्हणून मला आनंद आणि अभिमानहि वाटतो. बसा!"

आबाजी खरोखरीच आश्चर्यानें थक्कच झाला. आपणास महाराजांनीं नांवासुद्धां कसें ओळखलें, हेंच त्याच्या लक्षांत येईना. तो शिवाजीच्या भव्य व शांत मुखाकडे पाहातच राहिला! त्यानें शिवाजीविषयीं ज्या ज्या गोष्टी ऐकल्या होत्या, त्या त्या सर्व गोष्टी त्याला शिवाजीच्या चर्येवर लिहिलेल्याच दिसूं लागल्या! त्याच्या मनांत आदर आणि पूज्यभाव उत्पन्न झाला. शिवाजीनें त्याला 'बसा' म्हणून सांगितलें; परंतु शिवाजीपुढें बसण्याचें त्याला धैर्य होईना.

"तुम्हीं माझ्याकरितां एक मोठं कार्य केलं आहे, हेंहि मला कळलं!" शिवाजी म्हणाला, "पण त्याबद्दल आपण दुपारीं स्वस्थ चित्तानं बोलूं! त्यांतून आज आहे बाजारचा दिवस, तेव्हां आतां सर्वत्र गडबड आहे. तुम्ही आतां जेवण वगैरे आटोपून विश्रांति घ्या. तुम्हांला श्रम झाले आहेत हे मला दिसतात. माझा मुक्काम ह्या ठिकाणीं आहे, हें कसं कळलं तुम्हांला?"

"आम्ही मागल्या खेडयांत होतों, तेथें कळलं."

"पण इतके मागं कसे राहिलांत?"

"मार्ग माहीत नाहीं, त्यांतून जवळ जोखीम असल्यामुळं रहदारीचे मार्ग चुकवावे लागतात."

"पण तुमच्याबरोबर नेताजी होता ना?"

"होता. जगपाळराव विचारे यांच्या गढींतून निघतांना होता; पण तो पुनः परत फिरला."

"मग नेताजी गेला कुठं?" शिवाजी किंचित्काल विचारांत पडला. "बरं जा. आतां थोडी विश्रांति घ्या. मग दुपारीं बसूं!"

"गाई एका बैराग्यानें सोडविल्या" असा खाटकांचा झालेला समज शेवटपर्यंत कायम राहावा, म्हणून शिवाजीनें पुनः वेषांतर केलें. आजच्या बाजारांत त्यानें पुष्कळच गोष्टी केल्या. पुष्कळ धान्य खरेदी करून तें गरीबगुरिबांना वाटलें. त्याचप्रमाणें पुरुषांना घोंगड्या व वस्त्रें

देऊन खेड्यांतील प्रत्येक स्त्रीला लुगडें आणि खण दिला. तसेंच कित्येकांच्या शेतजमिनीवर सावकारांचें कर्ज होतें, तें देऊन त्यांच्या जमिनी मोकळ्या करून दिल्या. लुळेपांगळे अशा असाहाय्य भिकाऱ्यांना अन्नवस्त्राची खैरात केली. अशा रीतीनें दोन अडीचशें मोहरांत त्यानें सर्व खेडें आनंदमय करून टाकलें. सर्वांच्या मनांत आदरबुद्धि उत्पन्न झाली; इतकेंच नव्हे तर कांहीं वृद्ध लोक, त्यांनीं ऐकलेल्या गोष्टी म्हणजे 'भोसल्यांच्या कुळांत शककर्ता निर्माण होईल असा श्रीभवानीचा वर आहे,' आणि त्या मातेच्या वराप्रमाणें शंकरानें शहाजीराजांच्या पोटीं शिवाजीराजांच्या रूपानें अवतार घेतला आहे, तेच हे शककर्ते, असें खेड्यांतील लोकांना सांगूं लागले. अर्थात् त्या खेड्यांतील लोकांचा दृष्टिकोन बदलून सर्वांच्या मनांत शिवाजीविषयीं भक्तिभाव उत्पन्न झाला. असो. आमच्या कथानायकाच्या जेवणाच्या व्यवस्थेंत मंडळी गुंतली असतां 'खाटीक आले' अशी हूल उठली. तेव्हां "आपण स्वस्थ भोजन करा; आम्ही त्यांचा समाचार घेतों; ते पुनः ह्या प्रदेशांत येणार नाहींत असा बंदोबस्त करतों" असें म्हणून खेड्यांतील तरुण आपापलीं आयुधें घेऊन पटापट बाहेर पडले. शिवाजीनें आपल्या लोकांनाहि त्यांच्यामागें पाठविलें. पंधरा-वीस खाटीक भरलेल्या बाजारांत तुफान करीत होते. त्यांनीं बाहेरून आणलेल्या वीस पंचवीस गाई एका दाव्याला बांधलेल्या होत्या. "ह्या खेड्यांतून आम्हांला दहा गाई मिळाल्याच पाहिजेत" असा त्यांचा हट्ट होता. आपलीं आयुधें घेऊन उत्साहानें बाहेर पडलेली मंडळी बाजारांत येतांच दंग्याला सुरुवात झाली. कांहीं जण खाटकांच्याबरोबर दोन हात करण्यांत गुंतले तर कांहींनीं दाव्याच्या गाई सोडल्या. बराच रक्तपात झाला. चार पांच खाटीक जिवानिशीं मारले गेले. कांहींना जखमा झाल्या. तरुण मंडळींतील कांहींजण घायाळ झाले. आतां गाई आपणांस लाभत नाहींत असें पाहून पळतां पळतां खाटकांनीं कांहीं गाई जखमी केल्या. मंडळींनीं फार दूरवर पाठलाग करून त्यांना पळवून लावलें. आज आपण किती बहादुरी केली असें प्रत्येकाला वाटूं लागलें. सर्वजण मोठ्या अभिमानानें परत आले.

"महाराज, आपल्या चरणप्रतापानं आम्हीं खाटकांच्या हातून सर्व गाई तर सोडविल्या; पण त्या झटापटींत त्यांच्या लांब पल्लेदार तरवारींनीं बऱ्याच गाई जखमी मात्र झाल्या आहेत. आमच्याजवळ तशा तरवारी कोठून असणार? आम्ही खेड्यांतील खेडवळ माणसं! ह्या आमच्या कोयत्या-कुऱ्हाडी काय करणार?"

"काय करणार?" त्यांना जवळ घेऊन शिवाजी म्हणाला, "माझ्या गड्यांनो, असे उतावीळ होऊं नका! ह्या आपल्या कोयत्या-कुऱ्हाडीच शत्रूंचीं नरडीं फोडतील, हा विश्वास ठेवा!—जा, त्या जखमी झालेल्या गाई आणा आणि त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था करा—"

ती मंडळी जाण्याकरितां निघाली, इतक्यांत आणखी कांहीं मंडळी आली. शिवाजीनें त्या सर्वांना ओळखलें. विजापुरांत वजिराबरोबर गेलेल्या शस्त्रें विकणाऱ्या पोर्तुगीज व्यापाऱ्यांचा शोध करून येण्यास पाठविलेल्या मंडळींनीं बरोबर आणलेले ते पोर्तुगीज व्यापारीच होते. त्यांचा चमत्कारिक पोषाख पाहून 'हें काय नवीन प्रकरण आहे?' तें पाहण्याकरितां खेड्यांतील पुष्कळ मंडळी त्या ठिकाणीं गोळा झाली.

"महाराजांच्या आज्ञेप्रमाणं शोध करतां हे व्यापारी सांपडले!" शिवाजीला मुजरा करून एकजण म्हणाला, "ह्या लोकांची भाषा समजायला फार कठीण आहे खरी, पण इतक्या दिवसांच्या प्रवासांतील सहवासामुळं आपली भाषा थोडी थोडी त्यांना कळते. आपण त्यांची भेट घ्यावी." असें म्हणून त्यानें एकाला खुणेनें पुढें बोलाविलें. तेव्हां एक फिरंगी पुढें आला आणि बैराग्याच्या वेषांत असलेल्या शिवाजीकडे गोंधळलेल्या दृष्टीनें पहात राहिला. शिवाजीनेंहि त्याला हातानेंच खूण करून विचारलें. तेव्हां तो म्हणाला, "यौ सेवाजी का?"

शिवाजीनें त्याला स्वतःच्या छातीवर हात ठेवून 'शिवाजी तो मीच' असें दर्शविलें; परंतु त्याची खात्री झाली नाहीं. क्षणभरानें तो म्हणाला, "यौ पोर्टुगीझ मॉरकिंतीस एक हजार आरमस्—पांच हजार वायतेनीस!" असें म्हणून त्यानें आपल्याबरोबर आलेल्या दुसऱ्या फिरंग्याच्या खांद्यावर असलेल्या ओझ्याकडे बोट दाखविलें. त्यांचें

काय काय संभाषण झालें, तें वाचकांच्या सोईकारितां मराठींत दिलें आहे.

" शिवाजी आपलीं शस्त्रं विकत घेईल. " शिवाजी म्हणाला, " त्या ओझ्यांत तीं शस्त्रंच आहेत काय ? "

" होय. नमुन्याचीं शस्त्रं त्यांत बांधलेलीं आहेत. तुमची इच्छा असेल तर तुम्हांला दाखवितों. पाहा, कशीं नमुनेदार हत्यारं आहेत तीं ! " असें म्हणून त्यानें ओझें सोडलें. तीन लांब नळीच्या बंदुका आणि दोन सरळ व दोन वांकड्या तरवारी चामड्याच्या मोठ्या पिशवींत बांधलेल्या होत्या. तो फिरंगी त्या तरवारी सोडीत असतांना आजूबाजूला उभी असलेली मंडळी चळवळ करूं लागली. त्यानें एक लांब तरवार पुढें केली. ती हातांत घेतांना त्या शस्त्रावर सूर्याचे किरण पडून तें तळपूं लागलें. हाताला त्या शस्त्राचा स्पर्श होतांच एक नवीन चैतन्य आपण हातांत घेत आहोंत असें वाटून शिवाजीच्या मनांत किती तरी विचार भर्रकन् येऊन गेले. आपल्या पराक्रमानें राष्ट्राचें तेज वाढवून आपल्या इच्छा, आशा आणि महत्त्वाकांक्षा सिद्धीस नेणारी ही राष्ट्रदेवताच आपल्या हातीं आली, असेंच त्याला वाटलें. बराच वेळ हातांतील तरवारीकडे कौतुकानें पाहिल्यावर बाजूला उभा असलेल्या बहिर्जीला तो म्हणाला, " बहिर्जी, नुकतेच कोयत्या-कुऱ्हाडीवरून आपले हे गडी काय बोलत होते, तें तूं ऐकलंसच ! त्यांच्या हातांत जर हें शस्त्र दिलं तर ? "

" तर महाराज, म्यां पामरानं अधिक तें काय सांगावं ? असं विजयी शस्त्र हातीं आल्यावर आमचा उल्हास द्विगुणित होऊन आपले मनोरथ पूर्ण व्हायला फार वेळ लागणार नाहीं. महाराज, हें बहुमोल साधन खरंच आमच्या हातीं द्या. दिल्लीच्या आणि विजापूरच्या बादशहांनीं हीं शस्त्रं परत केलीं—"

" पण मी परत करणार नाहीं. दिल्लीच्या शहाजहान बादशहानं ज्यांना परत लावलं, विजापूरच्या महंमदशहानं ज्यांचा अनादर केला आणि जे माझ्याकडे माझाच शोध करीत आलं आहे, त्याचा मी केव्हां तरी अनादर करीन काय ? असं बहुमोल साधन हातीं आलं

असतां जें भावी यश आमच्या शत्रूंना साधतां आलं नाहीं, तें मी आज साधल्याशिवाय कसा राहीन?" असें म्हणून शिवाजी त्या फिरंग्याकडे वळून विचारूं लागला, "ह्या आपल्या सर्व शस्त्रांची किंमत काय आहे तें सांगा; आणि शस्त्रं कुठं आहेत तीं सांगा."

"ह्या सर्व शस्त्रांचा सांठा आम्हीं ठाण्याच्या खाडींत उतरला आहे; आणि सर्व मिळून किंमत दीड लाख रुपये आहे."

शिवाजी क्षणभर विचार करीत म्हणाला, "ठीक आहे. मी थोडा वेळ विचार करून सांगतों. आतां आपण थोडा वेळ विश्रांति घ्या. आपल्या जेवणाखाण्याची सर्व व्यवस्था मी करतों. मग दुपारीं आपण हा सौदा ठरवूं!"

"काय, तुम्ही हा सौदा ठरविणार?" शिवाजीकडे पाहात तो फिरंगी म्हणाला, "हीं शस्त्रं दिल्लीच्या बादशहाला घेतां आलीं नाहींत आणि तुम्हीं म्हणतां सौदा ठरवूं? छे!—शिवाजी कुठं आहे तें जर तुम्हांला माहीत असेल तर सांगा. ह्या तुमच्या माणसांनीं 'शिवाजी दाखवितों' असें सांगून आम्हांला इकडे आणलं आणि आपण फकीर-बैरागी आमची थट्टा करतां?" फिरंग्याचें भाषण ऐकून शिवाजीलाच हसूं आलें असें नाहीं तर बाजूचीहि सर्व मंडळी हसूं लागली. फिरंगी वेड्यांसारखे त्यांच्याकडे पाहूं लागले. तेव्हां बहिर्जी म्हणाला, "आम्हीं कोणीहि आपली थट्टा करीत नाहीं. आमच्या मंडळींनीं आपणांस ज्यांच्याकडे आणलं आणि आपण ज्यांच्याकडे हीं शस्त्रं घेऊन जाणार म्हणतां तेच हे आमचे महाराज आहेत!"

"काय?" आश्चर्यचकित होऊन फिरंगी म्हणाला, "हेच ते शिवाजी? आपण म्हणतां काय? नवीन बादशाही करणार ते हेच शिवाजी? —छे! मुळींच नाहीं— कधींच नाहीं. शिवाजी असा बैरागी?— बिलकूल झूट! एकदम झूट! आमचीं शस्त्रं विकत घेणारा दिल्लीचा तख्तनशीन बादशहा! त्याचं ऐश्वर्य मीं डोळ्यांनीं पाहिलं आहे. तसंच परवां विजापूरच्या बादशहाचं वैभवदेखील मीं डोळ्यांनीं पाहिलं आहे. तसंच मी हीं शस्त्रं घेऊन जाणार ते नवीन राज्यस्थापक शिवाजी

वैभवसंपन्न असले पाहिजेत. भिकार बैरागी वेष घेतलेले हेच शिवाजी असं तुम्ही सांगाल तर तें आम्ही खरं कसं मानूं?"

"मीच तो शिवाजी आहें! आणि मीच तुमचीं शस्त्रं विकत घेणार आहें. पण आतां तुमची खात्री मी कशी पटवूं?"

असें म्हणून शिवाजीनें आपल्या कृत्रिम लावलेल्या जटा काढल्या आणि अंगांतील कफनीहि दूर फेकली. त्याबरोबर खाडकन् तेथील देखावा बदलला! ते फिरंगी आश्चर्यानें थक्क होऊन 'आ' वासून उभे राहिले. तेव्हां बहिर्जी म्हणाला, "पाहिलंस बाबा, साध्या दिसणाऱ्या राखेंतच धगधगीत अग्नि कसा असतो तो!"

"बहिर्जी, आजचा मोठा सुदिन म्हटला पाहिजे. त्या जगच्चालकाची पूर्ण कृपादृष्टि आणि आई भवानीचा वरदहस्त असला म्हणजे हे योगायोग असेच जुळून येतात. ह्या व्यापाऱ्यांची इच्छा आणि माझ्या प्रतिज्ञा कशा जुळतात पाहा!"

थोड्या वेळानें आबाजी सोनदेवाला बोलाविण्याकरितां शिवाजीनें मनुष्य पाठविला. मंडळींनीं आमच्या कथानायकाकरितां उभारलेल्या पालांत सदरेची जागा राखून ठेविली होती; आणि बाजूला इतरांकरितां लहान लहान डेरे उभारले होते. शिवाजी बसला होता, त्याच्याजवळ खेड्यांतील कांहीं वयोवृद्ध मनुष्य जामानिमा घालून बसले होते. आज शिवाजीजवळ बसण्याचा आपणांस मान मिळाला, यांतच त्यांना किती तरी आनंद वाटत होता. शिवाजी अगदीं मोकळ्या मनानें त्यांच्याबरोबर बोलत होता. आबाजी येतांच शिवाजीनें त्याला आपणाजवळ बसवून घेतलें आणि कल्याणचा सुभा त्यांनीं कसा लुटला, त्या कामीं कोणीं मदत केली, किती माणसें कामीं आलीं इत्यादि सर्व हकीकत विचारली आणि मोजक्याच शब्दांत त्याचा गौरव केला. त्याचें अंतःकरण उचंबळून आलें. शिवाजीनें ती सर्व लूट आणि नक्त खजिना मोजून पाहिला; त्यांत रुप्याचीं आणि सोन्याचीं नाणीं मिळून पाऊण लाख रुपये भरले. नंतर त्यानें त्या फिरंगी व्यापाऱ्यांना बोलाविलें. शिवाजीपुढें तो द्रव्याचा ढीग पाहून 'तेच हे शिवाजी' अशी त्यांची खात्री झाली आणि मोठ्या आदर-

भावानें त्यांनीं शिवाजीला सलाम केले. शिवाजीनें त्यांना जवळ बसवून त्यांच्या खाण्यापिण्याची चौकशी केली; नंतर तो म्हणाला, "आपण आपल्या शस्त्रांची दीड लाख रुपये किंमत सांगितली. हा सौदा ओढून ताणून करावा अशी माझी इच्छा नाहीं. आपण मागितलेल्या किंमतीला मला हा सौदा मान्य आहे. त्यापैकीं अर्धी रक्कम पाऊण लाख रुपये आपण स्वाधीन करून घ्या, आणि अर्धी मालाची पोंच करून पदरांत घ्या. हें जड जोखीम नेण्याकरितां मी विश्वासू नोकर तुमच्याबरोबर देतों. त्यांच्याबरोबरच हत्यारांचा सांठा पुण्यास घेऊन या." नंतर शिवाजी बाजूला वळून आबाजीला म्हणाला, "आबाजी, ह्या लुटी-बरोबर तुम्हीं एक निराळीच लूट मिळविली आहे असं मला कळलं, ही गोष्ट खरी काय?"

"होय महाराज!" हात जोडून आबाजी म्हणाला, "त्या छाप्यांत सुभ्याची सून माझ्या हातीं लागली. महाराजांनीं तिचा स्वीकार करावा अशी ह्या दासाची इच्छा आहे."

"तुमची अशी इच्छा आहे काय?—बरं तर, घेऊन या तिला इकडे—"

"ह्या सदरेला मी तिला आणूं?—महाराज स्वतः पाहीपर्यंत तिचं नखहि कुणाच्या दृष्टीस पडूं नये अशी मीं व्यवस्था ठेविली आहे. तेव्हां ह्या सदरेंत—"

"कांहीं हरकत नाहीं. तुम्ही आमच्याकरितां आणलेली ही लावण्य-संपन्न स्त्री सर्वांना पाहूं द्या. आपल्या सुंदर कामगिरीचं जगानं कौतुक करावं, म्हणूनच ब्रह्मदेवानं तिला लावण्यसंपन्न बनविलं. ती कुणाच्या दृष्टीस पडूं नये अशा इच्छेनं तुम्ही तिला पडद्यांत ठेवाल तर तुम्ही ब्रह्मदेवाचे गुन्हेगार व्हाल!"

ह्या भाषणापुढें आबाजीला एक शब्दहि उच्चारतां येईना! मुकाट्यानें त्यानें मेणा तेथें आणविला.

"तुम्हीं आणलेल्या सुंदर स्त्रीचं आम्हांला मुखदर्शन करवा!" असें शिवाजीनें सांगतांच आबाजीनें तिला मेण्याच्या बाहेर यावयास सांगितलें. थोड्या वेळानें तोंडावरून ओढणी घेतलेली स्त्री बाहेर येऊन उभी

राहिली. त्या वेळीं तिनें नखशिखान्त ओढणीनें स्वतःला झांकून घेतलें होतें, तरी त्या वस्त्रांच्या आंतून तिच्या लावण्याची प्रभा जणूं काय बाहेर पडत आहे, असाच सर्वांना भास झाला. क्षणभरानें तिनें आपली ओढणी दूर केली, आणि शिवाजीच्या इच्छेप्रमाणें, लोकांचें कौतुक करण्याकरितां, ब्रह्मदेवानें तिला दिलेल्या सौंदर्याचें तिनें प्रदर्शन केलें! अहाहा! त्या लावण्याला उपमाच नव्हती! सर्वजण थक्क झाले! सर्वांची हालचाल बंद पडली! परंतु आमच्या चरित्रनायकानें त्या सर्वांना चटकन् शुद्धीवर आणलें. तो म्हणाला, "बाई, तुम्ही आपली ओढणी घ्या—आबाजी, आजचा दिवस बाजाराचा; पण योगायोगानं जुळून आलेल्या आनंदाचा असा सुदिनच आहे. आज पुष्कळ मौजा झाल्या! आज गोमाता प्रसन्न झाली यांत शंका नाहीं. गोमातांना कसायांच्या हातून सोडविलं; खेड्यांतील वृद्ध, तरुण, स्त्रिया, मुलं यांच्याकरितां आम्हीं बाजार केला; आम्हां वीरांची देवता आज आमच्या हातीं आली; आजपर्यंत एकदम दृष्टीस पडला नव्हता इतका खजिना आमच्यापुढं येऊन पडला. ह्या सर्व गोष्टी झाल्या, पण आपण आणलेलं हें जगांतील अप्रतिम सौंदर्य आमच्या दृष्टीस पडलं हेंच आम्ही सर्वांपेक्षां जास्त आनंदाचं समजतों. ब्रह्मदेवाचं खरं खरं कसब आज आम्हांला तुम्हीं दाखवलं! आज आमच्या देहाचं सार्थक झालं असंच आम्ही समजतों!" असें म्हणून शिवाजी त्या स्त्रीकडे पाहूं लागला. क्षणभर आपली दृष्टि तिच्याकडे एकाग्र केल्यावर तो म्हणाला, "सुंदर आई-बापांच्या पोटीं जन्म घेणारीं मुलं सुंदर होतात असं म्हणतात! मी स्वतः सुंदर नाहीं हें मला माहीत आहे; पण आमच्या मासाहेब ह्या बाईसारख्या सुंदर असत्या तर आम्हींदेखील असेच सौंदर्यवान् निपजलों असतों, खरं ना? आणि असे आम्ही सुंदर झालों असतों म्हणजे जगानं आमच्याकडे निराळ्याच दृष्टीनं पाहिलं असतं! जी गोष्ट सुंदर आहे, निर्मळ आहे आणि पवित्र आहे, तेथें देव आहे असं आमच्या मासाहेब आम्हांला नेहमीं सांगतात. आतां ह्या स्त्रीकडे पाहतांना मला आमच्या मासाहेबांत आणि हिच्यांत कांहींच फरक दिसत नाहीं! बाई, तुम्ही मला माझ्या पूज्य मासाहेबांच्या ठिकाणीं आहांत!" मासाहेबांची भावना येतांच शिवाजीनें त्या स्त्रीला हात

जोडले. तें पाहून प्रत्येकाच्या अंतःकरणावर अननुभूत पण पवित्र अशा भावनेचे तरंग उद्भवले. आपणापुढें उभी असलेली ती स्त्री मानवकोटींतील नसून शिवाजीमहाराजांना प्रसन्न होऊन आशीर्वाद देण्याकरितां प्रगट झालेली एक देवताच आहे, असा प्रत्येकाला भास झाला! क्षणभरानें तो आबाजीकडे वळून म्हणाला, " आबाजी, ह्या स्त्रीला योग्य वस्त्रालंकार आणि सौभाग्यवाण देऊन तिच्या इतमामाप्रमाणं तिला परत स्वगृहीं पोंचती करा. तुम्हीं माझ्यावरील भक्तीमुळं हिला माझ्याकडे आणलं; परंतु ह्यापूर्वी तुमची माझी ओळख नसल्यामुळं 'मी' ही व्यक्ति काय आहे, हें तुम्हांला माहीत नाहीं; म्हणून ह्या कामांत मी तुम्हांला दोष देत नाहीं; पण तुम्हीं कल्पना केली तसा हा शिवाजी नाहीं, हें आतां लक्षांत ठेवा! हा शिवाजी परस्त्रीचा अभिलाष केव्हांहि करणार नाहीं! परस्त्रीचा अभिलाष ही अधोगति आहे! इंद्र-चंद्रासारखे देव ह्या परस्त्रीच्या अभिलाषानं कलंकी झाले! रावणासारखे बलाढ्य राजे धुळीला मिळाले, इतकंच काय पण ब्रह्मदेवहि लटपटले, तेथें माझ्यासारख्या यःकश्चित् माणसाची काय कथा? जा—"

" अहाहा! हे पवित्र आणि निर्मल मनाच्या पुण्यपुरुषा! तूं धन्य, धन्य आहेस!" ती लावण्यवती म्हणाली, " तुझ्या या गुणावरून तूंच एक ह्या अखिल पृथ्वीचं राज्य करण्यास योग्य आहेस. मी अल्लाची रात्रंदिवस प्रार्थना करीन आणि माझी खात्री आहे कीं, अल्ला आपले मनोरथ लवकरच पूर्ण करील!"

" तथास्तु!" प्रत्येकाच्या मुखांतून एकभावनेनें शब्द बाहेर पडला.

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम........
विभाग........
क्रमांक........
नों. दि.........
शाखा

## २१. मराठ्याचा शब्द

सहस्त्ररश्मि सूर्यनारायण उदयाचलावर येण्याच्या बेतांत होता. त्याचें आगमन सुचविण्याकरितांच कीं काय, पूर्वदिशेकडे रक्तपताका फडकत होत्या. आकाशपटल निरभ्र असून आपल्या स्वामीच्या आगमनार्थ पुढें आलेल्या कोमल किरणांमुळें रक्तवर्ण दिसत होतें. हळूहळू त्याचीं रक्तवर्ण किरणें उंच अशा वृक्षांवर आणि बाजूच्या डोंगरांच्या उंच शिखरांवर पडून त्यांच्यावर जणूं सुवर्णरसाचा वर्षाव करीत आहेत, असा भास होत होता. अखिल पक्षिगण कर्णमधुर सुस्वर गायनानें त्याचें स्वागत करीत होता. वृक्षसमुदाय मोठ्या नम्रतेनें सूर्यनारायणाला प्रणाम करीत त्याचें किरणामृतपान करीत होता. मनाला आल्हाद देणाऱ्या पुष्पांच्या परिमलानें सर्व प्रान्त भरून गेला होता. अशा ह्या मनोहर प्रभातसमयीं निसर्गसुंदरी सृष्टिदेवता आणि मानव प्रेम आनंद आणि उल्हास यांतच मग्न असायचीं ! पण आमच्या जगपाळरावांच्या गढींत मात्र ह्या तिन्ही गोष्टींचा अभाव होता.

त्या रात्रीच्या भयंकर प्रसंगाचें वर्णन एकोणिसाव्या प्रकरणांत केलें आहे. गढीवर दरोडा पडून सुमित्रा आणि निर्मला यांना नेलें असें कळतांच नेताजी स्तब्ध झाला. तो कोणत्या उत्साहानें गढींत येण्या-करितां निघाला होता, हें वाचकांना अवगत आहेच ! तो आतां गलितगात्र बनला. सर्वत्र काळोख असल्यामुळें कांहींच दिसत नव्हतें; आणि दरोडेखोरांनीं सर्वत्र विध्वंस करून टाकल्यामुळें प्रकाशाचें साधनहि नव्हतें. जिकडे तिकडे नासधूस होऊन अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तु मात्र पसरल्या होत्या. आपणाबरोबर कण्हत कण्हत बोलत असलेला जखमी मनुष्य महाराजांच्याच पक्षाचा आहे, असें कळतांच तो मोठ्या गोंधळांत पडला. "महाराज येथें आले होते काय ? ते आतां कुठं आहेत ?" असे त्यानें प्रश्न विचारले; परंतु त्याच्या पहिल्या दोनचार प्रश्नांना उत्तरें देऊन तो बेशुद्ध झाला होता. नेताजीनें ठेचाळत सर्व गढी शोधून पाहिली, परंतु त्याला कांहींहि शोध लागला नाहीं. अरुणोदय होऊन उजाडेपर्यंत गढींतील खरी वस्तुस्थिति कळणार नाहीं

अशी खात्री होतांच तो मुकाट्यानें त्या काळोखांत दरवाजाला टेंकून बसला; प्रथम कांहीं वेळ त्याच्या डोक्यानें 'न भूतो न भविष्यति' इतका विचार केला; परंतु थोड्या वेळानें त्याला चटकन् झोंप लागली.

वर वर्णन केल्याप्रमाणें सूर्यकिरण गर्दींत येऊन त्याच्या अंगावर पडतांच तो धडपडून जागा झाला. डोळे उघडतांच सभोंवारचा भीत्युत्पादक पण करुणाजनक देखावा त्याच्या दृष्टीस पडला! आठ प्रेतें बाजूला अस्ताव्यस्त पडलीं असून चौघेजण विव्हळत पडले होते. त्यानें उठून त्या चौघांच्या जखमा बांधल्या आणि त्यांना पाणी पाजून नवजीवन दिलें!

दोन प्रहरीं नेताजी आपल्या घोड्यावर स्वार झाला आणि पुनः नवीन कामगिरीवर निघाला; परंतु कोणत्या दिशेनें कुठें जावें हेंच प्रथम त्याला गूढ पडलें. राहून राहून त्याला बाजी घोरपड्याचा संशय येई. शहरांत येतांच आपलें मन आपणांस बाजी घोरपड्याकडे कां ओढतें, हें त्याच्या लक्षांत येईना. संध्याकाळपर्यंत त्यानें बाजी घोरपड्याच्या वाड्याचा शोध लावला; परंतु कोणत्या सबबीवर देवडींतून आंत जावें, हेंच त्याला सुचेना. घोड्याची कांहीं तरी व्यवस्था लावून परत पायींच वाड्यावर यावें आणि रात्रीं वाड्यांत कांहीं गडबड झाली अगर कोणी बायकामाणसें आलीं, याचा बाहेरूनच शोध करावा, असें त्यानें ठरविलें; व बहिर्जी नाइकाबरोबर पूर्वीं तो ज्या धर्मशाळेंत उतरला होता, तेथें जाण्याकरितां त्यानें घोडा वळविला. इतक्यांत वाड्यांतून एक लंगडा मनुष्य दुसऱ्या मनुष्याच्या खांद्यावर हात ठेवून लंगडत लंगडत बाहेर पडतांना त्याच्या दृष्टीस पडला. हा मनुष्य आपल्या ओळखीचा असेल, अशी त्याला कल्पनाहि नव्हती; परंतु त्याचा घोडा त्या लंगड्या माणसाजवळून जाऊं लागतांच त्यानें हांक मारली, "नेताजीराव!"

"कोण रहिमान!—अरे वाः! अगदीं वेळेवर भेटलां! पण तुम्ही केव्हां आलां? जखमा कशा आहेत?"

"भाई, हा आतांच रखडत आलों. आतां हकीमसाहेबांकडे जातों. प—ण—आतां नको! तूं आलास, आतां बसूं देवडीवर. हकीम-

साहेबांकडे जाईल हा पोर. ये—आंत—" असें म्हणून रहिमान मागें फिरला.

"रहिमान, त्या गर्दींत तर मोठा हलकल्लोळ उडाला. रात्रीं मी जाऊन पोंचण्यापूर्वीं तेथें दरोडा पडला, आणि दोघींना त्यांनीं नेलं!"

"अरे अरे! वाईट झालं! मग आतां भाई, असं कर, तो खलिता टाक फाडून! आतां काय त्याचा उपयोग?"

"कां बरं?—मी त्या दोघींच्या शोधाला निघालों आहें. त्यांचा शोध लावल्याशिवाय मला चैनच पडायचं नाहीं."

"पण त्यांचा शोध लागणार कसा? बरं, पण नेताजीराव, तुझ्याजवळ तो खलिता इथंच आहे ना? मग एकदां वाचून तरी पाहा, म्हणजे कळेल त्यांत इतकं काय आहे तें!"

"नाहीं. रहिमानभाई, तसं माझ्याकडून व्हायचं नाहीं. मानकरीसाहेबांनीं विश्वासानं सोंपविलेलं हें काम आहे. एक देईन तर तो खलिता सुमित्राबाईंच्या हातांत देईन, नाहींतर परत जगपाळरावांच्या हातांत देईन; पण मध्येंच तो खलिता वाचण्याचं निंद्य काम माझ्याकडून होणार नाहीं."

"शाबास रे मेरे भाई! ह्यालाच म्हणतात मराठ्याचा शब्द!!" नेताजीच्या गळ्यांत हात टाकून अत्यंत सद्गदित अंतःकरणानें रहिमान म्हणाला.

"रहिमान, मराठ्याचा शब्द तो मराठ्याचा शब्द! शब्दापुढें मराठ्याला प्राणाची किंमत नाहीं! मग त्यांत वाटेल तें होवो. जग बुडत आहे असं दिसलं तरी मराठा आपल्या शब्दाला बेइमान व्हायचा नाहीं, ही खात्री ठेव!"

"खरं आहे."

* * *

# २२. आरसेमहालाचा चोरदरवाजा

" बरं भाई, मी आतां तुझी सर्व व्यवस्था करतों. आल्यासारखा दोन दिवस माझ्याकडे राहा आणि मग जा. " रहिमाननें नेताजीची सर्व व्यवस्था लावली. " मी जखमी होऊन आजारी आहें म्हणून माझी देवडीवर नेमणूक झाली आहे. तुला इथं पडून राह्यला कांहीं हरकत नाहीं. "

" पण तुमचे धनीसाहेब मला ओळखतात. ते तुला विचारतील, मग तूं काय सांगशील ? " नेताजी म्हणाला, " बरं पण रहिमान, काल रात्रीं ह्या वाड्यांत कांहीं गडबड झाली काय ? मला माझी मनो-देवता असं सांगते कीं, निर्मला—म्हणजे भानकऱ्यांची धाकटी मुलगी—इथं ह्या वाड्यांत आज आहे ! "

" छे रे ! पण मी चौकशी करतों. तूं जरा स्वस्थ रहा ! जेवण्या-खाण्याची काळजी करूं नको ! वाड्यांत मराठ्यांच्या बटकी पुष्कळ आहेत. मी एखादीला तुझं जेवण करायला सांगतों. " असें तो म्हणाला, तोंच एक मराठ्याची काळीसांवळी वीस वर्षांची पोर बाहेर आली आणि म्हणाली, " कोण रहिमान, तूं का आज देवडीवर आहेस ? आणि हे कोण ? तुझे दोस्त वाटतं ? "

" होय, माझे दोस्त आहेत. पण आवडे, ते एक जहागीरदार आहेत बरं. उगाच नाहीं हा रहिमान ! दोस्ती करील तर मोठ्यांशींच करील ! "

" तें काय विचारतां रहिमानसाहेब ! तुम्हीं देवडीवर पहारा करावा आणि गप्पा माराव्या हातभर लांब. मियां टीचभर आणि दाढी सव्वा-हात; पण हे जहागीरदार कोठचे ? ओसाड गांवचे काय ? मला तरी मिळवून दे असा एखादा जहागीरदार. "

" तुझ्याकरितांच तर हे मुद्दाम आणले आहेत. हें बघ आवडे, आज ह्यांच्या जेवण्याखाण्याची तूं व्यवस्था कर. करशील ना ? " रहिमानचें बोलणें ऐकून आवडीनें क्षणभर नेताजीकडे पाहिलें. इतका वेळ तिनें थट्टेत विषय ओढला होता; पण आतां किंचित् लक्षपूर्वक नेताजीकडे पाहतांच तिला नेताजीच्या चेहऱ्यांत मोहकपणा दिसला. त्या

चेहऱ्यांत कांहींतरी विशेष आहे असेंच तिला वाटलें. ती लाजून म्हणाली, "थट्टा करतोस! पण खरंच सांग, खरंच का हे येणार आहेत मजकडे जेवायला? माझी मीठभाकर त्यांना रुचेल का?"

"रुचेल, रुचेल! आणखी कितीदां सांगूं? पण काय ग आवडे, तूं देवडीवर कां आली होतीस?" रहिमाननें विचारलें.

"सरदारसाहेबांचा निरोप सांगायला आलें होतें. त्यांनीं सांगितलं आहे, देवडीवर जो कोणी असेल त्याला सांग, कोणीहि भेटायला आलं तरी—वजीरसाहेब आले तरीहि—सरदारसाहेब वाडयांत नाहींत, असं सांगायचं आणि कोणालाहि वाड्यांत घ्यायचं नाहीं." येवढें सांगून आवडी गेली.

थोडया वेळानें जेवण तयार असल्याचें सांगावयास आवडी देवडीवर आली. वाडा मोठा असल्यानें प्रत्येक नोकरास स्वतंत्र खोली होती. नेताजी वाडयांतून जात असतां बऱ्याच नोकराचाकरांनीं त्याला पाहिलें; परंतु त्याचा रुबाबच असा होता कीं, त्याला पाहिल्यावर त्याच्यापुढें जाणाऱ्या आवडीची थट्टा करण्याचें कोणालाहि धैर्य झालें नाहीं. खोलींत येतांच तिनें नेताजीला पाणी दिलें व मनापासून ती त्याच्या तैनातीला लागली. जेवण होत असतां त्यानें तिची माहिती विचारली. त्यानें तिला जे जे प्रश्न विचारले, त्यांचीं उत्तरें देतांना तिचा आवाज, तिचें पहाणें, तसेंच तिचा आविर्भाव, तिच्या चारित्र्याची उघड उघड ओळख करून देत होता; परंतु नेताजीनें त्या बाजूकडे लक्ष दिलें नाहीं, किंवा तिला उत्तेजनाहि दिलें नाहीं. तिच्या स्वतःबद्दल विचारून झाल्यावर नेताजीनें बाजी घोरपड्याच्या घरची हकीकत विचारली. तेव्हां ती म्हणाली, "बाजीसाहेब नेहमीं इकडे रहात नाहींत. दरबारांतून बोलावणं येतं तेव्हां येतात. त्यांची मोठी जहागीर कर्नाटकांत आहे. तेथें दोन बायका आहेत. बाजीसाहेबांना मुधोळकर घोरपडे म्हणतात."

"ह्या त्यांच्या बायका इथं असतात का जहागिरीवर असतात?" नेताजीनें विचारलें.

"मागं दरबारला येत असत तेव्हां दोघींतून एकीला तरी बरोबर घेऊन येत असत; पण अलीकडे धनीसाहेब शहरांत आले कीं, जलसे, तमाशे, मजलशी सारख्या चालू असतात. ह्या खेपेस आमच्या धनी-साहेबांनीं विशेष नाचरंग उडविले नाहींत; पण काल रात्रीं वाड्यांत एक बाई आणली आहे!"

"काल रात्रीं?—केव्हां? कोण आहे ती?" उत्सुकतेनें नेताजीनें विचारलें.

"मध्यरात्र उलटून गेल्यावर! पण ती कोण बाई आहे तें नाहीं कळलं! तिच्या तैनातीला मैनेला दिलं आहे."

"त्या मैनेला विचारलंस तर ती नाहीं का सांगणार?"

"मैना सांगेल?—नांव कशाला काढतां? मोठी कुर्रेबाज आहे ती! त्यांतून धनीसाहेबांनीं सर्वांना सक्त ताकीद देऊन ठेवली आहे कीं, वरच्या आरसेमहालांत तुम्हीं कोणींहि जातां कामा नये. पण मी मात्र जाऊं शकतें हो!" स्वतःची प्रौढी दाखविण्याच्या हेतूनें आवडी म्हणाली.

"मग मला घेऊन चल. मी तिला पाहतांच ती जर माझ्या ओळखीपैकीं निघाली तर—"

"तर काय?—ती ओळखीची निघाली तर तिलाच घेऊन जाल!"

"तुलाहि घेऊन जाईन, मग तर झालं!"

"पहा बरं; नाहीं तर फसवाल!"

"आवडे, तुला मराठ्याच्या शब्दाची किंमत नाहीं. तुला बरोबर घेऊन जाईन आणि तुझं जन्माचं कल्याण करीन."

"अगदीं खरंच ना हें?—बरं, मी नेतें तुम्हांला, पण जरा थांबा—" असें म्हणून ती खोलींतून बाहेर पडली. नेताजीनें हात धुतला आणि आवडीची वाट पहात तो बैठकीवर बसला. थोड्या वेळानें ती परत आली आणि म्हणाली, "धनीसाहेबांनीं दोन ताटं वर मागाविलीं आहेत. आतां जेवणाच्या गडबडींत असतील. चला—त्यांचं काय भाषण होईल तें आपणाला ऐकूं येईल, अशा ठिकाणींच मी

तुम्हाला घेऊन जातें. चला—" असें म्हणून ती बाहेर पडली आणि तिच्यामागून नेताजी बाहेर आला. मागल्या बाजूनें ती पागेंत शिरली. तेथें भिंतीला अंतराअंतरानें तीन घोड्यांचे नाल बसविले होते. आवडीनें त्यांतील मधल्या नालाच्या पोकळींत बोटें घालून दाबतांच भिंत दुभंग होऊन एक मनुष्य सहज आंत येऊं शकेल असा दरवाजा उघडला. नेताजीला आंत जावयास सांगून तीहि आंत गेली व मागून तिनें तो चोरदरवाजा पूर्ववत् बंद केला. आंत अगदीं अंधार होता. त्या भिंतींतील ती चोरवाट होती.

"आपण आरसेमहालाजवळ आलों!" नेताजीच्या कानाला तोंड लावून आवडी म्हणाली, "धनीसाहेब बसले आहेत त्या जवळच्या भिंतीजवळ मी तुम्हांला नेतें."

एक एक पाऊल टाकीत त्यांनीं आरसेमहालाचा चोरदरवाजा गांठला. नेताजीनें ह्या दरवाजाला कान देतांच त्याला आंतील शब्द स्पष्ट ऐकूं येऊं लागले.

नेताजीनें आरसेमहालाच्या चोरदरवाजांतून काय ऐकलं?

* * *

## २३. दीनांचा वाली आणि शत्रूचा काळ!

बाजी आरसेमहालांत आला होता. आंत येतांच त्यानें मैनेला जावयास सांगितलें; आणि 'माझ्या हुकमाप्रमाणं करा' अशी खूणहि केली.

"निर्मले, तूं जेवायला नाहीं बसलीस?—बैस, आतां माझ्याशीं संकोच धरून कसं चालेल? ये, बैस—आपण दोघं एकदम बसूं." बाजी एका पाटावर बसला आणि बाजूच्या पाटावर तिला बसावयास सांगूं लागला; परंतु निर्मलेला तो आंत येतांच एकाएकीं भीतीचा धक्का बसला. तथापि मनाला धीर देत ती म्हणाली, "तुम्ही श्रमून आला आहांत, तुम्ही बसा. मला भूक नाहीं आणि अक्काची खुशाली कळल्याशिवाय मला अन्नहि जायचं नाहीं."

" तें कांहीं नाहीं ! हें पाहा निर्मले, तूं जर अशी रागावशील तर मी तुला तुझ्या अक्काची, तसंच तुझ्या बाबांची कांहींसुद्धां हकीकत सांगणार नाहीं. मग बैस पाहूं आतां ! "

" मला अक्काची आणि बाबांची हकीकत कळल्याशिवाय मी जेवायचीच नाहीं. " तिच्या स्वरांत निश्चयीपणा दिसत होता. तो पाहून बाजीनें पड घेतली. तो पुढें म्हणाला, " निर्मले, तुझी अक्का त्या बंडखोर शिवाजीचे जीभ लांब करून गुणानुवाद गात होती ना ? त्याच हरामखोरानं हा तुम्हांवर प्रसंग आणला, समजलीस ? कपटानं त्यानं तुझ्या वडिलांना कैद केलं आणि लगेच गढीवर दरोडा घालण्याचा बेत केला. मला ही बातमी कळतांच मीं एका क्षणाचाहि विलंब न करतां येथून स्वार रवाना केले. माझ्या स्वारांना जरा का तुमच्या गढींत जायला उशीर होता, तर त्या चोरानं तुझ्या अक्काला जसं पळवलं तसं तुलाहि पळवलं असतं ! " मोठ्या आढ्यतेनें तो निर्मलेकडे पाहात पाहात हंसूं लागला. निर्मला विचारांत पडली. शिवाजीनें आपल्या बाबांना कैद केलें; आपल्या गढीवर दरोडा घातला; ह्या दोन्ही गोष्टी तिला खऱ्या वाटेनात ! पण नाहीं म्हणावें तर अगदीं मध्यरात्रीं ऐन वेळेवर बाजीसाहेबांकडून मदत आली; तेव्हां ते सांगतात तें खरेंच असलें पाहिजे, असेंहि वाटूं लागलें. मग काय ? शिवाजीच्या अनुयायांनीं त्याची महती गाइली, ती सर्व खोटी असून बाबा म्हणत होते त्याप्रमाणें शिवाजी देशसेवेचें मिष करून दरोडेखोरी करतो हीच गोष्ट खरी असली पाहिजे, असें आतां तिला हळूहळू वाटूं लागलें. ती म्हणाली, " हा शिवाजी असा आहे काय ? "

" म्हणजे ? तुला अजूनहि शंकाच आहे वाटतं ! तरी मी तुम्हांला सारखं बजावीत होतों—पण तुझी अक्का पडली हुशार ! पण भोग म्हणावं आतां त्या हुशारीचं फळ ! "

" आतां त्या गोष्टी कशाला ? अक्काचा स्वभाव तुम्हांला माहीत आहे ना ? मग आतां बाबा आणि अक्का यांना सोडवून आणण्याची काय तजवीज करतां ? अक्का, बाबा भेटल्याशिवाय मला चैन पडायचं नाहीं. "

"मग मी काय करूं म्हणतेस?—तूं सांगशील तसं करतों. आतां सर्व कांहीं तुझ्या हातांत आहे."

"मी आणखी काय सांगणार?—उद्यांच्या उद्यां बाबा आणि अक्का यांना सोडवून घेऊन या."

"त्यांना मी हां हां म्हणतां सोडवून आणीन; प—ण!"

"पण काय बाजीसाहेब?—मी येऊं का तुमच्याबरोबर?"

"वाः! तुझ्या नाजुक शरीराला श्रम दिल्यावर मग आमचं काय राहिलं? मग काय, माझं म्हणणं तुला मान्य आहे ना? तूं आतां माझी आहेस हें खरं ना? मग ऊठ पाहूं! थोडी जेव; सकाळीं मी तुझ्या आज्ञेप्रमाणं निघालोंच समज!" असें म्हणून बाजी पाटावरून उठला आणि निर्मलेजवळ जाऊं लागला.

"बाजी, नका हो नका! मी असाहाय्य तुमच्या हातीं सांपडलें म्हणून का तुम्ही माझा अंत पाहतां?—माझे बाबा!—माझी अक्का!"

"रड—वाटेल तितकी रड! आतां तुझे बाबाहि येत नाहींत मदतीला किंवा तुझी अक्काहि येत नाहीं धीर द्यायला! आतां ह्या बाजीलाच शरण ये!"

"तुमचं अंतःकरण इतकं नीच असेल अशी मला कल्पनाहि नव्हती!"

"पण आतां झाली ना? ठीक आहे, आतां तुला त्याची साक्ष पटवितों पहा!" असें म्हणून बाजीनें दरवाजा बंद करून घेतला. तोंच निर्मला धांवली आणि म्हणाली, "बाजी, दरवाजा उघडा; मला मुकाट्यानं जाऊं द्या."

"ओरड—वाटेल तितकं ओरड. तुझ्या ओरडण्यानं कोणीहि धांवून येणार नाहीं! मीं सर्वांना सक्त ताकीद देऊन ठेविली आहे. ओरड!"

बिचारी असाहाय्य गाय त्या व्याघ्रमुखांतून सुटण्याकरितां किंकाळी फोडून निर्वाणीची धडपड करूं लागली. इतक्यांत त्याच्यामागचा चोर-दरवाजा खाड्दिशीं उघडला! दरवाजा उघडण्याचा आवाज आणि

बाजीच्या कंबरेंत धाड्दिशीं बसलेल्या लाथेचा आवाज एकदमच झाला! ती लाथ इतक्या जोराची होती कीं बाजी दोन गोलांट्या खाऊन समोरच्या भिंतीवर जाऊन आदळला.

"कोण, नेताजीराव!" आश्चर्यातिशयानें निर्मलेच्या तोंडून शब्द बाहेर पडले.

"होय. अनाथ अबलांचं रक्षण करण्याची प्रतिज्ञा केलेल्या त्या शिवाजीचा हा चेला, नेताजी!"

* * *

## २४. आशा-निराशेचें द्वंद्व

"हरामखोरा! तूं इथं कसा आलास?" धडपडत उठून बाजी म्हणाला.

"चांडाळा, तुझ्याच पापानं तुला प्रायश्चित्त देण्याकरितां मला आणलं, समजलास? खबरदार! एक पाऊल जर पुढं टाकशील तर तें तुटलंच म्हणून समज! पाहा सांभाळ!" असें नेताजी म्हणतो न म्हणतो तों बाजी स्वतःला सांवरून त्याच्या अंगावर धांवून आला; परंतु नेताजीच्या प्रचंड शक्तीची अद्यापि त्याला जाणीव झाली नव्हती, असेंच म्हणावें लागतें. नाहींतर ज्यानें एका लाथेच्या फटक्यांत आपणांस दोन गोलांट्या खावयाला लावून भिंतीवर फेंकलें त्याची शक्ति किती असेल याची कल्पना करूनच त्यानें गप्प बसावयास पाहिजे होतें. क्षणभरच दोघांची लढाल्ढी झाली! नेताजीनें त्याला एका सफाईदार पेंचांत मारून जमिनीवर लोळविलें आणि छातीवर स्वार होऊन कूस, बरगड्या यथेच्छ शेकण्यास सुरुवात केली. ओरडून त्याचा घसा कोरडा पडला; परंतु वाड्यांतील एकहि नोकर धांवून येण्याचें चिन्ह दिसेना! वाड्यांतील नोकरचाकर मंडळी ही आरसेमहालांत चाललेली आरडाओरड स्पष्ट ऐकत होती. अशा प्रकारची ओरड होणार आहे, अशी आगाऊच सूचना असल्यामुळें कोणीहि धांवून न जातां उलट मजेनें आपल्या

धन्याचा शंखध्वनि ते ऐकत बसले. शेवटीं नेताजीचा मार खातां खातां बाजी बेशुद्ध पडला, तेव्हां नेताजी त्याच्या छातीवरून उठला ! बाजूला निर्मला उभी होती. तिच्याकडे क्षणभर एकाग्रतेनें पाहात त्याच्या मुखांतून एकच उद्गार बाहेर पडला—

" निर्मला ! "

" नेताजीराव ! "

लगेच त्या उद्गाराला स्वाभाविक उत्तर मिळालें.

बराच वेळ तीं दोघें एकमेकांकडे पाहात राहिलीं. नंतर नेताजी म्हणाला, " निर्मले, तूं आतां ह्या दुष्टाच्या वाड्यांत राहणार कीं, मजबरोबर येणार ? "

" पण तुम्ही मला नेणार कुठं ? "

" तूं सांगशील तेथें तुला पोंचती करीन. "

" पण—पण—तुम्ही मला फसविणार नाहीं ना ? "

" ह्या नेताजीबद्दल तुला शंका येते काय ?—निर्मले, माझं तुझ्यावर प्रेम आहे, पण तें प्रेम शुद्ध आहे. दीनांचा वाली आणि शत्रूचा काळ शिवाजी त्याचा मी चेला आहें. तुझी संकटमय स्थितींतील दयार्द्र हांक ऐकून ह्या दुष्ट बाजीच्या वाड्याच्या भिंती फोडून आलों तो फसविण्याकरितां काय ? "

" तुम्ही ज्याचे स्वतःला अनुयायी म्हणवितां, ज्यानं मोठमोठ्या प्रतिज्ञा केल्या आहेत आणि त्या प्रतिज्ञांना भाळून माझ्या अक्कानं ज्याला देव मानलं, तो तुमचा शिवाजी स्वतःबद्दल जगाला जसं भासवितो तसा तो नाहीं; म्हणून मला आतां सर्वत्र भीति दिसूं लागली आहे. "

" निर्मले, शिवाजीमहाराजांच्या देशसेवेच्या शपथेबद्दल तुझं मन साशंक होतं काय ? ह्या पाजी मनुष्याच्या शब्दावर विश्वास ठेवून शिवाजीमहाराजांच्या पवित्र देशसेवेच्या शपथेंत किती पवित्रता आणि व्यापकता आहे, याची तुला अद्यापि अंधुकहि कल्पना झाली नाहीं हेंच खरं ! ह्या संकटापुरता तरी माझ्यावर विश्वास ठेव आणि चल माझ्याबरोबर ! तूं सांगशील त्या निर्भय स्थळीं मी तुला नेऊन पोंचवितों. "

अनुक्रम ... दि.

" येतें मी—पण इथून जाणार कसं ?"

" त्याची काळजी तुला नको ! " असें म्हणून नेताजीनें बाजूला पडलेल्या बाजीच्या डोक्याचा पटका सोडला आणि त्यांच वस्त्रानें त्याचे हातपाय जखडून बांधले, व तोंडांत बोळा कोंबून तोंडहि बांधून टाकलें.

" चल—निर्मले, आतां ह्या नेताजीवर विश्वास ठेवून चल ! "

पुनः चोरदरवाजा उघडून नेताजी पुढें झाला. अद्यापि आवडी तेथेंच उभी होती. आंत चाललेला सर्व प्रकार तिनें पाहिला. त्याचा प्रत्येक शब्द ती कान देऊन ऐकत होती. आपल्या धन्याला ज्यानें लाथेखालीं लोळविलें तो हा नेताजी कुणीतरी मोठा मनुष्य आहे, असेंच तिला वाटलें. निर्मलेला घेऊन नेताजी चोरदरवाजानें आंत येतांच तो म्हणाला, " आवडे, कर हा दरवाजा बंद ! चल, आतां लवकर चल—" थोड्या वेळानें तीं तिघेंहि पागेंत आलीं. तेव्हां नेताजी म्हणाला, " आवडे, तुझा काय विचार ठरला ? तुला मीं कबूल केल्याप्रमाणं ह्या नरक-वासांतून बाहेर काढून बरोबर घेऊन जाण्यास तयार आहें. "

" चल, आवडा, चल ! माझ्या सोबतीला चल. मी तुला नाहीं कधीं विसरणार ! चल, तुला माझ्या गळ्याची शपथ आहे. " निर्मलेची करुण याचना ऐकून आवडीचें मन द्रवलें. ती त्यांच्याबरोबर जाण्यास तयार झाली. लगेच नेताजीनें पागेंतील दोन घोडे सोडले आणि बाजूच्या भिंतीला टांगलेल्या दोन गाद्या काढून त्या घोड्यांच्या पाठीवर कसल्या.

गढींत येईपर्यंत नेताजी एक चकार शब्दहि बोलला नाहीं. निर्मलाहि गप्पच होती; परंतु त्यांचे विचार मात्र चालले होते. निर्मलेनें आपणाविषयीं, महाराजांविषयीं आणि त्यांच्या पवित्र ध्येयाविषयीं शंका घेतली ही गोष्ट त्याच्या मनाला फार लागली ! आपणाला तिची शंका कशी फेडतां येईल याचाच तो विचार करीत होता. निर्मलेला स्वतःविषयीं एक गोष्ट फार लागून राहिली. नेताजीच्या शुद्ध प्रेमाला आपण झिडकारून बाजीच्या नीच प्रेमाला आपण जवळ केलें, यांत स्वतःच्या मनाला पारख कशी करतां आली नाहीं, याचा ती विचार करीत होती. मध्यरात्रीच्या सुमारास ती मंडळी गढींत आली. नेताजीनें

देवडीवर येतांच साजबाला हांक मारली. तो पुढें येतांच प्रथम नेताजीनें जखमी झालेल्या मंडळींची चौकशी केली. तो म्हणाला, " साजबा, ही तुमची धाकटी मालकीण परत आणली आहे. आतां तिच्या रक्षणाची काळजी तुम्हांवर आहे. मी माझ्या एका कर्तव्यांतून आणि दारुण वचनांतून मोकळा झालों. जातों मी आतां—" असें म्हणून नेताजीनें आपला घोडा वळविला; तें पाहून निर्मला दुःखित स्वरानें म्हणाली, " असं निर्वाणीचं बोलून अंतःकरणाला घरे पाडून जाणार का ?—"

" निर्मले, एका शब्दानंहि तुझ्या अंतःकरणाला दुखविण्याची माझी इच्छा नाहीं, आणि मी तुला कधीं दुखविणारहि नाहीं; पण महाराजांच्या पवित्र ध्येयाविषयीं कोणींहि घेतलेली शंका मला—ह्या नेताजीला—कशी सहन व्हावी ? तूंच सांग. "

" संकटपरंपरेनं माझं मन शंकित झालं, त्याला मी तरी काय करूं ? "

" म्हणूनच मला राहतां येत नाहीं. शिवाय माझं दुसरं कर्तव्य अद्यापि पूर्ण झालं नाहीं; त्याकरितां मला गेलंच पाहिजे. "

" कोणतं कर्तव्य ? "

" तुझ्या असाहाय्य अक्काला दरोडेखोरांच्या हातून सोडविणं ! "

" प—ण, पण, अक्काला शिवाजीनं नेलं आहे ना ? "

" अरेरे—निर्मले, किती अमानुष कल्पना ही तुझी ? —महाराजांच्या ध्येयाविषयीं तुझी कशी खात्री पटवूं ? त्या नीच बाजीच्या सांगण्यावर तुझा इतका विश्वास आणि मी इतक्या तऱ्हेनं सांगत असतां तुला माझ्या सांगण्याचा विश्वास वाटूं नये काय ? "

" मग बाजीनं मदतीकरितां स्वार कसे पाठविले ?— शिवाजीनं बाबांना कैद करून आमच्या गढीवर दरोडा घालण्याचा घाट घातला आहे, हें कळतांच बाजीनं मदत पाठविली, हें तरी खरं ना ? "

" हें अगदीं निखालस खोटं आहे. शिवाजीमहाराज दरोडेखोर नाहींत ! निर्मले, यांत खात्रीनं गैरसमज किंवा दिशाभूल होत आहे ! तूं समजतेस तसे शिवाजीमहाराज नाहींत ! "

" मग तशी माझी खात्री पटवून द्या ! " निर्मला जोरानें म्हणाली.

“ आणि खात्री पटली तर ? ” नेताजीनेंहि जोरांत विचारलें.

“ तर—तर—तर— ! ” निर्मला अडखळली.

“ तर काय, बोल ? ”

“ तर आणखी काय सांगूं ? ” निर्मलेच्या आवाजावरूनच ती आणखी काय सांगणार हें नेताजीच्या चटकन् लक्षांत आलें. थोडा वेळ थांबून ती म्हणाली, “ तर माझ्या मनाची मला ओळख पटेल ! ”

“ म्हणजे ?—अद्यापि तुला तुझं मन ओळखतां आलं नाहीं काय ? ”

“ ओळखलं ! आतां ओळखलं ! पण तेंच तें मन, अशी खात्री पटवा म्हणजे बाजीच्या बाबतींत झाली तशी चूक तरी पुढं नाहीं होणार ! ”

“ ठीक आहे. तर ही खात्री पटवून घेण्याकरितां तुला माझ्याबरोबर आलं पाहिजे. ”

“ तुम्ही न्याल तिकडे येईन. ”

“ पण विश्वास आहे का ? ”

“ असंच का मला पुढं छळाल ? ”

* * *

## २५. सूक्ष्म मनाचे तीव्र संदेश

“ शिवबा, आलास ! ये बैस ! तानाजी, बाजी, तुम्हीहि बसा ! ” जिजाबाईनें त्या सर्वांना आपणांजवळ बसवून घेतलें आणि पुढें विचारलें, “ काय, तुमच्याकडे सोंपविलेल्या मुलखाची व्यवस्था कशी काय आहे ? ”

“ ठीक आहे, आईसाहेब ! ” तानाजी म्हणाला, “ दादोजींनीं आंखून दिल्याबरहुकूम व्यवस्था चालविली आहे. ”

“ दादोजी जी पद्धत घालून देतील ती फायद्याचीच असणार हें लक्षांत ठेवून तशीच पद्धत सुरू करा.—काय काय व्यवस्था केलीत ती सांगा पाहूं ! ” पुनः जिजाबाईनें विचारलें.

" लोकांच्या मालकीच्या आणि गांवच्या हद्दी प्रथम ठरवून टाकल्या. सर्व मुलूख फिरून लागवडींत असलेल्या जमिनींची मोजणी आणि प्रतबंदी करून पिकांच्या मानानं वसूल ठराविले. नवीन जमिनी धाऱ्यानं लागवडीला दिल्या. नवीन वस्तीकरितां आणि लागवडीकरितां जंगलं-रानं तोडण्याचे ठेके दिले. वाघ, लांडगे, तरस अशीं जंगली जनावरं मारून आणणाराला इनाम ठेवलं आणि बागाईत लावणाराला दहा झाडांवर एक झाड मालकीचं करून देण्याचं ठरविलं आहे. " तानाजीनें आपण चालविलेल्या कामाचा सरळ तपशील दिला. हा तानाजीनें दिलेला कामाचा अहवाल ऐकून जिजाबाईला आनंद झाला. जबाबदारी टाकल्याशिवाय मनुष्याची कर्तबगारी दिसून येत नाहीं, ह्या म्हणण्याची तिला सत्यता पटली आणि हीच मावळे मंडळी आपल्या पुढल्या योजनेला उपयोगीं पडतील अशीहि तिची खात्री झाली. ती म्हणाली, " जनावरं मारून आणणाराला इनाम ठेवलं आहे, तें प्रत्येकीं काय आहे ? "

" दोन, चार, आठ पैसे प्रत्येकीं ठेवले आहेत. वाघ मारून आणणाराला आठ, तरस मारून आणणाराला चार आणि लांडग्याला दोन पैसे, अशीं इनामं दादोजींनींच ठेविलीं आहेत. "

" एक मनुष्य रोज किती जनावरं मारतो ? "

" त्याचा कांहीं नेम नाहीं, आईसाहेब. एखादे दिवशीं चार मारतो, कधीं दोन मारतो, तर कधीं मिळतहि नाहीं. "

" मग असं करण्यापेक्षां महिना ठराविक वेतन देऊन ह्याच कामावर माणसं कां ठेवीत नाहींत ? त्यांत फायदा होईल. "

" होय; ह्यापुढं असंच करावयाचं आहे, असं परवां दादोजी मला म्हणाले. "

" तुमची ही व्यवस्था ऐकून मला आनंद झाला. असंच नेटानं काम करा कीं तुमचीं खेडीं दोन वर्षांनीं शहरं बनतील ! बरं शिवबा, तुझी काय खबर आहे ? मला ऐकूं दे ! " शिवाजीच्या पाठीवरून हात फिरवीत जिजाबाईनें विचारलें, " बजाजीराव मुसलमान झाले, हीच ना खबर ? "

"होय—" म्हणून शिवाजीनें साद्यंत हकीकत आपल्या आईला सांगितली.

"बजाजीरावांना मुसलमान राहूं देणं केव्हांहि चांगलं नाहीं! एक तर ते आपले जवळचे नातेवाईक, तेव्हां आपणांला लांछन आहे; शिवाय आपणांला ते फार उपयोगी आहेत."

"पण त्याला आतां करायचं काय? झाली गोष्ट होऊन गेली."

"ती पुनः पूर्ववत् केली कीं झालं!—हे पाहा दादोजी आले!—या असे. जवळ बसा—" दादोजी मुजरा करून बसल्यावर जिजाबाई पुढें विचारूं लागली, "बजाजीरावांबद्दल मीं विचारलं होतं, त्याची केलीत का चौकशी?"

"केली मासाहेब. आपण म्हणतां त्याप्रमाणं प्रायश्चित्त देऊन त्यांना शुद्ध करून घेतां येतं!"

"येतं ना?" आनंदित होऊन जिजाबाई म्हणाली, "मग शिवबा, ऊठ; बजाजीरावांना हरप्रयत्न करून इथं घेऊन ये. हा पुरुष हातचा जातां उपयोगी नाहीं. हें काम अत्यंत महत्त्वाचं आहे आणि तें प्रथम झालं पाहिजे!"

"जशी मासाहेबांची आज्ञा! मलाहि हें काम महत्त्वाचं वाटतं."

"मग आबासाहेबांबरोबर आम्हां दोघांनाहि जाण्याची परवानगी असावी, आईसाहेब!" हात जोडून तानाजी म्हणाला, "मागच्या खेपीं नवीन कामं आमच्याकडे दिलीं म्हणून आमचं जाणं झालं नाहीं; पण आतां आम्हीं कामाची बरोबर व्यवस्था लावली आहे. दादोजींनीं पाहिलीच आहे."

"होय. दोघांचींहि कामं अगदीं चोख आहेत!" दादोजी म्हणाला, "बरं मासाहेब, आतां आबासाहेब आले आहेत, तेव्हां राजांना केव्हां पत्र लिहायचं? इकडच्या पत्राची ते वाट पाहात असतील!"

"लिहा—शिवबानं सांगितलं तसंच पत्र लिहा. इकडच्या जहागिरीच्या व्यवस्थेलाच आतां वसुली पुरत नाहीं, म्हणून यापुढं इथली वसुली पाठवितां येणार नाहीं."

"तसं लिहितों, पण राजांच्या मनाला क्लेश होतील!"

"त्या गोष्टीला आतां नाइलाज आहे म्हणून एकदां तुम्हांला मीं सांगितलंच आहे! बरं, पण तोरणा गडावरच्या मजुरांच्या वेतनाची काय व्यवस्था केलीत?"

"काय करूं मासाहेब? मी त्याच फिकिरींत आहें. परवां आबासाहेबांनीं आणले होते पैसे, पण तेहि त्या व्यापाऱ्यांना दिले; ते आतां शिलकेंत असते तर राजमहालाचं आणि बागेचंहि काम पुरं झालं असतं!"

"दादोजी, तुम्ही त्या पैशावर का अवलंबून होतात?" शिवाजीनें मध्येंच विचारलें, "मीं ते बाहेर मिळविले आणि बाहेर घालविले! पण ते अनाठायीं तर नाहीं ना घालविले? मला शस्त्रांची आवश्यकता जास्त आहे. मी म्हणतों, तुम्हीं हा राजमहाल कां बांधायला सुरुवात केलीत? आम्हांला त्याची आवश्यकता नव्हती. ह्या मोडक्या वाडयांत मला राजमहालापेक्षां इंद्रमहालाइतकं सुख आहे. त्या महालांत गुंतलेले पैसे तिकडे लावले असते, तर इतक्यांत माझा तोरणा मजबूत झाला असता! मला प्रथम तोरणा पाहिजे!"

"मिळेल! मी त्याच उद्योगाला लागलें आहे. तूं जाऊन बजाजी-रावांना परत घेऊन येईपर्यंत तोरणा तयार होईल. मलाहि तेथें एक चक्कर द्यायची आहे. एक दोन दिवसांत जाईन पोरींना घेऊन! त्यांतून ती लक्ष्मी बाळंत होऊन बरेच दिवस झाले. तिच्या मुलाला बाळलेणीं पाठवायचीं आहेत, तींहि घेऊन जाईन बरोबर!"

दुसऱ्या दिवशीं पुन: विजापुरास जाण्याचें नक्की ठरलें. बरोबर तानाजी, बाजी, बहिर्जी आणि इतर बरीच मंडळी घेण्याचा शिवाजीनें विचार ठरविला. बराच वेळ तो जिजाबाईजवळ बसून विजापुरांत असतांना आणि तेथून येतांना ज्या गोष्टी घडल्या त्या सर्व सांगत होता. गढींतला प्रकार सांगतांना सुमित्रेबद्दल त्यानें कांहींहि सांगायचें चोरून ठेवलें नाहीं. तें सर्व ऐकून जिजाबाई म्हणाली, "इतकी दृढ-निश्चयी आणि धाडसी मुलगी आहे ती?"

"आई, तूं प्रत्यक्ष पाहिलीस कीं तुझीहि खात्री होईल! तिचं तन-मन सारखं माझ्याकडे लागलं आहे."

" अस्सं, अस्सं !—पण सईला खपेल का ? " हसत हसत जिजाबाईनें म्हटलें.

भोजनोत्तर शिवाजी आपल्या शयनागारांत आला खरा, पण त्याचें मन सुमित्रेभोंवतीं घोटाळत होतें. सईपासून त्याला ती गोष्ट लपवून ठेवायची नव्हती. शिवाजीच्या कार्याची सईबाईला पूर्ण कल्पना होती. त्याबद्दल पति-पत्नींत नेहमीं संभाषणाहि होत असे. दोघांच्याहि जिवाला राष्ट्रसंसाराचीच कळकळ लागली होती. आजहि तसाच विषय निघून बोलतां बोलतां शिवाजी म्हणाला,

" मीं हा राष्ट्रसंसार थाटल्यावर तूं एकटी गृहिणी तो भार कसा उचलूं शकशील ? "

" कां बरं ? इकडे माझ्याविषयीं इतकी काळजी वाटूं लागली ? " सई लडिवाळपणानें म्हणाली, " आणखी कोणी मदतीला देण्याची इच्छा आहे वाटतं ?— खरं ना ? सांगा, कोणती सुंदरी भेटली ?— आणि म्हणूनच माझी काळजी वाटूं लागली. नांव तरी ऐकूं द्या माझ्या सुंदर सवतीचं ? "

" सई, हा शिवाजी चेहऱ्याच्या सुंदरपणावर मोह पावणारा नाहीं, हें तुला माहीत आहे ना ? "

" होय. इकडचं मन अंतःकरणाच्या सुंदरपणाकडे धांव घेणारं आहे, हें मी जाणतें ! पण गडे, माझ्या बोलण्याचा राग का आला ? इकडे माझा पूर्ण विश्वास आहे. इकडून जें करणं होईल, तेंहि सुंदर होईल अशी माझी पूर्ण खात्री आहे. "

" अशीच खात्री ठेव म्हणजे आपण दोघंहि सुखी होऊं. " इतकें बोलून शिवाजी थांबला. बराच वेळ तो सुमित्रेच्या विचारांत तन्मय झाला. त्याच विचारांत त्यानें सईच्या मुखाकडे पाहतांच सुमित्रा सईच्या स्वरूपांत एकरूप झालेली त्याला दिसली, म्हणूनच दचकून त्याची दृष्टि स्थिर झाली ! क्षणभरानें पुनः त्याला रूपांत बदल झालेला दिसला. सर्वत्र उजेड होऊन सुमित्रा भयभीत झाली आहे, अशा प्रकारचा देखावा त्या रूपांत दृश्यमान होऊन गेला, तोंच पुनः त्याचें रूपांतर झालें. तलावाच्या कांठीं वजिरानें जो प्रकार केला होता, तशाच प्रका-

रचा देखावा क्षणार्धांत दृग्गोचर होऊन अदृश्य झाला. परंतु वजिराच्या वेळच्या प्रकारांत आणि त्यानें पाहिलेल्या देखाव्यांत पुष्कळ फरक असलेला आतां त्याच्या लक्षांत आला. वजिरानें फक्त सुमित्रेला आपल्या घोडयावर घेऊन पळविण्याचा विचार केला होता; पण आतां त्याच्या दृष्टीपुढें आलेल्या सुमित्रेला घोडयावर घालून नेत असतां, तिच्यासभों-वार भयंकर कापाकापी सुरू आहे असें त्यानें पाहिलें !

"असं काय पाहायचं तें !" सईनें त्याच्या खांद्यावर हात ठेवून विचारताच शिवाजी त्या स्वप्नसृष्टींतून जागा होऊन सत्यसृष्टींत आला. त्यानें स्वनेत्रांवरून हात फिरविला. एकदां आजूबाजूला पाहिलें. आपण इतका वेळ स्वप्नांत होतों किंवा काय, असाच त्याला भास झाला. तो पुनः सईकडे पाहूं लागला, तेव्हां तिनें विचारलें, "हें काय ! असं तीव्र रोखलेल्या दृष्टीनं माझ्याकडे काय पाहायचं तें ! क्षणापूर्वीं दिसणारी हास्यमुद्रा अशी एकाएकीं कावरीबावरी कां झाली ? बोलायचं नाहीं का ?—नका, आतां विश्रांति घ्या ! अष्टौप्रहर विचार करूनच हें असं होतं ! त्या डोक्याला विश्रांति तरी नको का ?"

"सई, ह्या वज्रदेहाला विश्रांति कसली ? आज इतक्या दिवसांनीं मासाहेबांचं पवित्र दर्शन आणि तुझं प्रसन्न वदन पाहिलं, यांनीं माझ्या श्रमांचा परिहार झाला; आतां मी जातों. मासाहेबांची परवानगी घेऊन आतांच निघतों. कुठं तरी गडबड झाली आहे आणि त्या ठिकाणीं मी हजर असणं अत्यंत अवश्य आहे ! जाऊं मी ?"

"हें काय ? 'कुठं तरी कांहीं तरी' असं सर्वच अनिश्चित ! आणि आपण जाणार कुठं ?"

"घोडयावर मांड टाकतांच तो मला नेमकं त्याच स्थळीं नेईल ! माझ्या घोडयाला तें स्थळ माहीत आहे !"

"कांहीं तरी बोलायचं झालं ! अशानं का माणसाचं समाधान होतं ?"

"सई, तूं शहाणी आहेस ! माझ्यावर विश्वास आहे ना ?—मग मी सांगतों तें ऐक. हें पाहा, माझ्या मनाला अतिशय ओढ लागल्याचा मला स्पष्ट भास होतो; पण तुला तो कसा कळणार ? हा सूक्ष्म मनाचा तीव्र संदेश मला येतो आहे. जाऊं दे.—जा म्हण ! माझ्या देवीनं प्रसन्न

चित्तानं जा म्हटल्यावर तिचा हा कर्मवीर संकटांचे सप्तसमुद्रहि उल्लंघून यशस्वी होऊन परत येईल?"

सईची परवानगी मिळतांच शिवाजीनें झटकन् कपडे चढविले. सईनें आपल्या हातानें खुंटीवर अडकवून ठेविलेली विजयी तरवार काढून ती त्याच्या कंबरपट्ट्यांत अडकविली, आणि ती म्हणाली, "बये! विजयी होऊन ये!"

तशाच तांतडीनें शिवाजी आपल्या मातेच्या महालांत गेला. अद्यापि तीहि जागीच होती. 'अशा अपरात्री शिवबा कां आलास?' म्हणून विचारण्यापूर्वींच तो म्हणाला, "आई, मला उद्यां निघायचं' पण आतांच निघायची आज्ञा दे."

"अरे, निंबाळकरांना परत आणण्याचं काम महत्त्वाचं आहे खरं, पण त्याकरितां असा रात्रीचा दिवस करायला नको! सकाळीं सावकाश निघालास तरी चालेल!"

"पण आई, मला आतांच जाऊं दे. कुठं तरी कांहीं तरी बिघडलं आहे, असं मला वाटतं! मघां एकाएकीं माझं चित्त अस्थिर झालं! कांहीं घोंटाळा झाला असावा, असं माझी मनोदेवता मला सांगते. पण कुठं तें नक्की लक्षांत येत नाहीं!"

"मग जा, नीट संभाळून जा. आई भवानी तुझं रक्षण करो!"

शिवाजीच्या मनाला ही इतकी ओढ कोठून होती! कोण त्याला मदतीकरितां हांक मारीत होतें? कोण अशा भयंकर संकटांत सांपडलें होतें? त्याच वेळीं गढींत तो प्रकार सुरू होता आणि सुमित्रा आपल्या देवाचा धांवा करीत होती. तिच्या शुद्ध मनाला प्राप्त झालेल्या शक्तीनें केलेला तो धांवा तीव्र संदेशाप्रमाणें त्याला जाऊन पोंचला होता.

शुद्ध मनाच्या शक्तीचा कोण हा प्रभाव!

* * *

## २६. हाच तो स्वर्ग !

" बहिर्जी, परवां आपण कृष्णाकांठावरून पुण्यास गेलों. आज पुनः जाण्यास आपल्या जनावरांनीं हा निराळा मार्ग कोठून शोधून काढला ?" आजूबाजूचा वनप्रदेश पाहून शिवाजी म्हणाला, " आपलीं जनावरं मार्ग तर चुकलीं नाहींत ना ? पण त्यांच्या चुकण्यांत कांहीं तरी ईश्वरी योजनाच असणार ! हा बाजूला दिसतो तो शंभुमहादेवाचा डोंगरच ना ? येतांना आपण अवश्य दर्शन घेऊं ! "

" महाराज, ही इथं मळलेली पायवाट दिसत आहे. " मध्येंच तानाजी म्हणाला, " जवळपास वस्ती असण्याचा संभव आहे. "

" ह्या पाऊलवाटेवरून इथं मनुष्यवस्ती आहे हें सिद्धच होतं ! " शिवाजी म्हणाला, " पाहा बरं, तानाजी—बहिर्जी. तुम्ही जरा पुढं होऊन पाहून या. अशा श्वापदांच्या वस्तीला वस्ती भिडवून राहणारीं माणसं अवश्य पाहिलीं पाहिजेत ! "

त्या दोघांच्या बरोबर आणखी दोनचार जण निघाले आणि त्या मळलेल्या पायवाटेवरून माग काढीत चालले. शिवाजीहि शांतपणें ती वनशोभा पाहात विचार करीत होता. त्यानें गडींत जाण्याचें प्रथम ठरविलें होतें. त्या दोघी बहिणींची चौकशी करून मग बजाजीच्या शोधाला जावयाचें असा त्याचा विचार होता. इतक्यांत बहिर्जी आला आणि मुजरा करून म्हणाला, " महाराज, ह्या तुटलेल्या खिंडीला लागून दिसणाऱ्या पहाडांत ठिकठिकाणीं गुहा आहेत. प्रत्येक गुहेंत मनुष्यवस्तीचीं चिन्हं दिसतात. मडकीं, फुटकीं भांडीं, कांहीं नवीन तांब्यापितळेचीं भांडीं, तसंच घोंगड्या, कित्येक गुहांत नव्या गाद्या व घोंगड्या, हत्यारं अशा वस्तु आहेत. बहुतकरून लुटारू-दरोडेखोरांची ती टोळी वस्ती करून असावी असं तानाजी म्हणतो, आणि मलाहि तसंच वाटतं, महाराज ! "

लगेच शिवाजी त्यांच्याबरोबर गुहेंत आला. तेथें कांहीं भलीं मोठीं कुलुपें असलेले पेटारेहि होते.

शिवाजीच्या सांगण्यावरून तानाजीनें एका पेटाऱ्याचें कुलूप तोडलें. आंत साधारण किंमतीचे कपडे, खण, लुगडीं, जरीचे पोषाख, पटके इत्यादि कापडसामान होतें. दुसऱ्या पेटाऱ्यांतहि तोच माल होता, आणि आतां ते तिसरा पेटारा उघडणार तोंच बहिर्जीची दृष्टि दूरवर गेली. फार अंतरावर पहाडाच्या खालीं पन्नास-साठ स्वार येतांना त्यानें पाहिले. शिवाजीच्या नजरेस हा प्रकार येतांच तो म्हणाला, "हीच ती लुटारूंची टोळी ! त्यांची संख्या बरीच आहे. आपण गुहांच्या बाहेर लपून राहूं आणि ते गुहेंत जाऊन हुश्श हुश्श करीत पडले कीं हल्ला करूं !"

ठरल्याप्रमाणं त्यांनीं लगेच व्यवस्था केली. प्रत्येक गुहेच्या तोंडाशीं पूर्ववत् शिला लावून आपापल्या सोईप्रमाणें गुहेजवळ एक दोन सशस्त्र असामी लपून राहिले. तुटलेल्या कड्यालगतच एक प्रचंड शिला होती, आणि सभोंवार दाट झाडी होती, तींत शिवाजी बसून राहिला. तेथून त्याला सर्व गुहांवर नजर टाकतां येत होती.

थोड्या वेळानें ती सर्व मंडळी पटापट चढून वर आली. बहुतेक सर्व कातवडी आणि भिल्ल होते, पण तिघांचा पोषाख अगदीं भिन्न होता. सरदारी पेशाच्या थाटांत ते तिघे होते. दुसरे चौघे त्यांच्यासारख्या पण साधारण मानाच्या पोषाखांत होते. त्यांच्या बाजूनें एक स्त्री चालत होती. तिनें पदरानें सर्व तोंड झांकलेलें असल्यामुळें शिवाजीला ती कोण आहे हें जरी ओळखतां आलें नाहीं, तरी तिच्या आकृतीवर दृष्टि जातांच तो दचकला !

"हे सुंदरी ! ह्या गुहेंत आम्ही तुझं स्वागत करतों ! आतां इथल्या सर्व प्रदेशाची मालकीण तूं ! हें राज्य तुझं !" त्या तिघांपैकीं एकजण बोलत होता. त्या भिकार गढीपेक्षां सहस्रपट अधिक सुख तुला आमच्या गुहेंत प्राप्त होईल. मात्र मघांचे सर्व वेडे विचार आपल्या डोक्यांतून काढून टाक. वास्तविक तुझ्या सुंदर रूपामुळंच आम्हीं आमचा सर्व राग आणि त्वेष गिळून टाकला आहे."

"तुमच्या त्वेषाची आणि रागाची मला पर्वा नाहीं !" ती स्त्री म्हणाली. तिचा शब्द कानीं पडतांच शिवाजी विस्मयचकित झाला !

ती सुमित्रा हें त्यानें आतां ओळखलें! पहिल्या आवेशांत तो लपलेल्या जागेवरून बाहेरच येणार होता, पण लगेच त्यानें विवेक करून मनाला आवरलें!

"पुनः आम्हांला चिडवूं नकोस!—परिणाम केव्हांहि चांगला होणार नाहीं. तुला जिवंत ठेवण्यांत सुख किंवा लाभ तर नाहीं, उलट तूं आम्हां तिघांत कलह उत्पन्न करणारी होणार! शिवाय तुझ्याबरोबर दुसरी कांहीं प्राप्ति म्हणावी तर तीहि नाहीं! इतकं लांब येऊन आमचीं दोनचार माणसं मेलीं, कांहीं जखमी झालीं आणि तो खजिना हातीं लागला नाहीं तो नाहींच!"

"तो खजिना तुमच्यासारख्या नीच दरोडेखोरांकरितां नव्हता, म्हणून तो तुमच्या हातीं लागला नाहीं!"

"आम्ही नीच आणि तो शिवाजी कोण?"

"आमच्या सपाट्यांत सांपडत नाहीं, नाहीं तर दाखविलं असतं! खंड खंड करून ह्या खिंडींत फेंकला असता!"

"भागुबाईच तुम्ही! तोंडानं वाताच माराव्या. शिवाजीच्या पुढं उभं राहण्याची तुम्हांपैकीं एकाच्या अंगीं तरी धमक आहे काय? ह्या चल्गना बायकांपुढं करा आणि अशा गुहेंतच आपलीं थोबाडं लपवा!"

"आतां जास्त बोलशील तर—" तरवारीकडे हात नेऊन तो म्हणाला.

"हं—खबरदार!" तो नीच तिच्या अंगावर येतांच सुमित्रा मागें झाली, तोंच मागें असलेल्या तिसऱ्या नीचानें तिला मागून धरलें. त्याबरोबर चवताळलेल्या वाघिणीप्रमाणें आपला कोपर जोरानें तिनें त्याच्या छाताडांत मारला. तो फटका खरोखरींच फार विलक्षण त्वेषाचा होता. त्याच्या आघाताबरोबर त्या नीचाचे हात सुटले आणि दुःखा-वेगानें तो खालींच बसला. त्याच्या हातून सुटतांच "ही सुमित्रा आतां तुमच्या हातीं जिवंत लागणार नाहीं!" असें म्हणून ती खिंडीच्या बाजूला तीरासारखी धांवत सुटली! ती खिंडीच्या धारेवर क्षणभर उभी राहिली आणि हात जोडून म्हणाली, "देवा, माझ्या हृदयींच्या देवाला

विजयी करून सुखी ठेव !—हे पवित्र देवा, शिवराया ! तुझी भेट आतां स्वर्गलोकीं !"

सुमित्रा उडी टाकणार तोंच बाजूनें गंभीर ध्वनि झाला !

"....तोच हा स्वर्गलोक !"

सुमित्रा दचकून मागें झाली ! वाजूच्या झाडींतून बाहेर पडलेली ती भव्य मूर्ति पाहून सुमित्रा जागच्या जागीं थबकली !

"सुमित्रे, हा शिवाजी तुझ्या हांकेला आला पाहा !"

'शिवाजी' हें नांव ऐकतांच मागून धांवत येणारांची गाळण उडाली. पहिला सुमित्रेच्या अंगावर तरवार उपसणारा वीर तर जागच्या जागींच कोसळला ! त्याच्यामागून धांवत येणारे कसेबसे जीव घेऊन परत फिरले आणि पळत सुटले, तों त्यांना तानाजी हातांत तळपणारी नंगी तरवार घेऊन उभा असलेला दिसला ! त्याची ती धिप्पाड आकृति आणि रागानें इंगळासारखे लाल झालेले डोळे पाहून प्रत्यक्ष 'काळ' आपणापुढें उभा आहे असा भास होऊन ती सर्व पळपुटी मंडळी दुसऱ्या दिशेनें पळूं लागली. तों तिकडे बाजी पासलकर दोन्ही हातांत नागव्या तरवारी घेऊन उभा असलेला दिसला. ती मंडळी आतां सैरावैरां पळूं लागली. आपण खिंडीच्या आणि कड्याच्या बाजूला धांवत आहोंत, हें भान न राहून त्यांच्या मृत्यूच्या जबड्यांत उडया पडल्या ! पंधरावीस जण अशा रीतीनें खिंडीचा तळ काढण्याकरितां खालीं कोसळले !

सुमित्रा आज खरें समाधिसुख अनुभवीत होती ! आज प्रथमच तिनें शिवाजीला सत्यस्वरूपांत पाहिलें. तिची दृष्टि त्या भव्य मूर्तीकडे वळतांच तिनें आपल्या हृदयांत चिरस्थान घेतलेल्या देवाला चटकन् ओळखलें ! तिला अंतःस्थ खूण पटली आणि आपल्या हांकेला धांवून कोण येतो हें तिला कळलें ! शिवाजीच्या दृष्टीला दृष्टि भिडतांच तिचे नेत्र आपोआप मिटले आणि तिला समाधि लागली !

तानाजीनें त्या सर्व दरोडेखोरांना दावणीला जनावरें बांधतात त्याप्रमाणें ओळीनें उभें केलें. सर्वांचीं हत्यारें काढून घेतलीं आणि प्रत्येकाची चौकशी केली. तीन देशमुखांनीं आपण कोण तें सांगितलें. बाकीची सर्व मंडली लुटींत मिळणाऱ्या प्राप्तींत हिस्सा घेऊन साहाय्य

करणारी भिल्ल कातवडी मंडळी होती. परंतु ते सर्वजण आतां शिवाजीला शरण आले होते. देशमुख आपल्या वतनवाडीसह शिवाजीला मिळाले. त्यांच्या गुहेंत शिवाजीला बराच लाभ होण्यासारखा होता; परंतु तो दीन-दुबळ्यांना लुटून सांठविलेला ऐवज. शिवाजीनें त्याला स्पर्शहि केला नाहीं. ज्या ज्या खेडयांत त्यांनीं लूटफाट केली होती, त्या त्या खेडयांत तो माल घोडयावर लादून तेथें नेऊन दाखवावयाचा, आणि ज्याचा असेल त्याला परत करावयाचा असें त्यानें ठरविलें. नंतर शिवाजीनें निर्मलेची चौकशी केली. त्याबरोबर सुमित्रेच्या नेत्रांत पाणी आलें. तिनें दरोडयाची हकीकत सांगितली; आणि हल्ला झाला त्या-बद्दल बोलतांना ती म्हणाली, "ह्या चांडाळांनीं सर्व वाडयाचा विध्वंस करण्याचा सपाटा चालविला असतां एकाएकीं पुनः गढीवर हल्ला झाला. ही हल्ला करणारी मंडळी कोण होती हें मात्र कळलं नाहीं; परंतु आमच्या गढीवर वारंवार दरोडे व हल्ले होण्याचं कारण, आपल्या मंडळींनीं लुटून आणलेला कल्याणचा खजिना एक रात्र गढींत होता हेंच होय! त्या वासानंच हा दरोडा पडला. हल्ला येतांच या दरोडे-खोरांनीं पूर्वीं पेटविलेल्या मशाली विझविल्या. सर्वत्र एकच हलकल्लोळ उडाला. सारखी हाणामारी आणि कापाकापी सुरू झाली. मी आणि निर्मला एका कोपऱ्यांत उभ्या होतों. ती कापाकापी जवळ येतांच मी बाजूला झालें आणि निर्मला त्या गर्दींत सांपडली! माझी निर्मला— अरेरे! तिची काय दशा झाली असेल?" सुमित्रेच्या कंठांतून कंपित शब्द निघूं लागले!

"सुमित्रे, असं दुःख करूं नकोस! माझ्यावरोबर बहिर्जी आहे, त्याला आतां रवाना करून तिची खबर आणवितों. पण तुझे वडील कुठं आहेत?"

"बाजी घोरपड्याबरोबर स्वारींत गेले आहेत."

"ते जर परत आले असले तर बहिर्जी सर्व गोष्टी त्यांना कळवील, मग तूं त्यांच्याकडे जा.— तुझी इच्छा असल्यास जा!"

"त्यांनाच इकडे बोलवा. मी आतां त्यांच्या हेकेखोर स्वभावाची खात्री पटवीन!"

“ आणि त्या दिवशीं मीं पटविली नाहीं वाटतं ? मी परत येईपर्यंत तुला इथं राहायला हरकत नाहीं ना ? ”

“ सुमित्रेनें उत्तराऐवजीं फक्त हास्य केलें व एकदम आठवण होऊन विचारलें, “ पण महाराज, नेताजीराव कुठं आहेत ? ”

“ तेंच कळत नाहीं. मी गढी सोडून निंबाळकरांना भेटण्याकरितां विजापुरास जातांना त्याला कांहीं कामाची व्यवस्था करण्याकरितां पुण्यास जाण्याची आज्ञा केली होती; पण तो पुण्यास गेलाच नाहीं. त्याच्यावर एखादा प्रसंग गुदरला असावा—”

“ तसं नाहीं ! ती हकीकत फार मोठी आहे ! ” असें म्हणून तिनें निर्मलेजवळ त्यानें केलेली प्रेमयाचना, नंतर बाजीची प्रेमयाचना व त्याचा शेवट, ह्या सर्व गोष्टी सांगितल्या. त्या ऐकून शिवाजीनें बाजूला असलेल्या बहिर्जीकडे पाहिलें; त्यानें चटकन् मान खालीं घातली. तेव्हां शिवाजी म्हणाला, “ बहिर्जी, तूं जसा दीपाबाईकरितां प्रेमवेडा बनून भटकत होतास, तसा नेताजी आतां प्रेमवेडा होऊन भटकत आहे. त्यानं प्रथम तुला शोधून काढलं आणि नंतर तुझ्या दीपाबाईला सोडवून आणलं, तसं आतां तुला केलं पाहिजे. हें देवाण-घेवाण आहे. निर्मला आणि नेताजी यांना शोधून आणण्याचं काम तुलाच केलं पाहिजे. ”

“ जशी महाराजांची आज्ञा ! ”

* * *

## २७. शीलाची जागृति आणि शंकानिवृत्ति

“ हा अरण्यवास आतां माझ्या जन्माला लागला ! काय हे माझ्या आयुष्याचे धिंडवडे निघत आहेत ? विजापूर सोडलं, परत निघालों, इतका जवळ आलों पण ह्यापुढं पाऊल उचलण्याचं धैर्य मला होत नाहीं. शंभुमहादेवाचं पवित्र शिखर इकडून दृष्टीस पडतांच हृदयांत धडकी बसली ! आतां त्या कुलदैवताच्या दर्शनाचा मला काय अधिकार ?—मी मुसलमान ! घरीं तरी मी कसा जाऊं ? हें काळं तोंड

कसं दाखवूं? परमेश्वरा! माझ्या आयुष्याचे असे खेळ व्हावयाचे होते तर मला जन्माला तरी कशाला घातलंस? मीं शीलवंत मराठ्यांच्या उच्च कुलांत जन्म घेऊन शेवटीं मराठ्यांच्या धवल कीर्तीला काळोखी लावली! हें अघोर पाप मी कुठं फेडूं? शिवाजी, त्या दिवशीं तूं जर माझा कंठच्छेद केला असतास तर जगांतलं एक पाप तरी नाहींसं झालं असतं!"

कपाळावर हात मारून घेऊन बजाजी गप्प बसला! त्याचे विचार थांबले! त्याला झिडकारून शिवाजी निघून गेल्यावर बजाजी सारखा भटकत होता. त्यानें विजापुरांतील सुखचैनीवर लाथ मारून शहाजादीचा त्याग केला आणि आतां मनाला होणाऱ्या असह्य यातना भोगीत तो असा अरण्यांत दिवाभीतासारखें आयुष्य घालवूं लागला. एकदां बायकामुलांना दुरूनच पाहावें अशी इच्छा होऊन तो फलटणास येण्याकरितां निघाला; परंतु शंभुमहादेवाच्या डोंगराजवळ येतांच त्याला पुढें जाण्याचें धैर्य होईना.

गेल्या प्रकरणांत उल्लेख केल्याप्रमाणें शंभुमहादेवाच्या पिछाडीला असलेल्या पहाडांतील गुहा हस्तगत करून घेऊन शिवाजीनें सर्व व्यवस्था लावली. सुमित्रेला तेथेंच ठेवून तिच्या रक्षणार्थ बाजीला ठेवलें; बहिर्जीला नेमून दिलेल्या कामगिरीवर पाठविलें आणि आपण स्वतः तानाजीला बरोबर घेऊन मासाहेबांनीं सोंपविलेल्या कामगिरीवर निघाला. पहाडावरून उतरत असतांना खालीं वासना नदीवर कोणी पाणी पीत आहे, असें शिवाजीला दिसलें; परंतु अंतर फार दूर असल्यामुळें पाणी पिणारा कोण आहे, हें ओळखतां येणें शक्य नव्हतें. दोघेहि हळूहळू खालीं उतरले. जवळ येतांच शिवाजीनें बजाजीला तत्काळ ओळखलें. बजाजी आपणांस इतक्या जवळ भेटेल अशी त्याला कल्पनाहि नव्हती. वर सांगितल्याप्रमाणें बजाजीनें कपाळावर हात मारून घेतला, त्याच वेळीं लटकाविलेल्या तरवारीला धक्का लागून दगडावर म्यानाचा आवाज झाला. त्याबरोबर त्याचे विचार त्या दिशेला वळले. त्यानें तरवार वर उचलली आणि क्षणभर तिच्याकडे पाहात तो म्हणाला, "नको, अशी दीन वदनानं या अधम चांडाळाकडे पाहूं नकोस?

तुझा पवित्रपणा स्पष्ट दिसत आहे. मी बदललों; माझा पोषाख बदलला; माझं नांव—गांव बदललं. माझा आचार, विचार आणि कृतिसुद्धां बदलली ! पण तुझ्यांत किंचित्हि बदल झाला नाहीं. तुझा पवित्रपणा अद्यापि कायम आहे. पण माझ्यामुळं तुझं तेज लोपून माझ्याबरोबर तुला हा अरण्यवास भोगावा लागत आहे, त्याबद्दल मला क्षमा कर. देशसेवेकरितांच तुझा उपयोग करीन, अशी मीं यवतेश्वरावर महादेवाच्यापुढं शिवाजीजवळ शपथ घेतली होती. शपथेचं स्मरण झालं कीं डोकं भ्रमिष्ट होऊन जातं. अरेरे ! माझी शपथ—बजाजीनं घेतलेली शपथ—महादेवापुढं शिवाजीजवळ घेतलेली शपथ—"

"त्या शपथेची आठवण करून देण्याकरितां हा शिवाजी पुनः आला आहे." झाडींतून पुढें होऊन योग्य संधि साधूनच शिवाजी म्हणाला, "तानाजी, स्वयंस्फूर्तीनं माझ्याजवळ शपथ घेतलेल्या मंडळींत आप्तेष्टांपैकीं बजाजीराव हे पहिले ! आणि त्या शपथेला हरताळ लावणारेहि पहिलेच !"

"शिवाजी, नको— मला आतां जास्त लाजवूं नकोस ! लाजूनच हें काळं तोंड कुणाच्याहि दृष्टीला पडूं नये, म्हणून मी ह्या निर्जन वनांत आलों— हा अरण्यवास पत्करला ! आतां मला लाजवूं नकोस !"

"निंबाळकर, मी तुम्हांला लाजविण्याकरितां आलों नाहीं. तुमची हकीकत मासाहेबांना कळली आणि त्यांना अत्यंत दुःख झालं ! त्यांनीं मला तुम्हांला देण्याकरितां एक निरोप दिला आहे, तो निरोप घेऊन मीं आलों. तुम्हांला लाजविण्याकरितां आलों नाहीं. मासाहेबांचा निरोप फक्त तुम्हीं घेतलेल्या देशसेवेच्या शपथेची आठवण ठेवा !"

"अरेरे ! जें मी टाळतों, तेंच माझ्या कपाळीं येतं ! आठवण—देशसेवेची आठवण ! आतां कसली आठवण आणि कसली देशसेवा ! शिवाजी, आतां ह्या वेळेला मला ठार मारशील तर तुलाच उलट देशसेवेचं मोठं पुण्य लागेल ! मार—मार—ठार मार—!"

"नाहीं—निंबाळकर, मी तुम्हांला मारणार नाहीं. माझ्याबरोबर चला ! मी तुम्हांला घेऊन जाण्याकरितांच आलों आहें. तुम्हांला घेऊन येण्याकरितांच मला मासाहेबांनीं मुद्दाम पाठविलं आहे."

"हें पाप घेऊन मी तुझ्याबरोबर येऊन काय करूं?"

"माझ्याबरोबर या आणि स्वतःचा देह ह्यापुढं फक्त परोपकारार्थ झिजवूनच पाप धुऊन टाका आणि शुद्ध व्हा!"

"तें शक्य आहे का?"

"निंबाळकर, तुमच्यासारख्या कर्त्या पुरुषाला जगांत अशक्य असं कांहीं नाहीं."

"अशक्य नाहीं हें खरं; पण शिवाजी, धर्मांतर करून मी मुसलमान झालों आहें ना?"

"तुम्हीं धर्मांतर केलं असलं तरी तुमच्या मनानं धर्मांतर केलेलं नाहीं. तुमचं मन हिंदु आहे आणि आजन्म तें हिंदुच राहील!"

"पण माझा हा देह भ्रष्ट झाला आहे ना शिवबा?"

"तो कांहीं काल भ्रष्ट व्हावा, अशी ईश्वराची योजनाच होती. ईश्वरी लीला अतर्क्य आहे. ईश्वरी योजनेचा मला पावलोपावलीं अनुभव येतो. त्याच्या असंभाव्य, अद्भुत आणि अकल्पित योजनेचा तुम्हां आम्हां मानवांना प्राणान्तापर्यंतहि अंत लागायचा नाहीं. म्हणून म्हणतों, ईश्वर जें करतो तें आपल्या बऱ्याकरितां करतो, यावर विश्वास ठेवा!"

"खरंच शिवबा! आठवण झाली कीं तें रक्तच सारखं उसळी घेतं; पण—"

"निंबाळकर, आतां 'पण—पण' करून काय करतां? फक्त त्या तुमच्या हृदयांत घोरत पडलेलं तें मराठ्याचं मन जागं करा! निंबाळकर, हालवा—त्या अस्सल मनाला हालवा—जोरानें हालवा; म्हणजे प्रायश्चित्त देऊन शुद्ध करण्याकरितां हा महाराष्ट्र मारीत असलेली हांक त्याला ऐकूं येईल!"

आणि खरोखरीच त्यांना एक मोठी हांक ऐकूं आली! शिवाजी बोलायला आणि ती हांकेची आरोळी ऐकूं यायला एक गांठ पडली. ती आरोळी ऐकतांच बजाजीच्या सर्वांगावर अपूर्व रोमांच उभे राहिले! शिवाजीच्या म्हणण्याप्रमाणें खरोखरीच महाराष्ट्र आपणांला हांक मारीत आहे असें त्याला वाटलें!

ती हांक पहाडावरील मंडळींनीं मारलेली होती! शिवाजीनें वळून पाहिलें तों बहिर्जी धांवत येत असलेला त्याच्या दृष्टीस पडला. जवळ येतांच तो म्हणाला, " महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणं मीं देवाण-घेवाण पूर्ण केलं! नेताजी आणि निर्मला यांना मी घेऊन आलों. मला ती मंडळी इकडे जवळच वाटेंत भेटली!"

वाचकहो! नेताजी आणि निर्मला इकडे कशी आली तें आपण पाहूं. निर्मलेच्या शंकानिवृत्तीवर आपलें सर्व जीवित अवलंबून आहे, असें पाहतांच नेताजीला स्वस्थ बसवेना! निर्मलेला प्रत्यक्ष महाराजांच्या पुढें नेऊन उभी केल्याशिवाय तिच्या कलुषित मनाचें समाधान होणार नाहीं असें त्याला वाटलें; आणि तो लगेच तिला घेऊन गढींतून निघाला. आवडीहि त्यांच्याबरोबर होती. वास्तविक विचार केला तर दरोडेखोर सुमित्रेला घेऊन गढींतून निघाले, त्यांच्या-मागाहून सबंध एक दिवस उशिरां नेताजी निर्मलेला घेऊन निघाला. अर्थात् तो तितका उशिरांच यावयास पाहिजे होता; पण ती मंडळी दरोडेखोरांच्या मागाहून दोन घटकांत येथें आली. याचें कारण ते जवळच्या रहदारीच्या रस्त्यानें आले; आणि दरोडेखोर स्वतःच्या पापाला भिऊन आडमार्गानें जंगलें, दऱ्या, खिंडी तुडवीत लांबच्या मार्गानें आले, हें होय. प्रवासांत त्यांचें फारसें संभाषण झालें नाहीं. तथापि निर्मलेच्या निर्मल मनावर संशयाचें आलेलें पटल आतां दूर होत चाललें होतें. अक्काच्या सांगण्याप्रमाणें प्रेमस्थानाचा शोध करण्यांत आपल्या हातून चुकी झाली, अशी तिची आतां खात्री झाली. विशेष परिचयामुळें बाजीच्या दिखाऊ मोठेपणावर आपलें मन भाळलें होतें, आणि त्याला आपण प्रेम समजून बाजीकडे पाहात होतों अशी तिची खात्री झाली. बाजीच्या नीच वर्तनानें तिला वाटत असलेल्या त्या दिखाऊ प्रेमाला तिलांजलि मिळून खरोखरीच तिच्या अंतःकरणांत जें शुद्ध, निर्मल आणि सात्त्विक प्रेम दृढ स्थान करून बसलें होतें तें नेताजीविषयींचेंच प्रेम, त्यानेंच स्वतःच्या आचरणानें, कृतीनें आणि भाषणानें आतां बाहेर काढलें होतें. निर्मलेला तें कळलें, परंतु अद्यापि तिनें तें प्रकट मात्र केलें नाहीं, इतकेंच! बाकी प्रवासांत असतांना तिच्या वागण्यांत आणि संभाषणांत नेताजीला तें स्पष्ट दिसूं लागलें होतें.

शंभुमहादेवाच्या डोंगराजवळ येतांच अवचित समोरून येतांना बाहिर्जी त्याला दिसला. दोघांनाहि अत्यानंद झाला, पण त्या आनंदाची सलामी वहिर्जीनें निराळ्या शब्दानें दिली. तो एकदां बायकोमुळें भ्रमिष्ट होऊन रानोमाळ भटकत असतां नेताजीनें हिणविलेलें त्याच्या पूर्ण लक्षांत होतें; तेंच उसनें फेडून घेण्याच्या इच्छेनें तो म्हणाला, "का नेताजीराव, डोकं आहे ना ठिकाणावर ?— मला प्रेमवेडा ठरविलं होतंस, पण महाराज आपण !—निर्मला जवळच आहे; विचारतों तिला ! "

सर्व मंडळी पहाडावर आली. आपण महाराजांच्या आज्ञेप्रमाणें इतक्या लवकर कामगिरी बजाविली, हें सांगण्याकरितां तो उतावीळ झाला होता; पण चौकशी करूं लागतांच 'महाराज आणि तानाजी नुकतेच गेले' असें त्याला कळतांच तो तडक निघाला. पहाडावरून उतरतांना खालच्या झाडींत त्याला महाराज, तानाजी आणि बजाजी दिसले. त्याबरोबर आनंदातिशयानें त्यानें मोठ्यानें हांक मारिली, पण त्याची हांक ऐकूं जाण्यासारखी नव्हती म्हणून शरीराप्रमाणेंच मोठ्या आवाजाच्या बाजी पासलकरानें हांक ठोकली ! पुढला मजकूर वाचकांनीं वर वाचलाच आहे ! बाहेर महाराजांना मारलेली हांक गुहेंतील मंडळींना स्पष्ट ऐकूं आली. तेव्हां त्या गुहेची आतां खरी बनलेली स्वामिनी बाहेर आली. दोघी वहिणींची दृष्टादृष्ट झाली. दोघीहि एकमेकींकडे धांवल्या आणि त्यांनीं परस्परांच्या गळ्याला घट्ट मिठ्या मारिल्या !

सर्वजण गुहेंत आले. नेताजीनें सर्व हकीकत सांगितली आणि आतां आपण केवळ निर्मलेच्या शंकेचें निरसन करण्याकरितां महाराजांजवळ जाण्याकरितां निघालों होतों, असें सांगितलें. तें ऐकून सुमित्रा म्हणाली, " निर्मले, महाराजांच्या उच्च आणि पवित्र ध्येयाविषयीं तुला शंका उत्पन्न झाली, तसंच नेताजीरावांचं पवित्र आणि शुद्ध प्रेम तुला ओळखतां आलं नाहीं, हा तुझा दोष नाहीं. त्या पापी बाजी घोरपड्याची तुझ्यावर सांवली पडली होती, आणि असा कांहीं काल तुझ्या चित्ताला

भ्रम व्हायचा होता. हें विधिलेखनच होतं! बरं, आतां आंत जा. प्रथम स्नान कर, मग जेवणाची व्यवस्था करूं!"

खालच्या मानेनें निर्मला उठून आंत गेली. तेव्हां नेताजीनें हळूच आपल्या फेट्यांत लपविलेला लखोटा काढला, आणि त्या लखोट्याबद्दल थोडक्यांत सांगून तो म्हणाला, "तुमच्या वडिलांनीं हा तुम्हांला दिला आहे. निर्मलेच्या समक्ष द्यावयाचा नाहीं, असं त्यांनीं बजाविलं असल्यामुळं निर्मलेला यांतील कांहीं कळूं दिलं नाहीं!" .

सुमित्रेनें तो लखोटा हातीं घेऊन वाचला. त्यावरोबर तिच्या मुखांतून उद्‌गार निघाले, "अहा रे! बाजी घोरपड्या, तूं इतका अधमाधम आहेस! नेताजीराव, हा लखोटा वाचा. तुम्हीं हा पूर्वींच निर्मलेला दाखविला असता तर तिच्या शंकेचं झटकन् निरसन झालं असतं. थांबा, मी तिला हांक मारतें; मग वाचा." निर्मलेला हांक मारतांच ती बाहेर आली. तेव्हां सुमित्रा म्हणाली, "निर्मले, हा बाबांचा लखोटा आला आहे. पाहा यांत ते काय लिहितात. वाचा–"

**'चि. सुमित्रा हीस अनेक आशीर्वाद विशेष. मला बाजीसाहेबांनीं स्वारीच्या निमित्तानें बाहेर काढून शिरहट्टीच्या किल्ल्यावर कैद करून ठेविलें आहे. त्यांच्या म्हणण्याला निर्मला रुकार देत नाहीं, त्यामुळें चिडून त्यांनीं मला ओलीस धरलें आहे. तूं समजूतदार आहेस. निर्मलेची समजूत घाल. बाजी मोठे सरदार आहेत, श्रीमंत आहेत, असें तिला सांगून तिचें मन वळवशील तरच बाजी माझी येथून सुटका करतील. जास्त काय लिहूं?...**

तुझा दुर्दैवी बाप
**जगपाळराव विचारे'**

"मला क्षमा करा!" पत्र ऐकतांच निर्मलेनें दोन्ही गुडघे टेकून हात जोडून म्हटलें.

"मी कोण तुला क्षमा करणार?" नेताजी म्हणाला, "ज्या महापुरुषाच्या उच्च आणि पवित्र ध्येयाविषयीं तूं शंका घेतलीस, त्या पुरुषाची क्षमा माग म्हणजे झालं!—ते पाहा महाराज आले!"

शिवाजी, बजाजी, तानाजी आणि बहिर्जी पहाड चढून वर आले. शिवाजीला सत्यस्वरूपांत पाहतांच आश्चर्यचकित होऊन निर्मला म्हणाली, "हेच का महाराज? शिवाजीमहाराज ते हेच! अक्का गर्दींत बैराग्याच्या, फकिराच्या वेषांत आलेले ते हेच का?"

"हेच ते!–निर्मले, पाहा, माझ्या पवित्र देवाला पाहा आणि सर्व शंका तोडून टाक!"

शिवाजी पुढें येतांच निर्मलेनें त्याच्या पायांवर लोळण घेतली, तें पाहून त्याला आश्चर्य वाटलें. त्यानें सुमित्रेला "हा काय प्रकार आहे?" म्हणून विचारतांच तिनें सर्व खुलासा केला. तेव्हां निर्मलेला उठवून तो म्हणाला, "निर्मले, मीं तुला अंतःकरणपूर्वक क्षमा केली आहे. माझ्याविषयीं तुला शंका आली, यांत विशेष नाहीं. तूं तर बोलून चालून पोरबुद्धीची! पण समंजस आणि स्वतःला थोर मुत्सद्दी म्हणविणारे तुमचे वडील, तसंच आमचे वडील, ह्या शिवाजीच्या ध्येयाबद्दल साशंक आहेत; परंतु कालांतरानं जशी आज तुझी शंका फिटली, तशीच कालांतरानं त्यांचीहि शंका फिटेल! नेताजी, तूंहि तिला क्षमा कर आणि शुद्ध प्रेमांत तुम्ही दोघेहि सुखी व्हा. हं—कर तिचा आमच्यासमक्ष स्वीकार! अरे, अशा मांना खालीं घालून काय उभे राहिलां? तिचा हात धर, नाहींतर एखादा बाजी येऊन तिला पळवून नेईल!"

सर्वत्र एकच हंशा पिकला!

* * *

## २८. स्वराज्याचा श्रीगणेशा

" महाराज, आम्हांला थोडी तरी भाकर द्या ! आम्हांला मुशाहिरा मिळत नाहीं. जवळ पैसा नाहीं, त्यामुळं अन्न नाहीं. आज चार दिवस आम्ही उपाशी आहोंत. आम्हांला मुशाहिरा नको, पैसा नको; फक्त एक वेळ आमच्या पोटाला शिळा भाकरतुकडा द्या ! "

' शिवाजीमहाराज गडाखालीं आले आहेत ' असें कळतांच तोरणा-गडावर तटबंदीचें काम करीत असलेले मजूर आणि कारागीर काम टाकून धांवत सुटले. कित्येकांच्या हातांत खोरीं होतीं, कांहींच्या हातांत कुदळी, फावडीं होतीं, तर कित्येक उघडे बोडकेच धांवत होते. डोंगराचा उतार संपतांच शिवाजी त्यांच्या दृष्टीस पडला. त्याबरोबर मुजरा करून मोठ्या आर्तस्वरांत ते म्हणाले, " महाराज, आमची दया येऊं द्या— आम्ही रात्रंदिवस काम करतों. आम्हांला मुशाहिरा नको, पण फक्त एक वेळ शिळा भाकरतुकडा द्या ! "

" अरेरे, काय ही यांची स्थिति ! पोट पाठीला लागलं आहे ! शिवाजी, हें तुला कसं रे पाहावतं ! " अत्यंत उद्विग्न होऊन कपाळावर हात मारून शिवाजी म्हणाला, " माझ्याजवळ आत्मविश्वासाचं भांडवल पुष्कळ आहे, पण पैशाचं पाठबळ नसल्यामुळं माझ्या महाराष्ट्राला स्वातंत्र्याचा तट बांधणाऱ्या ह्या माझ्या कारागिरांची ही कोण शोचनीय अवस्था ! " शिवाजीबरोबर असलेल्या मंडळींनाहि अत्यंत वाईट वाटलें. ह्या वेळीं आपण कांहीं तरी करावें, असेंच प्रत्येकाला वाटत होतें. परंतु ती मंडळी काय करणार ? गडावर खपणारे दीड दोन हजार मजूर व कारागीर अन्नाशिवाय चार दिवस मुशाहिऱ्याचीहि पर्वा न करतां केवळ शिवाजीवरील भक्तीमुळेंच काम करीत होते. जहागिरीची नवीन व्यवस्था करण्यांत शिल्लक संपली आहे, हें शिवाजीला माहीत होतें. आतां काय करावें हें त्याला सुचेना. तो बराच वेळ स्वतःशीं विचार करीत राहिला. डोक्यांत चाललेले विचार तुडुंब भरतांच ते शब्दरूपानें हळूहळू बाहेर पडूं लागले. " हें मी कशाकरितां करतों ! बा महाराष्ट्रा ! तुला स्वतंत्र करण्याची माझी महत्त्वाकांक्षा माझ्या

दृष्टीला भलभलतं दाखवून मला भुरळ तर घालीत नाहीं ना ?—स्वतंत्र होणाऱ्या वैभवसंपन्न महाराष्ट्राचं भावी सुंदर चित्र जें रात्रंदिवस माझी महत्त्वाकांक्षा माझ्या डोळ्यांपुढं नाचवीत आहे, तें स्वप्नसृष्टींतीलच काय?—देवा ! तुझ्या मनांत माझ्या प्रयत्नानं ह्या राष्ट्राचा कधींतरी भाग्योदय व्हावा असं आहे कीं, त्यानं चिरकाल पारतंत्र्यांतच राहावं अशी तुझी योजना आहे ?—तें कांहीं जरी असलं तरी मी आतां या मजुरांची समजूत तरी काय करूं ?—" क्षणभरानें त्यानें एक दीर्घ श्वास सोडला.

" माझ्या मित्रांनो ! मला ही तुमची स्थिति पाहावत नाहीं ! माझ्याजवळ वेतन द्यायला पैसा नाहीं, किंवा दिवसांतून दोन वेळ तर नाहींच पण दोन दिवसांतून एकदांदेखील तुमच्या पाठीला चिकटलेल्या पोटाला भाकर द्यायला मी समर्थ नाहीं. म्हणून म्हणतों, जा—जिकडे तुम्हांला वेतन मिळेल तिकडे जा—जिकडे तुमच्या पोटापाण्याची सोय होईल तिकडे जा ! ह्या शिवाजीकरितां असें अन्नान्न करीत तडफडून आपल्या बायकामुलांसह स्वतःचे बळी देऊं नका ! "

" नाहीं—नाहीं ! महाराज, आम्ही आपले चरण सोडून कधींहि जाणार नाहीं. ही टीचभर खळगी भरण्याकरितां परक्यांच्या ऐषआरामासाठीं इमारती बांधण्यापेक्षां तुम्ही श्रीमंत मनानं बांधीत असलेली ही महाराष्ट्राची इमारत बांधतांना आमचे बळी पडले तरी हरकत नाहीं!"

" अहाहा ! काय ऐकतों हें मी !—माझ्या महाराष्ट्राच्या स्वतंत्रतेची इमारत बांधण्याकरितां स्वतःचे बळी देणारे हे शिवाजीचे श्रीमंत मनाचे मजूर गवंडी मित्र पाहा ! आणि त्या इमारतीच्या मजबुतीकरितां स्वतःच्या रक्ताचं पाणी घालणारे हे शिवाजीचे श्रीमंत मनाचे आडमुठे मावळे मित्र पाहा !—शिवाजी, तूं धन्य आहेस ! " सद्‌गदित स्वरानें जवळ असलेल्या गवंड्यांच्या आणि मावळ्यांच्या गळ्यांत हात टाकून शिवाजी म्हणाला. त्यांच्याहि नेत्रांतून प्रेमाश्रु टपकूं लागले !

" आमचं पोट भरलं ! चला—पळा— काम करायला चला ! आजच्या आज काम पुरं करूं. चला !" शिवाजीच्या शब्दानें पोट भरलेली ती मजूर मंडळी पटापट धांवत सुटली ! सर्वजण नव्या जोमानें कामाला लागले. ती मंडळी गेल्यावर बजाजी म्हणाला, " शिवबा, सध्यां आपण

पैशाच्या अडचणींत आहोंत आणि तिकडे विजापूरच्या खजिन्यांत टांकेटांक द्रव्य भरलेलं आहे! तो आतां जाऊन उपसण्याशिवाय दुसरा उपाय नाहीं असं मला वाटतं!"

"तुम्हांला वाटतं तसं मलाहि वाटतं, पण वाटून उपयोग काय! विजापूरकरांचा कांठोकांठ भरलेला खजिना सर्वस्वी आपला आहे! त्यांतील प्रत्येक कवडीन् कवडी आपल्या लोकांची आहे! आपल्या लोकांच्या मालकीच्या त्या पैशावर— घामाच्या त्या द्रव्यावर त्यांची घरबसल्या चैन चालली आहे, हें सगळं मला कळतं, पण माझा उपाय नाहीं. त्या खजिन्याकडे वक्रदृष्टि करतां येत नाहीं म्हणून मलाहि वाईट वाटतं?"

"कां बरं? यांत कठीण काय आहे?" बजाजी म्हणाला, "मला तेथली इत्थंभूत माहिती आहे. नेताजी, तानाजी, बहिर्जी आणि बाजी असे चौघेहि तो खजिना हां हां म्हणतां लुटून आणतील!"

"चौघे कशाला? कोणीहि एकटा तें काम करील! पण त्याकडे न पाहण्याचं कारण आमचे बाबा शहाच्या पदरीं आहेत ना? माझं कार्य उगाच त्यांच्या गळीं बसेल म्हणून मला स्वस्थ बसावं लागतं! बाबा! आपण कशाला ही परदास्यशृंखला आपल्या पायांत अडकवून घेतली आहे?" असें म्हणून शिवाजीनें पुनः एक दीर्घ श्वास सोडला. इतका वेळ बहिर्जीच्या डोक्यांत कांहीं विचार चालू होते. तो पुढें होऊन म्हणाला, "महाराज, परवां आपण तीं शस्त्रं घेतलीं, त्यांना दीड लाख रुपये दिले आहेत—"

"ते छापा घालून आणावे, असं म्हणतोस काय?" इतक्यांत शिवाजीच्या शब्दांत किंचित् कठोरता आली! तो पुढें म्हणाला, बहिर्जी, ह्या शिवाजीविषयीं तूं स्वतःचा गैरसमज करून घेऊं नकोस!— तो व्यापारी बोलूनचालून परदेशाचा असून केवळ माझं नांव ऐकून विश्वासानं माझ्याकडे सौदा करण्याकरितां आला. एका हातानं दिलेली मालाच्या किंमतीची रक्कम छापा घालून जर मीं दुसऱ्या हातानं लुटून आणली तर तो आमच्या ह्या देशांत काय पण स्वतःच्या देशांत जाऊन 'शिवाजी लुटारू' असा माझ्या नांवाचा डांगोरा पिटील! माझ्या

नांवाचा ‘ लुटारू शिवाजी ’ असा दुष्कीर्तीचा पिटलेला डंका मला नको आहे —परवां कल्याणचा सुभा आणला, ती लूट नव्हे. आमचा पैसा त्यांच्या चैनीकरितांच जात होता तो मीं परत आणला आणि त्याचा देशाकरितांच उपयोग केला. परवां विजापुरांत त्या नीच लोकांना फटके मारून पैसा घेतला ती लूट नव्हे. तो न्यायाचा दंड होता. तोहि पैसा मीं देशकार्याला लावला. मला अन्यायाचा पैसा नको आहे! काल गुहेंत त्या दरोडेखोर देशमुखांनीं किती ऐवज आणि खजिना जमविलेला तूं पाहिलास बरं? पण मीं त्याला हात लावला का? दीनदुबळ्यांना लुटून मिळविलेला तो पैसा मला नको! हा शिवाजी लुटारू नाहीं! लुटारूला आपला देश स्वतंत्र करतां यावयाचा नाहीं, लुटारूला आपल्या देशाला सुख देतां यावयाचं नाहीं आणि लुटारूला आपल्या मातृभूमीचे पांगहि फेडतां यावयाचे नाहींत. मला लूट करण्याची जरूरीच नाहीं. माझं मन श्रीमंत आहे आणि आत्मविश्वास हें माझं भांडवल आहे. ह्याच भांडवलाच्या जोरावर मीं हा तोरणागड घेतला आहे. माझं श्रीमंत मनाचं श्रीमंत अन्न जेवून ही गडावरची मजूर मंडळी आतां परत धांवत गेली! माझ्या आत्मविश्वासाच्या भांडवलावर त्यांच्याकडून आज गडाचं काम पूर्ण होईल! आतां ह्या पहिल्याच गडाची मुहूर्तमेढ रोंवतांना तुम्हां सर्वांच्या साहाय्याच्या बळावर, मासाहेबांच्या आशीर्वादाच्या जोरावर आणि वडील गुरुजनांच्या पुण्याईच्या हिंमतीवर प्रथम ह्या प्रवेशद्वारावर ह्या माझ्या शस्त्रानं मी ‘स्वराज्याचा श्रीगणेशा’ लिहून स्वराज्याचं तोरण ह्या तोरणागडावर फडकविणार! म्हणून म्हणतों, हा शिवाजी लुटारू नाहीं! खऱ्या राष्ट्रभक्ताला—निस्सीम राष्ट्रकिंकराला लूट करण्याची आवश्यकताच नाहीं. खरा देशभक्त लुटीशिवाय वाटेल तितका पैसा मिळवील! श्रीमंत मनाच्या तिजोरींत ठेवलेला आत्मविश्वास हाच त्याचा खजिना! ह्या खजिन्यानं कदाचित् आजच्यासारखे प्रसंग भागले नाहींत तर ही भूमाता आपल्या खऱ्या पुत्राला कधींहि संकटांत ठेवणार नाहीं! कशी, कोठून आणि किती पैसा त्याच्या हातीं आणून देईल याचा अंतहि लागणार नाहीं!”

इतक्यांत मोठा गलबला झाला ! सर्व मंडळी वर पाहूं लागली. यादव उड्या मारीत येत होता. त्याच्यामागें डोक्यावर हंडे घेतलेले कांहीं मजूर आणि त्यांच्यामागून कामकरी लोकांचा हजार दीड हजारांचा समूह हर्षातिरेकानें जयघोष करीत येत असलेला दिसला ! तोंच खालच्या बाजूनें बैलगाड्यांचा मोठा तांडा येतांना त्यांच्या दृष्टीस पडला.

"महाराज, गडावर हे मोहोरांनीं भरलेले हंडे सांपडले ! मीं शोधून काढले ! आणखी आहेत !" धांपा टाकीत यादव म्हणाला.

सर्वजण स्तंभित झाले ! ह्या अपूर्व व ईश्वरी अतर्क्य लीलेची साक्ष पटविणाऱ्या वार्तेनें शिवाजीच्या भाषणाची सर्वांना सत्यता पटली ! प्रत्येकाच्या सर्वांगावर अपूर्व भावनेचे रोमांच उभे राहिले. इतक्यांत त्या आनंदांत भर टाकण्याकरितांच कीं काय जिजाबाईचा मेणा घेऊन भोई तेथें आले. मेण्यांत जिजाबाई आणि सईबाई बसल्या होत्या. जिजाबाई मेण्यांतून वाहेर आली. शिवाजीबरोबर सर्वांनीं तिला वंदन केलें. ती म्हणाली, "शिवबा, गडावरील मजूर उपाशी आहेत असं मला काल कळलं ! इतक्या थराला गोष्ट आली पण मला कोणीं कळविलंहि नाहीं ! फार वाईट वाटलं, अंतःकरण तुटलं, आंतड्यांना पीळ पडला ! दादोजीजवळ शिल्लक नाहीं ! संकट पडलं, कांहीं सुचेना ! सर्व दागिने मोडले, टक्के केले आणि दोन हजार ताटांना पुरेसं अन्न तयार करून गाड्या भरल्या आणि स्वतः घेऊन आलें—हांक मार ! त्यांना प्रथम पोटभर जेवूं दे, मग मला समाधान वाटेल !"

"अहाहा ! आई, आजचा दिवस खरोखरीच ईश्वरी प्रसादाचा आहे. कधीं काळीं ह्या माझ्या महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्याचा प्रसंग आला तर ह्या तोरणागडावरील हा 'स्वराज्याचा श्रीगणेशा' सुवर्णाक्षरांनीं लिहिला पाहिजे ! आई ! तुझ्या आशीर्वादानं आतां ह्या शिवाजीला कांहीं कमी नाहीं. हें पाहा गडावर मोहोरांनीं भरलेले हंडे सांपडले !"

"शिवबा, पुढल्या पिढीचे इतिहासकार हा 'स्वराज्याचा श्रीगणेशा' सुवर्णाक्षरांनींच लिहून ठेवतील ही खात्री ठेव आणि हाच इतिहास भावी पिढीला मार्गदर्शक होईल !" बजाजी पुढें होऊन म्हणाला.

"कोण ? बजाजीराव, तुम्ही आलांत ? आनंद झाला !" जिजाबाई म्हणाली. बजाजीनें वंदन करून उत्तर न देतां खालीं मान घातली. धर्मक्षत्रासिंह लज्जेमुळें त्याला बोलवेना, हें पाहून शिवाजी पुढें म्हणाला, "आई, ही सुमित्रा पाहा आणि तिची ही बहीण निर्मला !"

"दोघींनीं पुढें होऊन जिजाबाईला वंदन केलें. जिजाबाईनें त्या दोघींना प्रेमानें जवळ घेतलें, तोंच दौड करीत कांहीं स्वार येत असलेले त्यांच्या दृष्टीस पडले. टापांचा आवाज ऐकतांच सर्वांचें लक्ष तिकडे वेधलें. स्वार जवळ येतांच त्या दोघी बहिणी हर्षानें एकदम म्हणाल्या, "बाबा आले !"

"होय ! शिरहट्टीच्या किल्ल्यांत बाजी घोरपड्यानें कैदेंत ठेवलेले ते हे जगपाळराव विचारे. शिवाजीच्या आज्ञेप्रमाणें नेताजीनें जाऊन त्यांची मुक्तता केली आणि त्यांना बरोबर आणलें. वाटेंत त्यांना नेताजीनें सर्व हकीकत सांगितली होती. आतां त्यांस आपली चुकी कळली आणि शिवाजी हा 'पोर' नसून 'थोर कार्यकर्ता' आहे, अशी त्यांची खात्री पटली. ते पुढें होऊन म्हणाले, "शिवाजी, मला माझ्या कृतकर्माबद्दल पश्चात्ताप झाला. मी तुला न ओळखतां जें बोललों, दुरुत्तरं केलीं, तुझा अपमान केला, त्याबद्दल मला क्षमा कर ! आतां हा जगपाळराव विचारे तुझा अनुयायी झाला. ह्या देहाचा अंत होई-पर्यंत तुझ्या पवित्र कार्यांत मी तुला मदत करीन अशी मी सर्वांसमक्ष शपथ घेतों." बापानें घेतलेली ती शपथ ऐकतांच सुमित्रेला अत्यानंद झाला !

ह्या एकंदर वर्णनावरून तो दिवस शिवाजीच्या म्हणण्याप्रमाणें सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्याखारखा नव्हता काय ? होय, त्यानें तोरणा-गडाच्या प्रवेशद्वारावर तरवारीच्या टोंकानें जीं अक्षरें लिहिलीं, तीं वाचून त्या काळच्या मावळ्यांत चैतन्य उत्पन्न झालें ! तसें चैतन्य भावी पिढींत उत्पन्न होण्याकरितां प्रस्तुत लेखक आपल्या लेखणीनें तींच अक्षरें लिहितो, तीं वाचा—

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
स्वराज्याचा :
नं. क्र. ५५९५. नों. दि. ........
IRBK-0105715
IRBK-0105715